## कल्याणमल्ल कवी

# अनंगरंग * रतिशास्त्र

## ग. र. मुळे

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र.



RI 1 BK-0018428

९८०२८

८८८३२
सं५९६
३९।३।८२
निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
- 7 APR 1978 अनुक्रम ८८८३२ वि: निबंध
क्रमांक २९८८ नों दि ३९-३-८२

12 SEP 1979

REFBK-0018428



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... दि: ...
... ग्रंथ दि: ...
मराठी ग्रंथ संग्रहालय

राजर्षि कल्याणमल्लकवि प्रणीत

# ।। अनङ्गरङ्ग उर्फ रतिशास्त्र ।।

।। अथातः कामजिज्ञासा ।।

।। संपादक गजानन रघुनाथ मुळे ।।

।। मॅजेस्टिक बुक स्टॉल ।।

॥ सस्कारित बारावी आवृत्ती ◇ एक मे बहात्तर ॥

॥ प्रकाशक : केशव विष्णु कोठावळे, मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुबई ४ ॥

॥ मुद्रक . वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४ ॥

॥ सजावट राजा मराठे ◇ मांडणी : अरुण घाटे ॥

॥ किंमत बारा रुपये ॥

॥ अनुक्रमणिका ॥

स्त्रियांचे प्रकार १ कामपूर्तीविषयीं विवरण : १३ पुरुषांचे, मैथुनाचे प्रकार २३ स्त्रियांच्या सामान्य धर्माविषयीं ' ३५ निरनिराळ्या देशातील स्त्रियांचे भाव आणि गुणधर्म : ५२ द्रावणादि औषधांविषयीं ६० वशीकरणाविषयीं १०० वधू कशी असावी याविषयीं . ११८ बाह्यसंभोगाविषयीं : १६२ सभोगासनाचें संशोधन १८२ परिशिष्ट २२५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्रमांक ८८४३२ वि. ...
ग्रंथांक ... नों. दि. ...
१८४२८

## ॥ पस्तीस वर्षांपूर्वी ॥

१९३६ च्या जून महिन्यात, मुंबईचे दोन वरिष्ठ गुप्त पोलिस-अधिकारी कर्जत येथें स्थानिक पोलिस-अधिकाऱ्याला घेऊन माझे घरीं आले. अनंगरंग–रतिशास्त्र हा अश्लील ग्रंथ प्रसिद्ध केल्याबद्दल मला अटक केल्याचें सांगून मुंबईला घेऊन गेले. मुंबईला गेल्यावर प्रथम पो. कमिशनरपुढें मला उभें केलें. पो. कमिशनरांनीं मला कांहीं प्रश्न विचारून मी काय व्यवसाय करतों याबाबत माझी चौकशी केली. प्राचीनकालचें कामशास्त्रीय संशोधन; असें मी उत्तर दिलें. नंतर चीफ प्रेसि. मॅजि. मि. होर्मसजी दस्तूर यांचे पुढें उभें केलें. त्यांनीं माझेवरील आरोपाची चौकशी पोलिस-अधिकाऱ्याजवळ केली; आणि पुस्तक पाहण्यास मागितलें. पुस्तक पाहिल्यावर मला कांहीं प्रश्न विचारले. माझा व्यवसाय आणि संशोधन सांगितल्यावर माझे-पुढें हा खटला नको. माझगाव कोर्टात हा खटला चालेल असें सांगून त्यांनीं ५०० रु. च्या जामिनावर मला ताबडतोब मोकळें केलें.

## ॥ कोर्टात ॥

प्रेसि. मॅजि. मि. ब्राऊन, बार–अॅट–लॉ यांचे कोर्टात सदर खटला सतत चार वर्षें चालला. माझे वकील मुंबईचे श्री. वि. ज. ऊर्फ बाळासाहेब घारपुरे M A, LL B. यांनीं अत्यंत परिश्रम घेऊन मोठ्या चिकाटीनें हा खटला कोर्टाला उत्तम प्रकारें समजावून दिला. प्रेसि. मॅजि. मि. ब्राऊन हे फिलॉसफीचे मोठे भोक्ते असल्यामुळें कामशास्त्राची हिंदु फिलॉसफीविषयीं बरीचशी सूक्ष्म चर्चा करून कामशास्त्राची आवश्यकता विवाहितांना का व कशी आहे याची माहिती श्री. घारपुरे यांनीं कोर्टाला पटवून दिली.

## ॥ निर्दोष ॥

१९४० च्या जुलै महिन्यांत प्रेसि. मॅजि. मि. ब्रॉऊन यानीं मला निर्दोषी ठरवून सोडून दिलें. माझें लेखी निवेदन आणि त्याचें निकालपत्र छापलें आहे. वाचकानीं तें वाचल्यावर कोर्टाला कामशास्त्रीय हिंदु तत्त्वज्ञान आम्हीं जें कांहीं सांगितलें त्याची थोडीशी कल्पना वाचकाना येईल.

## ॥ हिंदु जीवनाचें साफल्य ॥

या ग्रंथात संशोधन करून छापलेल्या टीपा वाचकाचे ठायीं बहुश्रुतपणा आणि त्याचे बुद्धीचे ठायीं विशालपणा प्राप्त करणाऱ्या आहेत. वाचकाचे या ज्ञानात भर टाकणाऱ्याहि आहेत. अज्ञानानें अधोगति, शैक्षणिक ज्ञानानें उन्नति हा सिद्धान्त मानवी जीवनांत महत्त्वाचा आहे. ज्ञानानंद, संभोगानंद, ब्रह्मानंद हे तीन आनंद तुल्यबल आहेत. हे तीन आनंद मानवांची उन्नति करणारे आहेत. अशा या तीन आनंदाची प्राप्ति त्या अमोलिक टीपा अभ्यासपूर्वक निरीक्षण करून वाचणाऱ्यास होईल. त्यायोगें त्यांचें इहलोकींचें जीवन सफल झाल्याची त्याना धन्यता वाटेल.

आमचे संशोधनांत असें दिसून आलें कीं, हा ग्रंथ कवीनें लिहिला त्या काळीं कामशास्त्राचा प्रसार इतका झाला होता कीं काहीं काहीं लेण्यातील शिल्पांमध्यें संपूर्ण कामशास्त्र चित्रित केलें गेलें. याची थोडीबहुत तत्कालीन माहिती वाचकाना मिळावी म्हणून खजुराहो येथील शिल्पाचें काहीं नमुने चित्रित करून प्रकरणांवर छापले आहेत.

: गजानन रघुनाथ मुळे



प्रकरण पहिले

## ॥ स्त्रियांचे प्रकार ॥

दा. क्र. १८६२

॥ मंगलाचरणश्लोक ॥

अतिललितविलासं विश्वचेतोनिवासं
समरकृतविकाशं शंबराख्यप्रणाशम् ।
रतिनयनविरामं संततं चाभिरामं
प्रसभविजितवामं शर्मदं नौमि कामम् ॥ १ ॥

अत्यंत सुंदर, विलासी, सर्व जीवांचे चित्तांत राहाणारा, युद्धप्रसंगीं प्रकट होणारा, शंबरासुराचा नाश करणारा, रतीच्या आणि लोकांच्या नेत्रास

शांतिकारक, निरंतर आनंदमय, बलात्कारानें सर्वांचें चांचल्य जिंकणारा, कल्याणदायक, असा जो कामदेव, त्यास नमस्कार करितों.

आरंभिलेल्या कार्यांत विघ्नें येऊन तें कार्य बिघडूं नये म्हणून ज्या विषयाची जी देवता असते तिचेंच मंगलाचरण लिहिण्याची हिंदूंची पद्धत आहे. 'धर्म' पुरुषार्थाचे ठायीं धर्मदेवता, 'अर्थ' पुरुषार्थाचे ठायीं अर्थदेवता, 'काम' पुरुषार्थाचे ठायी कामदेवता अधिष्ठित असतात, अशी हिंदुपंडिताची समजूत असल्यामुळें त्या त्या देवतांना प्रसन्न करून घेण्यासाठीं त्याची योग्य उपासना कशी करावी याची सशास्त्र माहिती उपासकांना ग्रंथद्वारें मिळावी म्हणून ग्रंथ लिहिले. कारण, योग्य उपासना केली असतां त्या त्या देवता प्रसन्न होऊन उपासकांच्या 'रक्षक' बनतात. अयोग्य उपासना केल्यास त्याच देवता उपासकावर उलटून क्रोधाविष्ट होतात व 'रक्षका'च्या ऐवजीं 'भक्षक' बनतात. असें होऊं नये म्हणून कार्यारंभीं त्या त्या देवतांना नमस्कार करतात! या ग्रंथाचा विषय मानवाला 'काम' पुरुषार्थाची प्राप्ति हा आहे. म्हणून कामदेवालाच नमस्कार केला आहे. त्यायोगें कामदेवता प्रसन्न होऊन कामदेवतेच्या उपासकांना निरनिराळ्या–कामक्रीडा अर्थात् संभोगक्रीडा करण्याचें अद्‌भुत सामर्थ्य प्राप्त होतें. आद्य कामशास्त्रकार नन्दि (महादेवाचा अनुचर) यानेंहि आपल्या कामशास्त्रग्रंथात "सर्व जगाला कामप्रेरणा करणाऱ्या कामदेवा, कल्याण आणि संतोष होण्यासाठीं नपुंसक नव्हेत अशा स्त्री-पुरुषाचे मनोवृत्तीत संभोगाची प्रेरणा कर" अशाच अर्थाचें मंगलाचरण लिहिलें आहे.

लोदीवंशावतंसो हतरिपुवनितानेत्रवारिप्रपूर-
प्रादुर्भूतांबुराशिरमलवरयशा लीलया प्लावितारिः।
तत्पुत्रः ख्यातकीर्तिरहमदनृपतिः कामसिद्धांतविद्वान्
जीयाल्लीलाडखानः क्षितिपतिमुकुटैर्घृष्टपादारविंदः ॥ २॥

पूर्वी लोदीवंशांत मुगुटमणि अहमद म्हणून राजा होता. त्यानें सर्व शत्रु मारून शत्रूंच्या स्त्रियाचे नेत्रोदकानें समुद्र उत्पन्न केला; असे सर्व शत्रु बुडवून बहुत यश मिळविलें आणि लीलेनें राज्य केलें. पुढें त्याचा पुत्र लाडखान म्हणून राजा झाला. त्यानेंही सर्व राजे जिंकून आपणाधीन केले; तेंव्हा सकल नृपति त्याचें पदकमल वंदन करूं लागले; असा तो राजाधिराज कामशास्त्रात निपुण होऊन राज्य करीत होता.

राज्यप्राप्ति, राज्यसंरक्षण व राज्यवृद्धि करण्यासाठीं राजेलोकाना कुटिल राजनीतिशास्त्रामध्यें निपुण व्हावें लागतें. त्याचप्रमाणें राज्यविस्ताराबरोबरच कामवासनेचा विस्तार करून सर्वप्रकारच्या कामसुखार्थ राजेलोकाना कामशास्त्रातही निपुण व्हावें

लागतें. लढाईमध्यें शत्रूला जिंकून त्याच्या अंतःपुरातील आणि राज्यातील मिळविलेली शत्रु-स्त्रियाची लूट मांडलिक राजानीं अर्पण केलेल्या अनेक राजकन्या राजाची मर्जी आपणावर प्रसन्न व्हावी म्हणून राजसेवकानीं व श्रीमंत नागरिकांनीं राजाकडे भोगार्थ पाठविलेल्या तरुण सौंदर्यवान् भोगांगना, शिवाय मनोरंजनार्थ ठेवलेल्या अनेक गायिका, नर्तिका, नटी, परिचारिका, वगैरे आश्रित स्त्रियाचा (तसेंच अंतःपुरांतील विविध स्त्रियांचा) उपभोग घेण्याचा मान विलासप्रिय राजेलोकाना नित्य मिळत असतो. म्हणून कामशास्त्राची त्याना आवश्यकता असते.

**अस्यैव कौतुकनिमित्तमनंगरंग ग्रंथं विलासिजनवल्लभमातनोमि।**
**श्रीमन्महाकविरशेषकलाविदग्धः कल्याणमल्ल इति भूपमुनिर्यशस्वी ॥ ३ ॥**

त्याचे राज्यात श्रीमान् यशस्वी कल्याणमल्ल म्हणून महाकवि राजर्षि होता. त्यानें लाडखान राजाच्या कौतुकासाठीं सर्व विलासी लोकास प्रियकारक आणि सकलकलायुक्त अनंगरंग या नावाचा ग्रंथ तयार केला.

राजेलोकासाठीं जरी हा ग्रंथ लिहिला आहे तरी प्रत्येक गृहस्थी मनुष्य विलासप्रिय-शृंगारप्रिय असतो, त्यांनीसुद्धा या अनंगरंग ग्रंथातील शास्त्रीय ज्ञान समजण्यासाठीं मोठ्या प्रीतीनें वाचावा अशी कल्याणमल्ल शिफारस करतात. राजे लोकानाच विलास करावासा वाटतो व इतराना वाटत नाहीं असें नाहीं; विलास करण्याची प्रवृत्ति सर्वांचीच असते. जो तो आपल्या सामर्थ्यानुसार विलासाचे शृंगारभोग प्राप्त करून घेत असतोच! अनंगरंग हा ग्रंथ प्रवृत्तिपर म्हणजे संभोगाकडे प्रवृत्ति करणारा आहे; निवृत्ति म्हणजे 'षंढ' होण्यासाठीं नाहीं. 'षंढत्वाची प्राप्ति' हें गृहस्थी मनुष्याच्या आयुष्याचें ध्येय कधींही नसतें. आपल्या कांतेकडे संभोगाची प्रवृत्ति व परस्त्रियाकडे व्यभिचारी संभोगाची निवृत्ति व्हावी अशा उद्देशानेंच हा ग्रंथ लिहिलेला आहे. अर्थात् कोणत्या स्त्रीशीं संभोग करावा व कोणत्या स्त्रीशीं करू नये, याचेंहि ज्ञान होण्यासाठीं हा ग्रंथ लिहिलेला आहे.

**मतानि दृष्ट्वा बहुशो मुनीनां तत्सारमादाय निरूपयामि।**
**अतोऽगनाकेलिकलानुरागैर्ग्राह्यः स्वदायं पुरुषैः सभावम् ॥ ४ ॥**

कल्याणमल्ल कवीनें ऋषींचीं पुष्कळ मतें पाहून त्यातील मुख्य सार घेऊन हा ग्रंथ निर्माण केला. यासाठीं कल्याणमल्ल कवीची सर्वांस प्रार्थना अशी आहे कीं, स्त्रियाशीं कामक्रीडा करण्याचे कुशलतेवर प्रीति ठेवून, ग्रंथावर भाव धरून, आपला भाग असें समजून तो पुरुषानीं ग्रहण करावा.

कल्याणमल्लाचें असें म्हणणें आहे कीं, कामशास्त्रात तज्ज्ञ असे जे पूर्वी अनेक ऋषि होऊन गेले, त्याच्या अनेक मतांची सूक्ष्म छाननी करून त्यातून योग्य असें जें

जें सार महत्त्वाचें मला आढळून आलें, त्यावरून या अनंगरंग ग्रंथाची रचना केलेली आहे. तपस्वी ऋषींनीं सांगितलेलें ज्ञान श्रद्धापूर्वक समजून घेतलें पाहिजे. कारण, श्रद्धेच्या ठायीं कल्याणकारक सिद्धि असते; आणि अश्रद्धेच्या ठायीं संशय आणि बुद्धि चंचल होते; म्हणून या ग्रंथावर श्रद्धा ठेवा. तसेंच स्त्रियामध्यें पवित्र प्रेम उत्पन्न करण्यासाठीं त्यांच्याशीं ज्या निरनिराळ्या कामक्रीडा करावयाच्या असतात, त्या कामक्रीडेमध्यें संभोगकौशल्य दाखविलें पाहिजे व तें कौशल्य या अनंगरंग ग्रंथाच्या अभ्यासानेंच प्राप्त होईल अशीं पूर्ण श्रद्धा ठेवून हें ज्ञान ग्रहण करा. कारण, संभोग कार्यात नियुक्त झालेल्या स्त्री–पुरुषांनीं संभोगसमयीं काय काय केलें असतां, संभोगकार्य यशस्वी होऊन उभयतांना संतोष आणि दांपत्यप्रेम प्राप्त होईल, हें समजण्यासाठीं कामशास्त्रीय ज्ञानच श्रेष्ठ होय. अशी प्रार्थना कल्याणमल्ल करितो.

**निःसारे जगति प्रपंचकुलके सारं कुरंगीदृशा**
**मेकं भोगसुखं परं च परमानंदेन तुल्यं विदुः।**
**तज्जात्यादिविवेकमूढमनसो लब्ध्वापि नानांगनाः**
**संविंदंति न कामतंत्रविकलाः पश्वादिवन्मानवः ॥ ५ ॥**

या जगांत प्रपंचामध्यें कांहीं सार नाहीं हें खरें; परंतु ब्रह्मज्ञानानें जो परमानंद होतो त्याचा लाभ प्रपंचामध्येंच आहे, आणि त्या आनंदाची बरोबरी करणारें असें दुसरें सुख म्हणजे हरिणाक्षि स्त्रियांचें संभोगसुख हें एक सार मानलेलें आहे. त्या संभोगाचें सुखाकरितांच स्त्रिया करितात. पूर्वदत्तयोगानें स्त्रियाहि नाना प्रकारच्या सुंदर मिळतात; तथापि तेथें ब्रह्मानंदरूप सुखाचा म्हणजे संभोगसुखाचा अनुभव मिळत नाहीं, कारण कीं, कामशास्त्राची कला कोणी जाणत नाहींत; तेणेंकरून स्त्रियांचे जातिभेदादिक समजण्याचा मार्ग नसतो, असे अविचारी मूर्ख पुरुष संसारामध्यें पश्वादिकांसारखे होतात, म्हणजे पशूप्रमाणें संभोग करतात. त्यांचा जन्महि व्यर्थ जातो. असें होऊं नये म्हणून हा ग्रंथ प्रकट केला; ग्रंथसंग्रह करून अवलोकन आणि अनुभव घेतला असतां फलप्राप्ति काय होते ती उत्तरश्लोकीं लिहितात.

अनेक 'विरक्त' मंडळी नित्य टाहो फोडून सांगत असतात कीं, या जगांत प्रपंचाचा पसारा व्यर्थ आहे. पण, या त्यांच्या सांगण्याकडे कोणीहि लक्ष देत नाहीं. उलट जो तो प्रपंचाचा पसारा वाढविण्यातच गुंतलेला दिसून येतो. प्रपंचामध्यें असें काय आहे कीं, ज्यायोगें मनुष्य या प्रपंचात गढून गेलेला दिसावा ! कल्याणमल्लाचें असें मत आहे कीं, हरिणीप्रमाणें ज्या स्त्रियांचे डोळे मोठे, काळेभोर वाटोळे आहेत अशा सौंदर्यवान् स्त्रियांशीं संभोग करून या प्रपंचामध्यें जो हा संभोगानंदाचा अनुभव

पुरुषांना मिळतो, त्या आनंदामुळेंच पुरुष हा आपल्या स्त्रियेशीं प्रपंच करण्यामध्यें गढून गेलेला असतो. प्रपंचामध्यें मनुष्याला एखादेवेळीं अन्न मिळालें नाहीं; तरी तो भूकेचा तडाखा त्यावेळीं सहन करील, धन मिळालें नाहीं, तर नशिबातच नाहीं असें म्हणेल; पण, त्याच्या कामवासनेला अडथळा झाला, तर त्याचें रक्त उसळतें, त्याचा क्रोध अनावर होतो. अशा प्रसंगीं त्याच्या कामवासनेची तृप्ति-शांति संभोगापासून मिळणाऱ्या संभोगसुखानेंच होत असते. असें हें प्रपंचामध्यें प्राप्त होणारें संभोगसुख ब्रह्मज्ञानानें प्राप्त होणाऱ्या परमानंदाच्या तोडीचें असतें. कारण, ब्रह्मानंद व संभोगानंद उत्पन्न करण्याच्या क्रियेमध्येंहि साम्यता आहे, म्हणून या दोन्ही आनंदाची तुलना व त्यांतील साम्य येथें दाखविलेलें आहे. नाभिचक्राजवळ निद्रित असलेल्या 'कुंडलिनी' ला जागृत करून तिचा मस्तकांतील ब्रह्मरंध्रामध्यें प्रवेश करून नंतर योगी पुरुष ब्रह्मानंदाचा अनुभव प्राप्त करून घेतो व आपला आत्मा ईश्वराशीं तादात्म्य करून आपली आत्मिक उन्नति प्राप्त करून घेतो, याची माहिती पतंजलि ऋषींच्या योगसूत्रामध्यें आहे. त्याचप्रमाणें संसारी गृहस्थ हा आपल्या कमरेच्या मधोमध असलेल्या निद्रित लिंगाला जागृत करून म्हणजे लिंग ताठ करून आपल्या स्त्रीच्या कटिप्रदेशीं असलेल्या योनिरंध्रामध्यें आपल्या ताठ झालेल्या लिंगाचा प्रवेश करून संभोगानंद प्राप्त करून घेऊन आपल्या स्त्रीशीं तो तादात्म्य होतो, व आपली आणि आपल्या स्त्रीची संसारांतील आत्मिक उन्नति प्राप्त करून घेतो, याची माहिती संभोगशास्त्राचा म्हणजे कामशास्त्राचा राजर्षि कल्याणमल्लाच्या अनंगरंग या ग्रंथामध्यें आहे. संसारामध्यें अन्न आणि संभोगसुख या दोन्ही गोष्टींची इच्छा मनुष्य नित्य करीत असतो. जगांमध्यें कोठेंहि पहा, मनुष्यप्राणी क्षुधाशांतीसाठीं रुचकर अन्न आणि कामशांतीसाठीं सुंदर व तरुण बायको मिळविण्याची एकसारखी धडपड करताना आढळतो. पण, 'भोज्येषु माता' भोजनाचे वेळीं मातेप्रमाणें प्रेमळ असणारी व 'शयनेषु रंभा' शयनाचे वेळीं रंभेप्रमाणें संभोगशास्त्रातील कौशल्य दाखविणारी, अशी भार्या पूर्व नशिबानेंच भाग्यवान् पुरुषांना प्राप्त होते. अशा भार्येशीं मिळणारा संभोगानंद हा परमानंदाच्या तोडीचा असतो. 'असा हा आनंद प्राप्त व्हावा' अशी इच्छा करणाऱ्यांसाठींच हा अनंगरंग ग्रंथ आहे. अशी इच्छा नसणाऱ्यांचें लैंगिकजीवन केवळ-पशूप्रमाणें असतें, त्यांच्यासाठीं हा ग्रंथ नाहीं. पशूप्रमाणें (पश्वादिकांसारखें) म्हणजे कुत्र्याला कितीहि दटाविलें तरी फळास आलेल्या कोणत्याहि कुत्रीच्या पाठीमागें तो धावणारच ! फळास आलेल्या गाईच्या पाठीमागें तिच्या योनीचा वास घेत घेत आंडील वृषभ धावतोच ! तोंडावर दुगाण्यांनीं कितीहि मारलें तरी गाढवीच्या पाठीमागें गाढव धावतेंच ! बलिदानासाठीं वधस्थानाकडे चालविलेला मस्त मेंढासुद्धां मेंढीला सोडीत नाहीं. मनुष्य हाहि विषयसुखाला मोहित होणारा एक प्राणीच आहे. पण मानव आणि पशु यांत महत्त्वाचा फरक असा आहे कीं, गाय फळते आहे असें एखाद्या आंडील बैलानें पाहताच भर

चव्हाट्यावरहि तो बैल त्या गाईवर उडतो. तसेंच तरुण पुरुषानें एखादी सुंदर स्त्री पाहताच त्याचे मनात तिच्याविषयीं जरी कामवासना उद्भवली, तरी त्या आंडील बैलाप्रमाणें भर चव्हाट्यावर किंवा एकांत स्थळीं त्या सुंदर स्त्रीशीं त्याचा संभोग घडतोच असें होत नाहीं. तो संभोग घडण्यास शास्त्रीय उपायांची जरुरी असते. म्हणून कामशास्त्राची कला जे मनुष्य जाणतात, ते संभोगकार्यप्रसगीं 'गम्यागम्याचा' अनुकूल–प्रतिकूल विचार करून त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवतात व 'सुशिक्षित नागरिक' ही सज्ञा प्राप्त करून घेतात. अगम्य अशा स्त्रीशीं गमन केलें असतां नागरिकाचें आयुष्य, यश आणि कीर्ति याचा क्षय होतो. संभोगकार्य हें स्त्रीपुरुषानीं एकत्र येऊन आपापल्या गुह्येंद्रियाच्या द्वारें करावयाचें असतें. सभोगकार्यातील भागीदारीण म्हणून कामशास्त्राची कला स्त्रियानींहि सप्रयोग समजावून घेतली म्हणजे संभोगकार्यातील त्यांची महत्त्वाची कामगिरी त्या उत्तम पार पाडतील.

**सुविदितपरमार्थः कामशास्त्रस्य विद्वान्**
**विविधरतिविनोदैः कामिनीनां मनांसि ।**
**अनुदिनमनुरागाद्रंजयेद्यः सलीलं**
**फलमविकलमेव प्राप्नुयान्मानवः सः ॥ ६ ॥**

जो पुरुष कामशास्त्र जाणून क्रीडायुक्त नाना प्रकारचे रतिविनोदांनीं कामिनी स्त्रियाचीं मनें प्रतिदिवशीं प्रीतीनें रमवितो, त्याची सकल कामना परिपूर्ण झाल्यावर उत्कृष्ट परमार्थज्ञान होऊन विषयातीत होत्साता स्त्रीसह-वर्तमान पुनः आवृत्ति नाहीं अशा मोक्षपदास पावतो.

धर्म-अर्थ-काम-मोक्ष असे चार पुरुषार्थ हिंदूनीं मानलेले आहेत. हे चार पुरुषार्थ अनिगहन आणि विशाल स्वरूपाचे आहेत. त्याचे सत्य स्वरूप समजण्या-साठीं बुद्धीलाहि विशालत्व पाहिजे. विशालत्व बहुश्रुतपणामुळें येतें; निरनिराळ्या शास्त्रग्रंथाच्या अभ्यासानें बहुश्रुतपणा प्राप्त होतो, अनंगरंग ग्रंथात ज्या टीपा दिल्या आहेत, त्या टीपा वाचल्यानें वाचकांना बहुश्रुतपणा प्राप्त होऊन त्याची बुद्धि विशाल होईल व 'काम' पुरुषार्थाचें सत्य स्वरुप समजेल. या काम पुरुषार्थाचें 'फल' म्हणजे जिनें आपलें मन आकर्षित केलें आहे अशा चित्तवेधक सुंदर स्त्रीचें अलिंगन, चुंबन, सभोग या क्रीडाची सिद्धि पूर्ण यशस्वी रीतीनें प्राप्त होणें. या 'काम' पुरुषार्थाची प्राप्ति झाल्यावरच मोक्षप्राप्ति करून घ्यावी, असें कामशास्त्र-कारांचे मत हिंदुधर्मशास्त्रकारानीं मान्य करून, कामशास्त्राचें शिक्षण गर्भाधान संस्काराचे वेळीं 'वधू' ने आपल्या प्रेमळ मावशी अगर मोठी बहीण (जिनें पुरुषसुख भोगलें आहे) अशाकडून घ्यावें व 'वरा'नें आपल्या पुरोहिताकडून घ्यावें. हें न समजल्यास कामशास्त्रग्रथाचें अध्ययन उभयतांनीं करावें अशी व्यवस्था

हिंदुधर्मशास्त्रकारांनीं करून ठेवलेली आहे. भार्या ऋतुमती झाल्यावर चौथ्या दिवसापासून पुढें पंधरा दिवस तिचे शरिरांत कामवासना व्यक्त स्वरूपांत सचारत असते. त्या वेळीं त्या कामिनीची कामवासना पूर्ण करणें हें तिच्या नवऱ्याचें धार्मिक कर्तव्यच असतें. हें धार्मिक कर्तव्य बजावून शेवटीं मोक्षप्राप्ति व्हावी, शेवटीं म्हणजे वृद्धावस्थेंत. वृद्ध पुरुष तरुणाप्रमाणें कामसेवन नित्य करूं लागला तर तो वृद्ध पुरुष तरुणाच्या मार्गांत अडचणीचा होऊन बसेल. वास्तव, वृद्धाना अध्यात्मचिंतन, धर्मचर्चा-मोक्षचर्चा याद्वारें मोक्ष सपादनांत गुतवून ठेवलें आहे. मोक्ष म्हणजे ब्रह्मैक्य हीच प्रवृत्ति अनंगरंग ग्रंथाची आहे असें कल्याणमल्ल सागतात.

या ग्रथाचा सर्व अर्थ अध्यात्मपर करावयास येतो, परंतु तादृश आश्रय नाहीं; आश्रय झाल्यास पुढें दुसरा अर्थ करावयास येईल. कौतुकासाठीं किंचित एका श्लोकाचा अर्थ वेदान्तपर दाखवितों.

**पद्मिनी चित्रिणी चाथ शंखिनी हस्तिनी तथा**
**क्रमाच्चतुर्धा नारीणां लक्षणानि ब्रुवेऽधुना ॥ ७ ॥**

पद्मिनी, चित्रिणी, शखिनी आणि हस्तिनी अशा स्त्रियाच्या चार जाती आहेत आणि मुक्तीच्याही जाती चार. सायुज्यता, समीपता, सरूपता आणि सलोकता. त्याचीं क्रमानें सांप्रतकालीं लक्षणें सागतों.

पद्मिनी म्हणजे सायुज्य मुक्ति, चित्रिणी म्हणजे सामीप्य मुक्ति, शंखिनी म्हणजे सरूपता मुक्ति आणि हस्तिनी म्हणजे सलोकता मुक्ति. याचा अर्थ नारि हें अलंकार-शास्त्रात स्त्रियांचें नाम, वेदान्तामध्यें मुक्तिवाचक अर्थ होतो. नारि–नव्हे अरि ती नारि म्हणजे मुक्ति; का कीं मुक्तीचा द्वेष्टा कोणी नाहीं; म्हणून नारि या शब्दाचा अर्थ मुक्ति असा जाणावा. नारि शब्द ऱ्हस्व इकरात आहे. असंख्यात प्राण्याला मुक्तीही असख्यात झाल्या. पुढेंहि होणार. त्याचे भेद चार कल्पिले आहेत. त्यांचीं नांवें: पद्मिनी म्हणजे सायुज्य मुक्ति; जो प्राणी क्षीराब्धिवासी नारायणास मिळून एकरूप झाला त्या मुक्तीचें नाव पद्मिनी. नारायण सर्वांचा आद्य व नाभिस्थानीं पद्म धारण करितो, म्हणून पद्मिनीचा अर्थ सायुज्य मुक्ति चित्रिणी म्हणजे सामीप्य मुक्ति, मुक्तीस पावलेले प्राणी अवतार घेतात, ईश्वराप्रमाणें कांहीं कृत्यें करितात; म्हणून विचित्रवती जी मुक्ति ती चित्रिणी. जे जीव विष्णूच्या रूपाप्रमाणें रूप पावतात, ते शखचक्रादिधारक होतात म्हणून त्या मुक्तीचें नाव शंखिनी, म्हणून शंखिनी म्हणजे सारूप्य मुक्ति, असें समजावें. जे लोक वैष्णवादिकांचे लोकास मात्र जातात. त्या मुक्तीचें नाव सलोकता. जिला हात-पाय आहेत ती हस्तिनी, तेव्हा चवथ्या प्रकारचे लोक निर्गुणत्व पावत नाहींत, ते हस्तादिकेंकरून साकार असतात, तेव्हा हस्त आहेत जिला ती हस्तिनी, म्हणजे सलोकता मुक्ति. यास उदाहरण

खङ्गिनी, शूलिनी, चक्रिणी असा अर्थ वेदान्तर आहे, पण तो लिहावा तर ग्रंथ-विस्तार वाढतो.

॥ पद्मिनी स्त्रीचें स्वरूपवर्णन ॥

प्रांतारक्तकुरंगशावनयना पूर्णेंदुतुल्यानना
पीनोत्तुंगकुचा शिरीषमृदुला स्वल्पाशना दक्षिणा ।
फुल्लांभोजसुगंधकामसलिला लज्जावती मानिनी
श्यामा कापि सुवर्णपंकजनिभा देवादिपूजारता ॥ ८ ॥
उन्निद्रांबुजकोशतुल्यमदनच्छत्रा मरालस्वना
तन्वी हंसवधूगतिः सुललितं वेष सदा बिभ्रती ।
मध्यं चापि वलित्रयांकितमसौ शुक्लांबराकांक्षिणी
सुग्रीवा शुभनासिकेति गदिता नार्युत्तमा पद्मिनी ॥ ९ ॥

ज्या स्त्रीचें मुख पौर्णिमेच्या पूर्णचद्रासारिखें आल्हादकारक, डोळ्यांचे कोन आरक्त असून डोळेहि मृगबालकाचे डोळ्याप्रमाणें सुरेख स्तन उच, कठीण, मांसल; शरीर शिरसाचे फुलाप्रमाणें मऊ; जेवण थोडें, चतुर; फार मर्यादशील, थोरपणानें वागणारी, पिवळ्या कमळासारखी गोरी, काळी नसता तारुण्याच्या भरामुळें श्यामवर्ण भासणारी, कामसलिलाचा वास नुकत्याच फुललेल्या कमळाप्रमाणें येतो. झोंप सावध, मदनछत्र कमळाच्या गाभ्यासारखें, शब्द कोकिळेच्या शब्दासारखा मंजुळ, शरिरानें अत्यत नाजूक, हसिनीप्रमाणें चाल, निरतर सुदर वेष धारण करणारी, शरिराचे मध्यभागीं पोटावर तीन वळी असतात, पाढऱ्या शुभ्र वस्त्राची आवड करते, मान बारीक दिसाया-जोगी शखासारखी, नाक सरळ सुरेख, देवब्राह्मणांच्या पूजनाविषयीं तत्पर, अशीं लक्षणें ज्या स्त्रीच्या ठायीं असतील ती पद्मिनी असें म्हणावें.

॥ चित्रिणी स्त्रीचें स्वरूपवर्णन ॥

तन्वंगी गजगामिनी चपलदृक् संगीतशिल्पान्विता
नो ऱ्हस्वा न बृहत्तराऽथ सुकृशा मध्ये मयूरस्वरा ।
पीनश्रोणिपयोधरा सुललिते जंघे वहंती कृशे
कामांभो मधुगंधिसोष्णमपि सा तुच्छोत्रतंवत्सला ॥ १० ॥
कामागारमसांद्रलोमसहितं मध्ये मृदुप्रायशो
बिभ्रत्युल्लसिता च वर्तुलमथो रत्यंबुनाढ्यंसदा
भृंगश्यामलकुंतलाथ जलजग्रीवोपभोगे रता
चित्रा शक्तिमती रतेऽल्परुचिका ज्ञेयांगना चित्रिणी ॥ ११ ॥

जी स्त्री शरिरानें नाजुक, ठुमकत ठुमकत हत्तीसारखी चालते, दृष्टि चंचल, नृत्यादि गायनकलेंत व शिल्पविद्येंत कुशल, फार ठेंगणी व फार उंच नाहीं, शरिराचे मध्यभागीं अत्यंत कृश म्हणजे सिंहकटीप्रमाणें, मोराचे स्वराप्रमाणें स्वर, कुल्ले पुष्ट, स्तन घट्ट मांसल, मांड्या अति सुरेख, कामोदक फार उष्ण असून मधासारखा वास असतो. राघू-मैना इत्यादिकांचें पालन करणारी. कामगृहावर थोडे केंस, गुह्य मऊ बहुतकरून उकललेलें असून वर्तुळाकार; आणि रतिसंबंधी उदकानें सर्वदा नादयुक्त असते, वेणीचे केंस भ्रमरासारखे श्यामवर्ण, मान वाटोळी शंखाप्रमाणें, नानाप्रकारचे विलास भोगणारी, चित्रविचित्र शक्तियुक्त, रतीविषयीं फार रुचि नाहीं, या प्रकारचीं लक्षणें ज्या स्त्रीस आहेत, ती चित्रिणी असें समजावें.

॥ शंखिनी स्त्रीचें स्वरूपवर्णन ॥

दीर्घौ बाहुः शिरः कृशं पृथु अथो देहं वहंती तथा
पादौ दीर्घतरौ कटिं च बृहतीं स्वल्पस्तनी कोपिनी।
गुह्यं क्षारविगंधिना स्मरजलेनाल्पेन सांद्रैः कचै-
रानीतं कुटिलेक्षणा द्रुतगतिः संतप्तगात्रा भृशम् ॥ १२ ॥
संभोगे करजक्षतानि बहुश इच्छन्त्यनंगाकुला
न स्तोकं च न भूरि भक्षति सदा प्रायो भवेत्पित्तला
स्रग्वस्त्राण्यरुणानि वांछति दयाहीना च पैशुन्यभृ-
त्पिंगा दुष्टमनाश्च घर्घरमहारुक्षस्वना शंखिनी ॥ १३ ॥

ज्या स्त्रीचे हात लांब व डोकें कृश, अंग मोठें, पाय फार लांब, कंमर मोठी, स्तन लहान, फार रागीट, खारट दुर्गंधियुक्त अशा कामोदकानें भिजलेल्या केसानीं व्याप्त असें गुह्यस्थान असतें, दृष्टि वाकडी, चालणें घाईचें जलद, शरीर कडकडीत ऊन लागतें. कामोद्रेक असा होतो कीं, पुरुषभोगा-साठीं केवळ घाबरी होते, रतीच्या वेळेस बहुतकरून नखादि कौशल्याची आवड करिते, आणि जेवण फार थोडें नसून फार पुष्कळहि नसते, पित्तप्रकृति, तांबड्या वस्त्राची आणि तांबड्या फुलाच्या माळाची आवड, निर्दय, मन दुष्ट, पिंगटवर्ण, निंदा करण्याची खोडी, कंठ घोगरा, शब्द कर्कश, बोलणें फार दांडगें, हीं लक्षणें जिच्या ठायीं उपलब्ध होतील ती स्त्री शंखिनी जाणावी.

॥ हस्तिनी स्त्रीचें स्वरूपवर्णन ॥

स्थूला पिंगलकुंतला च बहुभुक्क्रूरा त्रपावर्जिता
गौरांगी कुटिलांगुल्यैकचरणा न्हस्वा नमत्कंधरा।
विभ्रत्येभमदांबुगंधिरतिजं तोयं भृशं मंदगा
दुःसाध्या सुरतेऽतिगद्गदरवा स्थूलोष्टिका हस्तिनी ॥ १४ ॥

जी स्त्री शरिरानें फार मोठी, लठ्ठ, केस पिंगटवर्ण, फारच खादाड, मोठी रागीट, निर्लज्ज, गोरी असली तरी तें गोरेपण नुसतें फिक्कट पांढरें असतें, एका पायाचीं बोटें वांकडी असतात, ठेंगणी, चालताना ओणवीशी दिसते, कामसलिल फार वाहतें, त्याला वास गजाचे गंडस्थलापासून जो मद वाहतो त्याप्रमाणें येतो, चालणें मद, मैथुनाचे वेळेस लवकर तृप्त होत नाहीं, फार वेळ सग करावा तेव्हा तृप्त होते, शब्द फार सद्गदित, ओंठ मोठे, या लक्षणानीं युक्त जी स्त्री असेल ती हस्तिनी असें समजावें.

वेदाक्षींदुशरप्रसंख्यतिथयः प्रोक्ता नलिन्या रते
भोग्यादित्यदशर्तुसंख्यतिथिषु प्रीताभवेच्चित्रिणी।
रुद्रांभोधिगुणासमेषु तिथिषु प्रायो द्रवेच्छंखिनी
राकादर्शचतुर्दशीग्रहतिथीष्वेति द्रवं हस्तिनी ॥ १५ ॥

रात्रौ चतुर्थचरणे नलिनी द्रवत्वं
संयाति चित्रदयिता प्रथमेऽथ यामे।
प्रीत्यै तृतीयचरणः खलु शंखिनीनां
नक्तं दिवार्धमपि हस्तिवधूजनानाम् ॥ १६ ॥

॥ कोष्टक समजण्याच्या रीति ॥

कोणकोणत्या तिथींस कोणकोणत्या स्त्रीला रतिसुखाची इच्छा होते तें कळण्यासाठीं पुढें कोष्टक लिहितों. अथ नलिनी प्रभृतीना सुखतिथयः उच्यते। ज्या ज्या कोष्टकासमोर ज्या ज्या स्त्रीचें नाव येईल, त्या त्या तिथींस त्या त्या स्त्रियांच्या योनीमध्यें कामप्राप्ति होते. त्या त्या वेळीं संभोगानें त्या संतुष्ट होतात, इतर तिथींस त्यास तादृश संभोगाची उत्सुकता नसते, तस्मात् हा भेद कळण्यासाठीं पुढील कोष्टक पहावें.

स्त्रियांच्या रतिसुखतिथींचें कोष्टक

| | |
|---|---|
| प्रतिपदा । द्वितीया । चतुर्थी । पंचमी | या तिथीस पद्मिनीस भोगेच्छा होते. |
| षष्ठी । अष्टमी । दशमी । द्वादशी | या तिथीस चित्रिणीस भोगेच्छा होते. |
| तृतीया । सप्तमी । एकादशी । त्रयोदशी | या तिथीस शंखिनीस भोगेच्छा होते. |
| नवमी । चतुर्दशी । पौर्णिमा । अमावस्या | या तिथीस हस्तिनीस भोगेच्छा होते. |

**रजनीसुरतेषु पद्मिनी न सुखं याति निसर्गतः कचित् ।**
**दिवसे शिशुयोगतोपि सा विकसत्यंबुजनी यथा रवेः ॥ १७ ॥**

पद्मिनी जातीच्या स्त्रीला रात्रीच्या संभोगापासून कधींहि सुख होत नाहीं, तिला रात्रीं मैथुनाचा स्वाभाविकपणेंच कंटाळा असतो, आणि दिवसा एखाद्या लहान मुलाशीं जरी संभोग झाला तरी ती तृप्त होते. जशी सूर्यकमलिनी सूर्योदय झाल्यावर प्रफुल्लित होते, तशीच पद्मिनी स्त्री दिवा-मैथुनानें प्रफुल्लित होते; तस्मात् पद्मिनी हें नाव अन्वर्थक व यथायोग्यच आहे.

स्त्रियांना सर्वकाळ मैथुन आवडत नाहीं, सगळ्या दिवसात एखाद्या प्रहरांतच त्या मैथुन इच्छितात. तो समय कळण्याकरिता पुढें कोष्टक लिहिलें आहे, त्या कोष्टकांत ज्या ज्या प्रहरीं ज्या ज्या स्त्रियाचा उल्लेख केलेला आहे, त्या त्या प्रहरीं त्या त्या स्त्रियांस मैथुनाची आवड असते, असें जाणावें. त्यांत पहिल्यानें रात्रीचे प्रहराविषयीं कोष्टक आहे व त्यापुढें दिवसाचे प्रहराविषयीं आहे.

॥ रात्रीचें भोगेच्छा विषयाचें कोष्टक ॥

| | |
|---|---|
| ४ प्रहर | पद्मिनीस भोगेच्छा होते. |
| १ प्रहर | चित्रिणीस भोगेच्छा होते. |
| १ प्रहर । ३ प्रहर | शंखिनीस भोगेच्छा होते. |
| १ प्रहर । २ प्रहर । ३ प्रहर । ४ प्रहर | हस्तिनीस भोगेच्छा होते. |

## ॥ दिवसा भोगेच्छा विषयाचें कोष्टक ॥

| | |
|---|---|
| १ प्रहर । २ प्रहर । ३ प्रहर । ४ प्रहर | पद्मिनीस भोगेच्छा होते. |
| | चित्रिणीस/शंखिनीस दिवसा भोगेच्छा होत नाही. |
| ३ प्रहर । ४ प्रहर | हस्तिनीस भोगेच्छा होते. |

**इति श्रीमल्लाडनवलविनोदाय महाकवि कल्याणमल्लविरचिते अनंगरंगे पद्मिन्यादि–जातिवर्णनं नाम प्रथमस्थलः कामाब्धिप्लुव नाम प्राकृती टीका प्रथमस्थलाची समाप्त ॥ १ ॥**

या प्रकारेंकरून राजाधिराज लाडखान त्याच्या विनोदासाठीं कविश्रेष्ठ जो कल्याणमल्ल त्यानें रचित अनगरग ग्रंथ त्यांतील पद्मिनीप्रभृति स्त्रियांचें जातिवर्णनांचें पहिलें प्रकरण संपूर्ण.



प्रकरण दुसरें

## ॥ कामपूर्तीविषयीं विवरण ॥

या दुसऱ्या प्रकरणामध्यें पाच कोष्टकें आहेत. स्त्रियांना रजोदर्शन झालें म्हणजे पहिले पधरा दिवस त्याचे शरिरांत कामवासना व्यक्त स्वरूपात असते व पुढील पंधरा दिवसात अव्यक्त स्वरूपात कामवासना असते. यालाच कामवासनेची भरती-ओहोटी म्हणतात. समुद्राची भरती व ओहोटी चद्रदर्शनावर अवलंबून असते. तसेंच कामवासनेची भरती व ओहोटी स्त्रियांच्या रजोदर्शनावर अवलंबून असते. म्हणून रजोदर्शनाला चंद्रदर्शन अशी लाक्षणिक सज्ञा दिलेली तन्त्रग्रंथात आढळते. रजोदर्शनानंतर कामवासना व्यक्त स्वरुपात आणण्यासाठीं शरिरातील जे जे ज्ञानतंतु उत्तेजित होत असतात, त्याच्या ज्ञानाला 'चद्रकला' अशी सज्ञा तंत्रग्रथात आहे. ज्योतिषशास्त्रात इंग्रजी भाषेंत चंद्राला Luna म्हणतात. 'चंद्रा' चा परिणाम मेंदूवर होत असतो

असें 'तंत्रशास्त्र' सांगतें. ज्याला चंद्रबळ नाहीं—म्हणजे ज्याचा मेंदू बिघडला आहे, म्हणजेच जो वेडा झाला आहे त्याला Lunatic म्हणतात. Luna शब्दावरून Lunaria शब्द तयार झाला. (Lunaria-an old and almost obsolete term for menstruation) गर्भवती स्त्रियांचे दिवस रजोदर्शन बंद झाल्यापासून मोजतात, त्यालाहि Lunar days म्हणतात. 'चंद्रकला' हा पारिभाषिक शब्द आहे, या चंद्रकलांचें म्हणजे Erotic zones चें ज्ञान प्रत्येकाला झालें पाहिजे. त्यांचें ज्ञान पुढील कोष्टकांवरून होईल 'He who does not understand the importance of erogenic zones makes a sweet-heart sad and loses a lot from his life' असें पाश्चात्य कामशास्त्रकारांनी आपलें मत प्रदर्शित केलेलें आहे. चंद्रकलेचें ज्ञान म्हणजेच कामवासना उत्पन्न करणाऱ्या ज्ञानतंतूंचें ज्ञान. 'कामवासना' व्यक्त स्वरुपात येत आहे हें सुचविणारें 'रजोदर्शन' हें सूचक चिन्ह होय. म्हणून कित्येक हिंदू लोक रजोदर्शनापूर्वीच आपल्या कन्येचा विवाह करीत असत. कारण न जाणों, रजोदर्शनानंतर कामवासना अतितीव्र स्वरुपात उत्पन्न झाली, तर एखाद्या दिवशीं आपल्या घराण्याची अब्रू जाण्याची पाळी येईल असे अधर्मीय कृत्य कन्येच्या हातून होईल, अशी भीति त्याना वाटत असे. कारण, अति तीव्र स्वरूपाची कामवासना पुरुषसंभोगानेंच शांत होते. पुरुषसंभोग केला नाहीं तर स्त्रीला भयंकर उन्माद होतो. उन्मादानें स्त्री-जीवनाचा नाश ठरलेलाच. जर पुरुषसंभोगानें उन्माद टाळावा तर गर्भवती होण्याचें संकट प्राप्त होतें. असे दुहेरी संकट टाळण्याचा उपाय 'विवाह' हाच ते समजत असत. आमच्या या एकंदर संशोधनावरून अभ्यासकांना येथें असें स्पष्ट आढळून येईल कीं, चंद्रदर्शन म्हणजे आकाशांतील 'चंद्रदर्शन' नसून 'रजोदर्शन'च होय. 'चंद्र' हा स्वभावतःच 'कामी' असल्यामुळें 'चंद्रदर्शनानें' कामोत्तेजन होतें. याचा सरळ अर्थ हाच आहे कीं, कन्येला रजोदर्शन (चंद्रदर्शन) झालें कीं, संभोगकार्याला ती योग्य झाली असें समजून आता तिच्याशीं संभोग करण्यास हरकत नाहीं, अशी इच्छा तरुण पुरुषाच्या अंतःकरणामध्यें स्फुरण पावते. स्फुरण पावलेली ही इच्छा हेंच चंद्रदर्शनाचे 'कामोत्तेजन!' संभोगोत्सुक तरुण पुरुषाचें शिश्न चेतनायुक्त ताठ होऊन त्याला संभोग करण्यास हेंच कामोत्तेजन प्रवृत्त करतें. हा त्याचा भावार्थ!

॥ पद्मिन्यादिक स्त्रियांच्या चंद्रकलेविषयीं ॥

आतां स्त्रियाना कोणकोणत्या तिथीस चंद्रकला कोठकोठें असते, त्याचें ज्ञान होण्यासाठीं पुढें कोष्टक लिहितों. (शरिरांतील ज्ञानतंतूंची माहिती)

सीमंताक्ष्यधरे कपोलगलके कक्षा—कुचोरस्थले ।
नाभिश्रोणिवरांगजानुविषये गुल्फे पदे गुह्यके ॥ १ ॥

कृष्णाकृष्णविभागतो मनसिजस्तिष्ठेत्क्रमाद्योषिताम् ।
वामांगेष्वधऊर्ध्वतोऽभिगमनान्मासस्य पक्षद्वये ॥ २ ॥

ज्या ज्या पक्षाच्या तिथीच्या समोर स्त्रीच्या ज्या ज्या अवयवाचें नाव आलें आहे, त्या त्या अवयवात त्या त्या दिवशीं काम असतो. ज्या ज्या अवयवासमोर जें जें कृत्य लिहिलें आहे, तें तें त्या तिथीस मैथुनाच्या प्रसंगीं केलें असतां स्त्रिया संतोषित होऊन वश रहातात, नाहीं तर तंटाभांडण होतें. तें न व्हावें म्हणून आणि पुरुषाचें मन परस्त्रीकडे व स्त्रीचें मन परपुरुषाकडे न जावें, परस्पराचें प्रेम विशेष वाढावें, यास्तव पुढील कोष्टकात सांगितल्याप्रमाणें तीं तीं कृत्यें केलीं असता स्त्रियाची चद्रकला प्रदीप्त होते. यास्तव हा ग्रंथ पाहून चंद्रकलेचें ठिकाण जाणून तें तें कृत्य केलें असतां मृगाक्षी स्त्रिया प्रीत होऊन स्वाधीन रहातात; त्यायोगें परम सुख प्राप्त होतें.

शुक्लपक्षीं उजव्या अगीं काम असतो, त्याचा उलटा क्रम, पौर्णिमेपासून प्रतिपदे-पर्यंत धरावा. कृष्णपक्षीं डाव्या अगीं काम असतो, त्याचा क्रम सरळ, प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत धरावा.

कामाची स्थानें महिनाभर तींच असतात, परंतु शुक्लपक्ष—कृष्णपक्षाच्या योगानें उजवें-डावें अंग मात्र होत असतें. याचा विचार करून रति केली असतां उभयताची इच्छा परिपूर्ण होते. ही कोष्टकपद्धति कळण्याकरिता सामान्य लिहिली आहे, पुढील कोष्टकात स्पष्ट विस्तार लिहिला आहे.

## ॥ स्त्रियांच्या कामेच्छापूर्तिविषयीं विवरण ॥

| तिथी | | स्थान | काम-पूर्ती होण्याची रीति |
|---|---|---|---|
| शुक्लपक्ष उजवे अंग | कृष्णपक्ष डावे अग | | |
| १५ | १ | केंस, मस्तक | केंस धरावे व मस्तकावर चोटे लावावी. |
| १४ | २ | नेत्र | चुंबणे. |
| १३ | ३ | ओठ | चुंबणे व हळूच चावणे. |
| १२ | ४ | गाल | चुंबन घेणे. |
| ११ | ५ | गळा | नखांनी हळूहळू खाजवावा. |
| १० | ६ | कूस | नखानी खाजवावी. |
| ९ | ७ | स्तन | हातानी घट्ट धरावे -आवळावे. |
| ८ | ८ | ऊर | फार हळूहळू बुक्क्या माराव्या. |
| ७ | ९ | बेंबी | हळूहळू चोटाने थापट्या माराव्या |
| ६ | १० | कुल्हे | धरून चुरावे, बुक्क्या माराव्या. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | ११ | योनि | ताठ शिश्न घालून घर्षण करावें. |
| ४ | १२ | गुडघा | आपल्या गुडघ्यानें गुडघा ठोकावा व टिचक्या माराव्या. |
| ३ | १३ | पोटरी | आपल्या पोटरीनें पोटरी घासावी व टिचक्या माराव्या. |
| २ | १४ | पाय | आपल्या पायानीं स्त्रीचे पाय दाबावे व आंगठ्यानें टोचावे. |
| १ | ३० | पायाचा आंगठा | आपल्या आंगठ्यानें आंगठा दाबावा अथवा टिचक्या माराव्या. |

या वरील कोष्टकात 'चंद्रकोर' असा तंत्रग्रंथांतील पारिभाषिक शब्द आला आहे. कन्या कौमार्यावस्थेंत असतांना तिच्या योनीमध्यें चंद्राच्या कोरीप्रमाणें (crescent-shape) पातळ पडदा असतो. त्याला इंग्रजीमध्यें 'हाइमेन' म्हणतात. हा पडदा न फाटता सुरक्षित असणें याला कौमार्याची खूण हिंदु समजतात. अशा योनीला 'चंद्रकोर' अशी संज्ञा येथें दिलेली आहे. योनींतील हा पडदा फाडून टाकण्यासाठीं पुरुष आपलें ताठ झालेलें लिंग त्या योनींत जोरजोरानें आत घालतो (म्हणजे जोरकस संभोग करतो). त्याला कौमार्यभंग म्हणतात. हा कौमार्यभग करिताना पुरुषाच्या ताठ झालेल्या शिश्नाला 'dart of love' असें समजतात. घशांत अडकलेलें काढलें म्हणजे बरें वाटतें. तद्वतच, कुमारी वयांत येताच तिच्या योनींत असलेला हा कौमार्यसूचक पडदा योनींत अडकलेल्याप्रमाणें तिला वाटतो. त्यायोगें शब्दानें सांगता येणार नाही असें तिला कसेंसेंच होत असतें. अशा वेळीं, त्या कुमारीचा पूर्ण विश्वास बसला आहे अशा तरुणानें तिच्याशी गोडगोड बोलून तिच्या संमतीनें आपलें ताठ शिश्न तिच्या योनींत खुपसून तो पडदा फाडला की तिला बरें वाटतें. स्त्रीचा हा कौमार्यभंग ज्या पुरुषाच्या ताठ झालेल्या शिश्नानें प्रथमच होतो, त्याच पुरुषावर ती स्त्री आमरण प्रेम करिते; व मनामध्यें त्याच पुरुषाची आठवण अगर स्मरण ती स्त्री रात्रंदिवस करीत असते. 'मना'च्या या अवस्थेमुळेंच नूतन 'वधू'चा कौमार्यभग करण्याचा हक्क तिच्या नवऱ्याचाच आहे, असें हिंदुधर्म-शास्त्रकार मानतात. हिंदु लोक गर्भाधानसंस्कार विधि करतात त्यांत 'वधू' आपलें कौमार्य 'वरा'ला प्रथमच अर्पण करते व 'वर' आपल्या 'वधू'चा कौमार्यभंग करितो. कित्येक जातींमध्यें असा आचार आहे की, 'वधू'चा कौमार्यभग करण्याचा हा हक्क तिच्या नवऱ्याचा नसून ईश्वराचा प्रतिनिधि जो राजा अगर धर्मगुरु याचा तो हक्क आहे असें मानतात. राजानें अगर धर्मगुरूनें कौमार्यभंगाचा हक्क प्रथम बजाविल्यावर नंतर त्या 'वधू'ला 'वरा'च्या ताब्यांत देण्यात येतें. ज्याप्रमाणें ईश्वराला नैवेद्य प्रथम दाखवून झाल्यावर मग आपण त्याचें सेवन करावयाचें तसेंच

हें आहे असें ते मानतात. जुलमी राजे व भोळ्या जनांना फसविणारे धूर्त व ढोंगी धर्मगुरु यांनीं ही पद्धत अमलांत आणलेली आहे.

जुलमी राजाचे लबाड नोकर किंवा ढोंगी धर्मगुरूंचे कावेबाज शिष्य नूतन वराला असे सांगतात कीं, तूं जर स्वतः आपल्या नूतन वधूचा प्रथम कौमार्यभंग केलास तर तुझ्या लिंगाला भयंकर इजा होईल; तू रोगी होशील; तुझ्यावर ईश्वराचा कोप होईल. तसेच कौमार्यभंगाचे वेळीं योनींतील पातळ पडदा फाटून जें रक्त बाहेर येते ते विषमय असतें; त्यायोगें तुला मरण येईल. केवळ दैवी शक्तीच्या जोरावरच धर्मगुरु हें मरण टाळतात. ' पण ही सर्व फसवणूक आहे. वैद्यकीय उपचार करून या सर्व गोष्टी टाळता येत असल्यामुळें वधूचा कौमार्यभंग करण्याचा प्रथम हक्क नवऱ्याचाच आहे, इतरांना नाहीं, असें स्मृतिकार 'मनू'चें मत आहे. कित्येक शास्त्रकारांचें असें मत आहे कीं, विशिष्ट परिस्थितींत योनींतील हा पडदा न फाटता कन्येचें कौमार्य अभग ठेवून युक्तीनें तिच्याशीं संभोग करितां येतो. (विशिष्ट परिस्थिति म्हणजे रबराप्रमाणें अतिशय चिवट पडदा.) योनीमध्यें शिश्न जसें जसें आंत जाईल, तसातसा तो चिवट पडदा न फाटतां रबराप्रमाणें आंतल्याआंतच खोल ताणला जातो; योनींतून शिश्न बाहेर काढलें कीं तो ताणलेला पडदा तत्काल पुन्हा पूर्ववत् होतो. पडदा फाटत नाहीं, म्हणून कौमार्यभंग होत नाहीं. दुसरा प्रकारः–folding type hymen ही विशिष्ट परिस्थिति. पराशर ऋषींनी सत्यवतीजवळ व सूर्यदेवानें कुंतीजवळ त्या कौमार्यावस्थेंत असतांना 'तुमचा कन्याभाव नष्ट होणार नाहीं' (अर्थात् तुमचा कौमार्यभंग होणार नाहीं) असें सांगून त्यांच्याजवळ संभोग केलेला भगवान् व्यासांनीं महाभारतांत दाखविला आहे. स्त्री गर्भार असूनहि हा पडदा हयात असतो असेंहि कित्येकांचें मत आहे. हा पडदा जाड अगर अति चिवट असल्यास आंगठ्याजवळच्या बोटानें फाडून बाजूला करितात, अगर शस्त्रक्रियाहि करितात. फार पूर्वी 'दगडी शिश्नानें' हा कौमार्यभंग करीत असत; त्याला artificial defloration म्हणतात. कल्याणमल्लाचें असें मत आहे कीं, अशा चंद्रकोर योनीमध्यें पुरुषानें आपला मदनध्वज म्हणजे ताठ झालेलें शिश्न घालूनच एकसारखें घर्षण करून हा पडदा फाडावा. त्यायोगें त्याच्या शिश्नाचें खरें सामर्थ्य समजून येतें. दुसरीं मतें कल्याणमल्लाला मान्य नाहींत. कित्येकांचे असेंहि मत आहे कीं जरी चंद्रकोर योनि नसली तरी सशयित स्त्री ऋतुमती झाली कीं तिला शुद्ध समजावें. हें मत प्रतिपादन करणाऱ्यांचें असें म्हणणें आहे कीं, 'गर्भधारणेचा काल' हा रजोदर्शनापासून पुढें पंधरा दिवस असतो. म्हणून या पंधरा दिवसांत औरस संततीसाठीं संभोग करण्याचा हक्क नवऱ्याचाच आहे. पण त्यानंतरचा पुढील दिवसांचा काल हा 'गर्भधारणेचा काल' नसल्यामुळें या काळांत म्हणजे ऋतुकालव्यतिरिक्त स्त्रीला संभोगाचें स्वातंत्र्य असावें. कारण, हा काल गर्भधारणेचा नसल्यामुळें स्त्रीला जरी संभोगस्वातंत्र्य दिलें, तरी तिला परपुरुषापासून गर्भधारणा होणार नाहीं. त्या

स्त्रीला योग्यकाली रजोदर्शन होणारच! रजोदर्शन होताच तिला शुद्ध समजावें. कारण, स्त्री आणि मोतीं हीं अशुद्ध जरी असलीं तरी त्याना शुद्ध करून घेतां येतें. मोतीं जों जों हाताळावें तों तों मोत्याचें तेज वृद्धिंगत होतें व त्याची किमत वाढते. त्याच दृष्टीनें समोगासाठीं स्त्री जों जों हाताळली जाईल, तों तों ती स्त्री संभोग-कौशल्यांत तरबेज होत जाईल; अशा स्त्रीपासूनच समोगसुखाची कमालमर्यादा गाठता येईल. अर्थशास्त्रांतील व्यवहारामध्यें म्हणजे वेश्या–व्यवसायामध्यें जरीं हें मत मान्य होत असलें, तरी गृहस्थाश्रमातील पति-पत्नीच्या संभोग–व्यवहारामध्यें धर्मशास्त्र-कारांना हें मत मान्य नसल्यामुळें कल्याणमल्लालाहि मान्य नाहीं.

## ॥ पद्मिनीचें चंद्रकलेविषयीं ॥

कंठे संश्लिष्य गाढं मृदुकरजचयं मंडपाल्यां नितंबे
पृष्ठे पार्श्वादरे वा विदधदथ रदैः खंडयन्दंतवासः।
प्रेम्णाचुंबन्ललाटं वपुषि च जनयन् रोमहर्षं नितान्तम्
सीत्कारप्रायवक्त्रा प्रतिपदि नलिनीं द्रावयेदन्नविग्धः॥
संचुंब्य दंतवसनं जघने कपोले पादद्वये स्तनयुगे च नखानि दत्त्वा।
प्रायः प्रबुद्धमदनां युगुलाख्यतिथ्यां
कामी नयेद् द्रवदशां नलिनीं सहर्षाम् ॥ ५ ॥
गाढालिंगनपूर्वकं कुचयुग संपीड्य दंतच्छदं
दष्ट्वा चाशु रदैरथोरुफलके यच्छन्नखान्यादरात्।
दोर्मूले सहसा सकृन्नखपदं कुर्वंश्चतुर्थ्यां तिथौ
कामं संप्रतिबोध्य चंद्रकलया कुर्यान्निजां पद्मिनीम् ॥ ६ ॥
दष्ट्वाऽधरं तदनुपीनकुचौ विमर्द्य प्रायेण चूचुकयुगं परिचुंब्य रागात्।
केशांस्तु दक्षिणकरेण विकृष्य मंदं
कुर्यात्सुविव्हलतनूं किल पंचमीषु ॥ ७ ॥

आता पद्मिनी, चित्रिणी इत्यादि निरनिराळ्या एकएकीच्या चंद्रकला म्हणजे कामोत्पत्ति होऊन मोकळ्या होण्याविषयीं वर्णन करितों. त्यात पहिल्याने पद्मिनीचा काम कोणते तिथीस कोठें असतो आणि तो मोकळा कसा होतो, हें कळण्याकरितां पुढें कोष्टक लिहितों. या कोष्टकातहि ज्या ज्या तिथीसमोर जो जो अवयव लिहिला आहे आणि त्या त्या अवयवासमोर जें जें कृत्य लिहिलें आहे, तें तें कृत्य स्त्रीला इतकें करावें कीं, ती बहुतकरून मुखानें सीत्कार करील आणि अंगावर रोमाच उठेतोंपर्यंत करावें आणि नंतर भोगावी. म्हणजे कामसलिल गलित होऊन पद्मिनी स्त्री संतोषित आणि वश्य रहाते.

## ॥ पद्मिनीचें कामशांति कोष्टक ॥

| | |
|---|---|
| *प्रतिपदा* | कंठास घट्ट मिठी मारावी, गाल चुंबावे, नखे लावावी, कमर नखानीं खाजवावी, पाठीवर हळूहळू बुक्क्या माराव्यात, कुशी खाजवावी, पोटास बोटे व नखे लावावीत, ओठ हळूहळू चावावेत व चुंबावेत, ललाटाचें चुंबन घ्यावे. |
| *द्वितिया* | गाल चुंबावेत, नखे लावावीत, स्तनाला नखे लावावीत, जघनाला नखे लावावीत, पोटाला नखे लावावीत, कुचचुचुकाचें चुंबन घ्यावें, पायांना नखे लावावी. |
| *चतुर्थी* | उरास नखे लावावी, स्तन ओढून चुंबावे, बाहू धरून ओढावेत, हिसके मारावेत, ओठ चावावेत, चुंबावेत. |
| *पंचमी* | केंस उजव्या हातानें धरावेत, स्तन मर्दन करावे, ओठ चावावेत, कुचचुचुक बोटानी चुरावे. |

## ॥ चित्रिणीचें चंद्रकलेविषयीं ॥

पूर्वी साधारण चंद्रकलेविषयींच्या कोष्टकात ज्या ज्या स्थानीं जें जें कृत्य लिहिलें आहे, तें तें करून आणखी या कोष्टकातील मात्र करून तें टाकूं नये; त्यातील व यातील अशी मिश्रकृत्यें करावीं.

जशी पद्मिनीची चंद्रकला फिरते त्याप्रमाणें तिथिपरत्वें सगळ्यांचे चंद्रकलेविषयीं फरक आहे; तो समजण्याकरिता चित्रिण्यादिकाचें कोष्टक लिहितों.

अधरं परिचुंब्यकंधरामथसंश्लिष्य नखैर्नितंबकम् ।
विलिखन्द्रुतमेव चित्रिणीं ननु षष्ठ्यां द्रवतां नयेन्नरः ॥ ८ ॥
कंठे संपरिरभ्य बाहुलतया नाभिं लिखन्पाणिजै-
र्दष्ट्वाशु रदच्छदं सपुलकं गृह्णन्नुरोजद्वयम् ।
कुर्वन्मन्मथमंदिरे करिवरक्रीडायितुं बुद्धिमान-
ष्टम्यां स्मरवारिनिर्झररवीं कुर्वीत चित्रं प्रियां ॥ ९ ॥
कर्णोरुस्तनमध्यपृष्ठिमदनागारेषु कट्यां तथा
कामिन्या निजवामपाणिकमलं कांतः समालोडयन् ।
ग्रीवां पाणिरुहोर्लिखंश्च शनकैश्चुंबन् ललाटं भृशं
कुर्यादाशु विसृष्ट मन्मथजलां रामां दशम्यां तिथौ ॥ १० ॥
गाढं संपरिरभ्य गंडफलकौ चुंबन् दशन्नाधरं
कर्णश्रोणिनखप्रदानरसिकं कुर्वन्निमेषदृशोः ।
संकर्षंश्चिकुरान्विलासकुशलः सीत्कारयुक्तां प्रियां
द्वादश्यां त्वरयातिविह्वलतनूं कुर्यात् पुमांश्चित्रिणीम् ॥ ११ ॥

यापुढील कोष्टकाचींहि वचनें व सर्व प्रणालिका पूर्वीच्या कोष्टकाप्रमाणेंच आहे. या कोष्टकांत जसें कृत्य लिहिलें आहे त्याप्रमाणें चित्रिणीला करून नंतर भोगावी.

पद्मिनी, चित्रिणी, शंखिनी, हस्तिनी अशा चारी जातींच्या स्त्रियांच्या शरिरातील कामवासना उत्तेजित करणारे ज्ञानतंतु व त्यांच्या तिथ्यनुसार वेगवेगळ्या वेळा व क्रिया या सर्वांचें सूक्ष्मज्ञान व माहिती करून देणारे तंत्र–ग्रंथ कल्याणमल्लाचे समोर होते. त्यांतील सारूपानें हे ज्ञान कल्याणमल्ल येथे देत आहे. शरिरातील ज्ञानतंतूंच्या ज्ञानाची प्रगति किती व कशी झाली होती याची कल्पना वाचकांनीच करावी. केवळ, योनीमध्यें आपलें ताठ शिश्न घालून वीर्यस्खलन झालें एवढेंच समाधान मानणें म्हणजे शारीरिक संभोगकार्य झालें; याला खरें संभोगकार्य कल्याणमल्लाचा अनंगरंग मानीत नाहीं. ज्या जातीच्या लक्षणाची स्त्री असेल, तीं लक्षणें निरखून त्या लक्षणानुसार त्या स्त्रीच्या शरिरातील ज्ञानतंतु उत्तेजित करून स्त्रीला संभोगाची इच्छा झाली म्हणजे पुरुषानें संभोगकार्य करावें. त्यायोगें दोघाना एकसमयावच्छेदेंकरून संभोगानंदाचा विशेष आनंद प्राप्त होतो. ‘अनंगरंगा’चें शास्त्रज्ञान यासाठीच आहे.

### ॥ चित्रिणीचें कामशांति कोष्टक ॥

| | |
|---|---|
| *षष्ठी* | अधरोष्ठ चुंबावा, कंठास मिठी मारावी, कंबर नखानें खाजवावी. |
| *अष्टमी* | योनीत मदनध्वज घालावा, कंठास मिठी मारावी, नाभि नखानें खाजवावी, ओठ लौकर चावावा, स्तन धरावे व ओढावे. |
| *दशमी* | योनि डाव्या हातानें चोळून खाजवावी, कंठास मिठी मारावी, कंबरेवर डावा हात फिरवावा व चोळावा, स्तनावर डावा हात फिरवावा, कानाशीं डाव्या हाताने कांहीं चाळे करावे, मांड्या डाव्या हातानें चुराव्या. मध्य डाव्या हातानें चुरावा, वर खाजवावा, पाठ डाव्या हाताने चोळावी व बुक्की मारावी, कपाळ जोराने चुंबावें. |
| *द्वादशी* | अधरोष्ठ हळूहळू चावावा, कंठास फार घट्ट मिठी मारावी. कानास नखे लावावीं, टि. कुल्ल्यास चुंबून नखे लावावी, नेत्राबरोबर डोळे मिटेशी कृत्ये करावी, चि. केस ओढावे. |

### ॥ शंखिनीचें चंद्रकलेविषयीं ॥

बाहुभ्यां परिरभ्य गाढमधरं दंतैर्दशन्मर्दयन्
दोर्मूले खरपाणिजक्षतचयं यच्छन्व्यथेप्ं भृशम् ।
संकुर्वन् छुरितं कुचद्वयतटे नूनं तृतीयास्वलं
मुक्तानंगजलां स्वकीयवशगां कुर्यान्नरः शंखिनीम् ॥ १२ ॥

वक्षःकपोलगलकर्णपदेषु यच्छन्प्रायो नखानि परिरभ्य कृतास्यपानः ।
गाढं विमर्ध मदनालयमाशु नारीं संद्रावयेन्नरवरः किल सप्तमीषु ॥ १३ ॥
परिरभ्य दृढं रदवच्छदं पिटनाघातरतो वरांगके नखरैः ।
परितो विदारयन् स्ववशां शंभुतिथौ नयेत्प्रियाम् ॥ १४ ॥
विलिखन्नखरैः शिरोधरामथ गृह्णंश्च कुचौ ससीत्कृतम् ।
परिचुंब्य कपोलमंगनां श्लथयेदाशुतिथौ मनोभुवः ॥ १५ ॥

या चारही श्लोकांवरून एक कोष्टक तयार होतें, तें पुढें लिहितों. या कोष्ठकाची सर्व प्रणालिका पूर्वीच्या कोष्टकाप्रमाणेंच आहे.

## ॥ शंखिनीचें कामशांति कोष्टक ॥

| | |
|---|---|
| *तृतीया* | अंग आवळावे, अधर चावावे, स्तन ओरबडावे, चुरावे. |
| *सप्तमी* | अग आवळावे, उराशी नखानें चाळे करावे, गालाला नख लावावे, चाळे करावेत, गळ्याला खाजवावे, नखे लावावीत, कानाला नखे लावावीत, पायाला नखे लावावीत, पा० टो० मुख चुंबावे. चंद्रकोर-योनींत मोठ्या बळानें लिंग आत घालून मर्दन करावे. योनिप्राताच्या पाकळ्या ओढाव्यात. |
| *एकादशी* | अंगास घट्ट आलिंगन द्यावें. चंद्रकोर-योनींत लिंग घालून आघात करावा. ओठ-शिरोधरा-मान चुंबावे, योनिप्रात ओढावा, नखे लावावीत. |
| *त्रयोदशी* | स्तन स्त्री तोंडाने सीत्कार करी तो आवळावे, गाल चुंबावे, ओठ-शिरोधरा-मान नखांनीं लिखन करावी. |

## ॥ हस्तिनीचें कामशांति कोष्टक ॥

| | |
|---|---|
| *नवमी* | चंद्रकोर योनि निर्दयपणाने शिश्नाने न होय तर हाताने चुरावी. नाभि चोळावी, हात वरचेवर फिरवावा, ओष्ठ चुंबीत असावा, चुंबावा, कुशी फार हलक्या हाताने खाजवून हळू नखे लावावीत, स्तन कुस्करून मिसमिशीत करावेत, आवळून लहान करावेत. |
| *चतुर्दशी* | चंद्रकोर-योनीस नखे लावावीं, शिश्न घालून वरचेवर चेपावे, तिची कमर लववावी, डोळे व त्यांच्या कक्षा याचा मुका घ्यावा, चुंबावे, गुदगुल्या कराव्यात व खाजवावे. |
| *पौर्णिमा* | ओष्ठांचीं नानाप्रकारचीं चुंबनें करावी, स्तन ओरबडावे, उराला ओरखडे काढावेत, स्तनाची बोंडी चुंबावी, चिमटीने चुरावी, अंगास नानाप्रकारे आलिंगावे, डोळे व कक्षा यांना नखे लावावी, गुदगुल्या कराव्या. |

'हातानें चुरावी' म्हणजे गजहस्तानें चुरावी. पुरुषाचे शरिरांत 'कामवासना' उत्पन्न झाली म्हणजे त्याचें लिंग ताठ होतें. हें चिन्ह प्रत्यक्ष दिसून येतें. पण स्त्रीचे शरीरात संभोगाची इच्छा उत्पन्न झाल्याचें प्रत्यक्ष चिन्ह दिसून येत नाहीं. संभोगाची इच्छा नसलेल्या स्त्रीशीं संभोग केल्यास त्या स्त्रीला शारीरिक व मानसिक त्रास होतो असें आयुर्वेदाचें मत आहे. म्हणून हलक्या हातानें योनीचें मर्दन केलें असतां योनि मृदु होऊन योनीच्या आतील भाग ओलसर व बुळबुळीत होतो; असें झालें म्हणजे त्या स्त्रीला संभोगाची इच्छा झाली आहे असें मानतात. हस्तिनी स्त्रीची योनी फारच मोठी व आंतील पोकळ भागही मोठा असतो म्हणून तिची योनि गजहस्थानें चुरावी. पांचही बोटांचीं टोकें एकत्र जुळविलीं असता हाताचा आकार हत्तीच्या सोंडेसारखा होतो; त्याला गजहस्त म्हणतात. वात्स्यायनानेंहि गजहस्ताची ही क्रिया कामसूत्रात दाखविलेली आहे. मद्रास प्रांतांतील तंजावरच्या बाजूला 'कुंभकोणम्' जवळ 'उच्छिष्ट' गणपतीचें देऊळ असून त्याचें छायाचित्र 'एलिमेंटस् ऑफ धी हिंदु इकानोग्राफि', पहिला भाग, यांत छापलें आहे. गणपतीची मूर्ति भव्य, पण पूर्ण नग्न असून शेजारीं एक स्त्री पूर्ण नग्न उभी आहे. नग्न स्त्रीनें गणपतीचें ताठ व क्षुब्ध झालेलें शिश्न हातात धरलें असून नग्न गणपती आपली सोंड त्या नग्न स्त्रीच्या योनीमध्यें घालून घुसळण्याची क्रिया करीत आहे. गजहस्त क्रियेचा संबंध या गणपतीशी येऊ शकतो; कारण, त्यात साम्य कसें दिसत आहे याचें ज्ञान होण्या साठीं आम्ही या गणपतीचा उल्लेख येथें केला आहे. 'हस्तिनी' स्त्रियांना हा 'गजहस्ता'चा प्रकार मानवतो.

**इति श्रीमल्लाडनवलविनोदाय महाकविकल्याणमल्लविरचिते अनंगरंगे चंद्रकलानिरूपणं नाम द्वितीयः स्थलः ॥ २ ॥**

याप्रकारें करून महाकवि जो कल्याणमल्ल यानें श्रीलाडराजाच्या विनोदार्थ रचित अनंगरंग या ग्रंथातील दुसरें प्रकरण—प्रत्येक स्त्रीच्या साधारण चंद्रकलेचें वर्णन—संपूर्ण झालें.

या प्रकरणात चंद्रकला म्हणजे स्त्रीशरीरात काम कोणत्या तिथीस कोठें असतो व तेथें पुरुषानें कसें कृत्य केलें असता त्या स्त्रीचा काम मोकळा होतो, हें सांगितलें आहे. याप्रमाणें जो पुरुष वर्तणूक करील त्यावर स्त्रिया संतुष्ट होऊन वश्य राहातील, नाहीं तर त्याच्यात वैमनस्य येईल. दुसऱ्या प्रकरणाचें हेंच तात्पर्य आहे.



प्रकरण तिसरें

## ॥ पुरुषांचे, मैथुनाचे प्रकार ॥

या तिसऱ्या प्रकरणात मैथुनाचे मुख्यत्वेंकरून ९ भेद वर्णिले आहेत.

आरोहैर्मदनांकुशस्य पुरुषा ज्ञेयाः सदाथ स्त्रियो
योनीनां परिणाहकै रसनवादित्यांगुलीकैः क्रमात् ।
जात्या ते तु नराः शशाश्चवृषभा अश्वास्तथैवांगनाः
मृग्योऽश्व्यो द्विरदांगनाश्चकथिताः प्राक्सूरिभिः सर्वतः ॥ १ ॥

पुरुषांमध्येंही तीन जाती आहेत. त्याचीं नावें शश म्हणजे ससा, वृषभ म्हणजे बैल आणि अश्व म्हणजे घोडा. पुरुषांचे जातिभेद त्यांच्या शिश्नाच्या

लांबीमुळें झाले आहेत. ज्यांचें लिंग ताठ झाल्यावर ६ बोटेंपर्यंत लांब होत असतें त्यांस शश म्हणावें. ज्याचें लिंग ताठ झाल्यावर ९ बोटेंपर्यंत लांब होत असतें त्यास वृषभ म्हणावें. ज्याचें लिंग ताठ झाल्यावर १२ बोटेंपर्यंत लांब होत असतें तो पुरुष अश्व जातीचा असें समजावें.

लिंगामध्यें असलेल्या विशिष्ट गुणावरूनही शश, वृषभ व अश्व या संज्ञा दिलेल्या असाव्यात. उदारणार्थ :—'शश' म्हणजे 'उड्या मारीत मोठ्या वेगानें जाणारा' त्याला 'शश' म्हणजे ससा म्हणतात. जें लिंग सहा बोटें आंखूड असलें तरी ताठ झाल्यावर सशाप्रमाणें टुणटुण उड्या मारीत मोठ्या वेगानें योनीमध्यें प्रवेश करितें (घुसतें), तें शशसंज्ञक लिंग होय. असेंच वृषभ व अश्वसंज्ञक लिंगाचेंही समजावें.

कांहीं कामशास्त्रकार सांगतात कीं, जो तरुण, अतिजड बुद्धीचा, आलस्य-सुस्तपणा फार, दुराचरणांकडे नित्य प्रवृत्ति, वर्तनानें गावढळपणा दाखवितो तो दीर्घ शिश्नाचा जाणावा. जो बुद्धीनें तरतरीत, चलाख, सदाचार-शिष्टाचार नेहमीं पाळतो, आवाजात माधुर्य, विद्वत्तापूर्वक वक्तृत्व करणारा, तो लघु शिश्नाचा होय.

## ॥ रति विनोद ॥

संस्कृतामध्यें लघुशिश्नविषयक एक रतिविनोद प्रसिद्ध आहे. 'सिद्धान्तकौमुदि' शिकणारे प्रबुद्ध विद्यार्थि–विद्यार्थिनी एकत्र बसले असतां एक कर्मठ विद्यार्थी स्नान करून तेथें आला. तलमवस्त्र (धोतर) नेसत असता त्यातून त्याचें आंखूड झालेलें शिश्न सहज दिसलें, तेव्हा एक विद्यार्थिनी दुसरीला बोटाची खूण करून सांगते, "ऱ्हस्व लघु, लहान आखूड आहे," तोंच, तो कर्मठ विद्यार्थी उद्गारला, "संयोगे गुरु–सयोगाचे वेळीं तें मोठें होतें." व्याकरणात्मक प्रश्न त्याचें व्याकरणात्मक उत्तर; संयोग=संभोग.

जसें पुरुषांत लिंगाची लांबी व आडखूपणा यामुळें तीन भेद झाले आहेत, तसेंच स्त्रियांच्या योनीचा खोलपणा व उथळपणा यामुळें स्त्रियांच्याही पद्मिन्यादि प्रत्येक जातींत तीन तीन भेद झाले आहेत. त्यांचीं नांवें हरिणी म्हणजे हरीण जातीची स्त्री· अश्विनी म्हणजे घोडी, करिणी म्हणजे हस्तिनी. ज्या स्त्रियांची योनी सहा बोटेंपर्यंत खोल त्यास हरिणी म्हणावें; ज्याची नऊ बोटेंपर्यंत खोल असते त्यास अश्विनी समजावें आणि ज्याची बारा बोटेंपर्यंत खोल असेल त्यास करिणी म्हणजे हस्तिनीच्या जातीच्या समजाव्या.

आतां या प्रत्येक जातीच्या पुरुषाशीं व प्रत्येक जातीच्या स्त्रीशीं संभोग होऊन मैथुनाचे मुख्य ९ भेद झाले आहेत; त्यामध्यें ५ प्रति आहेत. त्यांचीं नांवें–समान १, उच्च २, नीच ३, अत्युच्च ४, आणि अतिनीच ५.

अनुक्रम ८८५३२ वि: निषेध
 नों दि ३२२५२

१ समान म्हणजे सारखें अथवा बरोबर, या मैथुनानें दोघासही उत्तम सुख होतें. २ उच्च म्हणजे कठीण अथवा अवघड, हें स्त्रीला अल्प सुख देणारें. ३ नीच म्हणजे पोकळ अथवा हलकें, दोघासही स्वल्प सुख देणारें. ४ अत्युच्च म्हणजे फार कठीण अथवा फार अवघड, आणि स्त्रीला अगदीं सुख न करणारें. ५ अति नीच म्हणजे फारच पोकळ अथवा अगदीं हलकें, आणि यापासून सुख दोघासही अगदीं होत नाहीं.

**हरिणीशशयोर्वृषाश्विन्योः समयोगः करिणीतुरंगयोः भवतीह परस्परं द्वयोर्नितरां प्रीतिरनंगसंगरे ॥२॥ हरिणीवृषभातथाश्विकातुरगाच्चोच्चमितिद्वयं रतम् तुरगीशशाकाद्विपीर्वृषात्स्मृतमेतद्वितयं तु नीचकम् ॥३॥ कुरंगीहरयोर्योगे रतिमत्युच्चकां विदुः हस्तिनीशशयोश्चापि रतं स्यादतिनीचकम् ॥४॥ तत्र प्रशस्तं सुरतं समं स्यादुच्चद्वयं मध्यममेव निंद्यात् नीचेऽधमेत्युच्चमधोतिनीचमत्यंतनिंद्यं कविभिः प्रदिष्टम् ॥५॥**

आता कोणत्या स्त्रीशीं कोणत्या प्रकारच्या पुरुषाचा संभोग झाला असतां कोणत्या प्रतीचें मैथुन घडतें व ती प्रत लावण्याकरिता शिश्नाची लांबी किती असते हें कळण्याकरिता शिश्नाची लांबी व योनीची खोली यांसुद्धा त्या त्या स्त्रियांची व त्या त्या पुरुषाचीं नांवें पुढें कोष्टक घालून लिहितों.

या कोष्टकांत स्त्रीपुरुषाच्या नावासमोरच्या घरांत शिश्नांच्या व योनींच्या प्रमाणाचे अंक लिहिले आहेत, त्या पुढें संगकोष्टक. त्यात उत्तम, मध्यम, कनिष्ठ असें म्हटले आहे. त्यावरून उत्तमादिक संग जाणावा.

पहिलीं कोष्टकें आहेत, परंतु या कोष्टकावरून स्त्रीपुरुषास कोणत्या मैथुनानें सुख होतें ते कळणार नाहीं. यासाठीं हा भेद स्पष्ट समजण्याकरितां नवीन कोष्टक लिहिलें आहे. यात पुरुषजाती—स्त्रीजाती समजेल. कोणाशीं संभोग झाला असतां उत्तम, मध्यम, कनिष्ठ सुख होतें हें कळेल. कोष्टकाची अनुक्रमणिका, कोष्टकावर भेद, नांवें इत्यादिक लिहिलें आहे त्यावरून समजेल.

॥ शशपुरुष ॥

| भेद | नांवें | गुह्यस्थान | अंगुळें | प्रमाण | संभोग |
|---|---|---|---|---|---|
| पहिला | शशपुरुष / हरिणी स्त्री | लिंग । योनि | ६ । ६ | लांब । खोल | उत्तम |
| दुसरा | शशपुरुष / अश्विका स्त्री | लिंग । योनि | ६ । ९ | लांब । खोल | मध्यम |
| तिसरा | शशपुरुष / करिणी स्त्री | लिंग । योनि | ६ । १२ | लांब । खोल | कनिष्ठ |

### ॥ वृषपुरुष ॥

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पहिला | वृषपुरुष / हरिणी स्त्री | लिंग । योनि | ९ । ६ | लांब । खोल | मध्यम |
| दुसरा | वृषपुरुष / अश्विका स्त्री | लिंग । योनि | ९ । ९ | लांब । खोल | उत्तम |
| तिसरा | वृषपुरुष / करिणी स्त्री | लिंग । योनि | ९ । १२ | लांब । खोल | कनिष्ठ |

### ॥ अश्वपुरुष ॥

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पहिला | अश्वपुरुष / हरिणी स्त्री | लिंग । योनि | १२ । ६ | कनिष्ठ |
| दुसरा | अश्वपुरुष / अश्विका स्त्री | लिंग । योनि | १२ । ९ | मध्यम |
| तिसरा | अश्वपुरुष / करिणी स्त्री | लिंग । योनि | १२ । १२ | उत्तम |

### ॥ मैथुनसुखांत अंतर कां पडतें ? ॥

आतां मदनांकुशाच्या लांबीच्या न्यूनाधिक्यभावामुळें आणि तसेंच योनीच्या उथळपणा व खोलपणामुळें मैथुनाच्या सुखांत अंतर पडून मैथुनांत उत्तम व मध्यम प्रती कशा झाल्या तें वरील कोष्ठकावरून कळेल. परंतु असें सुख होण्यांत फरक कां पडावा हें कळण्यासाठीं पुढील चार श्लोक लिहिले आहेत. मदनाकुश—मदनाचा अकुश म्हणजे ताठ झालेलें शिश्न.

मत्त हत्तीला लोखडी अकुशानें त्याच्या गंडस्थळावर जोरानें टोचलें असता तो मत्त हत्ती ताब्यात रहातो. त्याप्रमाणें कामवासनेनें मत्त झालेल्या तरुण स्त्रीला तिच्या योनीवर ताठ झालेल्या मदनांकुशानें टोचलें असतां ती स्त्री ताब्यात रहाते, हें दर्शविण्यासाठीं येथें 'अकुश' या शब्दाचा उपयोग मोठ्या युक्तीनें केला आहे. सदोदित कामविलासामध्येंच दंग असणाऱ्या उन्मत्त स्त्रिया ताठ झालेल्या शिश्नाला-मदनाकुशाला 'प्रेमाचा टोंचा' असें संबोधितात. कारण, हा 'प्रेमाचा टोंचा' त्यांच्या योनींवर टोंचल्यानें त्या स्त्रियांच्या हृदयामध्यें प्रेम उत्पन्न होतें, प्रेमाचा हा एक प्रत्यक्ष साक्षात्कारच होय असें त्या विलासिनी स्त्रिया समजतात.

**क्रमयो रुधिरोद्भवास्त्रिधा लघुमध्यातिबलाः स्मरालये ।**
**जनयंति बलानुसारतो बहुकंडूर्वनितावरांगके ॥ ६ ॥**

स्त्रीच्या गुह्यभागामध्यें रक्तापासून फार सूक्ष्म कृमि उत्पन्न होतात. ते तीन प्रकारचे असतात. थोड्या बळाचे, मध्यम बळाचे आणि अधिक बळाचे. ते कृमि आपआपल्या शक्त्यनुसार मुळारंभीं योनीमध्यें कंडू उत्पन्न करितात. त्यामुळें स्त्रियांना भोगाची इच्छा होते आणि तो कंडू पुरुष-लिंगानें जोराजोरानें घर्षण करून शमविला म्हणजे भोगाविषयीं स्त्रिया तृप्त होतात.

रजोदर्शनाच्या वेळीं स्त्रीच्या योनींतून तीन दिवस आर्तव म्हणजे सांचलेलें रक्त बाहेर वहात असतें. तें रक्त जेथून वहातें त्याच्या मूळ जागीं त्या आर्तवापासून अतिसूक्ष्म जंतु उत्पन्न होतात. व ते जंतु आपल्या सामर्थ्याप्रमाणें अति तीव्र, मध्यम व मंद अशी कंडू तेथें उत्पन्न करितात. हा कंडू स्त्रियांच्या शरिरात संभोगेच्छा उत्पन्न करण्यास कारणीभूत होतो असें कल्याणमल्लाचें मत आहे. (शास्त्रीय युगांत जंतुविज्ञानशास्त्र प्रसिद्धच आहे.) लांकडाचे दोन ठोकळे एकमेकांवर जोरानें एकसारखें घर्षण केलें असता त्यांतून अग्नि निर्माण होतो. तसेंच योनीच्या आंतील भागांवर ताठर व कठीण शिश्नाचें जोराजोरानें घर्षण केलें असता योनींतील कंडूची खाज शमून तेथें प्रेमाग्नि निर्माण होतो. त्या प्रेमानें स्त्रियाना संतोष वाटतो. पुरुषाशीं संभोग करण्यास स्त्रिया कां तयार होतात ? हा संतोष स्त्रियांना प्राप्त होतो म्हणून स्त्रिया पुरुषाशीं संभोग करण्यास तयार होतात, पण वेश्या-स्त्रिया संतोषाऐवजीं द्रव्य मिळतें म्हणून संभोग करतात.

**प्रमाणहीनलिंगेन स तु कंडुर्न शाम्यति ।**
**अतो न नीचसंयोगे तुष्टिं गच्छन्ति योषितः ॥ ७ ॥**

तो कंडू आखूड लिंगानें शमत नाहीं; कारण जेथें कंडू उत्पन्न होतो, तेथें आंखूड लिंग स्पर्श करीत नाहीं. म्हणून पूर्वी जें कोष्टकात वर्णिलेलें कनिष्ठ मैथुन त्यापासून स्त्रियांस संभोगसुख प्राप्त होत नाहीं.

**वरांगमध्यं नारीणामत्यंतं कोमलं स्मृतम् ।**
**अतिप्रमाणलिंगेन नातस्तासां सुखं भवेत् ॥ ८ ॥**

तसेंच योनीच्या खोलपणापेक्षां लिंग फारच लांब असलें तर स्त्रियांना कां सुख होत नाहीं ? कारण सर्व स्त्रियांची योनि आतल्या बाजूनें फारच कोमल असते; यास्तव योनीपेक्षा अधिक लांब शिश्नानें त्यास सुख होत नाहीं. (उलट त्रास होतो.) उदाहरणार्थ—अश्व पुरुष व हरिणी स्त्री.

॥ लिंग कसें असलें असतां सुख उत्तम होतें? ॥

समप्रमाणलिंगेन स्थूलेन सुदृढेन च ।
शमयेन्मूलकंडूतिं स्पन्दयंश्च मुहुर्मुहुः ॥ ९ ॥

स्त्रीची योनि जितकी खोल तितक्याच समप्रमाणामध्यें शिश्न लांब असून जाड आणि चांगलें ताठर झालेलें असावें. योनींत घातलेलें ताठर शिश्न मागें पुढें हालवून स्त्रियाच्या योनीचा कडू समप्रमाण लिंगानें शमवीत जावा; अशा मैथुनानेंच उभयता स्त्रीपुरुषांस पूर्ण सुख होतें.

कामकेलिकलाभिज्ञः सुखयन् विविधैर्गुणैः ।
विसृष्टकामसलिलां वशीकुर्यान्मृगीदृशम् ॥ १० ॥

कामक्रीडेची कला म्हणजे हें कामशास्त्र जो जाणेल तो नानाप्रकारच्या गुणानीं स्त्रीला सुख उत्पन्न करून तिचें कामसलिल पाडून आपल्या स्वाधीन ठेवील.

आपल्या स्त्रीला पूर्ण समाधान होईल असें संभोगसुख मिळण्यासाठीं कामशास्त्र आणि कामकलेमधील कौशल्य पुरुषानें शिकलेंच पाहिजे. त्यायोगें आपली स्त्री आपल्याच ताब्यांत राहील, ती परपुरुषाकडे मुळींच पहाणार नाहीं. प्रत्येक पुरुषाची इच्छा अशीच असते कीं, आपली वायको आपल्या स्वाधीन असावी. 'कामसलिल' म्हणजे प्रेम उत्पन्न करणारा योनींतील द्रवरस. योनींतील श्लेष्मत्वचेंतून ओलसर व बुळबुळीत जो रस पाझरतो त्याला 'कामसलिल' म्हणतात. हें कामसलिल पडलें म्हणजे योनींतील श्लेष्मत्वचेंतून ओलसर व बुळबुळीत रस संभोगाचें वेळीं उत्पन्न झाला कीं, त्या पुरुषावर स्त्रीचें प्रेम बसल्याचें तें एक सूचक चिन्ह आहे. मदनाला पाहून कृष्णस्त्रियाची योनि आंतून ओलसर व बुळबुळीत झाल्याची कथा 'भविष्य-पुराणां'त आहे. आवडीचें पक्वान्न पाहिलें म्हणजे मुखामध्यें जशी लाळ उत्पन्न होते, तसेंच स्त्रीनें प्रेम बसलेला आपल्या आवडीचा 'सुंदर तरुण' पाहिला कीं तिची योनि बुळबुळीत ओलसर होते. तिच्या योनींतून वरीलप्रमाणें प्रेमरस पाझरू लागतो. त्यावेळीं, या कामोपभोगासारखी गोडी दुसऱ्या कशातहि नाहीं, असें तिला वाटतें; आणि त्या सुंदर तरुणाशी संभोग कार्य करण्यास तिचें मन उत्साहित होतें.

आतां नारीचें कामसलिल पडलें हें कसें ओळखावें यासाठीं कामसलिल पडल्याचीं लक्षणें लिहितों.

नारी विसृष्टकुसुमेषुजला रतांते
नृत्यं करोति बहुवल्गनरोहणे च ।
कैवल्यमेति मुकुलीकृतवामनेत्रा
शक्नोति नो किमपि सोढुमतिप्रयासात् ॥ ११ ॥

नारीच्या रतीचा अंत झाला असता ती चळवळ करू लागेल व वल्गना फार करील. डोळ्यातून पाणी वाहील व फार प्रेमात येईल, आणि डोळा अर्धा मिटील, व मोठ्या प्रयासानेंही मग तिच्यानें कोणतेही चाळे सोसवणार नाहींत. अशीं हीं लक्षणें उत्पन्न झालीं असतां त्या स्त्रीचें रेत पडलें असें समजावें. म्हणजे त्या स्त्रीला संभोग पुरा झाला असें कामशास्त्रज्ञ पुरुषानें समजावें.

चिरमध्यमशीघ्रसंभवा नरनार्युक्तविसृष्टिरुच्यते ।
समयप्रमितिप्रभेदतो नवधैवं सुरतं समीरितम् ॥ १२ ॥

सर्व विसृष्टि तीन प्रकारच्या आहेत. चिरसभवा विसृष्टि, मध्यमसभवा विसृष्टि आणि शीघ्रसंभवा विसृष्टि. विसृष्टि म्हणजे वीर्य पडणें. फारच उशीरानें जें वीर्य पडतें त्याला चिरसंभवा विसृष्टि म्हणतात; मध्यम वेळानें वीर्यस्राव होतो, त्याला मध्यमसंभवा विसृष्टि म्हणावें; आणि तावडतोब जो वीर्यपात होतो, त्याला शीघ्रसंभवा विसृष्टि असें नाम आहे. या विसृष्टि नरांच्या व नारींच्याही ठिकाणीं असतात, तेंव्हां या विसृष्टिकालाचे भेद ९।९ झाले आहेत.

चंडमध्यममदाख्यांस्त्रीन् वेगांश्च विदुस्तयोः ।
क्रिया च त्रिविधा प्रोक्ता लघमध्यचिरोदया ॥ १३ ॥

आतां वेगही स्त्रीपुरुषाचे तीन प्रकारचे आहेत. चंडवेग, मध्यमवेग आणि मदवेग. वेग म्हणून पदार्थांच्या ठायीं कांहींएक विचित्र सामर्थ्य असतें, तें ध्यानांत येण्यासाठीं एक दृष्टांतिक उदाहरण लिहितो. क्षुधा सर्वांस लागते खरी, परंतु एकाद्या क्षुधेचा असा वेग असतो कीं, क्षुधा लागली असता त्या माणसाला अगदीं दम धरवत नाहीं, लागलाच घाबरा होतो, एकादे क्षुधेचा मध्यम वेग असतो, त्या क्षुधेनें मनुष्य तसा लवकर घाबरा होत नाहीं, आणि ज्या क्षुधेचा मद वेग असतो, ती क्षुधा सहज सहन करिता येते. याच न्यायेंकरून मैथुनाचें वेग समजावेत.

एखाद्या मैथुनाचा वेग असा प्रचंड असतो कीं, लिंग ताठ झाल्याबरोबर जर तत्काळ संभोग केला नाहीं, तर त्या पुरुषाला काहीं सुचत नाहीं, निर्लज्ज व चिडखोर बनतो, निष्कारण रागावतो व शेवटीं भ्रमिष्टहि होतो. मैथुनाचा हाच प्रचंड वेग कामातुर स्त्रीच्या ठायीं उत्पन्न होऊन जर तिला तावडतोब संभोगसुख समाधानकारक

मिळालें नाहीं, तर त्या स्त्रीला 'उन्माद' होतो, असें 'आयुर्वेदा'चें मत आहे. जलामध्ये मत्स्यवेग, पृथ्वीवर अश्ववेग, आकाशात गरुडवेग, शयनमंदिरात संभोगाचा मैथुनवेग महत्त्वाचा समजतात.

क्रिया म्हणजे आपलें रेत पाडण्याचा व स्त्रीचें पाडविण्याचा उद्योग; ती क्रिया तीन प्रकारची आहे.

चिरोदयक्रिया, मध्योदयक्रिया आणि लघूदयक्रिया. चिरोदयक्रिया म्हणजे संभोगसमयीं फार उशिरानें रेत पडेल असा उद्योग करणें, मध्योदयक्रिया म्हणजे नेमस्त वेळातच वीर्यस्राव होईल असा उद्योग करणें आणि लघूदयक्रिया म्हणजे फार लवकर रेत पतन होईल असा उद्योग करणें.

**अत्रापि कालभेदेन नवधात्वं समूहयेत् ।**
**सप्तविंशति संख्यांकैः कीर्तितैव रतिर्बुधैः ॥ १४ ॥**

याप्रकारें हे क्रियेचे भेद कालाच्या न्यूनाधिक्यतेमुळें झाले. त्याहि मैथुनभेदाचे भेद ९।९ आहेत; अथवा या ग्रंथाचा दुसरा असा भाव दिसून येतो कीं, शिश्नाची लांबी व योनीच्या खोली यामुळें मैथुनाचे प्रकार ९, विसृष्टीमुळें झालेले ९ आणि क्रियेच्या कालामुळें होणारे ९; एकूण २७ प्रकारची रति आहे असाही भाव दिसतो.

### ॥ पूर्वी सांगितलेल्या वेगांचीं लक्षणे ॥

**प्रचंडवेगे बहुशो विसृष्टिः कामाकुलत्वं रतिलोलता च ।**
**स्यान्मन्दवेगे विपरीतमेतत्तन्मध्यमभावः खलु मध्यमेषु ॥ १५ ॥**

स्त्रीस कामाचा प्रचंड वेग असला तर तिचें रेत बहुत वेळ पडेल व कामोपद्रव असा होतो कीं, केवळ भोगासाठीं घाबरी होईल आणि रतीसाठीं फार उत्सुक होईल. मद वेग जर असेल तर या चंडवेगाचीं जी लक्षणें, त्याच्या विपरीत लक्षणें होतील आणि मध्यमवेगास मध्यम लक्षणें होतील.

### ॥ अथ शशलक्षणानि ॥

**प्रायः कोमलकोमलाः पृथुदृशः शांताश्च तुच्छाशनाः**
**सूक्ष्मांगाः शुचयः सुवर्तुलमुखास्तुल्यात्पदंतारतथा ।**
**विभ्रांतः करजानुपादजघनग्रीवोरुषु श्यामतां**
**धन्याः स्वल्परताः सुगंधिमदनस्पंदा विनीताः शशाः ॥ १६ ॥**

ज्या नराचे केस नाजूक, डोळे मोटे, वृत्ति शांत, खाणें थोडें, शरिरानें लहान, तोंड स्वच्छ सुरेख असून वाटोळें, दात बारीक हात, गुडघे, पाय, जघन, गळा व छाती इतक्या ठिकाणीं श्यामता भासते व जे लोक मोठ्या सत्कीर्तींचीं कामें करितात आणि ज्याची रति अल्प असते, मदनध्वजास सुगंध येतो व जे नम्र असतात, ते शशाच्या जातीचे होत असें समजावें.

॥ अथ वृषलक्षणानि ॥

क्रूराः प्रोन्नतमौलयो दृढभुजा सुप्रौढवक्षस्थला
रूक्षाः कूर्मनिभोदराः कठिनतास्त्यागान्विताः पीवराः ।
शोणांतस्थिरदीर्घलोचनभृतस्त्वारक्तहस्तोदरा
व्यालोला वृषभा नवांगुलमितं कामांकुशं बिभ्रति ॥ १७ ॥

जे पुरुष क्रूर असून कपाळ उंच, दंड फिरलेले, छाती मोठी, शरीर रुक्ष, पोट कासवाप्रमाणे कठीण, त्यागाविषयीं तयार, अंगानें पुष्ट, डोळे लांब असून आतल्या बाजूनें गुलाबी रंगाप्रमाणें असतात, तळहात चांगले आरक्त, स्वभावानें चंचल आणि ज्यांच्या मदनांकुशाची लांबी ९ अंगुळें असते, ते वृषभ जातीचे आहेत असें जाणावें.

॥ अथ अश्वलक्षणानि ॥

दीर्घस्थूलशिरोरुहाश्चलदतिस्फारेक्षणाः क्रोधना
अत्यंतं कृशदीर्घकंधररदश्रोत्राननाः लोभिनः ।
पीनोरस्थलदीर्घबाहुयुगला निद्रालवः सालसाः
प्रौढा वक्रनखांघ्रिजानुयुगला गंभीरसंभाषिणः ॥ १८ ॥
धृष्टाः खंडरते रताश्च नितरां दीर्घांगुलिश्रेणयः
स्थूलस्त्रीरतिलालसा बहुभुजो गत्या तु पृथ्व्यान्विताः ।
भूरिक्षारविगंधिमन्मथजलप्रायास्तथाऽस्थ्याकुला
आदित्यांगुलसंमितं च तुरगालिंगं सदा बिभ्रति ॥ १९ ॥

ज्या पुरुषाच्या मस्तकाचे केस लांब असून ठोंसर, तसेंच पहाणेंही रोखाचें असून फार चंचल; अत्यंत क्रोधी आणि लोभी असतात; मान, दांत, कान, तोंड हीं फार लांब असून कृश, छाती पुष्ट, हात फार लांब, झोंपाळू, आळशी, आंगानें मोठा, बोलणें गंभीर; नखें, पाय व गुडघे वांकडे असतात, जे पुरुष शरिरानें रांकट आणि ज्यांस वीर्यस्रावापर्यंत भोगाची तादृश प्रीति

नसते, वीर्यस्रावाच्या पूर्वीच रति टाकतात, बोटें व कुल्ले लांब असतात आणि स्थूल बायको जशी मनापासून आवडते तशी कृश आवडत नाहीं. जेवण फार जेवतात, चाल गंभीर, रेताला उग्र खारट वास येतो व वीर्य फार पडतें आणि अगावर मास फार असत नाहीं, लिंग बारा बोटेंपर्यंत लांब असतें, ते अश्व जातीचे आहेत असें समजावें.

॥ मृगीचीं लक्षणें ॥

सांद्रा कुंचितकुंतला समशिरा तन्वी सुतुंगस्तनी
फुल्लेंदीवरलोचनाऽल्पविवरघ्राणा च तुच्छोदरी ।
आरक्ताधरपाणिपादयुगला पीनोरुकामालया
प्रायः कोमलचंचलर्जुभुजिका विस्तीर्णगंडश्रुतिः ॥ २० ॥
ईर्ष्यालुः सुकुमारिका पिकरवाऽत्यंतं रतेलंपटा
विभ्रत्यंबुजमंजुगंधिमदनस्पंदा तथाल्पाशना ।
सुश्रोणी सरलांगुली गजगतिश्चञ्चन्मना रागिणी
ज्ञेया निम्नषडंगुलैः परिमितं गुह्यं वहंती मृगी ॥ २१ ॥

जिचे केंस स्निग्ध असून कुरळे, शीर नेमस्त आणि शरीर नाजूक, स्तन वर उचलल्यासारखे असतात, डोळे निळ्या कमळाप्रमाणें काळे, नाकाचीं छिद्रें बारीक, पोट चांगलें पाठीस मिळालेले असतें, अधरोष्ठ व हातपाय अति आरक्त, मांड्या आणि गुह्याग पुष्ट असतें, भुजा कोंवळ्या असून गोलाकार असतात; गाल व कान हे विस्तीर्ण, ईर्षा फार, शरिरानें अत्यंत कुमारीप्रमाणें लहानशी दिसते, शब्द कोकिळेप्रमाणे, रतिसुखाविषयीं फार लंपट आणि जिच्या मदनसलिलाचा वास कमळाच्या वासाप्रमाणें येतो, जेवण फार नसतें, कुल्ले चागले पुष्ट, बोटें सरळ आणि पूर्वी सांगितलेली जी गजगति त्याप्रमाणें चाल, मन चचल, प्रीति फार असते, गुह्य सहा बोटें खोल असतें, ती स्त्री मृगीच्या जातीची असें समजावें.

॥ वडवेचीं लक्षणें ॥

मौलिं निम्नसमुन्नतं विदधती स्थूलर्जुसांद्रैः कचै-
र्नीलांभोजदलेक्षणाऽयतगलश्रोत्रानना कोमला ।
पीनश्रोणिपयोधरा शुभगतिर्गम्भीरनाभिह्रदा
किंचित्पृथ्वधरा च मांसलभुजा क्षामोदरी कोपिनी ॥ २२ ॥

शोणांभोरुहचारुपाणिचरणा निद्रासुभोज्यप्रिया
विस्तीर्णा दधती कटीं चलमनाः कांतेऽनुरागान्विता ।
कामांभः पललप्रगंधि सुचिरात्संभोगकाले द्रवे-
द्विज्ञेया वडवा नवांगुलिमितं गुह्यं वहंती बुधैः ॥ २३ ॥

ज्या स्त्रीचें शीर उतरतें आणि लांब, सरळ व मऊ केसांनीं युक्त असून उच असतें, मान लवलेली, डोळे निळ्या कमळाचे पाकळीप्रमाणें, गळा, कान, तोंड हीं रुंदट, शरिरानें नाजूक, कुल्ले व स्तन पुष्ट, चालणे गंभीर, बेंबी खोल आणि खालचा ओंठ किंचित् मोठा असतो व भुजा पुष्ट, दोंदिल-पणा असत नाहीं, कोपिष्ट असते, हातपाय तांबड्या कमळाप्रमाणें आरक्त सुरेख असतात, निद्रा व चांगलें अन्न याची आवड करते आणि ढुंगण रुंद, मनानें चचल, नवऱ्यावर प्रीति असते, कामसलिलाचा वास मातट येतो, भोगकाळीं रेत लवकर पडत नाहीं, योनि ९ बोटें खोल असते, असल्या स्त्रिया घोडीच्या जातीच्या असतात.

## ॥ करिणीचीं लक्षणें ॥

पीनघ्राणकपोलकर्णगलका प्रस्फारलंबौष्ठिका
पिंगाक्षी दरवक्त्रपर्वनिवहा पृथ्वल्पनीलालका ।
ऱ्हस्वस्थूलकरांघ्रिबाहुयुगलां गंभीररूक्षस्वना
कामार्ता सततं स्वतीक्ष्णदशना दुष्टा च वीतत्रपा ॥ २४ ॥
दुःशीला शबलांगिका पृथुकुचा कष्टैकसाध्यारता
चात्यंत बहुभोजनी च नितरां पापेषु बद्धस्पृहा ।
विभ्रत्येभमदोग्रगंधमपि सा कंदर्पनीरे सदा
ज्ञेया भानुमितांगुलैकमदनावासा बुधैर्हस्तिनी ॥ २५ ॥

ज्या स्त्रीचें नाक व कान हे मोठे आणि गळा मोठा, गाल फुगीर असतात, ओंठ लांब असून बाहेरच्या बाजूस उलटलेले असतात, डोळ्याचा वर्ण पिंगट, तोंड भयकर असून वाजत असतें, अंगाचे सांधे चालत असतां अथवा काहीं दुसरे वेळेस खट्खट् असे वाजत असतात, केंसाला आखूडपणा असून काहीं काळेपणाही असतो, पाय, हात व दंड आंखूड असून स्थूल असतात, शब्द मोठा कर्कश असतो व स्त्रीला सर्वकाळ कामोद्रेक असून मोठी कामातुर आणि दुष्ट, अगदीं निर्लज्ज असते, दात मोठे तीक्ष्ण कुत्र्याप्रमाणें असतात, स्वभाव

दुष्ट, वाईट, अगाबर मलादिकाचें शबर असतें, स्तन फार मोठे असतात, रति थोडी पुरत नाही, लवकर दमतही नाही व खादाड फार असते, पाप करण्याविषयीं अगदीं मागें सरत नाहीं, खुशालपणीं पातक करिते, सर्वकाळ कामसलिलाला हत्तीचा जो मद वहातो त्याच्या वासाप्रमाणें उग्रट वास येतो, इतके गुण ज्या स्त्रीच्या ठिकाणीं असून गुह्य बारा बोटें खोल असतें, तिला करिणी म्हणावें.

**इति निर्दिष्टभेदानां व्यभिचारोपि लक्ष्यते ।**
**श्रेष्ठध्याधमत्वेन सांकर्यात्र विशेषतः ॥ २६ ॥**

हीं लक्षणें सर्वत्र सारखीं उतरून अनुभव येत नाहीं: याचें कारण असे आहे कीं, पूर्वी सांगितलेले गुण कोठें फार असतात व कोठें थोडे राहातात, आणि एखादे ठिकाणीं तर फारच थोडे सापडतात, त्यामुळें अनुभव येण्यात अंतर पडतें आणि कोठें तर जातिभेदाचें सांकर्य म्हणजे प्रकृतीचा मिश्रभाव असतो, अशा कारणामुळें व सूक्ष्म भेद लक्षात न आल्यामुळें बरोबर उतरत नाहीसें वाटतें.

मिश्रप्रकृति म्हणजे पद्मिनी, हस्तिनी, अशा तीन चार लक्षणानीं मिळून अथवा मृगी व करिणी, इत्यादि दोनतीन प्रकृति मिळून स्त्रिया, आणि पुरुषही शश–वृष इत्यादि दोनतीन जातीचे गुण मिळून झालेले असतात; तेव्हां तसल्या स्त्रीपुरुषाच्या ठिकाणीं लक्षणाचा संकर होतो, त्यामुळें फल बरोबर उतरत नाहींसें वाटतें. आता मिश्रप्रकृतीच्या स्त्रीपुरुषानीं संभोगाच्या वेळीं मिश्रकृत्यें केलीं असतां सर्व गोष्टीस बरें पडेल, परंतु मिश्रप्रकृति ओळखण्यास मोठें चातुर्य पाहिजे. तें जर असेल तर मिश्रप्रकृतींतील प्रत्येक प्रकृतीचे गुण ओळखून त्या त्या प्रकृतीला प्रियकर अशीं जर मिश्रकृत्यें स्त्रीपुरुष करतील तर अनुभवामध्यें कांहीं फरक वाटणार नाहीं.

**इति श्रीमल्लाडनवलविनोदाय महाकविकल्याणमल्लविरचितेऽनंगरंगे जातिविशेषपूर्वकसुरतभेदनिरूपणं नाम तृतीयः स्थलः ॥ ३ ॥**

याप्रकारें करून श्रीमत राजाधिराज जो लाड राजा त्याच्या विनोदासाठीं श्रीकल्याणमल्लकवीनें रचित जो अनगरंग ग्रंथ त्यातील तिसरें प्रकरण स्त्री-पुरुषाच्या जातिभेदाच्या वर्णनासहवर्तमान सुरतभेदनिरूपणाचें सिद्धीस जातें झालें.



प्रकरण चौथें

## ॥ स्त्रियांच्या सामान्य धर्माविषयीं ॥

सामान्य धर्म चार प्रकारचे किंवा तीन प्रकारचे, अशा सकल स्त्रियावर रहाणारे गुण.

आता वयपरत्वें करून स्त्रियांच्या चार अवस्था आहेत, त्या आणि त्याना कशी कशी आवड असते त्यासुद्धां त्याच्या स्वभावाचे वर्णन करितो, तें यथास्थित ध्यानात येण्याकरिता पुढें कोष्टक लिहितों.

यावद्वस्वद्रमुदिता जन्मतो नाम कन्यका ।
तत ऊर्ध्वं रुद्रसमा तावद्गौरीति विश्रुता ॥ १ ॥

जन्मापासून आठ वर्षांपर्यंत कन्या संज्ञा, अकरा वर्षांपर्यंत गौरी, त्याच्यापुढें कोष्टकीं लिहिलें आहे.

यावत्षोडशसंख्यमब्दमुदिता बाला ततस्त्रिंशतं
यावत्स्यात्तरुणीति बाणविशिखप्रख्यं तु यावद्भवेत् ।
सा प्रौढेत्यभिधीयते कविवरैर्वृद्धा तदूर्ध्वं स्मृता ।
निंद्या कामकलाकलापविधिषु त्याज्या सदा कामिभिः ॥ १ ॥
बाला नवीनसुरते मुदिता तमिस्त्रे
संजायतेऽथ तरुणी महति प्रकाशे ।
प्रौढा प्रकाशतमसोः समुपैति सौख्यं
वृद्धा तु न क्वचन जीवितहारिणी सा ॥ २ ॥
बाला तांबूलमालाद्यैस्तरुणी भूरिभूषणैः ।
सुप्रेम्णा रंजते प्रौढा वृद्धा स्वालापगौरवैः ॥ ३ ॥

॥ स्त्रियांच्या वयोधर्माविषयीं कोष्टक ॥

| | | | | |
|---|---|---|---|---|
| *स्त्रियांचे वर्षभेद* | १२–१६ वर्षें | १६–३० वर्षें | ३०–५५ वर्षें | ५५–१०० वर्षें |
| *व वयपरत्वे नांवें* | बाला | तरुणी | प्रौढा | वृद्धा |
| *कामविलासाविषयीं* | योग्य | योग्य | योग्य | अयोग्य |
| *मैथुनाची अतिप्रीति* | अंधारांत आवडते | उजेडात आवडते | थोड्या उजेडात थोड्या अंधारात | पुरुष शक्तिक्षीण होतो, रोगी होतो |
| *कोणती कशी वश्य होते* | पुष्पें-विडा इत्यादिकांनीं | अलंकारादि भूषणानीं | चांगल्या प्रेमानें | मोठेपणाच्या स्तुतीनें |

या कोष्टकात बाला, तरुणी, प्रौढा अशा तीन प्रकारच्या स्त्रिया संभोगासाठीं योग्य ठरविल्या असून 'वृद्धा' स्त्री अयोग्य ठरविली आहे. बाला, तरुणी, प्रौढा या तिन्ही प्रकारच्या स्त्रिया कामशास्त्रकाराच्या मतें योग्य आहेत; 'आयुर्वेदा'च्या मतें 'बाला' संज्ञक कुमारी स्त्री जर वृद्ध पुरुषानें नित्य उपभोगिली तर तो वृद्ध तरुण होतो. धर्मानुसार आपलें वर्तन निर्दोष ठेवणारे असे 'शिष्टजन' हे विवाह-संस्कारानें 'बाला' संज्ञक कुमारी स्त्री प्राप्त करून घेतात. स्मृतिकार मनूला हें मान्य आहे, 'धनिकजन' हे आपल्या धनाच्या जोरावर वेश्यावर्गातील 'बालासंज्ञक' कुमारी स्त्री प्राप्त करून घेतात. 'बाला' संज्ञक कुमारी स्त्री ही शरीरावरील मदनकांतीनें अत्यंत सुशोभित दिसते. तिच्या पादस्पर्शानें अशोकवृक्षाला, हस्तस्पर्शानें आम्रवृक्षाला, तिच्या कंठातील मधुर व मोहक गायनानें प्रियालवृक्षाला, आपल्या गुलाबी गालाच्या मुखांतून तिनें उन्मादक–मदनमस्त अशा फेकलेल्या शब्दानें बकुलवृक्षाला टवटवीतपणा येऊन त्या सर्वांना नवजीवन प्राप्त होतें, असें संस्कृत कवींनीं वर्णन केलेलें आहे. मग तिच्याशीं नित्य संभोग करून प्राप्त होणाऱ्या स्पर्शसुखानें वृद्ध पुरुषांना नवचैतन्य, उत्साह व नवजीवन का प्राप्त होणार नाहीं ?

मद्य, मत्स्य, मांस, मुद्रा, (Amorous-movement) कामचेष्टायुक्त शब्दोच्चार, नेत्रकटाक्ष व शरिराची हालचाल, मैथुन. अशा या पाच 'म कार शक्त्या "संभोगानंद" निर्माण करण्यास मदत करितात; अशा पाच 'म'कार शक्तींचा पुरस्कार करणारे शाक्तधर्मग्रंथ (तंत्रग्रंथ) यामध्यें असें एक वचन आढळतें कीं, "बाला स्त्री क्षीरभोजनम्" दुधामध्यें शिजविलेल्या खिरीचें भोजन जसें शरीर-मन-बुद्धि या सर्वांना तुष्टि-पुष्टि-शांति देतें, तसेंच, बालासंज्ञकस्त्रीशीं केला जाणारा संभोग तरुणांनाच काय, पण वृद्धानाहि त्याचें शरीर-मन-बुद्धि या सर्वांना उत्तेजित करून तुष्टि-पुष्टि-शांति देतो, बालासंज्ञक स्त्रीशीं केल्या जाणाऱ्या संभोगापासून जी तुष्टि-पुष्टि-शांति प्राप्त होते ती आयुष्याची वृद्धि करते, या प्रयोगानें आयुष्य वाढतें, असें 'The essay on the art of prolonging life by Hufeland' यामध्यें लिहिलेलें आढळतें. ज्याला बाला स्त्री प्राप्त होत नाहीं, त्यानीं बालस्त्रीप्रमाणें घट्ट स्तन आणि आवळ योनि होईल अशी औषधियोजना आपल्या स्त्रीचे ठायीं करावी म्हणजे ती बालास्त्रीप्रमाणें होईल. पाश्चात्य शास्त्रकाराचेंही मत असेंच आहे.

"There is, too, a wide-spread belief in revitalizing and rejuvenating power, which coitus with a young girl and especially a virgin possesses It is based upon the theory, that some vital fluid is absorbed during the act of intercourse. Students of Bible will recall that David performed the sexual act with the young girl Abisag for the very purpose Most sensual old men have a penchant for young and pretty females" या मताला Shunammitism म्हणतात.

याबाबत आमचें संशोधन असें : प्रमाणबद्ध अवयवांनीं युक्त, यौवनकांतीनें तेजस्वी, चित्ताकर्षक, मोहक अशा डौलदार आणि बांधेसूद बनलेल्या शरिराच्या 'बाला' संज्ञक कुमारी स्त्रीच्या योनीच्या ठायीं तारुण्यमदाची उबदार वाफ आणि एक सौम्य पण उन्मत्त करणारा गंध असे दोन पदार्थ उत्पन्न झालेले असतात. संभोगाचे वेळीं स्पर्शेंद्रियद्वारा वृद्ध पुरुषाचे शरिरांत 'यौवनमद वाफ आणि गंध' शिरून सर्वत्र पसरतात. त्या योगें, त्या वृद्ध पुरुषाचें शरीर, मन, बुद्धि, इंद्रियें हीं सर्व आनंदित, उत्तेजित, प्रफुल्लित होतात. त्यामुळें वृद्धावस्थेत उत्पन्न होणारे दोष नष्ट होतात. आपण पुन्हा तरुण झालों असें त्या वृद्ध पुरुषाला वाटूं लागतें. अशी ही अद्‌भुत आणि गूढ शक्ति बालासंज्ञक कुमारी स्त्रीच्या योनीमध्यें असते. ही गूढ शक्ति प्राप्त होण्यासाठीं शक्तिपूजक शाक्तपंथाच्या धर्मग्रंथात कुमारी स्त्री अत्यंत महत्त्वाची मानतात. तिला भैरवी देवी समजून तिच्या योनीची पूजा करतात. अर्थातच तिच्या योनीच्याठायीं असलेल्या या गूढ शक्तीचीच ते पूजा करतात.

गृहस्थाश्रम स्वीकारण्यासाठीं फक्त कुमारी स्त्रीचाच विवाहविधीनें केलेला स्वीकार सर्वांत श्रेष्ठ आणि सन्माननीय का समजतात हें वाचकांना आतां सहजच समजेल. तरुण पुरुषांचें वीर्य शोषून घेऊन तें विरघळून टाकण्याची शक्ति तरुण स्त्रियांचे योनीमध्येंही असते व त्यायोगें तरुण स्त्रीपुरुषांना पुष्टता प्राप्त होत असते, असें पतंजलि ऋषींनीं आपल्या योगसूत्रांत वज्रोली मुद्रा साध्य करिताना सांगितलें आहे. व्हॅन डे वेल्ड या जर्मन शास्त्रज्ञानेंही 'आयडियल मॅरेज' या पुस्तकांत हेंच मत प्रदर्शित केलेलें आहे. योनींतील या गूढ 'शक्ती'ला 'कामाग्नि' अशी संज्ञा हिंदु-पंडितांनीं दिलेली आहे. अन्न पचवून पुष्टता देण्याचा गुणधर्म अग्नीचा आहे. उदाहरणार्थ, जठराग्नि! तसेंच योनींतला हा 'कामाग्नि' पुरुषवीर्य पचवून स्त्रियांनाही पुष्टता देतो. योनींतील शुद्ध आर्तव हें आग्नेय म्हणजे अग्निगुणविशिष्ट आहे असें सुश्रुताचार्यही सांगतात.

## ॥ विरहिणीचीं लक्षणें ॥

कृशतनुरतिदीर्घा निम्नकक्षा च कृष्णा
सुचिरपतिवियुक्ता कामिनी स्याच्छ्लथांगी ॥

जी स्त्री शरीरानें कृश होऊन अतिलांबट दिसू लागते, थोडी ओणवी व काळवटशी भासते, सर्व गात्रें शिथिल होतात, त्या स्त्रीची भ्रताराशीं फार दिवस ताटातूट पडली आहे असें जाणावें.

आतां ज्या स्त्रीला पुरुष सर्वदा भोगतो तिचीं लक्षणें लिहितों.

पृथुलतरशरीरा गौरवर्णा च खर्वा
सततसुरतयोगाद् व्यूढकक्षा दृढा स्यात् ॥ ४ ॥

जी स्त्री अंगानें धष्टपुष्ट होऊन तेजस्वी, गौर वर्णाची दिसू लागते व ठेंगणी भासते आणि छाती भरून दृढ होते, तिला सुरतयोग निरंतर आहे असें समजावें.

## ॥ स्त्रियांच्या भिन्न प्रकृती ॥

आतां स्त्रियांच्या प्रकृति तीन असतात. कफप्रकृति, पित्तप्रकृति, वातप्रकृति. या तिघींचा विचार लिहितों.

श्रेष्ठाऽबला कफवती पित्तला मध्यमा स्मृता ।
अधमा वातला नारी तल्लक्ष्माण्यभिदध्मये ॥ १ ॥

जिची कफप्रकृति असेल ती स्त्री मैथुनाला उत्तम होय आणि पित्तप्रकृतीची मध्यम जाणावी. वातप्रकृतीची सकळ स्त्रियांत कनिष्ठ आहे. कोणत्या प्रकृतीचे कसे गुण असतात तें सांगतों.

॥ कफप्रकृतीच्या स्त्रीचीं चिन्हें ॥

सुस्निग्धदंतनखलोचनपद्मयुग्मा मानोन्नता प्रियतमे सुदृढानुरागा।
श्यामाऽतिशीतमृदुमांसलगुह्यरंध्रा प्रोक्ता कफप्रकृतिरेव वरा
पुरंध्री ॥ २ ॥

जिचे दांत, नखें, नेत्रकमळें हीं तेजस्वी, जी अनुदार भ्रताराव्र प्रीति फारच करिते, बहुतकरून ज्वानींतच असतें; म्हणजे शरिराचा बांधा बिघडत नाहीं, काळी, जिचें गुह्य अति थंड, मऊ, मांसल व घट्ट असतें, ती स्त्री कफप्रकृतीची होय. तीच सर्वांपेक्षा श्रेष्ठ मानिली आहे.

॥ पित्तप्रकृतीच्या स्त्रीचीं लक्षणें ॥

स्यात्पित्तला तु गौरांगी शोणलोचनपाणिजा।
क्षणं रुष्टप्रसन्ना च पीनश्रोणिपयोधरा ॥ ३ ॥
बिभर्ति घर्मसलिलं विस्रगंधि सुबुद्धिका।
श्लथकोष्णवरांगी च कुशला सुरते मृदु ॥ ४ ॥

ज्या स्त्रीचें अंग पांढरें, डोळे व नखें यांना आरक्तता असते, क्षणांत रुष्ट, क्षणांत प्रसन्न होते, कुल्ले व स्तन थलथलीत असतात, जिच्या घामाचा वास आंवट येतो, बुद्धि चांगली, गुह्य सैल असून उष्ण असतें, सुरताविषयीं कुशल असून मऊ असते, ती पित्तलाप्रकृतीची होय.

॥ वातप्रकृतीच्या स्त्रीचीं लक्षणें ॥

वातला तु कठोरांगी रूक्षकेशी प्रलापिनी।
चंचला बहुभोज्या च कृष्णपाणिजलोचना ॥ ५ ॥
श्यामधूसरवर्णा च सुरते कठिना भृशम्।
गोजिव्हाभं खरस्पर्शं बिभर्ति मदनालयम् ॥ ६ ॥

ज्या स्त्रीचें अंग टणक, केंस रुक्ष असतात आणि वाचाल, चंचल असून खादाडपणा फार करिते, डोळे व हाताचीं बोटें काळीं असतात, अंग काळें

व भरभरीत असते व हिला सुरत पुरेसें करणें फार कठीण आहे. आणि गाईची जीभ जशी खरखरीत असते, त्याप्रमाणें हिच्या योनीचा आतील भाग खरखरीत असतो. ती वातप्रकृतीची स्त्री होय.

### ॥ अथ देवसत्वादय उच्यंते ॥

सत्त्व म्हणजे स्वभाव अथवा पूर्वी जो जन्म असेल तो. तेव्हा ज्या ज्या स्वभावाची स्त्री असेल तें तें नाव ठेविलें आहे. त्यातून पहिल्यानें देवसत्वा स्त्रीचा स्वभाव सागतों.

**प्रसन्नवक्त्रांबुजसौरभांगी संतोषयुक्ता शुचिकर्मदक्षा ।**
**प्रियंवदा भूरिजना धनाढ्या नारीयमुक्ता किल देवसत्वा ॥ ७ ॥**

जी स्त्री हास्यमुख असते आणि कमलाप्रमाणें अगाला सुवास येतो, सर्वदा संतोषित, शुचिर्भूत, चांगल्या कर्माविषयी दक्ष असते, गोड बोलणें, माणसाचा कटाळा असत नाही आणि ज्या स्त्रीजवळ सपत्ति असते, ती स्त्री देवासत्वाची आहे असें समजावें.

### ॥ गंधर्वसत्वा स्त्रीचीं लक्षणें ॥

**संगीतलीलारसिकातिशांता सुगंधमाल्यादिरुचिः शुभांगी ।**
**विलासिनी निर्मलचारुवेषा गंधर्वसत्वा वनिता प्रदिष्टा ॥ ८ ॥**

जी स्त्री संगीत, गाणें बजावणें, नृत्यादि खेळ, इत्यादिकाविषयीं रसिक, अत्यत शात, जिला सुवासिक पदार्थ आणि फुलें याची अभिरुचि असते, स्वरूप सुदर, मैथुनाच्या वेळीं विलास बहुत चागले करिते, वेष स्वच्छ असून सुदर असतो, ती स्त्री गंधर्वसत्त्वा अशी जाणावी.

### ॥ यक्षसत्वा स्त्रीचीं लक्षणें ॥

**अपेतलज्जा मधुमांससक्ता पीनस्तनी चंपकगौरदेहा ।**
**रोषान्विता संततभोगवाञ्छा प्रोक्ता कवींद्रैः खलु यक्षसत्वा ॥ ९ ॥**

जी स्त्री निर्लज्ज, मद्यमांसादिकाविषयीं आसक्त, स्तन मोठे, चाफ्याच्या फुलाप्रमाणें गोरी, रागीट, सर्व काळ भोगेच्छा करणारी अशी स्त्री यक्षसत्वा जाणावी.

॥ मनुष्यसत्त्वा स्त्रीचीं लक्षणें ॥

**आतिथ्यसख्यादिषु शुद्धभावाऽनुरागिणी निर्मलचित्तवृत्तिः ।**
**नानाव्रतैरेति न च प्रयासं मनुष्यसत्त्वा परिकीर्तिता सा ॥ १० ॥**

ज्या स्त्रीस आदर, आतिथ्य, मैत्री, भोग याची आवड, मन निष्कपट आणि जी नाना प्रकारचीं व्रतें करण्यांत श्रमी होत नाहीं; ती स्त्री मनुष्यसत्त्वाची जाणावी.

॥ पिशाचसत्त्वा स्त्रीचीं लक्षणें ॥

**दुश्चारिणी कुत्सितभूरिभोज्या दुष्टात्यहृष्टा परितप्तगात्रा ।**
**सर्वातिकृष्णा सविकारवक्त्रा मालिन्ययुक्तेति पिशाचसत्त्वा ॥ ११ ॥**

ज्या स्त्रीचें आचरण दुष्ट, जेवण फार असून वाईट पदार्थांची आवड आणि संतुष्ट नसून अति दुष्ट, अंग कडकडीत ऊन, ठेंगणी फार काळी, कपाळास सर्वकाळ आठ्या असून मलीन असते, ती पिशाचसत्त्वाची स्त्री जाणावी.

॥ नागसत्त्वा स्त्रीचीं लक्षणें ॥

**व्याकुला भ्रांतिशीला च सोच्छ्वासं बहु जृंभते ।**
**निद्रासक्ता च सततं नागसत्त्वेति सा स्मृता ॥ १२ ॥**

जी स्त्री नेहमीं गडबडींत, स्वभाव भ्रांतिवत् व विसराळू आणि उच्छ्वासासह जांभया वरचेवर देते, डोळ्यावर सर्वकाळ झोंप असते, ती स्त्री नागसत्त्वाची होय.

॥ काकसत्त्वा स्त्रीचीं लक्षणें ॥

**उद्योगं निष्फलं कुर्यान्नेत्रे संभ्रामयेन्मुहुः ।**
**अतिक्षुधार्ता सततं काकसत्त्वेति सोच्यते ॥ १३ ॥**

जी स्त्री उगीच निष्फळ उद्योग करिते, डोळे पुनः पुनः फिरविते, भूक नाहींशी कधींही होत नाहीं, सर्वदा खाण्याचा नाद फार असतो, ती स्त्री काकसत्त्वाची आहे असें समजावें.

### ॥ वानरसत्त्वा स्त्रीचीं लक्षणें ॥

**अत्यंतचपला या तु सततो भ्रांतलोचना ।**
**दंतसंगरसक्ता च कपिसत्त्वेति तां विदुः ॥ १४ ॥**

जी स्त्री फार चपल, नेहमीं डोळे मोडते, दात खाते, ती स्त्री वानरसत्त्वाची असें जाणावें.

### ॥ खरसत्त्वा स्त्रीचीं लक्षणें ॥

**स्वभावाद् दुष्टवाक्यानि विप्रियाण्येव भाषते ।**
**अपेतरागा स्नानादौ खरसत्त्वेति सा स्मृता ॥ १५ ॥**

जिच्या तोंडातून सरळ उत्तर येत नाहीं, वाकडीच भाषणें बोलते, वाकडें बोलण्यास कांहीं निमित्त नको, स्वभावच वांकडें बोलण्याचा असतो; तें असें कीं, जें बोलणें कोणासही गोड लागू नये, आणि स्नान करणें अथवा दुसऱ्या कांहीं स्वच्छताकारक कृत्याचा त्याग करणारी, ती स्त्री खरसत्त्वा म्हणजे गर्दभसत्त्वाची असें जाणावें.

**जाति सत्त्वादयो ये तु नारीणामत्र भाषिताः ।**
**प्रधान प्रकृतिर्ज्ञेया तेषु सर्वेषु पंडितैः ॥ १६ ॥**

जे देवादिक जातीच्या सत्त्वाचे गुण सांगितले ते एकच प्रकारचे असावे. असा नेम जाणावा कीं, मुख्यत्वेंकरून सहज ध्यानात यावयाजोगे एकसत्त्वाचे मात्र असावे. आणि इतर गुण जे असणें ते सरासरीस असल्यास चिंता नाहीं; परतु फार करून जसे गुण असतील त्याप्रमाणें विचार करून ही स्त्री अमुक सत्त्वाची आहे असें ठरवावें, म्हणजे हिचा पूर्वीचा जन्म अमुक होता अथवा अमुक स्वभाव आहे असें निश्चित करावें. याप्रकारें सत्त्वप्रकरण म्हणजेच स्वभाव-प्रकरण समाप्त.

### ॥ अथ स्त्रीणां नाशहेतुरुच्यते ॥

आता स्त्री कशानें बिघडते तीं कारणें सांगावयास आरंभ करतों.

**पितृसदननिवासः संगतिः पुंश्चलीभिः**
**प्रवसनमपि पत्युर्वाधिकं सेर्ष्यता च ।**
**वसतिरथ च पुंभिर्दुष्टशीलैस्त्ववश्यं**
**क्षतिरपि निजवृत्तेर्योषितां नाशहेतुः ॥ १७ ॥**

जी स्त्री भर तारुण्यात फार वर्षेपर्यंत माहेरीं राहते, जीस व्यभिचारिणी स्त्रियाचीं संगत, जिचा भ्रतार फार वर्षेपर्यंत प्रवासी अगर म्हातारा, जी वाईट कर्म करणारे जे दुर्वर्तनी पुरुष त्यामध्यें राहते, जिला पोटास नाहीं व जाच फार होतो; इतक्या गोष्टींनीं स्त्री विघडून अवश्य शीलभ्रष्ट होते.

वरील कारणानीं विघडणाऱ्या स्त्रियाचें मन चचल झालें की, त्याच्या मनाचा तोल सुटून जातो. मग, परपुरुषाशीं सभोग करण्यास त्या तयार होतात. यास्तव अशा स्त्रियाचें मन चंचल होईल अशी संधीच त्याना मिळूं देऊं नये. स्त्रियावर पापी नजर ठेवून त्या स्त्रियानीं त्याच्याशीं त्याचे इच्छेप्रमाणें संभोग करण्यास कबूल व्हावें म्हणून, तो पापी पुरुष काय काय आणि कसे कसे प्रयत्न करील; द्रव्याची, उंची वस्त्राची, दागिन्याची, मधुर पक्वान्नाची, सुगंधी अत्तराची, लालूच दाखवून मोहक भाषणांनीं कसा भुलवील याचें संपूर्ण ज्ञान त्या स्त्रियाना असलें म्हणजे त्या सावध राहून, शीलभ्रष्ट होण्याचा प्रसग त्यांच्यावर येणार नाही. यासाठीं, पापी नजर ठेवणाऱ्या परपुरुषाशीं दळणवळण वाढेल, परिचय अगर सहवास होईल असें बोलणें, चालणें, फिरणें, खेळणें यांचे प्रसग त्या स्त्रियानीं आणू नयेत. जर का त्याना परपुरुषाशीं सभोग करण्याची चटक लागली तर ती चटक सुटणार नाहीं. मग त्या स्त्रिया निर्लज्ज बनून अनेक परपुरुषाशीं संभोग करण्यास कसलीच भीती बाळगत नाहींत.

## ॥ स्त्री उदास होते त्याचीं कारणें ॥

कार्पण्याद्तिमानरोगविरहोद्योगादिपारुष्यता-
मालिन्यासमयक्षतादिभयतः शोकाद्दरिद्रादपि ।
भर्तृणा तनुतादिभिश्च वपुषः काठिन्यतः शंकया
दोषाणां च वृथा प्रयांति वनिता वैराग्यमुच्चैः सदा ॥ १८ ॥

ज्या स्त्रियांशीं फार कृपणपणा करणें १. मर्यादा, मान हीं फार धरवणें २. रोगाच्या उपद्रवानें ३. भ्रताराच्या विरहानें ४. अथवा फार काम करविणें ५. किंवा मारणें. ६. शिव्या देणें ७. अथवा मलिनता ८. वेळ अवेळ न पाहून वर्तणें ९. किंवा फार धाक दाखवणें १०. अथवा शोकानें ११. व दारिद्र्याच्या योगें करून १२. किंवा भ्रतार सर्वदा फार अशक्त १३. अथवा निर्दयपणानें १४. आणि तिच्यावर वाईट कर्माचे नेहमीं आरोप घेणें १५. या पधरा कारणानीं स्त्रिया उदास होतात. यास्तव स्त्रियास इतक्या गोष्टी असू नयेत.

॥ स्त्री विरक्त होऊं लागली हें ओळखण्याचीं चिन्हें ॥

**नाभिपश्यति भर्तारं नोत्तरं संप्रतिच्छति**
**वियोगे सुखमाप्नोति संयोगे चातिसीदति ॥ १९ ॥**
**शय्यामुपगता शेते वदनं मार्ष्टि चुंबने ।**
**तन्मित्रैर्द्वेष्टि मानं च विरक्ता नाभिवाञ्छति ॥ २० ॥**

जी स्त्री भ्रताराकडे नीट पाहात नाहीं १. कांहीं विचारलें असता उत्तर देण्यास कटाळा करिते २. दूर गेलें असता आनंदित होते ३. जवळ गेलें असता दु:खी होते ४. पलंगावर आणिली असता उगीच निजून शृंगारिक खेळ कांहीं खेळत नाहीं ५. चुंबन घेतलें तर तोंड मुरडते. ६. भ्रताराचे जे मित्र असतील त्यांचा द्वेष करिते ७. मानाची गरज अगदीं धरीत नाहीं ८. अशीं हीं आठ लक्षणें उत्पन्न झाली असतां त्या स्त्रीमध्यें विरक्तता उत्पन्न झाली असें समजावें.

॥ स्त्रीपुरुषांचीं प्रीतिवर्णनें ॥

**नैसर्गिकी विषयजा समा चाभ्यासिकी तथा ।**
**चतुर्विधेति विद्वद्भिर्दंपत्योः प्रीतिरुच्यते ॥ २१ ॥**

स्त्रीपुरुषाची प्रीति चार प्रकारची आहे. तिचीं नांवें—नैसर्गिक प्रीति १. विषयजा प्रीति २. समा प्रीति ३. आणि अभ्यासिकी प्रीति ४. अशा चार प्रीति विद्वान् पुरुषानीं सांगितल्या आहेत.

**अभ्यासविषया साध्या दंपत्योः सहजानुया ।**
**सांद्रा निगडभूता च प्रीतिर्नैसर्गिकी मता ॥ २२ ॥**

ज्या दंपत्याची प्रीति कांहीं कारण न लागता स्नेहयुक्त पक्की निगडी-सारखी साहजिक असते, ती नैसर्गिक समजावी. (पति-पत्नि प्रीति, आई-वडिलांची पुत्रावर प्रीति नैसर्गिक.)

**मालाचंदनभोज्याद्यैर्विषयैर्वर्धिता तु या ।**
**प्रीतिर्विषयजा प्रोक्ता समयोगे समा स्मृता ॥ २३ ॥**

सुगंधी माला, चंदन, उत्तमोत्तम पक्वान्नें इत्यादि विषयानीं वृद्धिंगत केलेली जी प्रीति ती विषयजा प्रीति; आणि दोघांच्याही सारख्या योगानें व केवळ समान आर्तपणानें जी उत्पन्न झाली, तिला समा प्रीति असें म्हणावें.

सुंदर–मोहक वस्त्रें, सर्वप्रकारचीं सौंदर्यवर्धक प्रसाधनें, सुगंधी अत्तरें, तेलें, फुलें, मेवा–मिठाई वगैरे वस्तु भेटीदाखल देणें; यायोगें परिचय होऊन जी प्रीति जमते ती विषयजा दोघाची हौस, आवडी-निवडी सम–समान् असल्यानें परिचय होऊन जी प्रीति जमते ती समा प्रीति.

**आखेटदेवपूजादिकेलीसंगीतकर्मसु ।**
**अभ्यासयोगाद्या वृद्धिं याति साभ्यासिकी मता ॥ २४ ॥**

शेतादिकाचे कामासाठीं बाहेर फिरताना अथवा देवपूजा-व्रतें करून व विलासादिकानीं किंवा गाणें, बजावणें इत्यादि संगीत कलाच्या अभ्यासयोगे-करून झालेली जी प्रीति, तिला अभ्यासिकी प्रीति असें नाव आहे.

शेतादिकांत, कारखान्यात, दुकानात, नाटकात कामें करतांना, यात्रा, उत्सव, सामुदायिक क्रीडा, वगैरेसाठीं बाहेर जाताना फिरताना; गायन, वादन, नर्तन वगैरे कलाचा अभ्यास करताना मोकळेपणानें स्वैर बोलणें, चालणें, हांसणें, खिदळणें, थट्टा–मस्करी करणें वगैरे द्वारें परिचय होऊन विशेष सलगी होते; त्यायोगें जी प्रीति जमते ती अभ्यासिकी.

## ॥ स्त्रियांच्या भोजनादि व्यवस्था ॥

**भोजने द्विगुणा स्त्रीणां बुद्धिः कृत्ये चतुर्गुणा ।**
**निश्चयः षड्गुणः पुंभ्यः कामवेगस्तथाऽष्टधा ॥ २५ ॥**

स्त्रियांची खाण्याविषयी बुद्धि पुरुषापेक्षां दुप्पट असते, साहसादि कामांत चतुर्गुण अधिक असते, निश्चय पुरुषाहून सहापट विशेष असतो आणि कामाचा वेग आठपट जास्त असतो.

## ॥ योनि आणि योनीचे विविध प्रकार ॥

**योनिरभ्यंतरे कापि पद्मकिंजल्ककोमला ।**
**योनिः स्याद्गुटिकाकीर्णा काचिद्वलिचयाकुला ॥ २६ ॥**
**गोजिव्हामखरस्पर्शा काचिदभ्यंतरे भवेत् ।**
**पूर्वपूर्वतरा तासु श्रेष्ठा ज्ञेया विचक्षणैः ॥ २७ ॥**

एकादे स्त्रीची योनि आतल्या बाजूनें कमलाचे केसराप्रमाणें कोमल असते, एकादींत गोळ्या–गाठी असून त्यानीं व्याप्त असते आणि एकादींत वळकट्या फार असतात. एकादी योनि आतील बाजूस गाईच्या जीभेप्रमाणें फारच

खरखरीत असते; तीमध्यें शेवटीं जी सांगितली तीपेक्षा तिचे आधीं सांगितलेली उत्तम, तीहूनही तिच्यापूर्वी सांगितलेली उत्तम, असें क्रमेंकरून जाणावें.

गाईच्या जीभेप्रमाणें खरखरीत असलेल्या योनीला 'षढी' अशी संज्ञा 'निबंद्ध रत्नाकर' ग्रंथामध्यें आहे. (स्त्री अत्यत सौंदर्यवान् असून तिची योनि 'षढी' असेल तर संभोगकार्यप्रसंगीं 'विशिष्ट रस' उत्पन्न करण्यास 'षढी' संज्ञक योनि असमर्थ असते. अशा स्त्रीचा पति आपली बायको 'षढी' (no more sexual-passion) आहे असे समजून ती सौंदर्यवान् असली तरी तिच्यावर प्रेम करीत नाही. दीर्घ (लांब) व स्थूल लिंगाचा लघु म्हणजे लहानशा योनीशीं नित्य संभोग झाल्यास त्या योनीच्या बाहेर दोन बाजूला दोन अंड येऊन लोंबकळतात, तिला 'अंडली योनि' म्हणतात.

'अंडली योनि' संभोगाचे वेळीं स्त्रियांना वेदनायुक्त त्रासदायक होते; म्हणून, अशा स्त्रिया संभोगाचाच तिरस्कार करतात. वारंवार मैथुन करूनही समाधान न पावणारी योनि 'अत्यानंदा' होय. ('अत्यानंदा योनि' संज्ञक स्त्रिया वारंवार कितीही मैथुन केलें तरी त्या समाधान पावत नाहींत.) मैथुनविधि दीर्घकाल सतत चालू करूनही फारच कष्टानें द्रवते, ती योनि 'अतिचरणा' होय. जी योनि लांबी, रुंदी व खोली यांनीं अत्यंत विस्तृत असते, तिला 'महायोनि' म्हणतात. ('महायोनि' युक्त स्त्रीला तिच्या दुर्दैवानें जर लघु लिंगाचा म्हणजे बारीक व आंखूड लिंगाचा पति मिळाला, तर तो पति तिची संभोगेच्छा तृप्त करण्यास असमर्थ असल्यामुळें ती स्त्री आपल्या पतीवर प्रेम करीत नाहीं, स्वाभाविकच द्वेष करते.) असे हे योनीचे अनेक सूक्ष्म प्रकार 'निबंद्धरत्नाकर' ग्रंथांत सांगितले आहेत. ज्या स्त्रियांची योनि 'अश्वत्थपत्रा' सारखी असते, ती योनि संभोगाला सर्वांत श्रेष्ठ होय. कारण, अश्वत्थ-पत्रासमान योनि असलेल्या स्त्रीपासून पुरुषांना मिळणारें संभोगसुख नित्य नव्या नव्या प्रकारचें मिळत असतें. आज जें संभोगसुख मिळेल, त्याहून निराळें संभोगसुख उद्यां मिळेल; त्याच्याहूनहि निराळ्या प्रकारचें संभोगसुख परवां मिळेल, अशा प्रकारें रोजच्या रोज नवें नवें संभोगसुख प्राप्त करून देऊन कामी पुरुषांना रमविणें अशा त्या योनीमध्यें अद्भुत गुणधर्म आढळून येतो. शिवलिंगाच्या प्रतिमेंतील योनिसूचक खालचा भाग अश्वत्थपत्रासारखाच असतो हें सूक्ष्म निरीक्षणानें कोणालाही आढळून येईल. ज्या स्त्रीची योनि शंखाच्या आकृतीसारखी असून योनीच्या अन्तर्भागात वळकट्या फार असतात ती स्त्री मोठी रंगेल असून विलासप्रिय असते असें शरीर-शास्त्रकार मानतात. ज्या स्त्रीची योनि आंब्याच्या आकाराप्रमाणें असते अशी स्त्री नित्य तरुण रहाते. वयानें जरी वृद्ध झाली तरी रूपानें तरुणच दिसते. कितीहि बाळंतपणें झालीं तरी तिची योनि सैल व पोकळ न होता कुमारीप्रमाणें नित्य घट्ट रहाते. अशा स्त्रीजवळ ७५ वर्षांचा वृद्ध गृहस्थ नित्य संभोग करूं लागला तरी तो

वृद्ध गृहस्थ २५ वर्षांच्या तरुणाप्रमाणें शोभूं लागतो. असा अद्भुत गुणधर्म त्या योनीमध्यें असतो. ज्या स्त्रीची योनि सदैव क्षारयुक्त ओलसर, खारट असते तिला 'समुद्रयोनि' म्हणतात. संतानोत्पत्तीला ही समुद्रयोनि निरुपयोगी असते. ज्या स्त्रीचा हात काहींहि कारण नसता नित्य ओलसर घामट असलेला दिसतो त्या स्त्रीची योनि समुद्रयोनि असते. ज्या स्त्रीच्या योनीला निरनिराळ्या शिश्नापासून मिळणाऱ्या स्पर्शसुखाची निरनिराळी गोडी चाखण्याची सवय नित्य लागलेली असते, त्या व्यभिचारी स्त्रीच्या योनीला दुष्टयोनि, भ्रष्टयोनि, चारगटयोनि, चवचालयोनि असें निरनिराळ्या नावानीं शरीरशास्त्रकार संबोधितात. ही योनि सुखी जीवनाची राख-रांगोळी करते. जी योनि कमलाच्या फुलाप्रमाणें आकाराची असून त्या योनीचा आतील भाग अत्यंत मृदु आणि कमलाच्या पाकळ्याप्रमाणें असतो त्या योनीला 'कमलयोनि' अशी संज्ञा आहे. अशा श्रेष्ठ योनींतून जन्मणारें बालक अत्यंत विद्वान्, वैभवशाली आणि पराक्रमी निपजतें. कमलयोनींतून लक्ष्मी आणि ब्रह्मदेव उत्पन्न झाले. कमलयोनीला कमळाचा वास येतो. ज्या स्त्रीची योनि नागवेलीच्या पानाच्या आकारासारखी लांबट असते, त्या स्त्रीच्या योनीला 'पत्रयोनि' असें म्हणतात. मुखरंजनार्थ विडा करून खाण्याचे पानाला नागवेलीचे पान म्हणतात. 'पत्रयोनि' असलेली स्त्री पतीच्या शिश्नाशिवाय परपुरुषाच्या शिश्नाचें दर्शनहि घेऊं इच्छीत नाहीं. मग, परपुरुषाशीं संभोगाची गोष्ट दूरच ! अशी स्त्री पतिनिष्ठ, धार्मिक वृत्तीची, मर्यादशील, हसतमुखीं, प्रसन्न चेहऱ्याची, मधुर भाषणी असते. अशी पतिनिष्ठ आणि धार्मिक वृत्तीची स्त्री मला प्राप्त झाली आहे. तिच्याशीं मी संसार करणार आहे. याला तुमची मान्यता असावी असें सूचविणारें सुचक चिन्ह म्हणून विवाहाचे वेळीं जमलेल्या नातेवाईक मंडळींस पानांवर सुपारी ठेवून ती पानसुपारी वाटतात, "आपली मान्यता आहे" हें दाखविण्यासाठीं नातेवाईक मंडळी त्या पानसुपारीचा स्वीकार करतात. सुपारी ताठ आणि कठीण असते. शिश्नाच्या पुढील गोलाकार अग्रभागाला शिश्नाची सुपारी म्हणतात. शिश्न ताठ झालें कीं शिश्नाची सुपारी कठीण होते. पत्रयोनीवर अशी ही कठीण झालेली शिश्नसुपारी असा हा संभोगसूचक लाक्षणिक अर्थ त्यावेळीं दिलेल्या पानसुपारीचा होतो. याप्रमाणें पत्रम् (पत्रयोनि, अश्वत्थपत्रयोनि), पुष्पम् (कमलयोनि), फलम् (आम्रफलयोनि), तोयम् (कामसलिल-प्रेमरस) अशा या चार गोष्टींचें त्रोटक विवेचन योनिशास्त्राच्या आधारें कामदेवतेला प्रसन्न करून घेण्यासाठी आम्हीं येथें कामोपासकांना समजावें म्हणून केलें आहे.

**योनिमध्येऽस्ति नाड्येका कामांकुशसमा हि सा ।**
**लिंगेन क्षोभिता सैवा मद्वारि निरंतरम् ॥ २८ ॥**
**कामातपत्रात्सृजति सस्पंदा इति कीर्त्यते ।**
**वरांगरंध्रादूर्ध्वं तु नासिकाग्रं यदस्ति तत् ॥ २९ ॥**

मन्मथच्छत्रमित्याहुराढ्यं मदशिराचयैः ।
योनिरंध्रे नातिदूरात्पूर्णचंद्रास्ति नाडिका ॥ ३० ॥
मनोजवारिसंपूर्णा स्त्रीणां तिष्ठति सर्वदा ।
तद्विसृष्ट्या ऋतानारी प्रोच्यते पूर्वसूरिभिः ॥ ३१ ॥

पुरुषाच्या लिंगाप्रमाणें स्त्रीच्या योनीमध्येंही एक नाडी आहे. ती शिश्नाचे धक्के बसून क्षोभित झाली असता तीच कामसलिल कामछत्रातून निरंतर बाहेर पाडते. योनीच्या आत बेंबीकडल्या बाजूस थोडे मासल कांटेकाटेसे आहेत, त्या काट्याजवळ ती नाडी आहे, यास्तव त्या काट्यावर लिंगानें जोरानें घर्षण केलें असता स्त्रियांना चागलें समाधान वाटतें. त्या नाडीचें नाव सस्पदा असें आहे.

योनीच्या रंध्रापासून वरच्या बाजूला नाकाप्रमाणें जें आहे, तें जसा केळीचा कोंब जमिनींतून वर येताना दिसतो त्याप्रमाणें तो एक कळा आहे, त्याला मदनाचें छत्र म्हणतात. तो कळा सर्वदा मदवाही नाडींनीं युक्त आहे.

स्त्रियाच्या योनीच्या रंध्राजवळ पूर्णचद्रा या नांवाची एक नाडी आहे. ती नाडी स्त्रियाचें कामसलिलानें सर्वदा भरलेली असते. ती नाडी वाहूं लागली असता स्त्री ऋतुस्नात झाली असें पूर्वीचे वृद्ध ज्ञाते म्हणत आले.

या ठिकाणींही 'चंद्र' शब्दाचाच उपयोग करून आर्तववाहिनी नाडीला पूर्णचंद्रा नाडी म्हटलें आहे. चद्रदर्शनानें चद्रविकासिनी कमल प्रफुल्लित होतें व चंद्रकांतमणि चंद्रदर्शनानें पाझरूं लागतो. हीं उदाहरणें 'ज्ञानेश्वरी' मध्येंही आढळतात. यातील गूढ रूपकाचा भाग सोडला तर असें आढळून येईल कीं, चंद्रदर्शनानें म्हणजे रजोदर्शनानें योनींतील कमल (गर्भाशयमुख) प्रफुल्लित होऊन विकास पावतें व योनी-मधून आर्तवही पाझरू लागतें. स्त्रियाच्या ऋतुप्राप्तीविषयीं म्हणजे रजोदर्शनाविषयीं अत्यत सूक्ष्म निरीक्षण केलें असता असें आढळून येईल कीं, काहीं स्त्रिया नित्य दिवसाच्याच रजस्वला होतात, त्या सूर्यविकासिनी ! काहीं स्त्रिया केवळ रात्रीच्याच, पण शुक्लपक्षातच रजस्वला होतात, त्या चंद्रविकासिनी ! काहीं स्त्रिया केवळ रात्रीच्याच, पण फक्त कृष्णपक्षातच (अत्यत काळोख्या रात्रीं) रजस्वला होतात, त्याना 'कालिनी' अशी सज्ञा आहे. तंत्रमार्गीय अघोरपंथी लोक आपल्या अघोर कर्मामध्यें 'कालिनी' सज्ञक स्त्रियाची योजना करितात. आपला पिता द्रोणाचार्य त्याचा कपटानें वध केला म्हणून सूड उगविण्यासाठीं रात्रीचा अवचित छापा घालून पाडवाचा वध करावा, अशा या अघोर कर्मांत यश मिळावें म्हणून अश्वत्थाम्यानें भयंकर अशा 'कालिनी' देवीचें स्मरण करून तिची प्रार्थना केली होती, असें महाभारत सागतें.

कांहीं स्त्रिया दिवस आणि रात्र याच्या संधिकाळांत रजस्वला होतात. या स्त्रिया नेहमीं तटस्थ वृत्तीच्या पण खोल अंतःकरणाच्या असतात. कांहीं स्त्रिया कधीं दिवसा, कधीं रात्रीं अशाही 'रजस्वला' होतात. कित्येक स्त्रियांच्या विटाळाला अत्यंत उग्र दर्पाची आणि अत्यंत किळसवाण्या दुर्गंधीची घाण इतकी येते कीं, अशी स्त्री पुरुषाजवळ गेली असता त्या पुरुषाचे मनांत असलेलें प्रेम तत्काल नष्ट होऊन त्या स्त्रीचा तिटकारा उत्पन्न होतो. अशा स्त्रियांनीं विटाळ चालू असतां पुरुषांजवळ कधींहि जाऊ नये. विटाळाच्या चौथ्या दिवशीं तैलयुक्त अभ्यंगस्नानानें पूर्ण शरीर शुद्ध करून नंतर पुरुषाजवळ जावें. सुगंध प्रेमाची वृद्धि करतो. दुर्गंध प्रेम नष्ट करतो. कामशास्त्रांत गंधशास्त्र महत्त्वाचें समजतात. उग्रदर्पाची, किळसवाण्या दुर्गंधीची विटाळशी स्त्रीची सावली फळें आलेल्या वृक्षावर पडली तर फळें सुकतात, त्या झाडांवरून फळें गळून पडतात, भाजीपाला वेल सुकून जातो. नागसर्प आंधळा होतो. फुलझाडें मरून जातात.

## ॥ अल्पसाध्य स्त्रीविषयीं ॥

आता अल्पसाध्य म्हणजे थोड्या संभोगानें लवकरच वश्य कोणत्या होतात, अथवा शीघ्ररेत स्रवून मैथून कोणत्या स्त्रियाना त्वरित पुरेसे होतें तें सांगतों.

**मार्गाद्विश्रांतदेहा चिरविरहवती मासमात्रप्रसूता ।**
**गर्भालस्या च नव्या ज्वरयुततनुका त्यक्तमाना प्रसन्ना ।**
**स्नाता पुष्पावसाने नवरतिसमये मेघकाले वसंते ।**
**प्रायः संपन्नरागा मृगशिशुनयना स्वल्पसाध्या रतेः स्यात् ॥ ३२ ॥**

ज्या स्त्रीचा देह मार्गादिकाचे क्रमण-योगादिकेंकरून श्रमी झाला आहे ती १ जी स्त्री बहुत काळपर्यंत विरहिणी असेल ती, २. महिन्याची बाळंत ३. गरोदर व आळसावलेली ४,५ नवीन ज्वर आलेली ६. ज्या स्त्रिया लवकर रेत स्रवून तृप्त होतात, तशीच अभ्रू सोडलेली ७. खुष झालेली ८ ऋतुस्नात ९. जिला पहिल्यानें भोगावयाची ती १०. मेघगर्जनेचे वेळेस ११. वसंतकाळीं १२. ह्या स्त्रिया थोड्याशा मैथुनानें लवकर साध्य होतात. या असल्या बारा प्रकारच्या स्त्रियाना बहुतकरून भोगाविषयीं अनुराग सर्वांच्या मनांत असतो; तेव्हा या अनुरागयुक्त स्त्रीस मैथुनाचे वेळीं साध्य करण्यास फार कठीण पडत नाहीं.

## ॥ स्त्रीपुरुषांस रतिसमयीं भाव कसे होतात ? ॥

**कंदर्पयुद्धे प्रथमेऽल्पभावाश्चिरेण तृप्तिं वनिता लभंते ।**
**शीघ्रं द्वितीये धृतभूरिभावाः पुंसः क्रमोऽयं विपरीत उक्तः ॥ ३३ ॥**

पहिल्या संभोगाचे वेळेस स्त्रियांना भाव थोडा असतो आणि रेतस्रावास उशीर लागून तृप्ति होण्यास विलंब लागतो, आणि दुसऱ्या उठावणीच्या वेळेस त्याचा भाव फार असतो म्हणजे त्या शृंगारिक चेष्टा फार करतात व रेत लवकर पडून तृप्त होतात.

हा क्रम पुरुषाविषयीं उलटा आहे. म्हणजे संभोगाचे वेळीं पुरुष चेष्टा फार करितो; परंतु वीर्य लवकर पडतें आणि दुसरे संभोगाचे वेळीं चेष्टा थोडी होऊन रेत पडण्यास विलंब लागतो.

## ॥ रत्यभिलाषेचीं चिन्हें ॥

आता स्त्रियाना मैथुनाची इच्छा झाली असतां चिन्हें कसकशीं होतात तीं संक्षेपानें लिहितों.

संगृह्णात्यलकान्मुहुः स्तनयुगं वस्त्रेण नाच्छादये-
द्दंतेनाप्यधरं दशेच्च विरमेत्सा जातलज्जा क्षणम् ।
प्रायश्चुंबति बालकं निजवपुः संमृज्यते जृंभते
रथ्या चापिरुणद्धि पश्यति च दोर्मूलं हसंत्यादरात् ॥ ३४ ॥
आलिंगेत्स्वसखीं प्रियं प्रलपति प्रत्युत्तरं याचते
प्रव्यक्तं न च भाषते स्मितमुखी व्रीडां वृथा धारयेत् ।
व्याजेनैवविलंबते प्रकुरुते मौलौ च कंडूयनं
नारीणां सुरतस्पृहा बुधजनैर्ज्ञेयेति भावैः सदा ॥ ३५ ॥

जी स्त्री आपले केस वरचेवर सावरते व धरते, पुनः स्तनावर पदर घेतलासा करते, परंतु स्तन मात्र अर्धवट उघडे टाकील, दातानें आपल्या अधरोष्ठाला दंश करते, क्षणोक्षणीं लज्जितशी होऊन विरमल्याप्रमाणें होईल, आणि जवळ असलेल्या लहान मुलाचे मुके घेईल, पुनः पुनः मुखादिकावरून हात फिरवील, जांभया देते आणि वाटेंत जाऊन वाट अडवील, पुनः पुनः आपल्या भुजांकडे पाहील, मोठ्या आदरानें हसेल, आपल्या सखीमैत्रिणीला वेंगाटील, चेष्टेचें गोड भाषण बोलून त्या भाषणावर प्रत्युत्तर घेण्याविषयीं इच्छील, बोलणें जें बोलेल तें स्पष्ट न बोलता तोंडातच अडखळत बोलेल, एका गालावर हंसून लाजल्यासारखें दाखवील, कांहींएक निमित्त करून कशाला तरी ओळखबा घेईल, मस्तकादिकांच्या ठायीं पुन्हा खाजवील, हे

भाव ज्या ज्या स्त्रियांच्या ठायीं असतील त्या त्या स्त्रिया बहुतकरून कामातुर झालेल्या असतात असें सर्वदा समजावें.

**इति श्रीमल्लाडनवलविनोदाय महाकविकल्याणमल्लविरचिते अनंगरंगे सामान्यधर्मनिरूपणं नाम चतुर्थः स्थलः ॥ ४ ॥**

याप्रकारें करून राजाधिराज जो लाडराजा त्याच्या विनोदासाठीं श्री-कल्याणमल्लकवीनें रचित जो अनंगरंग ग्रंथ, त्यातील चवथें प्रकरण—स्त्रियांच्या सामान्यधर्मनिरूपणाचें—संपूर्णतेस गेलें.

१८६२८



प्रकरण पांचवें

# ॥ निरनिराळ्या देशांतील स्त्रियांचे भाव आणि गुणधर्म ॥

निरनिराळ्या देशातील स्त्रियामध्यें निरनिराळें संभोगकौशल्य व संभोगवैचित्र्य अनुभवास येतें. त्याचें वर्णन कल्याणमल्ल येथें करीत आहेत. भाग्यवान नरेश संभोगवैचित्र्याचा अनुभव घेण्यासाठीं आपापल्या अंतःपुरात निरनिराळ्या देशाच्य अनेक स्त्रिया ठेवतात. श्रीमान्—धनिक पुरुषही प्रवासाचे निमित्तानें आणि श्रीमत व्यापारी व्यापाराचे निमित्तानें निरनिराळ्या देशात प्रवास करून तेथील निरनिराळ्या वेश्याजनस्त्रियाच्या संभोगवैचित्र्याचा अनुभव घेतात. लैंगिक जीवनातील लैंगिक-सुखाचा विस्तार करण्यासाठीं संभोगामध्यें विविध प्रकारचें नाविन्य शोधून काढणें असा विलासी पुरुषाचा स्वभावच असतो. संभोगामध्यें तो नित्य नाविन्य इच्छित असतो. नाविन्य ’ ही एक त्याची लहर असते. कित्येक स्त्रिया आपल्या

गौरवर्णीय सुंदर मुखाचें सौंदर्य खुलवून, कित्येक स्त्रिया आपल्या कुरळ्या केसांची सुंदर, अप्रतिम आणि चित्ताकर्षक केशभूषा करून, कित्येक स्त्रिया रम्य, चित्रविचित्र, मनहरण करणारा पोषाख करून, कित्येक स्त्रिया आपलें बांधेसूद, मनमोहक शरीर आणि पुष्ट अवयव व्यवस्थित राखून, कित्येक स्त्रिया मंजुळ सुस्वर गायन-वादन आणि अभिनययुक्त तालबद्ध नर्तन करून, कित्येक स्त्रिया चातुर्य आणि अनेक विनोदी कोट्या असलेल्या स्मितहास्ययुक्त मधुर भाषणें करून, कित्येक स्त्रिया एकांतात मनाला रजविणारें संभोगातील विविध कौशल्य दाखवून श्रीमंत पुरुषांच्या नाविन्याची लहर पूर्ण करीत असतात. प्राचीन ग्रीक वाङ्मय असें सांगते कीं, Voluptuousness is a right reserved for the governing classes अशी समजूत असलेले उच्चदर्जीय सरकारी अधिकारी जेव्हा आपल्या दौऱ्यावर निघत, तेव्हां ठिकठिकाणच्या विविध संस्थाना ते जसे भेटी देत, तसेंच ठिकठिकाणच्या अनेक कुंटणखान्यांनाहि भेटी देत असत. अर्थात् तेथें असलेल्या अनेक सौंदर्यवान् वेश्या-स्त्रियांशी संभोगाचे विविध प्रकार इच्छा तृप्त होईपर्यंत करून ते आपली नाविन्याची लहर पूर्ण करून घेत असत.

"कौटिलीय अर्थशास्त्र" या ग्रंथात 'गणिकाध्यक्ष' या प्रकरणावरून असें आढळून येतें कीं, प्राचीन काळीं भारतामध्यें, निरनिराळ्या देशाच्या अनेक सौंदर्यवान् तरुण वेश्या-स्त्रियांचे कळप बाळगणारीं सरकारमान्य अशीं अनेक वेश्यागृहें ठिकठिकाणीं प्रमुख शहरामध्यें होतीं. त्यांतील वेश्या-स्त्रियांच्या भोगद्रव्यावर सरकारी कर होता. वेश्यागृहांतील स्त्रियांचें संरक्षण करणारे कायदे, तसेंच वेश्यागृहामध्यें येणारें गिऱ्हाईक वेश्यागृहामध्यें लुटलें जाणार नाहीं अशी खबरदारी घेणारे कडक कायदेहि अंमलात होते. द्रव्य देऊन अर्थात अर्थव्यवहारद्वारें प्रेमव्यवहाराचें कुट्टण म्हणजे प्रेमव्यवहाराची हालचाल अहोरात्र ज्या स्थानीं होते, त्या स्थानाला कुट्टणखाना (कुंटणखाना) म्हणतात.

## ॥ मध्यदेशच्या स्त्रीचीं लक्षणें ॥

**विचित्रवेषा शुचिकर्मदक्षा सुशिल्पिनी दंतनखाद्विरक्ता ।**
**मनोजसंग्रामविनोदरंगा स्यान्मध्यदेशप्रभवा पुरंध्री ॥ १ ॥**

जी स्त्री चांगला विचित्र वेष करते, शुद्धकर्माविषयीं मोठी दक्ष, शिल्पादि कला जाणते, दांत व नखें ही तांबडी खरीं, परंतु त्यापेक्षा अंगाला विशेष आरक्तता असते, दाताचे व नखाचे चाळे आवडत नाहीं आणि कामविलासाविषयीं मोठी चमत्कारिक संभोगविलास करणारी असते, ती स्त्री मध्यदेशची असें समजावें.

॥ मालवदेशच्या स्त्रियांचीं लक्षणें ॥

उपभोगकलानुरागिणी चिरसंभोगरसप्रतोषिणी ।
करधा स्तनतुष्टमानसा वनिता मालवदेशसंभवा ॥ २ ॥

ज्या स्त्रीस उपभोगाची कला निरंतर आवडते, जी फार वेळ संभोग करते, तसल्या संभोगरसानें संतुष्ट होते, अर्थात् लवकर तृप्त होत नाहीं, हातानीं स्तनमर्दन केलें असता मन प्रसन्न होतें, ती मालवदेशोत्पन्न स्त्री होय. आणि जे पुरुष फार वेळपर्यंत संभोग करणारे आहेत, त्याच्या दमाला ह्या मालव-देशच्या स्त्रिया टिकाव धरून पुरुषालाही आपण स्वतः पुष्कळ वेळपर्यंत भोगून संतुष्ट करितात.

॥ आभीरदेशीय स्त्रियांचीं लक्षणें ॥

अभिघातरुचिर्विरज्यते नखदंतैः परिरंभलालसा ।
बहुचुंबनहारिमानसा वनिताऽऽभीरसमुद्भवा स्मृता ॥ ३ ॥

ज्या स्त्रीस मर्दनाची आवड असून नखाचे व दाताचे चाळे आवडत नाहींत, आलिंगनाविषयीं मोठी आतुर आणि नाना प्रकारच्या बहुत चुंबनाच्या योगेंकरून मनमोहित होते, ती स्त्री आभीरदेशातील होय.

॥ लाटदेशांत झालेल्या स्त्रीचीं लक्षणें ॥

परिरंभणलोलुपा रदक्षतघातैर्द्रवमेति सत्वरम् ।
सुकुमारतनुर्मनोरमा सुरते नृत्यति लाटकामिनी ॥ ४ ॥

जी स्त्री आलिंगनाविषयीं मोठी आसक्त, दातांनीं हळूहळू चावलें असता आणि शिश्नानें आघात केले असता लवकर द्रवते, शरिरानें नाजूक असून स्वरुपानें सुंदर आणि सुरताच्या योगेंकरून नाट्य करिते, ती स्त्री लाट-देशोद्भवा असें जाणावें.

॥ आंध्र–कर्नाटक स्त्रियांचें गुण ॥

मृद्वी दुराचाररता वहंती रतार्तिमुच्चैरतिकर्मदक्षा ।
त्रपाविहीनाऽतिमनोरमांगा स्यादांध्रकर्नाटभवा पुरंध्री ॥ ५ ॥

या दोन देशांतील स्त्री अंगानें व शब्दादिकेंकरून मृदु असते. दुराचारी, आसक्त, मस्करी करण्यात मोठी कुशल, लाज कशी ती ठाऊकच नसते

आणि अंग असें सुंदर असतें कीं, दृष्टीस पडली असता तिच्याच ठायीं रममाण व्हावें अशी इच्छा होते, ती स्त्री आंध्रदेशी व कर्नाटकी असें समजावें.

॥ कोसलराष्ट्रदेशोद्भव स्त्रियांचें गुण ॥

नितांतकंडूतियुतस्मरालया । द्रवंति चंडध्वजघातनाच्चिरम् ।
रतिप्रयोगे चतुराश्च योषितः । प्रकीर्तिताः कोशलराष्ट्रसंभवाः ॥ ६ ॥

ज्या स्त्रियाची योनि सर्वदा कंडूनें फारच युक्त असते आणि शिश्नानें जेव्हा जोराजोरानें धक्के फार वेळा द्यावे तेव्हा रेत अवकाशानें पडतें, रतिसंभोगाचे कलेमध्यें मोठ्या चतुर असतात, त्या स्त्रिया कोसलदेशात व राष्ट्रदेशांत उत्पन्न झाल्या असें समजावें.

॥ महाराष्ट्रदेशीय व पाटलिपुत्रदेशीय स्त्रियांचें गुण ॥

ईषद्धासमनोरमाश्च नितरां साक्षेपवाग्विभ्रमा ।
निर्लज्जाश्चपलाः कलासु कुशला गाढानुरागान्विताः ।
नार्यः पाटलिपुत्रजा अपि महाराष्ट्रोद्भवाः संततं ।
नानावेषविनोदभावरसिकाः संकीर्तिताः पंडितैः ॥ ७ ॥

ज्या स्त्रिया थोडें गालांत हसून नखरेबाज, कटाक्षयुक्त, चमत्कारिक विनोदाचीं भाषणें व आनदयुक्त मस्करी निर्लज्जपणानें करितात, क्रीडेविषयीं कुशल आणि चचल, अगीं प्रेम फार, चांगल्या प्रकारचे शृगार करणें अथवा बागात जाऊन विलास करणें, इत्यादि विनोदाची सर्वकाळ आवडच असते, त्या स्त्रिया महाराष्ट्र आणि पाटलिपुत्र देशातील समजाव्या.

॥ गौडदेश व वगदेश यांमधील स्त्रियांचें गुण ॥

कुसुममृदुशरीरा चुंबनालिंगनाद्यै । र्बहुतरधृतभावा क्रूरचेष्टाविरक्ता ।
विषमविशिखियुद्धे स्तोकवेगा पुरंध्री । भवति तरलनेत्रा बंगजा गौडजा च ॥ ८ ॥

ज्या स्त्रीचें अग फुलाप्रमाणें मृदु, चुंबन-आलिंगन इत्यादिकांविषयीं इच्छा फार; क्रूर चेष्टा अगदीं आवडत नाहीं, चचल नखऱ्यानें पाहणें आणि पूर्वी सागितलेला जो कामवेग तो जिचे ठायीं स्वल्प असतो, ती स्त्री वगजा आणि गौडजा म्हणावी.

॥ उत्कली व कामरूपदेशातील स्त्रियांचे गुण ॥

विपरीतरताभिलाषिणी गतलज्जा नखदानतोषिणी ।
निरतरमनुरागशालिनी मदनार्ता कथितैवमुत्कली ॥ ९ ॥

जी स्त्री अत्यत कामातुर निर्लज्ज होत्साती विपरीत संभोगाची इच्छा करिते, स्तनादिकाना नखें लावली असता संतुष्ट होऊन जिला नाना प्रकारचे भोगाविषयीं प्रेम फारच असतें, ती स्त्री उत्कलदेशोत्पन्न समजावी.

॥ कामरूपभव स्त्रियांचे गुण ॥

प्रियंवदा कोमलदेहवल्ली भृशं द्रवंती स्मरकेलिरंगे ।
विलासदक्षा प्रचुरानुरागा स्यात्कामरूपप्रभवा पुरंध्री ॥ १० ॥

ज्या स्त्रीचें भाषण मधुर, शरीर कोमल, कामविलासात बहुत चतुर, प्रीति फार, संभोगाचे वेळीं रंगात आली असतां रेत अत्यत स्रवतें, ती स्त्री कामरूप देशातील जाणावी.

॥ वनात झालेल्या स्त्रियांचें गुण ॥

निजदोषनिगोपने रताः परदोषग्रहणेषु तत्पराः ।
वनिता वनवाससंभवा दृढदेहाः परिकीर्तिता बुधैः ॥ ११ ॥

ज्या स्त्रियाचा आपलें छिद्र झाकून परच्छिद्र प्रसिद्ध करण्याचा स्वभाव, शरीरप्रकृति दृढ हे वनात झालेल्या स्त्रियांचें गुण पडितानीं वर्णन केले आहेत.

॥ गुर्जरदेशोद्भव स्त्रियांचें गुण ॥

उपभोगरता सुलोचना लघुसंभोगविधिप्रतोषिणी ।
शुभवेषधरा विचक्षणा कथिता सा खलु गुर्जरी बुधैः ॥ १२ ॥

जी स्त्री उपभोगाविषयीं आसक्त, डोळे चागले जसे असावे तसे असतात, मृदु संभोगानें संतोष पावते, फार शहाणी, सुदर वेष धारण करिते, ती स्त्री गुर्जरी अशी निश्चयेंकरून कवींनीं ठरविली आहे.

॥ सिंधुदेश, उज्जनी व बाल्हिक ह्या देशांतील स्त्रियांचें गुण ॥

प्रचंडवेगा अतिकष्टसाध्याः सुकोपवंत्यश्चलनेत्रपाताः ।
भवन्ति दुष्टाः किल सिंधुजाता अवंतिबाल्हीकभवाः पुंरध्र्यः ॥ १३ ॥

ज्या स्त्रियाचा कामवेग अतितीव्र, संभोगांत साध्य होण्यास फार कठीण, राग बहुत, नेत्रकटाक्ष चचल, स्वभाव दुष्ट, त्या स्त्रिया सिंधुदेशाच्या, अवंतिदेशाच्या आणि बाल्हीकदेशाच्या अशा जाणाव्या.

॥ तीरोद्भव स्त्रीचें गुण ॥

**नानोपभोगरसिका रतिरंगदक्षा प्रोत्फुल्लपद्मनयना प्रियवद्धरागा ।**
**कंदर्पदर्पपरिदीपनभावशीला ज्ञेया बुधैर्मृदुरतिः खलु तीरभुक् सा ॥ १४ ॥**

ज्या स्त्रीचें नेत्र प्रफुल्लित कमलाप्रमाणें शोभायमान, रतिविलासात अति शहाणी, नानाप्रकारचे उपभोग भोगणारी, नवऱ्यावर दृढ प्रीति, पतीनें पाहिली असतां तात्काळ त्याचा काम प्रदीप्त व्हावा असा जिचा स्वभाव आणि रतीविषयीं कशी तर फार फार नाजूक, ती स्त्री निश्चयेंकरून तीरोत्पन्न अशी विचक्षण पुरुषानीं जाणावी.

॥ पुष्पपूर, मद्रदेश व तेलंगदेशच्या स्त्रियांचें गुण ॥

**संभोगशिक्षाकुशलाः सलज्जाः प्रियोपभोगा अतिचंडवेगाः ।**
**मनोरमाः पुष्पपुरे प्रसूताः स्युरंगना मद्रतिलंगनाश्च ॥ १५ ॥**

ज्या स्त्रिया मैथुन कसें करावें याच्या शिक्षणाविषयीं कुशल असून मर्यादशील, पतीजवळ निजणाऱ्या आणि ज्या स्त्रियांचे उपभोगाला गोडी अधिक, पूर्वी सागितला जो चडवेग तो ज्याच्या ठायीं असतो, आणि नखरे आदि कृत्यानीं खूष करणाऱ्या असताल, त्या पुष्पपुरादिक देशाच्या अगना होत.

॥ द्रवीडदेश, सौवीर व मलयदेश येथील स्त्रियांचें गुण ॥

**मृद्व्यः सुवाचो लघुभोगसाध्याः ससाहसा वीतभयत्रपाश्च ।**
**समानरूपा द्रविडे प्रजाताः सौवीरभेदैर्मलये च नार्यः ॥ १६ ॥**

ज्या स्त्रियाचें अंग मऊ, भाषण मिष्ट, वस्त्रें चागलीं स्वच्छ असताल, हलू व थोड्या भावानें वश्य, स्वरूप आणि अवयव जसे असावेत तसे नेमस्त आणि लाज व भय टाकून साहसकर्माविषयीं उद्युक्त असताल, त्या द्रविडादिक देशात उत्पन्न झालेल्या जाणाव्या.

॥ कांबोजपौंड्रदेशांतील स्त्रियांचे गुण ॥

**नखादिविन्यासकलाविहीनाः संभोगसंमर्दनजाततोषाः ।**
**स्वभावतो दुष्टतमाः प्रचंडा कांबोजपौंड्रप्रभवाः पुरंध्र्यः ॥ १७ ॥**

एतद्देशीय रामा, म्हणजे स्त्रिया नखादिक लावून जे विलास करतात, त्यांची कला जाणत नाहींत; ज्या भोग आणि चांगलें मर्दन या गोष्टींनीं संतुष्ट होतात, स्वभावानें दुष्ट असून मोठ्या ढमाल असतात, त्या कांबोजादिक देशांतील स्त्रिया जाणाव्या.

॥ म्लेच्छ, पर्वत, गांध्य व काश्मीर देशांच्या स्त्रियांचे गुण ॥

**दुर्गंधिगात्रा लघुभोगतुष्टाः सचुंबनाश्लेषणभावहीनाः ।**
**म्लेंच्छांगनाः पर्वतजाश्च नार्यो गांध्याश्च काश्मीरभवास्तथैव ॥ १८ ॥**

ज्या स्त्रियांचें अंगाला दुर्गंध येतो, संभोग मोठ्यानें आवडत नाहीं, हलू संभोगानें संतोष पावतात, चुंबन घेणें व आलिंगन देणें इत्यादिक संभोगाच्या वेळच्या चेष्टा ज्या कामिनीस अगदीं ठाऊक नाहींत, त्या म्लेंच्छादि अंगना जाणाव्या.

॥ कामशास्त्राचा अभ्यास करण्याचा उपयोग ॥

**जात्यादिसाम्यमिति तत्त्वत एव यस्तु**
**ज्ञात्वा नरः सकलकामकलाप्रवीणः ।**
**संतोषयंश्च सततं सुरतप्रयोगैः प्राणै-**
**समत्वमुपयाति स कामिनीनाम् ॥ १९ ॥**

जो कामशास्त्राच्या या सर्व कला जाणील आणि पूर्वीं सांगितलेल्या ज्या स्त्रियांच्या जाती व गुण, चंद्रकलादि सर्व कला जाणतो, तोच नाना प्रकारच्या मैथुनादि कृत्यांनीं कामिनीस निरंतर आनंदयुक्त, सुखी करून तीस केवळ अगदीं प्राणप्रिय असा होतो.

कामशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या स्त्रीपुरुषांना आतां असें आढळून येईल कीं, ‘अनंगरंग’ हा ग्रंथ, व्यभिचारकर्माला उत्तेजन देणारा किंवा व्यभिचारी स्त्री-पुरुषांच्या संभोगलीलांनी कुतूहलें उत्पन्न करणारीं वर्णनें असलेला कथासंग्रह नाहीं. ईश्वरानें दिलेला अमोल जीव आणि देह यांना वियुक्त होऊं न देतां त्यांचे संबंध अव्याहत

कायम ठेवून शंभर वर्षांचें निर्दोष आयुष्य प्राप्त करून देणें, हा जसा वैद्यक शास्त्राचा मुख्य उद्देश आहे असें समजूनच वैद्यकीय उपचार सर्वत्र केले जातात, तसेंच, ईश्वर-प्रणित स्त्री-पुरुषाचे नैसर्गिक शरीरसंबंध (संभोगव्यवहार) अव्याहत सुव्यवस्थित सुरळीत ठेवून त्याना वियुक्त होऊं न देतां अर्थात् त्याच्यामध्यें 'घटस्फोट' अगर व्यभिचार हे दोष उत्पन्न होऊं न देतां, त्यांचा तो शरीरसंबंध (संभोगव्यवहार) पती-पत्नी या नात्यानें आमरण अव्याहत चालवून परस्परानीं परस्परांस अगदीं प्राणप्रिय होणें हाच मुख्य उद्देश कामशास्त्राचा आहे, असें समजूनच कामशास्त्रग्रंथाचा अभ्यास चारी वर्णांच्या स्त्री-पुरुषानीं करावा असें कामशास्त्रकार सांगतात. अर्थात् हाच मुख्य उद्देश अनंगरंग ग्रंथाचाहि आहे. लग्नाच्या निमंत्रणपत्रिकेंत 'शरीरसंबंध' हा शब्द वरील उद्देशानें घालतात.

**इति श्रीमल्लाडनवलविनोदाय महाकविकल्याणमल्लविरचिते अनंगरंगदेशजे धर्मनिरूपणं नाम पंचमः स्थलः ॥ ५ ॥**

याप्रकारेंकरून राजाधिराज जो लाडराजा त्याच्या विनोदासाठीं श्रीकल्याणमल्लकवीनें रचित अनंगरंग या नावाचा ग्रंथ, त्यातील पांचवें प्रक-रण-निरनिराळ्या देशांतील स्त्रियांच्या गुणधर्मांचें वर्णन-संपूर्ण झालें.



प्रकरण सहावें

## ॥ द्रावणादि औषधांविषयीं ॥

स्त्रियास मैथुनाचे वेळीं लवकर स्त्रवविणारी आणि मैथुनाला उपयोगी पडणारीं औषधें सांगतों.

**प्रागेव पुंसः सुरते न यावन्नारी द्रवेद्भोगफलं न तावत् ।**
**अतो बुधैः कामकलाप्रवीणैः कार्यः प्रयत्नो वनिताद्रवत्वे ॥ १ ॥**

संभोगाचे वेळीं पुरुष द्रवण्याच्या पूर्वी जर नारी द्रव पावत नाहीं तर तो संभोग करून निष्फळ होय. कारण त्या संभोगापासून स्त्रियांचें समाधान होत नाहीं; यास्तव पुरुषानीं कामकलेमध्यें प्रवीण होऊन स्त्री लवकर द्रवण पावेल असा प्रयत्न करावा म्हणजे तें सुरत रसिक होतें.

जात्यादिसाम्यं दुर्ज्ञेयं सांकर्यादिविशेषतः ।
अत एवातिसौक्ष्म्याच्च कलापींदोरगोचरा ॥ २ ॥

पूर्वी सांगितलेल्या ज्या जाति त्यांचें ज्ञान होऊन हा पुरुष अमुक जातीचा व ही स्त्री अमुक जातीची, हें ज्ञान होणें परम दुर्घट, आणि गुणांच्या संकरामुळें तर फारच कठीण. यास्तव फार सूक्ष्मतेमुळें चद्राकलाही (कामाचीं स्थानें) समजत नाहीं, अशा अज्ञ जनास समजावें म्हणून द्रावणादि प्रयोग सांगण्यास आरंभ करतों.

तस्माल्लोकहितार्थाय दंपत्योः सुखसिद्धये ।
नानौषधिविधानेन द्रवयुक्तिरुदीर्यते ॥ ३ ॥

अशा ह्या अडचणींसाठीं स्त्रीपुरुषाला सुख होऊन लोकांचें हित व्हावें, या परोपकारास्तव नानाप्रकारच्या औषधी–उपायांनीं स्त्री लवकर द्रवेल अशी युक्ति प्रकट करतों.

॥ प्रयोग १ ॥

मधुना सहितं घोपाचूर्णं यस्या वरांगके ।
निक्षिप्येत नतांगी सा पुंसः प्रागद्रवतां व्रजेत् ॥ ४ ॥

स्त्रीचे गुह्यांगामध्यें शोपेचें चूर्ण मधयुक्त घालावें म्हणजे ती स्त्री नम्र होऊन संभोगसमर्थी पुरुष द्रवणाच्या पूर्वी द्रवते.

॥ प्रयोग २ ॥

शुद्धं शंकरबीजं च जातीरसविमर्दितम् ।
वरांगमध्ये निक्षिप्तं नारी संद्रावयेद्रतौ ॥ ५ ॥

पांढरें रुईचें बीज शुद्ध करून, जाईच्या पाल्याच्या रसात, अथवा जायफळाच्या पाल्याच्या रसात खलून योनीस आतल्या बाजूनें लेप करून मग भोगावी म्हणजे स्त्री लवकर द्रवून वश होईल.

॥ प्रयोग ३ ॥

चिंचाफलं ससिंदूरं माक्षिकेन समन्वितम् ।
क्षिप्तं गुह्ये रतेयेषां प्रागेव द्रवतां नयेत् ॥ ६ ॥

चिंच, शेंदूर आणि रानांतल्या मधमाश्यापासून उत्पन्न झालेला तेलासारखा मध असतो तो, अशा तीन औषधि एकत्र खलून योनींत घालाव्या, म्हणजे रतिसमयीं पुरुषाचें रेत द्रवावयाच्या पूर्वी स्त्रीचें रेत स्त्रवेल.

॥ प्रयोग ४ ॥

कर्पूरं टंकणं शंभुबीजं चेति त्रिभिः समैः ।
स क्षौद्रैर्लिप्तलिंगस्तु नरः संद्रावयेत्प्रियाम् ॥ ७ ॥

कापूर, टांकणखार आणि शुद्ध केलेला पारा, हीं तीन औषधें समभाग मधात खलून पुरुषानें आपले लिंगास लेप करून मग स्त्री भोगूं लागावी; म्हणजे ती लवकर द्रवते. (अनुभवसिद्ध होय).

॥ प्रयोग ५ ॥

मध्वाज्यागस्त्यपत्रोत्थरससंमर्दितेन च ।
टंकणे तु ध्वजं लिप्त्वा द्रावयेदबलां नरः ॥ ८ ॥

मध, तूप व अगस्त्याचे पाल्याचा रस हीं तीन समभाग घेऊन त्यात टांकणखार खलून त्याचा लिंगास लेप करून मग भोगूं लागलें असता अबला लवकर द्रव पावेल.

॥ प्रयोग ६ ॥

जीर्णो गुडश्चिंचणिकाफलं च घोपारजः क्षौद्रयुतं समांशम् ।
एभिर्ध्वजं यः परिलिप्य शेते कुर्यात्स रेतच्युतिमंगनानाम् ॥ ९ ॥

जुना गूळ, चिंचेचें फळ आणि शोपेचें चूर्ण, हीं समभाग एकत्र मधात खलून त्यानें शिश्न लिप्त करून मग जो पुरुष संभोग करील, तो स्त्रियाचें वीर्य शीघ्र पाडील

॥ प्रयोग ७ ॥

मरिचचकनबीजैःपिप्पलीलोध्रयुक्तै
र्विमलमधुविमिश्रैर्मानवो लिप्तलिंगः ।
स्मरसमरविलासे कष्टसाध्यां च नारी-
मपगतरतिरागां संविदध्यादवश्यम् ॥ १० ॥

काळीं मिरीं, धोतऱ्याचें बीं, पिंपळी आणि लोध्र, हीं एकत्र पांढऱ्या मधांत खलून आपल्या लिंगाला लेप देऊन भोगूं लागलें असतां जी स्त्री मैथुनात लवकर तृप्त होत नाहीं, तसलीही कामिनी खात्रीनें मैथुनाविषयीं लवकरच निरिच्छ होईल.

काहीं स्त्रिया अशा असतात कीं, एकाच रात्रींत एकाच पुरुषाशीं अनेक वेळा किंवा अनेक पुरुषांशीं अनेक वेळा संभोग करूनही त्याच्या योनींतील तीव्र खाज शांत होत नाहीं. अशा स्त्रियांसाठी त्याच्या योनींतील तीव्र खाज शमविण्यासाठीं हा उपाय येथे सांगितलेला आहे.

॥ पुरुषाचें रेत लवकर पडूं न देणारे उपाय (वीर्योपासना) ॥

**पतनान्मदनांभ सत्वरं परितोषो न भवेद्विलासिनाम् ।**
**सुरतोत्सवसिद्धिहेतवे तदयं स्तंभविधिर्निरूप्यते ॥ ११ ॥**

विलासी पुरुषाचें संभोगसमयीं वीर्य त्वरित स्रवतें, तेणेंकरून संभोगामध्यें त्याचा संतोष पूर्ण न होऊन मनामध्यें सुरताची इच्छा शिल्लक राहाते; यास्तव दया येऊन लोकांचे सुरतोत्सवाची सिद्धि व्हावी म्हणून वीर्यस्तंभक उपाय सांगतों. (सुरतोत्सव हा वरवधूचा त्यांच्या शयनमंदिरातील मदनोत्सवच होय.)

॥ प्रयोग १ ॥

**लज्जालुमूलं गोक्षीरैर्वज्रीक्षीरेण वा पुनः ।**
**पिष्ट्वा स्वपादौ संलिप्य चिराद् बीजं न मुंचति ॥ १२ ॥**

लाजाळूचें मूळ गाईच्या दुधात अथवा पाचधारी निवडुंगाच्या चिकात वाटून आपले पायाना लेप करावा. आणि मग स्त्रीला भोगूं लागलें असता संभोगसमयीं रेत लवकर पडत नाहीं.

॥ प्रयोग २ ॥

**अथ कौसुंभतैलेन वर्षाभूरजसापि वा ।**
**लिप्तपादः पुमान् रेतो न जहाति अतित्वरम् ॥ १३ ॥**

करडईच्या तेलात पांढऱ्या रुईच्या मुळीची बुकी खलून पायाना लेप केला असतांही रतिसमयीं रेत लवकर पडत नाहीं.

॥ प्रयोग ३ ॥

सीतायाः काकजंघाया मूलं श्वेताब्जकेसरम् ।
क्षौद्रेण नाभिसंलेपात् बीजं स्तंभति कामिनः ॥ १४ ॥

पांढऱ्या कांगाचें मूळ आणि पांढऱ्या कमळाचें केसर ही मधांत वाटून यांचा लेप बेंबीवर लाविला असताही पुरुषाचें रेत स्तभन पावतें.

॥ प्रयोग ४ ॥

शिंशपा शंभुबीजं च कर्पूरं च समांशकम् ।
मधुना लेपयेन्नाभौ यः स वीजं न मुंचति ॥ १५ ॥

शिसव्याची साल, शुद्ध पारा आणि कापूर हीं समभाग मधात वाटून नाभीवर जो लेप ठेवील त्याचें वीर्य स्तभन पावेल.

संभोगाला आरंभ करिता करितांच म्हणजे संभोगाचे वेळीं, पुरुषाच्या ताठ झालेल्या शिश्नाला स्त्रीच्या योनीचा नुसता स्पर्श झाल्याबरोबरच जर पुरुषाचें वीर्यस्खलन तत्काळ झालें, तर त्याचें चैतन्य असलेलें ताठ शिश्न एकदम थंड होऊन आखूड व नरम होतें, मग पुढें सभोगच होत नाहीं. त्यामुळें मनामध्यें संभोग करण्याची इच्छा असूनही तशीच शिल्लक रहाते, समाधान वाटत नाहीं आणि संभोगसुखाचा आनदहि त्याला मिळत नाहीं. तसेंच, ताठ झालेलें शिश्न योनींत घुसून त्या शिश्नाचें सतत आंत बाहेर होणाऱ्या क्रियेनें योनीला जें जोरानें घर्षण होत असतें; तसें घर्षण थंड आणि नरम शिश्नानें होत नाहीं; त्यायोगें स्त्री संतोष पावत नाहीं. संभोगकार्य पूर्ण होईपर्यंत शिश्न ताठ आणि कठीण रहावयास पाहिजे. याला शास्त्रीय उपाय म्हणजे "मैथुनसमयीं वीर्यस्खलन लवकर होणार नाहीं असा वीर्यस्तंभक प्रयोग करून इच्छेस येईल असा दीर्घकाळ मनसोक्त संभोग करणें" हाच होय.

॥ प्रयोग ५ ॥

सितकोकिलनाम्नश्च बीज पुष्योद्धृतं कटौ ।
बद्धं लोहितसूत्रेण बीजस्तंभं करोत्यलम् ॥ १६ ॥

पांढऱ्या तालीमखान्याचें बीज पुष्य नक्षत्रावर काढून तांबड्या सुतानें कमरेस बांधिलें असताही वीर्यस्तभन इच्छा पूरे होईपर्यंत करितें.

॥ प्रयोग ६ ॥

सप्तपर्णस्य बीजं वा रविवारे समुध्दृतम् ।
वक्त्रे धृतं नृणां बीजं स्तभ्नाति सुरतौ चिरम् ॥ १७ ॥

सातविणाला शनिवारीं आवंतून रविवारीं त्याचें बीज काढावें आणि स्त्रीला भोगावयाचे वेळेस तोंडात धरावें, त्या योगानें रेत फार वेळपर्यंत दम धरतें.

॥ प्रयोग ७ ॥

श्वेतेपु पुंखामूलं वा पुष्यार्के प्राप्य यः कटौ ।
कन्याकर्तितसूत्रेण बध्नाति स भजेच्चिरम् ॥ १८ ॥

पांढऱ्या उन्हाळीचे बीज पुष्य नक्षत्र रविवारीं असेल त्या दिवशीं काढून कुमारीनें कातलेल्या सुतानें कबरेस बाधिलें असताही तो पुरुष फार वेळपर्यंत भोग भोगील.

॥ प्रयोग ८ ॥

बीजं सितपिकाख्यस्य वटक्षीरेण पेषितम् ।
करजबीजमध्यस्थं स्तंभनं वदने धृतम् ॥ १९ ॥

पाढऱ्या तालीमखान्याचें बीज वडाच्या चिकांत वाटून करंजाच्या बीजांत घालून तोंडात धरलें असतांही वीर्यस्तभन होईल.

॥ वाजीकरण म्हणजे काय? ॥

वाजीकरण म्हणजे जो पुरुष अशक्त असतो, संभोगाचे वेळी ज्याच्या लिंगाला चेतनायुक्त ताठरपणा नसतो; त्याचें शिश्न घोड्यासारखें टणक होऊन त्या शिश्नामध्यें घोड्याप्रमाणें जोरदार संभोगसामर्थ्य प्राप्त होण्यासाठीं त्या शिश्नाचा ताठरपणा आणि कठीणपणा संभोग करतांना जरासुद्धां कमी होणार नाहीं असा जो उपाय करतात त्यास वाजीकरण म्हणतात. पूर्वीं सांगितलेले द्रावक आणि स्तभक उपाय जर पुरुष अशक्त असून त्याचें लिंग मिसमिशीत असेल, तर त्यास ते उपाय कांय करतील? अशा अशक्त माणसास स्तंभक उपाय व्यर्थ होत. यास्तव तसल्या पुरुषाच्या लिंगाला घोड्याप्रमाणें टणक करून घट्ट व स्थूल करणारीं अशीं औषधें प्रगट करितो.

शक्तेरभावात्स्तंभादि सर्वमेवाप्रयोजकम् ।
अतः शरीरपुष्ट्यर्थं वाजीकरणमुच्यते ॥ २० ॥

जर पुरुषाच्या अंगीं संभोगशक्ति नसेल तर स्तभनादिक सगळे उपाय अप्रयोजक होत. यास्तव शरीर पुष्ट होण्यासाठीं वाजीकरण कथन करितों.

## ॥ राजदंड, कामदंड, वीर्यसंचय आणि घुसळणक्रिया ॥

ज्याप्रमाणें सिंहासनारूढ असलेल्या सत्ताधीश राजाचा 'राजदंड' राज्यव्यवहार करण्यास योग्य असा कार्यक्षम आणि बलवान् असला म्हणजे त्या राजाची प्रजा राजनिष्ठ रहाते व त्या राजनिष्ठ प्रजेमध्यें संतोष आणि समाधान, तसाच राजासंबंधी आदर पूर्णपणें वास करीत असतो. त्याचप्रमाणें, 'काम' पुरुषार्थाच्या सिद्धीसाठीं संभोगासनारूढ पुरुषाचा 'कामदंड' (ताठ झालेलें शिश्न) 'काम' व्यवहार करण्यास योग्य असा संभोगक्षम-बलवान् असला म्हणजे त्याची बायको पतिनिष्ठ रहाते. आनंदी व शांत चित्तवृत्ति आणि तृप्तता त्या स्त्रीचे ठायीं आढळून येते. 'कामदंड' दुर्बल असेल तर त्याची बायको चंचल चित्त होऊन तीं परपुरुषाचा आश्रय उघड अगर गुप्तपणें घेऊन ती स्त्री व्यभिचारी बनते. ताठ झालेल्या शिश्नास कामव्यवहारामध्यें 'कामदंड' अशी संज्ञा देतात. (राजदंड-कामदंड). कामदंड संभोगक्षम आणि बलवान् करणारे वाजीकरण औषधीप्रयोग कल्याणमल्ल येथें सांगत आहेत.

धर्मव्यवहाराचे समयीं शुद्ध, पवित्र असें निर्दोष शील आणि आचरण महत्त्वाचें समजतात. अर्थव्यवहाराचे समयीं सुवर्णसंचय हाच सर्वश्रेष्ठ मानला जातो. पण, कामव्यवहाराचे समयीं मात्र जें वीर्य शिश्न ताठ करून संभोगाला प्रवृत्त करतें, अशा ओजस्वी आणि तेजस्वी वीर्यसंचयालाच अत्यंत महत्त्वाचें समजतात. शुद्ध शील, पवित्र आचरण, भरपूर सुवर्णसंचय जवळ आहे. परंतु संभोगाला प्रवृत्त करणारा ओजस्वी आणि तेजस्वी वीर्यसंचयच शरीरात नसला तर कामव्यवहार तत्काल बंदच होतो. अशा या कामव्यवहारशून्य पुरुषाला पाहून स्त्रिया नाकें मुरडतात; हा षंढ आहे असें बोलून स्त्रिया त्याचा तिरस्कारहि करतात. इतर तरुण पुरुष त्याच्याकडे पाहून हंसतात, त्याची चेष्टा करतात व हातानें षंढत्वनिदर्शक खूण करून त्याचा उपहास करतात. समाजामध्ये त्याला मान-सन्मान रहात नाहीं. या सर्व गोष्टींचा सर्वांगीण विचार करूनच शरीरशास्त्रकार ओजस्वी-तेजस्वी वीर्यसंचयाचें महत्त्व ओळखून अशा वीर्यसंचयाला Golden Essence of Life असें समजतात. याच कारणासाठीं वाजीकरण प्रयोग येथें सांगितले आहेत.

वाजीकरणानें योनींत शिश्न घुसळण्याची क्रिया उत्तम प्रकारें करता येते. ज्याप्रमाणें दह्यामध्यें रवीचें घुसळण केलें असता लोणी प्राप्त होतें; त्याचप्रमाणें योनीमध्यें शिश्न घालून रवीप्रमाणें त्या शिश्नाची चांगली घुसळणक्रिया केली असतां स्त्रीच्या हृदयांतील प्रेमाचा अमोलिक ठेवा मिळतो. संभोगसमयीं कमरेंत जोर असला तरच हें शिश्न घुसळण उत्तम प्रकारचें होते. दही घुसळण्याची रवी ही ताठ शिश्नाप्रमाणेंच असते. काहीं काहीं विलासी स्त्रिया त्यांच्या योनींत रवीप्रमाणें शिश्न घुसळण्याची क्रिया केली असता अतिशयच संतोषित होतात. त्या स्त्रियांना ही शिश्न घुसळण्याची क्रिया मानवते. कारण त्या स्त्रियांची कामवासना फारच प्रखर असते.

रतिसुखाविषयीं आवड, उत्साह, आनद व प्रेम या सर्व गोष्टी वाजीकरणा'नें घडवून आणतां येतात. संभोगसमयीं स्त्री-पुरुषांच्या गुह्येंद्रियाचा विशिष्ट सयोग होऊन इंद्रियजन्य घर्षण होत असता शुक्रस्खलन होतें. त्या वेळीं शुक्राचें आधिक्य असल्यास पुत्र जन्मतो. "आर्तवाचें" आधिक्य असल्यास कन्या जन्मते. मातृसत्ताक पद्धतींत कन्येचें महत्त्व असून पितृसत्ताक पद्धतींत औरस पुत्राचें महत्त्व सांगितलेलें आहे. कारण पुत्र पित्याचा वंश चालवतो व वाढवतो. कन्या दुसऱ्याचा वंश वाढविते. पितृऋण फेडण्यासाठीं पुत्राची अपेक्षा करणाऱ्या पुरुषानें तेजस्वी शुक्राचें आधिक्य व्हावें, म्हणून वाजीकरण औषधाचें सेवन करावें असें 'सुश्रुताचार्यां'चें मत आहे. सभोगसमयीं योनींत स्खलन झालेल्या शुक्रामधील नरजतु अतिशय जोरदार असला म्हणजे तो नरजंतु स्त्रीच्या गर्भाशयात जोरानें शिरून तेथेंच स्थिर होतो. जर त्यावेळीं योनींतील आर्तवाचें (रज) आकर्षण अधिक असेल तर तें आकर्षण लोहचुंबकाप्रमाणें शुक्रांतील फक्त स्त्रीजतुच खेचून घेऊन त्या स्त्रीजतुला गर्भाशयात स्थिर करतें. म्हणून पुत्रेच्छु पुरुषानें वाजीकरण करावें.

॥ इंद्रियचापल्य आणि इंद्रियसामर्थ्यासाठीं वाजीकरण ॥

कित्येक देशांत अशी पद्धत आहे कीं, सभोग करण्यास नवरा कमजोर आहे म्हणून स्त्रिया घटस्फोट मागतात. अशा नवऱ्याचा ती तिरस्कार करून परपुरुषाचा आश्रय करिते. तेव्हां असें होऊ नये म्हणून वाजीकरण हें प्रत्येक पुरुषाला अवश्य आहे. राजेलोकांच्या अंत'पुरात शेंकडों—हजारों विलासी स्त्रिया असतात. त्यांना तर वाजीकरण औषधाची फार जरूरी! विजयनगरच्या राजाच्या अन्तःपुरात हजारों सौंदर्यवान् स्त्रिया होत्या, पुरुरवा राजा हा वाजीकरण औषधाच्या सेवनानें अहोरात्र नग्न राहून अखड सभोगकार्य करीत असे. त्याच्या नग्नतेला 'ऊर्वशी अप्सरेनें मर्यादा घातली. 'अमरु' राजाच्या अंतःपुरात शेंकडों कामशास्त्रज्ञ स्त्रिया असाव्यात असें अनुमान आद्य श्रीशंकराचार्यांच्या चरित्रावरून दिसतें कारण देवी सरस्वतीनें श्रीशंकराचार्यांना कामशास्त्राचे प्रश्न वादप्रसंगी विचारले असता, त्यानीं 'अमरु' राजाच्या मृत शरीरात योगसामर्थ्यानें प्रवेश करून राजाच्या अंतःपुरातील विलासी व कामशास्त्रज्ञ स्त्रियाजवळ वात्स्यायन कामसूत्रातील सभोगज्ञानाचें सप्रयोग शिक्षण घेतलें; असें त्यांच्या चरित्रांत लिहिलें आहे. अर्थात् कामशास्त्रज्ञ स्त्रियाजवळ कामशास्त्राचें सप्रयोग शिक्षण घेण्यासाठीं इंद्रियचापल्य व इद्रियसामर्थ्य वेगवान् व बलवान् करण्यासाठीं श्रीशकराचार्यांना वाजीकरण औषधाचें सेवन करावें लागलें असेलच, हें तर्कसिद्धच आहे. 'पितृसत्ताक' पद्धतींत एक पुरुष अनेक बायका करू शकतो. तेव्हां अनेक बायकांशीं एकाच वेळीं किंवा निरनिराळ्या वेळीं सभोग करण्याचें सामर्थ्य वाढविण्यासाठी पुरुषाला वाजीकरण औषधाचें सेवन करणें प्राप्तच आहे. यज्ञामध्यें पत्नीनें तुपाची सतत धार यज्ञकुंडात धरून आहुति दिल्या असतां

यज्ञदेव संतोषित होतो. त्याचप्रमाणें, मातृसत्ताक पद्धतींत कांहीं स्त्रिया अशा असतात कीं, त्याच्या योनींत वीर्याची सतत धार पडली असतां त्या स्त्रिया संतोषित होतात. योनि=यज्ञकुंड, पळी=ताठ शिश्न, तूप=वीर्य. म्हणून 'मातृसत्ताक' पद्धतींत एक स्त्री अनेक नवरे करू शकते, तेव्हां अनेक नवऱ्याशीं संभोग करण्याचीं वाजीकरण औषधें स्त्रियांना कोणतीं सांगितलीं आहेत हें पाहण्यासाठीं मातृसत्ताक पद्धतींत कामशास्त्र-ग्रंथाचा आम्हीं बराच शोध केला. पण तो आढळला नाहीं. कित्येक शरीरशास्त्रवेत्ते असें सांगतात कीं कांहीं झाडें छाटल्यानें (गुलाब-मोगरा वगैरे) पुन्हां दुप्पट जोरानें फुटून मोठ्या वेगानें वाढत असतात, त्याचप्रमाणें शिश्नाच्या पुढील कातडीचा कांहीं भाग कापला (circumcise) म्हणजे शिश्न वेगवान् होऊन संभोग दीर्घकाल करता येतो. या क्रियेला 'सुन्ता' म्हणतात. कांहीं ज्योतिषशास्त्रज्ञ असें सांगतात कीं, ज्याचे शिश्नावर काळा तीळ आहे त्याला अनेक स्त्रियांशीं समागम करण्याचे योग प्राप्त होतात.

## ॥ प्रयोग १ ॥

चूर्णं विदार्याः स्वरसैर्भावितम् भानुशोषितम् ।
मध्वाज्यमिश्रितं लिढ्वा भजते वनितादशम् ॥ २१ ॥

भुईकोहळ्याच्या रसाचीं सूर्यपुटें भुईकोहळ्याच्याच चूर्णाला देऊन तें चूर्ण तूप, खडीसाखर आणि मध यामध्यें नित्य खात गेलें असतां, दहा स्त्रियांना भोगावयाचें सामर्थ्य येईल.

## ॥ प्रयोग २ ॥

स्वरसैर्भावितं धात्रीचूर्णमाज्यसमन्वितम् ।
क्षौद्रेण विलीहनं रात्रौ वृद्धोपि तरुणायते ॥ २२ ॥

आवळ्याच्या रसाचीं सूर्यपुटें आवळ्याच्याच चूर्णाला देऊन तें चूर्ण तूप, खडीसाखर आणि मध यामध्यें रात्रीस जो नित्य खात जाईल, तो कांहीं महिन्यानीं म्हातारा जरी असला तरी मैथुनसमयीं तरुण पुरुषाप्रमाणें दम देणारा होईल.

## ॥ प्रयोग ३ ॥

कपिगोक्षुरगोरक्षबलानागबलाभवम् ।
चूर्णं च शतपत्रायाः पीतं क्षीरेण पौष्टिकम् ॥ २३ ॥

कवचबीज, काटेगोखरू, काकडी, चिकणा, लेचा आणि लघुशतावरी याचें चूर्ण दुधात घालून पीत गेले असता शरीर पुष्ट होतें.

संस्कृत भाषेंत कवचबीजाला कपि म्हणतात. कपि म्हणजे मोठा वानर. हा वानर १०-२० माद्यांशीं न दमता, न थावता अखड सभोगकार्य सहज करू शकतो. असें हें अचाट संभोगसामर्थ्य पुरुषाना प्राप्त होण्यासाठीं आयुर्वेदानें 'वानरयोग' सांगितला आहे. सकाळीं भुई कोहळ्याचें (विदारी कद) चूर्ण पाव तोळा दुधसाखरेबरोबर घेणें. दुपारीं कवचबीजाचें चूर्ण अर्धा तोळा तूप मधातून घेणें. सध्याकाळीं अश्वगंधाचें चूर्ण पाव तोळा दुधसाखरेबरोबर घेणें. रात्रीं उडीदाच्या पिठाचा लाडु एक खाऊन वर गव्हाच्या सत्वाची दुधात केलेली खीर पिणें. नंतर, केशर, जायफळ, भाग, अफू प्रत्येकीं तोळा घेऊन त्याच्या १०० गोळ्या करणें. त्यातून २ गोळ्या रात्रीं खाणें; हा वानरयोग सतत तीन महिने करावा. राजे लोकाचे अन्तःपुरात पुष्कळ विलासी तरुण स्त्रिया असतात. त्याच्यासाठीं हा वानरयोग आहे. अखड संभोगसामर्थ्य प्राप्त होतें. कमरेंत जोर येतो. वीर्य लवकर स्खलन होत नाहीं. शिश्न सदोदित ताठ रहातें.

॥ प्रयोग ४ ॥

सितासाधितगोक्षीरे माषान्संभाव्य शोषयेत्।
भानुपादैः पुनस्तेषां चूर्णस्य वटकं शुभम् ॥ २४ ॥
कृत्वा घृतेन संसाध्य प्रदोषे भक्षयेत्सदा।
वृद्धोपि प्रबलो भूत्वा वनितानां शतं व्रजेत् ॥ २५ ॥

दुधात साखर घालून त्या दुधाचीं सूर्यपुटें उडदास तीन वेळ द्यावीं. मग त्या उडदांचें पीठ करून त्याचा वडा करावा व तो तुपात तळून प्रदोषकाळीं नेहमीं खात गेलें असतां म्हाताराही मोठा प्रबल होऊन शभर स्त्रिया भोगील.

॥ प्रयोग ५ ॥

मध्वाह्वचूर्णकर्षं वा लीढ्वा मध्वाज्यमिश्रितम्।
पिबेत्तदनु गोक्षीरं यः स नारीशतं भुञ्जेत् ॥ २६ ॥

मोहाच्या अंतःसालीचें चूर्ण (वजन १० मासे) मध व तुपात खलून खावें आणि वर गाईचें दूध प्राशन करावें म्हणजे तो पुरुष शभर स्त्रिया भोगावयाजोगा होईल.

॥ प्रयोग ६ ॥

बीजं सितपिकाख्यस्य तंडुलाः षष्टिकोद्भवाः।
द्वयोः कर्षं लिहन् रात्रौ मधुना दढतां व्रजेत् ॥ २७ ॥

पाढऱ्या तालिमखान्याचें बीज व देवभाताचे तांदूळ मिळून वजन मासे १० मधाबरोबर रात्रीस खात गेलें असताही पुरुषास शक्ति येईल.

बुद्धिवादि श्रीसरस्वति देवीची, अर्थवादि श्रीलक्ष्मी देवींची उपासना करून आपापली उन्नति करून घेतात. त्यानुसार शक्तिवादि हे कुमारी देवीची उपासना करून आपली उन्नति करून घेतात. अशा प्रकारें शक्तीची उपासना करणाऱ्या शाक्त-पंथीय धर्मग्रथामध्यें, प्राशनीय, भक्षणीय, सेवनीय अशा पांच 'म' कारांचें महत्त्व सांगितलेले आहे. मद्य मांस-मत्स्य-मुद्रा-मैथुन हे पांच 'म' कार. सहावा 'म' कार मोक्ष. या मोक्षासाठींच पहिले पांच 'म' कार आहेत. या पांच 'म' काराचा अतिरेक ज्या विषयोपभोगामध्यें केलेला असतो असे विषयोपभोग जो पुरुष (शाक्त) पुन्हा–पुन्हां भोगतो, तो पुरुष लवकरच अध्यात्मवादी बनून मोक्षाचा अधिकारी होतो व मोक्ष प्राप्त करून घेतो. एखाद्या पदार्थाचें वीट येईल अगर वांति–ओकारी येईपर्यंत अतिसेवन एकसारखें पुन्हां पुन्हा केलें कीं, त्या सेवन केलेल्या पदार्थांची ओकारी होते. त्यामुळें त्या पदार्थाचें नाव घेताच अगर स्मरण होताच शिसारी येऊन तो पदार्थ नजरेसमोरहि नको इतकी निरिच्छता जशी त्या पदार्थाबद्दल प्राप्त होते, तसेंच पाच 'म कारांच्या भिन्न भिन्न शक्तीचें एकीकरण करून त्या एकीकरण केलेल्या शक्तीचें पुन्हा पुन्हा अतिसेवन शिसारी येऊन निरिच्छता प्राप्त होईपर्यंत जो शाक्त पुरुष करतो, तोच शाक्त मोक्षाचा खरा अधिकारी होय. या पांच 'म' कारांचा अतिरेक हा निरिच्छता आणि मोक्षप्राप्ति यांसाठीच असतो असें शाक्तधर्म सांगतो. मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा व मैथुन या प्रत्येक 'म' कारामध्यें एकेक अलौकिक शक्ति असते. मद्यामध्यें कांहीं मद्यें अशीं आहेत कीं, मैथुन शक्ति तत्काल उत्तेजित करून अमर्याद मैथुन सेवन केल्यानें जे मैथुनश्रम जाणवतात, त्या सर्व श्रमाचा परिहार तें मद्य करितें अशी शक्ति त्या मद्यामध्यें भरपूर असते. बोकड, मेंढा, ससा, रानडुकर, हरीण, घोरपड यांच्या मांसामध्यें मैथुनसामर्थ्य फारच असतें. 'मुद्रा' याचा शाक्तमार्गीतील अर्थ अंडीं, स्त्री असाहि होतो. राजमुद्रा (चलनी नाणें) असाहि अर्थ होईल. कोंबडा, कबुतर, चिमणी, मोर यांचीं अंडीं हीं वाढलेली मैथुनशक्ति दीर्घकाल टिकवून धरतात. स्त्री ही शक्तीची देवता आहे. नित्य मत्स्य-सेवन मैथुनशक्तीची वृद्धि करणारें आहे. मैथुनामध्यें तर आनंद देणारें विलक्षण सामर्थ्य असतें. अशा या मैथुनात पाच 'म' कारांच्या भिन्न भिन्न शक्तीचें पूर्ण एकीकरण, त्या सर्वांचें अमर्याद सेवन, शेवटीं शिसारी येऊन निरिच्छता आणि मोक्षप्राप्ति, असें हें गूढ तत्त्वज्ञान शक्तीची उपासना करणाऱ्या शाक्तांना शाक्तधर्मग्रंथ

लागतात. शाकाहारी लोकांना तो पंथ मद्य-मांसाहारामुळें योग्य नसल्यानें येथें वनस्पतींचे औषधिप्रयोग सांगितले आहेत.

॥ प्रयोग ७ ॥

शतपत्रारसं सर्पिस्तुल्यं तद्दशधा पयः ।
दत्त्वा संसाधितं क्षौद्रसिताभ्यां पौष्टिकं परम् ॥ २८ ॥

काटेशेवंतीच्या रसात समभाग तूप घालून, त्याच्या दसपट दूध घालून त्यात काहीं मध, काहीं साखर घालून खात गेलें असतां उत्तम पुष्टि येईल.

॥ प्रयोग ८ ॥

मृतायस्त्रिफलायष्टिचूर्णं मधुघृतान्वितम् ।
दिनांते लेढि नित्यं सुरतौ चटकवद्भवेत् ॥ २९ ॥

लोहभस्म, त्रिफळा आणि जेष्ठमध याचें चूर्ण मध व तुपात घालून जो सूर्यास्ताच्या समयीं नित्य घेईल, तो मैथुनाच्या कामाविषयीं चिमण्याप्रमाणें होईल.

चिमण्याप्रमाणें म्हणजे चिमणी म्हणून एक लहान पाखरूं आहे, त्यावर जसा चिमणा एका काळींच दहा वीस वेळा उडतो, तसा हा पुरुषहि बहुत वेळा उठावण्या करणारा होईल.

ग्रीक वाङ्मयामध्यें बोकड, मेंढा, ससा, कबूतर व चिमणा (नर) हे सर्व प्राणी संभोगकार्यामध्यें अप्रतिम कौशल्य दाखविणारे असल्यामुळें ग्रीक मदनदेवता—'Aphrodite' हिचे अत्यंत आवडते आहेत. अखंड संभोगकार्य करणाऱ्या 'पुरुरवा' राजाला बोकडाचें रूपक दिलेलें, परस्त्रियाशीं नित्य व्यभिचारकर्म करणारा सुप्रसिद्ध 'इंद्र' त्याला मेंढ्याचा वृषण लावलेला (हल्ली डॉ. व्हनार्फ हे 'मर्कटग्रंथी' पुरुषाला लावतात हें सुप्रसिद्ध आहे), कपोताचें रूप घेऊन कपोतीशीं इंद्रानें केलेला संभोगविलास, या गोष्टी हिंदूंच्या पुराणग्रंथामध्येंहि आढळून येतात. बोकड व मेंढा यांचे वृषण वाजीकरण म्हणून शिजवून खाणें; कबुतर, चिमणी, मोर यांचीं अंडीं वाजीकरणार्थ सेवन करणें-हे वाजीकरण औषधिप्रयोग 'आयुर्वेद' ग्रंथांमध्यें दिलेले आहेत. 'चटकविलसित' नावाचा एक संभोगप्रकार **वात्स्यायन—कामसूत्रांतही** वर्णन केलेला आहे. जंगलामध्यें भूमींत एक प्रकारचे कंद असतात. हे कंद फक्त रानडुकरेंच नेमके शोधून काढून खातात. या कंदाना 'डुकरकंद' म्हणतात. या डुकरकंदाचें चूर्ण सतत तीन महिने रोज एकेक तोळा सेवन केल्यास रानडुकराप्रमाणें जोरानें मुसंडी मारून योनींत घुसण्याचें संभोग सामर्थ्य शिश्नामध्यें निर्माण होतें. याला वराहयोग म्हणतात.

## ॥ लिंग मोठें व जाड करणारे उपाय ॥

कामशास्त्रांमध्यें सौंदर्योपासना, स्तनोपासना, लिंगोपासना, योनि-उपासना, वीर्योपासना अशा पांच उपासना 'काम' पुरुषार्थाच्या सिद्धीसाठीं सांगितलेल्या आहेत. सौंदर्योपासनेमुळें आकर्षक शक्ति वाढते. स्तनाची उपासना केली असता शरीराला बांधेसूदपणा, मोहकपणा प्राप्त होतो. लिंगोपासनेमुळें लिंगाचें सामर्थ्य वाढून दीर्घकाल संभोग करता येतो, स्त्रियाना समाधान वाटते. वीर्योपासनेनें संभोगानंद संभोगसुख भरपूर मिळतें. संभोगानंदाचा साक्षात्कार होतो. प्रत्येक उपासनेमध्यें अशी ही एकेक अलौकिक शक्ति असते. या पाच शक्तींनीयुक्त स्त्री-पुरुष संभोगकार्यांत वैभवशाली होतात. त्याचें जीवन सुखी होतें.

लघुसूक्ष्मेण लिंगेन नैव तुष्यंति योषितः ।
अतस्तत्प्रीतये वक्ष्ये स्थूलीकरणमुत्तमम् ॥ ३० ॥

लहान व मिसमिशीत लिंग असलें तर मैथुनाच्या वेळीं स्त्रिया संतुष्ट होत नाहींत आणि त्यामुळें स्त्रियाची भ्रताराचर प्रीतिही बसत नाहीं. यास्तव स्त्रियांची प्रीति पतीवर बसण्यासाठीं प्रीतिसंपादक असा उत्तम उपाय लिंग स्थूल करणें हा होय. याचा उपाय कथन करितों.

'लिंग' किंवा 'इंद्रिय' हे शब्द अश्लील नसून ग्रीक वाङ्मयामध्यें पुढील वचन आढळतें. "Lingam as a mystical instrument of propagation, as the symbols of nature, life-producing and inexhaustibly fruitful, hence we must understand the term, not as a part of shame Awe and pious adoration of the incomprehensible secret of the power of propagation belonging to nature that ever renews itself of preservation of the human race, thus the Phallus becomes a religious symbol" The Phallus was the Greek name for the male member

पवित्र शपथविधि घेण्यासाठीं मोठ्या आदरानें पवित्र धार्मिक ग्रंथांवर हात ठेवण्याची पद्धत न्यायालयात रूढ आहे, त्याचप्रमाणें पुरुषानें आपल्या पवित्र शिश्नावर हात ठेवून शपथविधि घेण्याची पद्धत पूर्वकालीन कित्येक जातींमध्यें रूढ होती. (Genesis XXIV) हिंदु लोकांच्या 'श्रावणी'मध्येंही 'इति गुह्ये' असें म्हणून प्रत्येक जण आपापल्या शिश्नाला सर्वांसमक्ष हस्तस्पर्श करीत असतो. मग तो विवाहित असो अगर अविवाहित असो! संभोगकालीन ताठ झालेल्या शिश्नाला हस्तस्पर्श केल्याशिवाय व्यवस्थित संभोगक्रियेला आरंभ करणेंच अशक्य असतें; हा

अनुभव नित्याचाच आहे. यावरून शिश्नाचें पावित्र्य दिसून येतें. (या ठिकाणीं उपदंशासारख्या रोगानें सडलेलें शिश्न समजावयाचें नाहीं. कारण त्याचें पावित्र्य अगोदरच नष्ट झालेले असतें.)

## ॥ शिवलिंग पूजन रहस्य ॥

स्पर्शेंद्रिय, आनदेंद्रिय, जननेंद्रिय, गुह्येंद्रिय, उपस्थेंद्रिय, प्रजापति, वगैरे सज्ञा सस्कृत शास्त्रग्रंथामध्येंही आढळतात. 'शिवलिंगपूजन' हा धार्मिक विधि हिंदूच्या 'शिवरात्र' या धार्मिक उत्सवामध्यें प्रत्येक हिंदु स्त्री-पुरुष करीत असतो. शिवलिंगाची पालखींतून मिरवणूक राजरस्त्यानें काढून त्यात सर्व लहान थोर स्त्री-पुरुष उघडपणें भाग घेतात. 'लिंगपूजन' व त्याच्या मिरवणुकीचे उत्सव सर्व जगभर चालू आहेत. याला Phallus worship म्हणतात. हिंदूच्या शिवलिंगपूजनाच्या विधीमधील धार्मिक भावनेचें पटल बाजूला करून त्या विधीचें शास्त्रीय पद्धतीनें सूक्ष्म निरीक्षण करताना पुढील गोष्टी आमच्या अभ्यासामध्यें आढळून आल्या.

ज्याप्रमाणें, शस्त्रपूजन म्हणजे केवळ शस्त्रावर गंध, अक्षता, फुलें वाहून त्या शस्त्राला नमस्कार करणें असें नसून शस्त्र गंजणार नाहीं असें वासून पुसून स्वच्छ ठेवणें, शस्त्राची धार नित्य तीक्ष्ण राहील असें करणें, शस्त्राचें तेज व सामर्थ्य वाढेल अशा रीतीनें शस्त्राची सुधारणा करणें, वाटेल त्या वेळीं उपयोगी पडेल असें शस्त्र सुसज्ज ठेवणें, वगैरे सर्व विधींना खरें 'शस्त्रपूजन' म्हणता येईल. त्याचप्रमाणें 'लिंगपूजन'चा विचार केला पाहिजे. लिंग म्हणजे शिश्न हें सर्व प्रकारच्या लैंगिक रोगापासून म्हणजे उपदंश, गरमी, परमा वगैरे रोगापासून (Venereal-diseases) अलिप्त ठेवणें. Venereal हा शब्द Venus या शब्दापासून तयार झाला. Venus म्हणजे The beautiful Goddess of love and prostitution. शिश्नाचें आरोग्य व पावित्र्य संभाळण्यासाठीं तें पवित्र क्षेत्रीं ठेवावें. योनीला 'क्षेत्र' अशीही सज्ञा आहे. रोगग्रस्त दूषित योनीमध्यें शिश्न घालूं नये. लिंगाला 'पंचामृता'चें स्नान घालावें. हें स्नान कामोत्तेजक आहे. पंचामृतातील दूध, दहीं, लोणी, तूप, मध वगैरे पदार्थ पुष्टिकारक आहेत. विचित्रवीर्य राजाच्या स्त्रियामध्यें नियोगपद्धतीनें प्रजोत्पत्ति करण्यासाठीं भगवान् व्यासानीं आपले सर्वांगाला घृतानें मर्दन करून स्नान केलें, नतर त्यांनीं त्या स्त्रियाशीं सभोग केला ही माहिती महाभारतांत आहे. तैलयुक्त अभ्यंगस्नान हें उत्साहवर्धक असून कामोत्तेजक आहे असें आयुर्वेदाचेंही मत आहे. Cleanliness is next to godliness (Genital-cleanliness) अशी धार्मिक भावना 'स्नानशुद्धि' मध्यें आहेच. लिंगाचें संभोगसामर्थ्य कमी न होईल, लिंग वेगवान् व सामर्थ्यवान् नित्य राहील असा आहार (वाजीकरण) नित्य सेवन करणें, शिश्न आवश्यक प्रमाणात म्हणजे लाब, रुद, जाड व टणक असें करणें, वगैरे या सर्व लैंगिक क्रियाचें सूचक चिन्ह

'शिवलिंगपूजन' होय! त्याचप्रमाणें शाक्तांच्या योनिपूजनाचेंही समजावें. एकंदरींत, शिश्नबहाद्दर पुरुषानें आपलें शिश्न संभोगाचे वेळीं आपल्या नायकोचें पूर्ण समाधान करणारें होईल असें संभोगक्षम करणें हें शिवलिंगपूजन विधीचें खरें रहस्य आहे. असें करण्यामध्यें अश्लील असे काहीही नाहीं हें स्पष्ट दर्शविण्यासाठीं शिवलिंगाची पूजा करुन राजरस्त्यावरून मिरवणूक काढतात.

ज्या वेळीं शिश्न थंड आणि चैतन्यहीन असतें किंवा ताठ होत नाहीं, त्यावेळीं त्या शिश्नाला Penis असें म्हणतात. ज्या वेळीं शिश्नामध्यें चैतन्यशक्ति सचरून तें शिश्न टणक, जाड व ताठ होऊन सभोगाला उद्युक्त करतें, त्या वेळीं त्या चैतन्ययुक्त ताठ शिश्नाला Phallus असें म्हणतात. लिंगपूजेला Phallus-Worship असें म्हणतात. Penis-Worship असें म्हणत नाहींत. जगामध्यें जी लिंगपूजा होते ती जाड, ताठ, टणक आणि संभोगाला उद्युक्त करणाऱ्या शिश्नाचीच होत असते. शिश्न ताठ होऊन संभोगोत्सुक स्त्रीच्या योनींत ते शिश्न जोरानें घुसण्यासाठीं अत्यंत उतावीळ होणें हें पुरुषत्वाचें लक्षणच होय. 'काम' पुरुषार्थाची सिद्धि यशस्वीपणें प्राप्त होणें सर्वस्वी ताठ–जाड–कठीण अशाच शिश्नावर अवलंबून असते. संभोगाचे वेळीं जें शिश्न ताठ होत नाहीं अशा पौरुषहीन पुरुषाला विलासी स्त्रिया 'षंढ' म्हणून त्याचा अपमान व तिरस्कार करतात. त्यामुळें 'आपण 'षंढ' झालों, दुबळे बनलों, आतां आपलें मानवी जीवन निष्फल झालें, आता जगण्यात काय अर्थ आहे?' असें सर्वत्र निराशामय त्या पुरुषाला वाटूं लागतें. संभोगसमयीं, सभोगोत्सुक स्त्रीचा योनिकुंड (योनींत शिश्न शिरत असतांना) शमवून तिच्या शरिरामध्यें आनंदाच्या लहरी उसळवून, स्त्रीला प्रेमजीवन आणि संभोगसुख याचा साक्षात्कार घडवून देण्यास समर्थ अशा जाड–ताठ–टणक आणि चेतनायुक्त शिश्नाचीच सर्व जग पूजा करितें, त्यावरच स्त्रिया आसक्त होऊन प्रेम करतात हा भावार्थ! ग्रीक वाङ्मयांत सुद्धा, ताठ–जाड–टणक शिश्नाला विलासी स्त्रियाचा 'प्रेममित्र' अशी संज्ञा दिलेली आढळते. अशा प्रेममित्राचा चुंबनानें त्या स्त्रिया सन्मान् करतात. शिवलिंगपूजनाचें रहस्य समजून घेणाऱ्या अभ्यासू वाचकाना Penis and Phallus या दोन शब्दानें सूचित होणारा रहस्यमय अर्थ आता सहजच समजून येईल. धर्म आणि तदनुरूप भावना, शास्त्र आणि तदनुरूप व्यवहार असे या उभयतांचे परस्परानुकूल संबध हिंदु पंडितानीं जोडलेले आहेत.

पूर्वी देवळांमध्यें हजारों देवदासी कन्या असत. त्याचा सामुदायिक कौमार्यभंगाचा विधि करण्यासाठीं दगडी शिश्नाचा उपयोग तेथील धर्मगुरु करीत असत. देवळातील हा धार्मिक विधि हें 'पूजन' होय. 'दगडी–शिश्न' हें शिवलिंग (Erect-penis) होय. हा विधि ज्या विशिष्ट दिवशीं धर्मगुरु करितात, तो विशिष्ट दिवस 'शिवरात्र' होय; कौमार्यभग विधि करण्यासाठीं जीं जीं दगडी शिश्नें उपयोगात आणावयाचीं तीं तीं दगडी शिश्नें प्रथम पंचामृतानें चोपडून नंतर धुऊन पुसून स्वच्छ करितात. तें

अनुक्रम. ७८.८.३२ दि: ७५७२८८ बो: दि: ३१-३-०२

शिवलिंगाचें पंचामृत स्नान होय. असेंही आमच्या अभ्यासात आढळलेलें आहे कीं, 'मोहोनजादारो' येथें प्राचीन कालचीं जीं शिवलिंगें सापडलीं आहेत, तीं दगडी शिश्नासारखींच आहेत. अनेक राजे लोकाना इच्छित पुत्रप्राप्तीचे वर शंकराचीच म्हणजे शिवलिंगाचीच कडक तपश्चर्या करून मिळाल्याचीं उदाहरणें पुराणग्रंथात आढळतात. श्रीशंकराची पूजा शिवलिंग स्वरुपात जास्त फलप्रद असते. (महाभारत द्रोणपर्व अ. २०२) शिव म्हणजे दाह. लिंग म्हणजे चिन्ह. पुरुषाचे शरीरांत कामवासनेचा सवार जोरानें झाला कीं, त्या पुरुषाचें लिंग ताठ होऊन तें खालीं-वर होत असते. त्यावेळीं संभोगकार्य झालें तर ते लिंग शांत होतें. संभोगकार्य झालें नाहीं तर त्या पुरुषाच्या देहाचा सारखा दाह होत असतो. दाह करणारें ताठ लिंग तें शिवलिंग. (The loveable form of the God 'Hermes' (हर = शंकर) is also influenced by erotic ideas) पुरुषाचें उत्तम व श्रेष्ठ लिंग म्हणजे लांब, रुंद, जाड आणि चांगलें टणक शिश्न असलें म्हणजे त्यावर स्त्रियांचे प्रेम बसते व पुत्रप्राप्ति होते. कारण दांपत्याच्या प्रेमावरच सुप्रजोत्पत्ति अवलंबून असते. म्हणून कल्याणमल्ल येथें प्रीतिसंपादक असा हा उपाय सांगत आहेत. दगडी शिश्नाना ग्रीक वाङ्मयामध्यें olisbos म्हणतात. इंग्रजीमध्यें selfsatisfier, संस्कृतमध्यें 'अपद्रव्याणि', व साधुवर्य एकनाथ महाराज 'मायिक शिश्न' म्हणतात.

ऐशिया योषिता नेणें किति । परस्परें आलिंगती ॥
परस्परें कुच मर्दिती । मुख चुंबति परस्परें ॥
गाढ देति आलिंगन । तरी रति नव्हे समाधान ॥
मग करिती अन्योन्य । सावधान अवधारा ॥
भक्षिति उन्माद अन्न । करिती उन्माद प्राशन ॥
तेणें स्त्रिया अन्योन्य । रतिरमण तें ऐका ॥

"करोनिया मायिक शिश्न। त्याचें कटीं पुष्टीं बंधन। येरयेराचे धरुनि चरण करिती मैथुन परस्परें ॥" एक स्त्री 'मायिक शिश्न' आपल्या कमरेला बांधून पुरुषाप्रमाणें दुसऱ्या स्त्रीवर चढून तिची कामवासना पुरी करते असें हें रावणाचे अन्तःपुरातील विलासी स्त्रियांचें वर्णन भावार्थ रामायणामध्यें एकनाथांनीं केलें आहे. विलासी राजेलोकांच्या अन्तःपुरातील रंगेल बनलेल्या कामविलासी स्त्रिया मायिक शिश्नाला Wife's friend असें एकमेकींना सांगतात, कारण, कामविलासी स्त्रियांच्या चित्तरंजनाचें कार्य हें मायिक शिश्न उत्तम प्रकारचें करतें. जो ब्राह्मण स्त्रीचित्तरंजनार्थ लाकडी मायिक शिश्नाचा (काष्ठलिंग) उपयोग करतो, त्याला श्राद्ध पक्षाला निमंत्रण देऊं नये असें "श्राद्धकल्पसूत्र" पोथीमध्यें सांगितलेलें आहे. उद्योगधंद्यानिमित्त पति दीर्घकाल परदेशांत गेला असतां पतिनिष्ठ स्त्री व्यभिचार कर्म

न करितां लाकडी माथिक शिश्नावर पतीची मूर्ति कोरून तें माथिक शिश्न पतीचेंच आहे असें समजून आपल्या योनींत घालतें, आणि त्यापासून ती स्त्री कृत्रिम संभोग-सुख प्राप्त करून घेत असे. असें अतिप्राचीन कालच्या हिंदु आणि ग्रीक वाङ्मयावरून आढळून येतें. दगडी शिश्नानें केल्या जाणाऱ्या देवदासींच्या कौमार्यभंगविधीला Artificial defloration म्हणतात. शाक्तांच्या 'नित्योत्सव' या ग्रंथात स्पष्ट सांगितलें आहे की, "प्रेम बसलेल्या स्त्रीच्या योनीचा आस्वाद पुरुष लिंगानें चाखल्याशिवाय त्याला आत्मशांति प्राप्त होत नाहीं." असें हें शिश्नबहाद्दराच्या शिश्न-प्रतापाचें व शिश्नलीलांचे शिश्नमहात्म्य आहे; तें भाविकांनीं श्रद्धेनें व शास्त्रज्ञांनीं शास्त्रीय चिकित्सेनें श्रवण करावें. याला लिंगोपासना ऊर्फ लिंगपूजन म्हणतात.

॥ प्रयोग १ ॥

बलानागबलाकुष्ठं वचाद्विरदपिप्पली ।
वाजिगंधाहयरिपुरिति सर्वं समांशकम् ॥ ३१ ॥
संचूर्ण्य नवनीतेन लिंगलेपो विधीयते ।
मुहुर्तादतिसूक्ष्मं च वाजीलिंगसमं भवेत् ॥ ३२ ॥

चिकणा, लेचा, कोष्ट, वेखंड, गजपिंपळी, आस्कंदाच्या काड्या आणि कण्हेरीचें मूळ, हीं सगळीं समभाग कुटून लोण्यांत खलून लिंगाला लेप करावा. मध्यें दोन घटका गेल्यावर लिंग बारीक असलें तरी मोठें होऊन घोड्याचे शिश्नाप्रमाणें टणक होईल. (हा प्रयोग सतत सहा महिने केल्यानंतर अनुभव येतो).

तामीळ भाषेंतील कामशास्त्र ग्रंथात शिश्न मोठें व जाड करण्याचा 'गर्दभयोग' पुढीलप्रमाणें सांगितला आहे. मस्तींत आलेल्या तरुण गर्दभाचें शिश्न ताठ झालें असता त्याचें अंडाला (वृषणाला) तीन जळवा लावाव्यात. त्या जळवा रक्त पिऊन फुगल्यावर त्याचा काळ्या तिळाचे शुद्ध तेलात खलबत्त्यानें चांगले एकजीव खलून तें मिश्रण बाटलींत भरावें. तीन महिने तें मिश्रण शिश्नावर रोज मर्दन करावें. शिश्न गर्दभ समान् होईल.

॥ प्रयोग २ ॥

जातीरसशिलापुष्टघोषाटंकणचूर्णकैः ।
तिलतैलयुतैर्लेपाल्लिंगवृद्धिः प्रजायते ॥ ३३ ॥

रक्त्याबोळ, मनशीळ, कोष्ट, शोप आणि टाकणखार याचें चूर्ण समभाग तिळाच्या तेलात खलून लिंगाला लेप करावा म्हणजे लिंग वृद्धिंगत होतें.

॥ प्रयोग ३ ॥

सैंधवं मरिचं कुष्टं बृहतीखरमंजरीम् ।
हयगंधायवामाषाः पिप्पलीगौरसर्षपाः ॥
तिलाश्वेतानि संपिष्य मधुनोद्वर्तनं बुधः ।
प्रयोजयेत्कर्णपालीं स्तनलिंगविवर्धनम् ॥ ३४ ॥

सैंधव, मिरें, कोष्ठ, रिंगणीमूळ, आघाड्याचे केसर, आस्कदाच्या कांड्या; सातू, उडीद, पिंपळी, गौरवर्ण शिरस आणि तीळ हीं समभाग कुटून मधात खलून योनीचे कर्णपालीस उद्वर्तन करावें म्हणजे स्तन आणि लिंग वृद्धिंगत होतील.

ढिले झालेले, खाली पडलेले, नरम झालेले स्त्रियाचे स्तन वर उचलून ताठ दिसावेत म्हणून चहाच्या कपासारख्या निरनिराळ्या आकारांच्या रबरी वाट्या मिळतात, त्या रबरी वाट्यांच्या खोलगट भागांत स्त्रियांनी आपले स्तन ठेवून वरती चोळी घट्ट बाधावी म्हणजे संभोगाचे वेळीं ते रबरी स्तन पुरुषानें हातांत धरले असता कुमारीप्रमाणें ते स्तन घट्ट-तंग लागतील. कितीही जोरानें पुरुषानें ते रबरी स्तन आंवळले तरी स्त्रीला मुळीच त्रास होणार नाहीं. चहाचा कपाचा आकार स्त्रियाच्या स्तनासारखाच असतो. तसेंच, पुरुषाचें शिश्न जरी ताठ झालें तरी तें बारीक आणि आंखूडच असतें त्या पुरुषानें रबरी टोपणें जाड, कठीण आणि लांब मिळतात तें टोपण आखूड शिश्नावर चढवावें, जसें युद्धप्रसंगीं लोखंडी चिलखत शूर योद्धा आपले अंगावर चढवितो; तसें संभोगसमयीं हें रबरी चिलखत आखूड शिश्नावर चढवावें म्हणजे रबरी चिलखत चढवून जाड-कठीण मोठे लांब बनलेलें तें शिश्न स्त्रीची कामवासना तृप्त करील. असे हें कृत्रिम उपाय आहेत. आंखूड बारीक केंसासाठीं स्त्रिया गंगावन वापरतात, तसेंच आखूड शिश्नासाठीं रबरी चिलखत वापरतात.

॥ प्रयोग ४ ॥

भल्लातं कृष्णलवणं नलिनीदलमेवच ।
दग्ध्वा तद्भस्मं बृहतीफलजेनांभसा सह ॥ ३५ ॥
महिषीगोमयैः पूर्वघृष्टलिंगे विलेपयेत् ।
तत्क्षणान्मुसलाकार दृढं चैव भवेदलम् ॥ ३६ ॥

बिब्बे, पादेलोण अथवा कोष्ठ आणि कमळाचीं पानें हीं एकत्र जाळून ती राख रिंगणीच्या फळांच्या रसांत भिजवावी आणि प्रथम लिंग महिषीच्या

शेणानें मर्दून त्यावर तें भस्म लावावें. असें केलें असता तत्काल लिंग मोठें जाड होऊन मुसळाप्रमाणें टणक होते. सर्व प्रयोगापेक्षां हा प्रयोग फार चांगला गुणकारी आहे असें समजावें. (वैद्याच्या सल्लयानें हा प्रयोग करावा.)

गृहस्थाश्रमी प्रत्येक पुरुषाला हें माहित असतें कीं, 'मुसळ' ही एक गृहोपयोगी वस्तु आहे. मुसळानें उखळामध्यें तांदूळ सडले असता तांदुळातील कोंडा निराळा होऊन पांढरे शुभ्र झालेले तांदूळ प्राप्त होतात. उखळाच्या आंत–बाहेर किंवा वर–खालीं होणाऱ्या मुसळाच्या हालचालीनें ते तांदूळ पांढरे शुभ्र होतात. त्या प्रसंगीं उखळ हें स्थिर असतें; पण मुसळ मात्र उखळाच्या आत–बाहेर किंवा वर–खालीं होत असतें; उखळ = योनी. मुसळ = लांब आणि ताठ टणक झालेलें शिश्न. संभोगाचे वेळीं योनि उखळाप्रमाणें स्थिर असते, पण ताठ शिश्नाची योनीच्या आत–बाहेर मुसळा-प्रमाणें हालचाल होत असते. या हालचालीच्या घर्षणानें गृहस्थाश्रमी स्त्रीपुरुषांना शुद्ध प्रेमाची प्राप्ति होते हा भावार्थ 'मुसळ' या शब्दानें दर्शविला जातो. वांगे, कांकडी, कारलें, भेंडा, रताळे, मुळा, केळें हीं सर्व ताठ शिश्नदर्शकच होत.

॥ प्रयोग ५ ॥

लोध्रकासीसमातंगवलाकल्कैस्तिलोद्भवम् ।
तैलं संसाधितं लिंगयोनिकर्णविवर्धनम् ॥ ३७ ॥

लोध्र, हिराकस, गजपिंपळी, चिकणा यांनीं तिळाचें तेल सिद्ध करून लिंगास आणि योनीस लाविलें असता लिंग व योनीचे कर्ण हें वृद्धिंगत होतात.

॥ प्रयोग ६ ॥

बृहतीफलभल्लातदाडिमीफलवल्कलैः ।
साधितं कटुतैलं च मर्दनं लिंगवर्धनम् ॥ ३८ ॥

डोरलीचीं फळें, बिब्बे, डाळिंबीचे फळाची साल, यानीं साधित जें कडू तेल याच्या मर्दनानेंही लिंग वाढतें.

ताठ झालेलें शिश्न आणि योनि याच्या संभोगामुळेंच स्त्री-पुरुषाना संभोगकार्य उत्तम प्रकारें करतां येऊन 'काम' पुरुषार्थ प्राप्त करून घेतो; म्हणून हीं दोन्हीं गुह्येंद्रियें चांगल्या प्रकारें संभोगक्षम होतील अशीं औषधें येथें सांगितलीं आहेत. औषधानीं साधलें नाहीं; तर कृत्रिम रबरी साधनाचा उपयोग करावा आणि 'काम' पुरुषार्थ साधावा.

## ॥ योनिसंकोचन (योनिउपासना) ॥

योनिसंकोचन म्हणजे योनीच्या भोंवतालचें मांस फुगवून योनीचें छिद्र बारीक करणें. तें छिद्र बारीक झालें असता योनि सैल झालेली असली तरी कुमारीप्रमाणें घट्ट होईल.

## ॥ योनिसंकोचनाचा उपयोग ॥

**प्रौढानवप्रसूतानां श्लथं गुह्यं न रोचते ।**
**यूनामतस्तत्संकोचे विधिः संक्षेपतो ब्रुवे ॥ ३९ ॥**

स्त्रिया वयानें मोठ्या प्रौढ झाल्या असता अथवा बाळंत झाल्या असता त्यांची योनि विस्तृत होते म्हणजे योनीचें छिद्र मोठें होऊन त्यामुळें संभोगाच्या काळीं अतिशय सैल वाटतें. यास्तव तरुण पुरुषास अशी ढिली व पोकळ झालेली योनि संभोगकार्यास आवडत नाहीं; तेथें प्रेम उत्पन्न होत नाहीं म्हणून हें संक्षेपेंकरून योनिसंकोचन लोकोपकारार्थ प्रकट करितों.

## ॥ योनिसंकोचनाचें रहस्य ॥

'तेथें प्रेम उत्पन्न होत नाहीं' या लहानशा वाक्यात मोठें गूढ रहस्य आहे. तें असें :—विलाप करीत असता (शोक) आर्तस्वराच्या ध्वनीचे अनेक आघात हृदयावर झाले असतां तेथें 'करुण' रसाचें वातावरण उत्पन्न होऊन हृदय द्रवतें. तसेंच संभोगकार्य करीत असता ताठर झालेल्या वेगवान लिंगाचे अनेक आघात योनिछिद्रावर झाले असता तेथें 'प्रेम–प्रीति' रसाचें वातावरण निर्माण होऊन योनि द्रवते. हा 'प्रेम-प्रीति' रस उत्पन्न झाला म्हणजेच परस्परांची मनें परस्परांमध्यें रममाण होऊन अगदीं एकजीव होतात. वासराच्या दर्शनानें गाईला प्रेमाचा पान्हा फुटून वात्सल्यप्रेम दिसून येतें. त्याचप्रमाणें संभोगाचे वेळीं योनिछिद्रावर लिंगाचे विविध प्रकारचे अनेक आघात करण्यात लिंगकौशल्य व लिंगचापल्य दाखविणाऱ्या आपल्या कामशास्त्रज्ञ पतीचें दर्शन होताच तिच्या योनीच्या ठायीं 'प्रेम' रसाचा पाझर फुटूं लागतो. या प्रेमरसाचा अनुभव गुह्येंद्रियांचे स्पर्शद्वाराच होणाऱ्या संभोगानें त्यांना मिळतो. व जन्मोजन्मीं "हाच नवरा मला मिळो" असें तिच्या हृदयात स्फुरतें. प्रेम उत्पन्न करणारें योनिछिद्र हें स्त्रियांचें एक मर्मस्थान आहे.

योनिछिद्र अतिशय मोठें व पोकळ झालेलें असेल तर योनीला पुष्कळच सैलपणा येऊन संभोगाचे वेळीं त्यावर लिंगाचे आघात चांगले होत नाहींत. मग 'प्रेमरसा'चें वातावरणही निर्माण होणार नाहीं. कुमारी स्त्रीची योनि घट्ट आणि आंवळ असते. अशी घट्ट–आवळ योनि संभोगाचे वेळीं तरुणांना फारच आनंददायक वाटते. योनि

घट्ट आणि आवळ करण्याचीं औषधें स्त्रियांना माहीत असलीं म्हणजे त्या स्त्रिया औषधानीं रोजच्या रोज सैल व पोकळ झालेली आपली योनि घट्ट–आवळ करून आपल्या नवऱ्यांना संभोगाचे वेळीं उत्कट आनंद आणि प्रेम प्राप्त करून देतात. या आनंदाच्या जोरावरच त्या स्त्रिया आपल्या नवऱ्याचें प्रेम जिंकून त्याला आपल्या पूर्ण ताब्यांत ठेवतात. नवरासुद्धां आपल्या बायकोशिवाय इतर परस्त्री पहात नाहीं. स्त्रीचें यौवन व सौंदर्य तिच्या घट्ट आणि पुष्ट स्तनांमध्यें जसें असतें, तसेंच स्त्रीचें सारें सौभाग्य-ऐश्वर्य वैभव तिच्या घट्ट व आंवळ योनीमध्यें असतें. म्हणून तिला "सुभगा" असें म्हणतात. जिची योनि अत्यंत सैल, योनीचा आंतील भाग अतिशयच पोकळ, अगदींच ढिली झालेली, ज्यामुळें संभोगामध्यें स्पर्शसुखाचा रस (आनंद-प्रेम) मुळींच उत्पन्न होत नाहीं अशा स्त्रीला "दुर्भगा" म्हणतात. ज्या योनीशीं केलेला संभोग कल्याणकारक, आनंददायक, सुखावह, प्रेमोत्पादक असा होतो, त्या योनीला स्वस्तिक चिन्हांकित योनि म्हणतात. म्हणून प्रेम आणि आनंद उत्पन्न करणारे 'योनि–संकोचना'चे उपाय कल्याणमल्ल येथे सांगत आहेत.

॥ प्रयोग १ ॥

सनालं कमलं पिष्ट्वा पयसा कारयेद्वटी ।
तां निधाय क्षणं योनौ वृद्धापि स्यात्कुमारिका ॥ ४० ॥

देंठासुद्धा कमळ दुधात वाटून त्याची गोळी करून योनींत घालीत गेलें असता क्षणमात्रें करून वृद्ध स्त्रीची योनि कुमारीप्रमाणें घट्ट होईल.

॥ प्रयोग २ ॥

देवदारुनिशायुग्मसरसीरुहकेसरैः ।
संलिप्तं मदनच्छत्रं संकोचं परमं भवेत् ॥ ४१ ॥

देवदारूची साल, हळद, दारुहळद आणि कमळाचे केसर हीं सर्व एकत्र वाटून मदन छत्राला लेप करीत गेलें असता फार बारीक होईल. मदनछत्र = योनि.

॥ प्रयोग ३ ॥

लिप्त्वा पिकाख्यबीजैश्च वारिपिष्टैः स्मरालयम् ।
नियमेन परं गाढं वरांगं लभतेऽगना ॥ ४२ ॥

तालिमखान्याच्या बीजाच्या रसांत तालिमखान्याचेच बीजाचें पिष्ट कालवून योनीला आतून व बाहेरून जी स्त्री लेप करीत जाईल, तिची योनि खचितपणें चांगली घट्ट होईल.

॥ प्रयोग ४ ॥

त्रिफलाधातकीपुष्पजंबूत्वक्सावरैः समम् ।
सक्षौद्रैर्लिप्तगुह्या च कन्येव जरठी भवेत् ॥ ४२ ॥

त्रिफळा, धायटीचीं फुलें आणि जांभळीची व सावरीची अंतर्साल हीं चार समभाग मधात वांटून योनीला जी स्त्री लेप करीत जाईल, ती जरी वृद्ध असली तरी कुमारीप्रमाणें तिची योनि घट्ट आवळ होईल असें समजावें.

॥ कुमारी योनीचें महत्त्व ॥

वृद्ध स्त्रीची योनि कुमारीप्रमाणें घट्ट–आवळ होईल असें या प्रयोगाचें फल येथें सांगितलेलें आहे. कुमारी योनीमध्यें अशी एक अजब शक्ति असते कीं, त्या योनीमध्यें घुसलेलें ताठ शिश्न ती योनि रबराप्रमाणें अगदी–घट्ट–आवळून धरते. त्या योगें त्या योनीच्या आंतील भागाचा नाजूक स्पर्श त्या शिश्नाला सर्व बाजूंनीं होतो. हाच नाजूक स्पर्श पुरुषाच्या सर्व शरिरात आनदाच्या लहरी उसळवून त्या पुरुषाला हें जगहि विसरावयास लावतो. कुमारी योनीमध्यें असलेली ही अजब शक्ति (elasticpower) वृद्ध स्त्रीच्या ढिल्या–सैल व पोकळ झालेल्या योनीमध्यें नसते. यास्तव, नष्ट झालेली शक्ति पुन्हां उत्पन्न करण्यासाठीं हे प्रयोग येथें सांगितलेले आहेत. योनीला सैलपणा प्राप्त झाला कीं स्त्रीच्या सर्व शरीराला सैलपणा प्राप्त होऊन शरिराचें रमणीयत्व आणि डौल्दारपणा नष्ट होतो. घट्ट–आवळ योनि असणें हें स्त्रीचें गुप्त ऐश्वर्य आहे. कुमारी योनीमध्यें साक्षात् मदन रहात असतो, त्यामुळें मदनयुक्त कुमारी योनीचें आकर्षण आणि मोहकपणा विलक्षण असतो, असें अलंकारिक भाषेंत वर्णन केलेलें आढळतें. "Cupid's nest and its charms" असें एक मोहक भाषेंत विवेचन केलेलें सुंदर आणि मनोरंजक प्रकरणहि पाश्चात्य कामशास्त्रामध्यें आढळतें. धर्म व्यवहारामध्यें विवाह-संस्कारांत कुमारी योनीचें महत्त्व, आदर, रक्षण आणि मान जितका पवित्र समजला जातो, तितकाच मान अर्थव्यवहारामध्येंहि आढळतो. अहोरात्र अर्थचिंतन करण्यात गढून गेलेला कंजूष धनपतिहि कुमारी योनीचें संभोग-सुख प्राप्त होण्यासाठीं कुमारीच्या भारभार सुवर्ण देतांना आढळतो. कुमारी योनीच्या पुढें कंजूष धनपतिहि प्राणाहून प्रिय असलेलें सुवर्णसुद्धां तुच्छ लेखतो. इतका प्रबल मोह कुमारी योनीचे ठायीं असतो. 'स्मरदीपिका' ग्रंथामध्यें लिहिलें आहे कीं, जी पूर्णपणें वयांत येऊन कोणींहि भोगलेली नाहीं, अशा नवीन नवीन कुमारीशीं पुरुषानें नित्य संभोग केल्यास नवचैतन्य उत्पन्न होऊन मानसिक वैभव लाभतें व बुद्धि तरतरीत होते. धर्मगुरु, श्रीमत, राजे, राजप्रतिनिधि हे विश्रांतीचेवेळीं गुप्तागुप्तीची अनेक गुप्त राजकारस्थानें केल्यामुळें मनाला आणि बुद्धीला आलेली मानसिक-बौद्धिक व्यग्रता नष्ट व्हावी म्हणून मद्यपानाबरोबरच देवळातील अनेक

कुमारी देवदासींचा उपभोग याचसाठीं घेत असतात. देवदासींवर सत्ता जशी राजाची असते, तशी धर्मगुरुचीहि सत्ता असते. धर्मगुरुवर 'ब्रह्मचर्य' लादलेलें असतें, तें फक्त लोकाना दाखविण्यापुरतें शाब्दिक असतें. भोळ्या-भाविक लोकाना तें खरें वाटतें, राजाप्रमाणें देवदासींचा उपभोग धर्मगुरु गुप्तपणें केव्हाहि घेऊं शकतो. धनिक हे धनाच्या जोरावर उपभोग घेऊ शकतात.

अशा प्रकारें कलावान्-कान्तीयुक्त शोभायमान् असलेलें देवदासीरूपी स्त्रीधन 'काम' व्यवहारासाठीं उपयोगी पडावें म्हणून हें स्त्रीधन देवाच्या नावावर आणि देवळाच्या उत्पन्नावर रक्षण करून पोसलें जातें. धर्मव्यवहार, अर्थव्यवहार आणि कामव्यवहार यामध्यें कुमारी योनीचें महत्त्व जितके मानले जातें, तितकें महत्त्व 'मोक्ष' व्यवहारामध्यें मानीत नाहींत; उलट मूत्रोत्सर्गाचें घाणीचें स्थान सम्बोधून योनीची निंदाच केलेली आढळते. पण लोकव्यवहार या निंदेकडे लक्षच देत नाहीं, असें सर्वत्र दिसून येते.

॥ प्रयोग ५ ॥

कटुतुंबीभवैर्बीजैः सलोध्रैः स्मरमंदिरम् ।
लिप्तं (लिप्त्वा) नवप्रसूतापि ध्रुवं कन्येव जायते ॥ ४४ ॥

कडू भोपळीचें बीज आणि लोध्र, हीं वाटून योनीला लेप केला असतां, बाळंत-पणामुळें आलेला योनीचा पोकळपणा जाऊन घट्टपणा येईल असें समजावें.

॥ प्रयोग ६ ॥

वाजिगंधावलाव्योपनिशेंदीवरकुष्ठकैः ।
तोयपिष्टैः स्मरागारं लिप्तं गाढतरं भवेत् ॥ ४५ ॥

आस्कदाच्या काड्या, चिकणा, ओंवा, दारुहळद, निळें कमळ, कोष्ठ वाळा, याचे समभागाचें पीठ करून योनि लिप्त करीत गेलें असता ती अत्यंत घट्ट होईल.

॥ प्रयोग ७ ॥

मधूककाष्ठसारेण श्लक्ष्णेन मधुना सह ।
वरांगं पूरितं यत्नादत्यंतं दृढतां व्रजेत् ॥ ४६ ॥

मोहाचे लाकडाचा खार चांगला घेऊन आत मध घालून कालवावा आणि त्यानें योनि अगदीं भरून पूर्ण करावी; असें करीत गेलें असतां योनीला फारच घट्टपणा येईल.

'वेश्या' स्त्रिया तरुण व सुंदर दिसण्यासाठीं तारुण्याचे कृत्रिम नखरे करून आपल्या गिऱ्हाइकास कशा फसवितात, त्यापैकीं काहीं प्रकार आम्ही सागतों. म्हणजे कोणी फसणार नाहीं.

वेश्या स्त्रिया आपली योनि तुरटीच्या पाण्यानें दिवसांतून अनेक वेळा आतल्या बाजूनें चागली धुतात. त्यायोगें योनि घट्ट होते. नंतर संभोगापूर्वी थोडा वेळ अगोदर त्या आपल्या योनीमध्यें पूर्णपणें रक्त प्यालेली जळू ठेवून देतात. नंतर ती वेश्या गिऱ्हाइकाला सागते कीं, 'माझ्याशीं अजून कोणाचाही संभोग झालेला नाहीं. अगदीं प्रथमच तुमच्याशीं संभोग होणार आहे. मी अगदीं कोरी आहे.' गिऱ्हाइकाला हें सर्व खरेंच वाटतें; संभोगाचे वेळीं योनि कृत्रिमतेनें घट्ट केली असल्यामुळें त्याला आपलें शिश्न त्या घट्ट झालेल्या योनीमध्यें घालण्यास जोर करावा लागतो; त्यायोगें योनीमध्यें ठेवलेली जळू फुटते व ती प्यालेलें रक्त बाहेर येतें; गिऱ्हाइकाला वाटतें कीं, योनींतील पडदा फाटून रक्त बाहेर आलें आहे; तेव्हा ही कुमारी असून हिच्याशीं प्रथम संभोग आपलाच झालेला आहे. अशा समजुतीनें तो त्या वेश्येला भरपूर द्रव्य देतो. वास्तविक खरी स्थिति तशी नसते. काहीं वेश्या गिऱ्हाईकासह मद्यपान केल्यानतर संभोग कार्यास आरंभ करण्याचे वेळीं ती वेश्या आपल्या हाताला मेणमिश्रित एरंडेल तेलाचे तयार केलेले मलम चोळते. नंतर त्या हाताचे मुठींत गिऱ्हाईकाचें ताठ झालेलें शिश्न धरून आपल्या योनीला केवळ स्पर्श होईल अशा रीतीने मोठ्या खुबीनें आपल्या योनीवर ठेवते. योनीच्या आत तें शिश्न घालू देत नाहीं. वेश्येच्या हाताला तें मलम चोळलेलें असल्यामुळें त्या हाताला योनीच्या आंतील भागास जशी स्निग्धता असते, तशी स्निग्धता त्या हाताला आलेली असते. त्यायोगें, हाताच्या मुठींत धरलेलें तें शिश्न योनींतच गेलेलें आहे असें वाटतें, तें मुठीत धरलेलें शिश्न वेश्या आपले हातानें हालवून हालवून गिऱ्हाइकाचें वीर्यस्खलन करविते. वीरभद्रदेव विरचित 'कंदर्पचूडामणि' या ग्रंथात ही वेश्याकला सांगितलेली आहे. ती वेश्या उलट त्या गिऱ्हाइकालाच कृत्रिम प्रेमात येऊन म्हणते वाहवा तुमचें संभोगकौशल्य किती उत्तम! तुमचें ताठ शिश्न माझे योनींत केव्हां जातें व बाहेर केव्हा येतें, हें मला मुळींच समजत नसे. या वेश्याकला म्हणजे जें मुळातच नसतें, त्याचें अस्तित्व पूर्णपणें बेमालूम भासविणें हें वेश्याव्यवसायांतील एक अप्रतिम कौशल्यच आहे. तें कौशल्य सर्वच वेश्याना साधत नसतें. याला 'वेश्याकला' म्हणतात. वेश्येचें तारुण्य, सौंदर्य, हासणें, बोलणें आणि प्रेम हीं सर्वच कृत्रिम असतात. जळू पूर्णपणें रक्त प्यालेली असली म्हणजे योनीमध्यें स्वस्थ पडून रहाते. हालचाल करीत नाही. प्राचीन कालीं, राजपुत्रांना ज्या अनेक विद्या आणि कला यांचें खास शिक्षण देत असत, त्यांमध्यें वेश्यांची कपटविद्या आणि वेश्या-व्यवसायांची कला याचेंहि सर्वांगीण शिक्षण राजपुत्राला सप्रयोग देत असत. त्यामुळें. राजपुत्राचा वेश्याशी जरी संबंध आला तरी ते कपटकलापटु राजपुत्र फसत नसत.

## ॥ योनिसंस्कार ॥

आतां योनीचा एक सस्कार आहे तो सागतों, सस्कार म्हणजे दुर्गुण काढून सद्‌गुण आणणारीं कृत्यें. (दोष नष्ट करून योनि निर्दोष करणें असा सस्कार.)

### ॥ योनीला सुगध येण्याविषयीं ॥

### ॥ प्रयोग १ ॥

**लघ्वग्नौ सार्षपं तैलं जातिपुष्पैः प्रसाधयेत् ।**
**नारीगुह्यं तदभ्यंगात्सुगंधिः सुरते भवेत् ॥ ४७ ॥**

शिरसेल तेलावर मदाग्नीच्या योगेंकरून जाईच्या फुलांचा सुवास ओढून घ्यावा, मग ते जायेल योनीला मर्दनें करून लावीत जावें, म्हणजे गुह्य सुवासिक होईल आणि मैथुनाचें काळींही दुर्गंध सुटणार नाही. (केवड्याचें अगर मोगऱ्याचें तेलही असेंच तयार करावें.)

सभोगाचे वेळीं योनीला दुर्गंध येत असला तर मन उदासीन होतें. मन उदास झालें म्हणजे पुरुषाचें ताठर झालेलें शिश्नही थंड होऊन पुढील सभोगकार्य होत नाहीं. संभोगकार्याचे पूर्वी स्त्रीनें आपले केंस, दोन्ही काखा, मुख, दात आणि योनि हीं सर्व प्रथम साबूनें स्वच्छ धुऊन नंतर कामोत्तेजक अत्तरांच्या सुगंधानीं सुगधित केली असता संभोगकार्याची आणि योनीचुंबनाची सिद्धि चांगली होते. केंस, कांखा, मुख हे सुगंधित करणारे उपाय पुढील सातव्या प्रकरणात सागितले आहेत. तामीळ भाषेंतील कामशास्त्र सांगतें कीं, कर्नाटक, आंध्र, केरळ, मलबार, सिलोन वगैरे देशातील विलासी स्त्रियाच्या सर्वांगाला, मुखाला, योनीला आणि त्यांच्या केसांना कस्तुरी, अम्बर, केतकी–केवडा, चंदन, मोगरा यांचा सुगंध येत असतो. अशा स्त्रियांजवळ कोणताहि तरुण गेल्यास त्याचे मनात तत्काळ सभोगाची इच्छा होते. हे सुगध कामोत्तेजक आहेत.

### ॥ प्रयोग २ ॥

**सुरदारुतिलारिष्टदाडिमांजनकांचनैः ।**
**तैलं सुसिद्धमभ्यंगाद्योनिं सुरभितां नयेत् ॥ ४८ ॥**

देवदार, तीळ, काळा शेवगा, डाळिंब, कडुनिंब व सोनचाफा यांचे तेल काढून योनीला लावीत गेले असतांही, योनीचा दुर्गंध जाऊन सुगंध येईल.

## ॥ केस जाण्याचे उपाय ॥

### ॥ प्रयोग १ ॥

कटुतैलै नागचूर्णं क्षिप्त्वा सप्ताहमातपे ।
विधेयं मर्दनात्तत्तु योनिलोमापहारकम् ॥ ४९ ॥

कडू तेलांत शिशाचें चूर्ण घालून तें तेल सात दिवस उन्हात ठेवावें. मग त्या तेलानें स्मरालय मर्दन केलें असता, योनीवरील केस जातील असें समजावें.

स्त्रीच्या योनीवरील केस प्रथम रेशमाप्रमाणें मऊ, विरळ विरळ अल्प असतात, तोंपर्यंत ठीक! पण पुढें हेच केस राठ होतात. योनिचुंबनाचे विविध प्रयोग पुरुष ज्या वेळी करूं लागतो, त्या वेळीं हेच राठ केस योनिचुंबनाला अडथळा करतात. तसेंच केस काढून गुळगुळीत आणि मऊ असलेली नायिकेची योनि संभोगाच्या वेळीं नायकाचे दृष्टीस पडली कीं, तो नायक त्या नायिकेवरच लुब्ध होतो व तिच्या-पासून मिळणारें संभोगसुख स्वर्गातील सुखासमान मानतो. केस काढलेली योनि हातानें मर्दन करीत असता तो आनंदीत होतो. यास्तव, योनीवरील केस काढणें स्त्रियाच्या हिताचेंच असतें. हल्ली अनेक तरुण स्त्री-पुरुष गुह्य भागांवरील केस सेफ्टी रेझरनेंहि काढतात. केस काढण्याचे साबु, मलमें, तेलें, चूर्णें वगैरे तयारहि मिळतात.

### ॥ प्रयोग २ ॥

सप्ताहं भावितं शंखभस्मं रंभांभसा ततः ।
तालेन युक्तं हरति योनिलोमानि योषिताम् ॥ ५० ॥

केळीच्या पाण्यांत शंखभस्म घालून सात दिवस उन्हात ठेवावें आणि मग त्यात हरिताळ घालून योनीस लेप दिला असताही योनीवरील केस जातात, असें समजावें.

### ॥ प्रयोग ३ ॥

हरितालं पलाशस्य भस्मं रंभाजलान्वितम् ।
एतस्य लेपाल्लोमानि न रोहंति कदाचन ॥ ५१ ॥

हरिताळ आणि पळसाचें लाकडाचे भस्म, केळीच्या पाण्यांत खलून योनीस लेप करीत गेलें असतां केस वाढेनासे होतील.

## ॥ नष्टपुष्प प्राप्तीसाठीं ॥

काहींएक रोगादि निमित्तानें स्त्रियांचा विटाळ मध्येंच जाणें, हा एक स्त्रियास विकार आहे. तो अकालींच प्राप्त झाला असता फार वाईट, म्हणून पुन्हा रजस्वला होण्याचीं औषधें सांगतो.

### ॥ प्रयोग १ ॥

भ्रष्टं ज्योतिष्मतीपत्रं जपापुष्पं च वारिणा ।
पिष्ट्वा पिबति सा भूयो नष्टं पुष्पं प्रविंदति ॥ ५२ ॥

पिंगत्री अथवा करडकागोणीचें गळलेलें पान आणि जास्वदीचें फूल पाण्यात वाटून जी स्त्री पीत जाईल, तिला नष्ट झालेलें पुष्प पुन्हा येईल; म्हणजे ती पुन्हा रजस्वला होईल.

### ॥ प्रयोग २ ॥

तंडुलादेवकाष्ठं च दूर्वापत्रसमत्रयम् ।
वारिपिष्टं पिबेद्या च नष्टं पुष्पं लभेत सा ॥ ५३ ॥

तांदुळजा, दुर्वाचा पाला, देवदार, हीं तिन्ही समभाग, आणि त्राळ्याचें चूर्ण, हीं सर्व पाण्यांत जी पीत जाईल, तिलाही पुष्प पुनः येईल.

## ॥ स्त्रीला विटाळ फार पडतो तो पडू नये असा उपाय ॥

### ॥ प्रयोग १ ॥

पथ्यारसांजनं धात्रीत्रयं पिष्ट्वांऽभसा समम् ।
पिबेद्याऽत्यंतिकं पुष्पं सप्ताहात्परिनाशयेत् ॥ ५४ ॥

हरडेदळ, कडुनिंब, आवळकांठीं, हीं तिन्ही समभाग कुटून पाण्यात कालवून सात दिवस जी पिईल, तिच्या अधिक पुष्पाचें निवारण होईल असें समजावें, म्हणजे त्या स्त्रीचें रज थोडें होईल.

### ॥ प्रयोग २ ॥

कपित्थं वेणुपत्रं च समांशं मधुना सह ।
लेह्यं सप्ताहमाधिक्यं पुष्पस्योपशमं नयेत् ॥ ५५ ॥

कवठ, वांबूचीं पानें याचा समांश रस मधांतून घ्यावा, म्हणजे सात दिवसानीं पुष्पाधिक्याचें निवारण होईल.

## ॥ गर्भ धरण्याचे उपाय ॥

त्याच्या अंगभूत पहिल्यानें क्षेत्रशुद्धि करावी लागते, तिचें वर्णन उपयोगासहवर्तमान करितों.

### ॥ प्रयोग १ ॥

रुक्मकांचनताम्राणां भस्मं क्षौद्रान्वितं त्रिहात् ।
लीढं पुष्पांतके स्त्रीभिः क्षेत्रशुद्धिं परां दिशेत् ॥ ५६ ॥

लोखंड, सोनें, तांबे याचें भस्म मधांत खलून स्त्रिया रजस्वला झाल्यावर चवथे दिवसापासून सहाव्या दिवसापर्यंत खात गेलें असता क्षेत्रशुद्धि चांगली होईल.

या उपचारें करून गर्भ उत्पन्न होण्याचें जें गर्भाशयादि क्षेत्र तें शुद्ध झाल्यावर मग हे पुढील गर्भधारणेचे उपाय करावे.

### ॥ प्रयोग २ ॥

नागकेशरचूर्णं वा स्नाताज्येन पिबेत् त्र्यहम् ।
क्षीरभुग्भर्तृसंयोगाद्गर्भं धत्तेऽगना ध्रुवम् ॥ ५७ ॥

नागकेशराचें चूर्ण तुपांत चवथे दिवसापासून प्रत्यही तीन दिवसपर्यंत पीत जावें व त्यावर पथ्यान्न खावें; असें केलें असता भर्त्याच्या संयोगानें स्त्री खचित गर्भाचें धारण करील.

### ॥ प्रयोग ३ ॥

वाजिगंधामृतासर्जिकाथं स्नानदिने पिबेत् ।
साऽपि पुंयोगतो नारी गर्भं धत्ते न संशयः ॥ ५८ ॥

आस्कद, गुळवेल आणि लघुराळ याचा काढा रजस्वला झाल्यावर चवथे दिवशीं स्नान केल्यावर जी स्त्री पिईल, तीही पुरुषाच्या योगानें म्हणजे संभोगानें गर्भ धारण करील.

### ॥ प्रयोग ४ ॥

शृंगवेरोपणक्षुद्राकणाकेसरजं रजः ।
गोघृतेन पिबेद्या तु वंध्यापि लभते सुतम् ॥ ५९ ॥

ओंवा, रिंगणी, पिंपळी आणि नागकेसर या सर्वांचें समभाग चूर्ण गाईच्या तुपांत जी पीत जाईल, ती जरी वंध्या असली तरी तिला पुत्रलाभ होईल; म्हणजे त्या स्त्रीचें वंध्यत्व जाईल.

॥ प्रयोग ५ ॥

पुष्योद्धृतं लक्ष्मणजं मूलं भर्त्रा निपेषितम् ।
पिबेद् घृतेन सा गर्भं धत्ते क्षीराशनाद् ध्रुवम् ॥ ६० ॥

पुष्य नक्षत्रावर पांढरे जासवंदीचें मूळ आणवून नवऱ्याकडून वाटवावें; आणि मग जी स्त्री तें तुपांत पीत जाईल व वर दुग्धान्न भक्षील ती गर्भ धारण करील.

॥ प्रयोग ६ ॥

बीजपूरस्य मूलं वा क्षीरसिद्धं घृतान्वितम् ।
ऋतौ त्र्यहं पिबेद्या सा गर्भं धत्ते न संशय ॥ ६१ ॥

महाळुंगीचें मूळ दुधांत घालून मग तें दूध फार वेळ कढवावें आणि त्यांत तूप घालून तीन दिवस ऋतुकाळीं जी स्त्री घेईल ती पुरुषाच्या संभोगानें गर्भ धरील.

॥ प्रयोग ७ ॥

पुष्योद्धृतश्वेतबलामूलं कर्षं च तत्समम् ।
यष्टिचूर्णं सितायास्तु पलमेकं विमिश्रयेत् ॥ ६२ ॥
पिष्ट्वा गोरेकवर्णायाः सवत्सायाश्च गोः पयः ।
आदाय क्षिप्त्वा तन्मध्ये पिबेत्स्नाता वरांगना ॥ ६३ ॥
न खादेत्तद्दिने किंचिदथ रात्रौ पतिं भजेत् ।
प्रातः क्षीरौदनं भक्षेद्गर्भिणी स्यादसंशयम् ॥ ६४ ॥

पुष्य नक्षत्रावर पांढरे चिकणीचें मूळ काढून त्याचे चूर्ण मासे १०, तितकेंच जेष्ठमधाचें चूर्ण, आणि खडीसाखर तोळे ८ मासे ४, अशीं तिन्ही एकत्र करून वाटावीं. मग तें चूर्ण सवत्स आणि एकवर्णी जी गाय असेल तिच्या दुधांत घालून ऋतुस्नात स्त्रीनें प्राशन करावें. त्या दिवशीं कांहीं खाऊ नये आणि रात्रीस पतीपासून भोग संपादावा. मग सकाळीं दुग्धान्न खावें. असें केलें असता ती स्त्री गर्भिणी राहील यात संशय नाहीं.

## ॥ कांहीं विकारानें गर्भस्राव होतो, तो होऊं नये याविषयीं औषधें ॥

### ॥ प्रयोग १ ॥

कुलालपाणिसंलग्नः पंकः क्षौद्रसमन्वितः ।
अजाक्षीरेण संपीतो गर्भस्तंभं करोत्यलम् ॥ ६५ ॥

कुंभार जेव्हां चिखल कमावीत असतो, तेव्हां त्याच्या हातास जो चिखल अगदीं मिळून गेल्याप्रमाणें चिकटलेला असतो, तो घेऊन मधाबरोबर शेळीच्या दुधात पीत गेलें असता, गर्भस्तंभन चांगलें होतें.

### ॥ प्रयोग २ ॥

यष्टिसावरधात्रीणां चूर्णं पीतं पयोन्वितम् ।
सप्ताहाच्चलितं गर्भं स्त्रीणां संस्तंभयेद् ध्रुवम् ॥ ६६ ॥

ज्येष्ठमध, शेवरी आणि आंवळकाठी, याचें चूर्ण समभाग दुधात सात दिवस प्यालें असतां जरी गर्भ चळला असला तरी खचित स्तंभित होईल.

### ॥ प्रयोग ३ ॥

कंदं लोहितपद्मस्य क्षीराज्यमधुसंयुतम् ।
सुपक्वं शीतलं कृत्वा सप्ताहं यांऽगना पिबेत् ॥ ६७ ॥
गर्भस्रावं तथा वांतीशूलशोथं त्रिदोषजम् ।
अन्यांश्च बहुशो रोगान्नाशयेन्नात्र संशयः ॥ ६८ ॥

दुधामध्ये तूप, मध आणि त्यांत तांबड्या कमळाचा कांदा घालून तें कढवावें, आणि चांगलें शिजलें म्हणजे मग तें निववून तें औषध जी स्त्री सात दिवस पान करील, तिचा गर्भस्राव बंद होईल, व ओकारी नाहींशी होऊन त्रिदोषशूल जाईल. सूजही उतरेल, आणि दुसरेही बहुत रोग नाश पावतील, यांत संशय नाहीं.

## ॥ सुलभ बाळंत होण्याचे उपाय ॥

### ॥ प्रयोग १ ॥

मातुलिंगमधूकोत्थं चूर्णं मधुघृतान्वितम् ।
पीत्वा सूते सुखं नारी शीघ्रमेव न संशयः ॥ ६९ ॥

महाळुंगीचें आणि मोहाचे सालींचें समभाग चूर्ण मध व तूप यामध्यें खलून प्राशन करावें म्हणजे आयासावाचून नारी लवकर प्रसूत होईल यात संशय नाहीं.

॥ प्रयोग २ ॥

**गृहधूमं समादाय पिबेत्पर्युषितांभसा ।**
**या सा सूते सुखे नैवशीघ्रमेव न संशयः ॥ ७० ॥**

चुलीवर धुरामुळें जी काजळी उत्पन्न होते ती शिळ्या पाण्यांत प्याली असता ती स्त्री प्रयासावाचून लवकर प्रसूत होईल, यात संदेह नाहीं असें जाणावें.

॥ प्रयोग ३ ॥

**रविवारे गृहीतस्य गुंजामूलस्य बंधनात् ।**
**नीलसूत्रैः कटौ मूर्ध्नि जायते प्रसवस्त्वरा ॥ ७१ ॥**

गुंजेचे झाडास शनिवारीं आवंतून आदित्यवारीं मूळ काढून तें मूळ काळ्या सुतानें स्त्रीच्या कमरेस व मस्तकीं बांधावें, म्हणजे ती स्त्री लवकर प्रसूत होईल.

॥ मंत्र ॥

**"जय मन्मथ मन्मथ वहिः लिं बालकस्योदरं मुंच मुंच लघु लघु"**

या मन्त्रास आदिप्रणवबीज अंतीं दैवी अग्निभार्या लावून मग मंत्रोच्चार करावा. हा मान्त्रिक विषय मंत्र जाणणाऱ्याचा होय.

**इति मंत्रेण संजप्तं पातुं देयं जलं बुधः ।**
**सूतेऽगना सुतं शीघ्रं मंत्रराजप्रसादतः ॥ ७२ ॥**

पुण्यवान जे पुरुष असतील त्याच्यापासून वर सांगितलेला जो मन्त्र, त्यानें मन्त्रून दिलेलें पाणी प्राशन केलें असतां, मन्त्रदेवतेच्या कृपेंकरून ती स्त्री बालकातें लवकर प्रसवेल.

हल्लीं वेदनारहित म्हणजे बाळत होण्याच्या वेळीं ज्या दुःखदायक प्रसूतीच्या वेदना स्त्रियाना सोसाव्या लागतात, अशा वेदना न होता सुखानें सुलभ प्रसूति होण्याचे उपाय उपलब्ध झालेले आहेत. हल्लीं पुण्यवान् पुरुष म्हणजे वेदनारहित प्रसूतीचे उपाय माहित असलेला तज्ज्ञ डॉक्टर हाच होय.

## ॥ वांझपणा येण्याचे उपाय ॥

प्रकृतिस्वास्थ्य, आर्थिक परिस्थिति, मरणान्तिक बाळंतपण यावर वाझपणा अगर सततिनियमन हा उपाय हल्लीं उत्तम समजला जातो. थंडीचें निवारण करण्यासाठीं गरम वस्त्राचा उपाय, रोगाचें निवारण करण्यासाठी औषधांचा उपाय, दुःखांचें निवारण करण्यासाठीं दैविक उपाय, पापांचें निवारण करण्यासाठी धार्मिक उपाय आपण करतो; तसेंच गर्भाचें निवारण करण्यासाठीं शास्त्रोक्त कृत्रिम साधनाचा उपयोग उपाय म्हणून तज्ज्ञ वैद्याच्या साहाय्यानें करण्यास कसलीच हरकत नाहीं. कृत्रिम डोळे चष्मे, कृत्रिम दात, कृत्रिम हात-पाय आपण उपयोगात आणतों; तसेंच गर्भनिवारण्याची कृत्रिम साधनें वापरण्यास कसलीच हरकत नाहीं. असें संतति नियमनाचे पुरस्कर्ते सागतात. स्त्रियासाठीं रबरी पेसरी – डच कॅप, स्पज, औषधिवड्या, सोंगट्या, जेली, आणि पुरुषासाठीं रबरी पिशव्या, फ्रेंच लेटर, रबरी कंडोम, वगैरे साधनें उपयोगात आणतात. शस्त्रक्रियाहि करतात. साधारण कोमट पाण्यामध्यें तें पाणी तांबूससर रंगाचें होईल इतकें पोटॅशियम परमँगनेट टाकून त्या पाण्यानें सभोग झाल्याबरोबर स्त्रीची योनि तत्काळ आंतल्या बाजूनें चागली धुवावी. धुण्यासाठीं डुशची पिचकारी विकत मिळते. त्यानंतर चवीला तुरट लागेल इतकी तुरटीची पूड कोमट पाण्यात टाकून त्या पाण्यानें ती योनि पुन्हां आतल्या बाजूनें धुवावी. नंतर शुद्ध तिळाचे तेलांत कापसाचा बोळा पूर्ण भिजवून तो बोळा योनींत अगदीं आंतपर्यंत रात्रभर ठेवावा. त्या कापसाच्या बोळ्यामध्यें सुपारीएवढा सैंधव मिठाचा खडा गुंडाळून नंतर तो बोळा तिळाच्या तेलांत भिजवून आतील खड्यासह योनींत ठेवला तर फारच उत्तम. हा सततिनियमनाचा डुशाचा व बोळयाचा प्रयोग पॅरिसमधील फ्रेंच वेश्या स्त्रिया करीत असतात. स्त्रीची योनी हीसुद्धा चर्मपिशवीच आहे. या चर्मपिशवींत गर्भप्रतिबंधक रबरी पिशवी घालून नंतर पुरुषानें सभेग करावा. प्रत्येक वेळीं ती रबरी पिशवी पोटॅशियम परमँगनेटच्या पाण्यानें धुऊन स्वच्छ करावी. तिच्यावर आतून बाहेरून पाढरें व्हॅसलीन चोळून योनींत घालावी. नंतर संभोग करावा. संततिनियमनाचा हा सोपा उपाय आहे.

### ॥ प्रयोग १ ॥

**गुडं त्र्यहायनं याति पलमात्रं तु नित्यशः ।**
**मासार्धं सा भवेद्वंध्या यावदायुर्न संशयः ॥ ७२ ॥**

तीन वर्षांचा जुना गूळ दररोज सव्वातीन तोळे एक मासा जी स्त्री पधरा दिवस नेमानें खात जाईल, ती जन्मभर वंध्या होईल असें समजावें.

कित्येकजण संततिनियमनावर पुरुषानें ब्रह्मचर्य व्रत पाळावें, सयमन करावें, सभोग करताना वीर्यस्खलन योनींत होऊ देऊ नये, असे उपाय सागतात. पण हे उपाय सर्वसाधारण अशक्य समजावेत. तीन वर्षांचा गूळ जुना झाला म्हणजे त्या गुळामध्यें

विशिष्ट प्रकारची आम्लता निर्माण होते. ही आम्लता संततिनियमन करते. ही आम्लता म्हणजे रासायनिक क्रियाच होय.

॥ प्रयोग २ ॥

तुषतोयेन संक्वाथ्य मूलमग्निसमुद्भवम् ।
पुष्पावसाने त्रिदिनं पीत्वा वंध्याऽभिजायते ॥ ७४ ॥

दंवाचे पाण्यांत चित्रक मुळाचा कषाय करून ऋतुकाळीं चवथ्या दिवसापासून तीन दिवसपर्यंत पीत गेलें असता स्त्री वध्या होईल असें समजावें.

॥ प्रयोग ३ ॥

कदंबस्य फलं पादं मक्षिकाया दिनत्रयम् ।
पीतमुष्णोदकेनैतद् वंध्यात्वं प्रतिपादयेत् ॥ ७५ ॥

कदंबाचें फळ व अरण्यमक्षिकेचा पाद (रानातील मक्षिकेचा पाय) ऊन पाण्यात जी स्त्री तीन दिवस घेईल तिला वध्यत्व येईल.

॥ प्रयोग ४ ॥

रक्षोभूरुहबीजानां पलार्धं तंडुलांभसा ।
ऋतौ पीतं तु सप्ताहं वंध्यां कुर्यान्मृगीदृशीम् ॥ ७६ ॥

२० मासे बिब्बे तांदुळाच्या धुवणांत उगाळून ऋतुकाळीं सात दिवस प्यालें असतां स्त्रिया वंध्या होतील. चागल्या हुशार वैद्याचा सल्ला घेऊन हा प्रयोग करावा.

बाळंतपणामध्यें कित्येक स्त्रिया बिब्याची सुपारी खातात. बाळंतपणानंतर "गर्भधारणा लवकर होऊं नये" असाहि उद्देश ही सुपारी खाण्यात असेल. १० तोळे तुपांमध्यें ६ तोळे चागले तेलदार बिब्याचे तुकडे तळावेत म्हणजे त्या बिब्याचें तेल तुपामध्यें उतरेल. त्या तुपामध्यें २० तोळे सुपारीचे बारीक तुकडे चांगले खरपूस तळावेत. नंतर त्या सर्वांमध्यें रुचीसाठीं लवंग-दालचिनी-ज्येष्ठमध कुटून घालावीं. याला बिब्याची सुपारी म्हणतात.

॥ केस चांगले होण्यासाठीं औषधें ॥

॥ प्रयोग १ ॥

गव्येन पयसा पिष्टतिलपुष्पसगोक्षुरम् ।
सप्ताहलेपनात्कुर्यात्केशान्दीर्घान्बहूनपि ॥ ७७ ॥

गाईच्या दुधांत तिळाचें फूल आणि गोखरूं वाटून केंसांना सात दिवस लेप केला असता केस लांब होऊन थोडे असल्यास फारही होतील असें समजावें.

॥ प्रयोग २ ॥

दंतिसावरकल्केन सिद्धं तैलं तिलोद्भवम् ।
पातं कार्श्यं च खर्वत्वं केशानां हन्ति लेपनात् ॥ ७८ ॥

जेपाळाचें बीज आणि सांबराचें शिंग याचा कल्क करून त्यानें तिळाचें तेल सिद्ध करावें आणि मग त्याचा लेप करीत गेल्यानें केंसाचा निर्जीवपणा जाऊन केस लांब होतील.

कोणाच्या केंसांना धर नसतो व सहज उपटून येतात, असे केस जाणार नाहींत, अथवा पिंगटपणा जाऊन निखालस काळे होतील. (सांबराचें शिंग घट्ट उगाळून घेणें).

॥ प्रयोग ३ ॥

गुंजाफलरजः क्षौद्रयुक्तं लेपान्निहंत्यलम् ।
इन्द्रलुप्तो तथा केशबाह्यारोपणकारणात् ॥ ७९ ॥

मधामध्यें गुंजेचें पीठ खलून लेप केला असता इंद्रलुप्त रोग जाईल, म्हणजे टक्कल पडलें असल्यास केंस उगवून तें बुजून जाईल.

॥ प्रयोग ४ ॥

दग्धेभदंतसुश्लक्ष्णं पिष्ट्वा तेन प्रलेपयेत् ।
इंद्रलुप्तं क्षयं याति केशा रोहंति भूरिशः ॥ ८० ॥

हस्तिदंत जाळून चांगला कुटावा आणि त्याचा मस्तकास लेप करावा म्हणजे टक्कल बुजून फार केंस उद्भवतील.

॥ केस चांगले काळे होण्याचे उपाय ॥

॥ प्रयोग १ ॥

आम्रप्रसूनं त्रिफला त्वक्पांडवतरोरपि ।
पिंडारकं चेति कल्कैस्तिलतैलं प्रसाधयेत् ॥ ८१ ॥
नीलतैलमिति ख्यातं केशसंरंजनं परम् ।
क्षिप्तोऽत्र हंसपक्षोपि ध्रुवं मेचकतां व्रजेत् ॥ ८२ ॥

आव्याचा मोहोर, त्रिफळा, अर्जुन वृक्षाची साल आणि पेंढरें, याचा कल्क करून त्यानें तिळाचें तेल सिद्ध करावें. या तेलास नीलतेल असें नांव आहे. हा कल्प केंसांना चांगला रंग आणण्याविषयीं उत्तमोत्तम आहे. फार काय या तेलाचें सामर्थ्य वर्णन करू! जर कदाचित् या तेलात हसाचा पख टाकिला तर तोही काळा होईल. मग केंस काळे होतील हें काय सागावें! काळेभोर केंसानी सौदर्य खुलतें.

॥ प्रयोग २ ॥

माजूफलकणानीलीं सैंधवैः सारनालकैः ।
पिष्टैः शिरोरुहा लिप्ताः श्यामवर्णा भवंत्यलम् ॥ ८३ ॥

मायफळ, पिंपळी, नीळ आणि सैंधव, यांचें पीठ आंबलेली गव्हांची पेज तींत खलून मस्तकास लेप केला असता मस्तकाचे केंस फार उत्तम नीलवर्ण होतील.

॥ प्रयोग ३ ॥

निंबं तैलं पलं नित्यं मासैकं यः पिबेन्नरः ।
शुक्लाः केशाः क्रमेणैव तस्य यांत्यलितुल्यताम् ॥ ८४ ॥

निंबाचे तेल ४० मासे प्रत्यहीं महिनाभर जो प्राशन करील, त्याचे केस पाढरे जरी असले तरी हळू हळू रंग पालटून क्रमानें भ्रमराप्रमाणें काळे होतील.

॥ प्रयोग ४ ॥

गोरोचनाः कृष्णतिलाः काकामाची शतावरी ।
अमीभिश्चिकुरा लिप्ताः श्यामतां यांति सत्वरम् ॥ ८५ ॥

गोरोचन, काळे तील, काकजघा आणि शतावरी हीं एकत्र वाटून मस्तकास लेप केल्यास केस कालिमा पावतील.

॥ केंस पांढरे करणारी औषधें ॥

॥ प्रयोग १ ॥

तिलानां स्नुहि क्षीरेण भावितानां तु यद्भवेत् ।
तैलं तल्लेपनात्केशाः स्फटिकाभा भवंति हि ॥ ८६ ॥

पचधारी निवडुंगाच्या चिकाचीं पुटें तिळाना देऊन त्या तिळाचें तेल काढून तें तेल डोक्यास लावलें असता केंस पाढरे स्फटिकाप्रमाणें होऊन तेजस्वी होतील.

॥ केस गळून पडण्याचे औषध ॥

॥ प्रयोग १ ॥

**वज्रीक्षीरेण या धात्री भाविता मज्जनात्तया ।**
**तत्क्षणादेव मर्त्यानां निपतंति स्वयं कचाः ॥ ८७ ॥**

निवडुगाच्या चिकाचीं पुटें आंवळ्याना देऊन तें आवळे वाटावे, आणि त्याचा लेप केल्यानें केंस आपोआप गळून पडतील.

॥ तोंडावरील पुळया निवारण्याचे उपाय ॥

आता तोंडावर पुळ्या उठून मग काळे डाग पडतात, त्यामुळें तरुणपणांतील मुखास विरूपता येतें. यास्तव पुळयांचें निवारण होण्यासाठीं उपाय सागतों.

॥ प्रयोग १ ॥

**वचासावरधान्यानां लेपनाद्यौवनोद्भवाः ।**
**मुखस्थाः पिटका यांति पुनार्योः संक्षयं त्र्यहात् ॥ ८८ ॥**

वेखड, साबराचें शिंग आणि धणे, हीं वाटून तीन दिवस मुखास लेप केला असता तारुण्यात स्त्रीपुरुपाच्या तोंडावर ज्या पुळ्या उठतात त्या क्षय पावतील.

॥ प्रयोग २ ॥

**कंटकैः शाल्मलैर्यश्च क्षीरपिष्टैर्विलेपयेत् ।**
**मुखं तस्यापि पिटका नाशं गच्छंत्यसंशयम् ॥ ८९ ॥**

सावरीचे काट्याच पीठ (चूर्ण) करून दुधात कालवून जो मुखावर लेप करील, त्याच्याही पुळ्या निःसंशय नाश पावतील.

॥ प्रयोग ३ ॥

**लोध्रसैंधवसिद्धार्थवचानां परिलेपनात् ।**
**गंडस्थाः पिटका यांति देहिनां संक्षयं क्रमात् ॥ ९० ॥**

लोध्र, सैंधव, पांढरा शिरस आणि लोखंड, यांच्या लेपनानेंही मनुष्याच्या गालावरील पुळ्या हळूहळू क्रमानें क्षय पावतात.

॥ कालिमा जाऊन गौर वर्ण यावा यासाठीं उपाय ॥

॥ प्रयोग १ ॥

तिलद्विजीरसिद्धार्थान् पिष्ट्वा क्षीरेण लेपयेत् ।
यः सप्ताहं जयेन्नीलीं चंद्रवद्वदनं भवेत् ॥ ९१ ॥

तीळ, जिरें, शहाजिरें आणि शिरस दुधांतून वाटून जो मनुष्य सात दिवस अंगास लेप करील, त्याचा सर्व कालिमा जाऊन वदन असें होईल कीं, चंद्र जसा सकल जनांस आल्हादकारक, तसें तें वदन चमकेल.

॥ प्रयोग २ ॥

गैरिक शोणयष्टिं च मेघनादं निशाद्वयम् ।
पिष्ट्वा रंभांभसा लेपात्सप्ताहं नीलिकां नयेत् ॥ ९२ ॥

सानें, शेंदूर अथवा पिवळा टेंटू, जेष्ठमध, तांदुळजा, हळद आणि दारुहळद, हीं केळीच्या पाण्यात खलून सात दिवस अंगास लेप केला असताही काळेपणा जाईल.

॥ स्तन मोठे व घट्ट करणारीं औषधें (स्तनोपासना) ॥

॥ प्रयोग १ ॥

वाजिगंधावचाकुष्ठकणाश्वारिलवंगकम् ।
नवनीतांबुसंमिश्रं लेपात्कुर्यात्कुचान् पृथून् ॥ ९३ ॥

आस्कंदाच्या काड्या, वेखड, कोष्ठ, कडूजिरें, कण्हेरीचीं मुळें आणि लवंगा, हीं औषधें लोणी आणि पाणी यांत खलून यानीं स्तन लिप्त करीत गेले असतां कुच घट्ट व मोठे होतात.

॥ कामवर्धिनी स्त्रीचें स्तनसौंदर्य ॥

स्त्रीचा वर्ण काळा असला तरी घट्ट आणि पुष्ट असें उन्नत स्तन स्त्रियांचें मोहक सौंदर्य वाढवितात. स्त्रीच्या उन्नत आणि भरदार छातीवरील असे घट्ट व पुष्ट झालेले स्तन तरुण पुरुषाचे दृष्टीस पडताच तो तरुण आकर्षिला जाऊन त्या स्तनसौंदर्याच्या पाशांत पूर्णपणें तत्काल अडकतो. "कठीण सुपारी फुटेल तुझ्या कुचावरी" असें

दुर्मिळ लक्षण घट्ट आणि पुष्ट स्तनाचें मानतात. असें हें स्तनसौंदर्य स्त्रीच्या तारुण्य-मस्तीचें लक्षण समजतात. कित्येक कामीजन स्त्रीच्या छातीवरील अशा घट्ट आणि पुष्ट स्तनाला "प्रेमाचे डोंगर" असें म्हणतात. तुळशीचें पान चुरगळल्याशिवाय तुळशीचा वास मिळत नाहीं. तसेंच, स्त्रीचें स्तन हातानें धरून जोरानें आंवळल्या-शिवाय स्त्रीचें प्रेम मिळत नाहीं. म्हणून संभोगाचे वेळीं असे स्तन हातानें धरून आवळणें, दाबणें, चुरणें, मर्दन करणें, आणि त्या स्तनांचें चुंबन घेणें, हीं सर्व कृत्यें तरुणाना फारच आवडतात. जी स्त्री आपल्या नवऱ्याला हीं सर्व कृत्यें करूं देते, त्या स्त्रीवर तिचा नवरा अतिशयच प्रेम करितो. सोन्याच्या आकर्षणापेक्षां स्त्रियांच्या स्तनसौंदर्याचें आकर्षण कामी तरुणाना अधिकच आवडतें. यास्तव, नायकाला आपल्या ताब्यांत ठेवण्यासाठीं नायिकेनें आपलें स्तनसौंदर्य उठावदार दिसेल अशी काळजी घ्यावी व स्तनसौंदर्याची उत्तम प्रकारें उपासना करावी. घट्ट आणि पुष्ट असलेल्या गोलाकार स्तनानें ज्या स्त्रीची छाती उन्नत–उठावदार अशी दिसते; त्या स्त्रीला 'कामवर्धिनी' अशी संज्ञा आहे.

**येक बदरी कुच कल्याणी । नारींग कुच गजगामिनी ॥**
**येक निंबु पीन स्तनीं । घनस्तनीं मातुलिंगें ॥**
**येकी वृतांकीस देठी । येकी भोपळीया कुचतटीं ॥**
**कुष्मांड कुच येक गोरटी । येक चिरमुटी काचरीया ॥**

बोराएवढ्या आकाराच्या स्तनापासून नारिंग, निंबु, महाळुंग, भोपळा, कोहळा, या आकारांच्या स्तनापर्यंतचें वर्णन श्रीएकनाथानी आपल्या भावार्थ रामायणामध्यें केलेलें आहे. इंग्रजीमध्यें The cult of Breast असें म्हणतात. ठिकठिकाणच्या लेण्यामधील कोरलेल्या दगडी स्त्रियांच्या मूर्तींत मोठ्या नारिंगाएवढ्या आकाराचें पीनस्तन–घनस्तन कोरलेलें आढळून येतात. हीं लेणीं वेरूळ, अजंठा, औरंगाबाद, खजुराओ, कोनर्क, नागार्जुन-कोंडा वगैरे ठिकाणीं असून चवथ्या–पाचव्या शतकातील असावींत.

॥ प्रयोग २ ॥

**कोकमज्जाहयारिश्च भुजंगस्य वसा समाः ।**
**एतेषां मर्दनात्स्त्रीणां कुचा संयांति पीनताम् ॥ ९४ ॥**

वियांशिवाय बोरीचें फळ, कण्हेरीचें मूळ, शिसें, ककोळाच्या झाडाचा नार, हीं सर्व समभाग वाटून या औषधानीं कुचाचें मर्दन केलें असतांही स्त्रियाचे स्तन पुष्टता पावतील.

## ॥ पडलेले स्तन वर उचलून पुष्ट होतील असा उपाय ॥

### ॥ प्रयोग १ ॥

**श्रीपर्णीरससंसिद्धतिलतैलविलेपनात् ।**
**पतितावपि संकुर्यात्पीनोत्तुंगौ कुचौ स्त्रियः ॥ ९५ ॥**

श्रीपर्णीचा रस काढून त्यानें तिळाचें तेल सिद्ध करून त्याचा लेप स्त्रियांनीं कुचास केल्यास स्तन जरी पडले असले तरी पुष्ट होऊन वर उचललेले होतील. (अनुभविक प्रयोग.)

### ॥ प्रयोग २ ॥

**दाडिमीकल्कसंसिद्धकटुतैलविमर्दनात् ।**
**स्तनौ चारुतरौ पीनौ नित्यं कुर्यान्मृगीदृशः ॥ ९६ ॥**

डाळिंबीच्या कल्कानें मोहरीचें तेल सिद्ध करून त्यानें नित्य मर्दन करीत गेल्यास स्त्रियाचे स्तन फारच सुरेख व गोलाकार होऊन पुष्ट होतील. (या योगानें स्त्रियांचें सौंदर्य खुलतें.)

### ॥ प्रयोग ३ ॥

**तैलं तिलोद्भवं गव्यं घृतं वार्कपयः समम् ।**
**अवला श्यामलता व्योषलज्जालुश्च निशाद्वयम् ॥ ९७ ॥**
**एतेषां कल्कसहितं पचेन्मृद्वग्निना सुधीः ।**
**तन्नस्येन कुचाः स्त्रीणां शीघ्रं यांति विशालताम् ॥ ९८ ॥**
**बाला तंडुलतोयेन तैलमेतत्पिबेद्यदि ।**
**पीनोत्तुंगौ कुचौ तस्या न पतेतां कदाचन ॥ ९९ ॥**

तिळाच्या तेलांत अथवा गाईच्या तुपात समभाग रुईचा चीक घालून त्यांत चिकणा, त्रिधार, ओंवा, लाजाळू, हळद आणि दारुहळद, याचा कल्क करून घालावा. आणि त्या कल्कासुद्धा तें तेल मदाग्नीवर शहाणपणानें पक्कें करावें, कच्चें राहू नये व अधिकही कढ देऊ नये. असें तें तेल अथवा तूप सिद्ध झाल्यावर स्त्रियांच्या नाकांत घालीत गेल्यास कुच लवकर विशालत्व पावतील आणि हेंच सिद्ध केलेलें तेल अथवा तूप सोळा वर्षांच्या अलीकडे जिचें वय असेल, अशी स्त्री तांदुळाच्या धुवणाबरोबर जर पीत जाईल,

तर त्या स्त्रीचे कुच पुष्ट होऊन नेहमीं वर उचललेले राहतील, कधींहीं खालीं पडणार नाहींत.

## ॥ स्त्रियांचे अतुलनीय बल ॥

कायद्याचें स्वरूप, त्याचें खोल व अचूक असें सांगोपांग सूक्ष्म ज्ञान असणें हें कायदेपंडितांचें 'बल' आहे. तसेंच यौवनपूर्ण निरोगी तारुण्य, मोहकता, घट्ट व उन्नत स्तन असलेली भरीव छाती असणें हें स्त्रियांचें अतुलनीय बल आहे; अशा 'मोहिनी' पुढें विश्वामित्रानें आपली तपश्चर्या सोडून दिली, सुंदोपसुंद मोहून गेले, भस्मासुर कामातुर झाला, हीं उदाहरणें जशीं हिंदुपुराणग्रंथांमध्यें आढळून येतात, तशींच दोन महत्त्वाचीं उदाहरणें जुन्या ग्रीक ग्रंथांमध्येंही प्रसिद्ध आहेत. ट्रॉयची लढाई जिंकल्यावर हेलेनला ठार मारण्यासाठीं हातात नग्न तलवार घेऊन निघालेल्या मेनेलास पुढें हेलेन पूर्ण नग्न होऊन उभी राहिली; आणि 'मला ठार मारून कर या स्तनसौंदर्याचा नाश !' असें निर्भयतेनें सांगूं लागली. तेव्हा, त्या नग्न झालेल्या हेलेनचें मोहक स्तनसौंदर्य दृष्टीस पडताच त्याला मोह पडून तिनें केलेला व्यभिचार तो विसरला; आणि हातातील तलवार फेकून देऊन त्यानें त्या नग्न हेलेनला आपल्या बाहूनीं मोठ्या प्रेमानें घट्ट मिठी मारली. त्याचप्रमाणें स्तनसौंदर्याचें दुसरें एक उदाहरण फ्रायनेचें प्रसिद्ध आहे. हिचें अप्रतिम आणि मोहक स्तनसौंदर्य पाहून अथेनियन न्यायाधिशानीं तिला खुनाच्या दोषारोपातून मुक्त केलें होतें. असें हें कामी पुरुषांना इष्ट आणि प्रिय असलेलें अप्रतिम, चित्ताकर्षक, मोहक स्तनसौंदर्याचें वर्णन केवळ कानानीं ऐकूनच आणि डोळ्यानीं पाहूनच कामीजन आनंदित होतात. मग, त्या स्तनसौंदर्याचा प्रत्यक्ष उपभोग घ्यावयास मिळाला तर त्या आनंदमय स्थितींत कामीजन तल्लीन होऊन स्वतःलाहि विसरतात यांत आश्चर्य तें काय ? लेण्यातील स्त्रियांच्या मूर्तींमध्यें हेंच स्तनसौंदर्य दाखविलेलें आहे. कल्याणमल्लानें या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून यापुढील सातव्या प्रकरणाच्या आरंभीं सांगितल्याप्रमाणें "दांपत्यानीं परस्परांवर अनुरक्त असण्यासाठीं" हे उपाय येथें सांगितले आहेत.

**इति श्रीमल्लाडनवलविनोदाय महाकविकल्याणमल्लविरचिते अनंगरंगे द्रावणादियोगनिरूपणं नाम षष्ठः स्थलः ॥ ६ ॥**

याप्रकारें राजाधिराज जो लाड राजा त्याच्या विनोदार्थ श्रीकविराज कल्याणमल्लरचित अनंगरंग ग्रंथांतील द्रावणादि औषधवर्णनाचा सहावा स्थल संपूर्णतेस पावला.



प्रकरण सातवें

## ॥ वशीकरणाविषयीं ॥

आता पुढें सातवे स्थलास आरंभ करितों. या स्थलात वशीकरणादिक विषय वर्णिले आहेत.

वशीकरण म्हणजे प्रीति वाढून दांपत्यांनीं परस्परावर केवळ अनुरक्त असणें. नायकानें नायिकेला वश करणें आणि नायिकेनें नायकाला वश करणें याचा उपाय.

सारमुद्धृत्य संक्षेपाद्वशीकरणमोहनम् ।
कामीनां प्रीतिजननं किंचिदत्र निगद्यते ॥ १ ॥

वशीकरण आणि मोहनादिक उपयोगाचीं औषधें बहुत आहेत, त्या सर्वांचें सार काढून कामुक जनाला प्रीति उत्पन्न करणारें असे येथें संक्षेपानें लिहितों.

अनुक्रम ५८४३२ बि: नोंद क्र. २७६८

## तत्रादौ तिलकविधिः ।

यात पहिल्यानें कपाळीं टिळा लावण्याचा प्रयोग प्रकट करितों.

॥ प्रयोग १ ॥

लज्जालुर्मधुकं हव्यं नलिनीमूलमेव च ।
एतत्पिष्ट्वा स्ववीर्येण यः कुर्यात्तिलकं पुमान् ॥ २ ॥
तत्क्षणादेव नयति वशतो भुवनत्रयम् ।
वात्स्यायनेन मुनिना प्रोक्तो योगोयमुत्तमः ॥ ३ ॥

लाजाळू, निळे कमळाचें मूळ, मोहाची साल आणि जव याचें पीठ करून मग तें आपल्या वीर्यांत कालवून जो पुरुष त्याचा तिलक कपाळीं धारण करील, त्याला तत्काळ त्रिभुवन वश होईल; म्हणजे तिलकासहवर्तमान जे पाहतील त्याना त्याची मोठी तहान पडत जाईल असा उत्तम प्रयोग वात्सायन मुनीनें सांगितलेला आहे.

॥ प्रयोग २ ॥

सीतार्कमूलं मंजिष्ठावचामुस्तं सकुष्ठकम् ।
स्त्रीयोनिशोणितेनैतदेकीकृत्य ललाटके ॥ ४ ॥
शुभं तिलकमादत्ते यः स लोकत्रयं क्षणात् ।
नयति स्ववशं प्राज्ञः सुचिरमादरो भुवि ॥ ५ ॥

पांढऱ्या रुईचें मूळ, जटामासी, वेखंड, नागरमोथा आणि कोष्ठ, या सर्व औषधी स्त्रीच्या योनींतल्या रक्तात (आर्तव) उगाळून आपल्या ललाटीं चांगला सुरेख टिळा जो पुरुष लावील, त्याला टिळ्यासह पाहताक्षणींच त्या पुरुषास त्रिभुवन वश होईल, आणि मग तो तिलक लावलेला मनुष्य मोठा शहाणा होत्साता, या भूमीच्या ठायीं चिरकाल आनंद पावेल.

तगरं पिप्पलीमूलं मेषशृंगी कणाजटा ।
एतत्समं स्वपंचांगमलैर्नीत्वैकतां सुधीः ॥ ६ ॥
मधुना तिलकं कुर्याद्यः क्षोणीसुतवासरे ।
जगत्सर्वं वशीकुर्यात्स पुमान्नात्र संशयः ॥ ७ ॥

तगर, पिंपळीमूळ, मेंढशिंगी, कडूजिरें आणि जटामासी हीं समभाग घेऊन यामध्यें यांच्याच पंचांगांचें भस्म मिश्र करून अथवा आपले रेतादिक पांच

मल या औषधात घालून मग मधात कालवून मगळवारीं जो पुरुष कपाळीं टिळा लावील, तो सर्व वश करील यात संशय नाहीं.

॥ स्त्रियांना पुरुष वश कसा होईल याचा उपाय ॥

**गोरोचनां च संभाव्य स्वपुष्परुधिरेण या ।**
**कुर्यात्तिलकं भाले सा पतिं मोहयेद् भृशम् ॥ ८ ॥**

गोरोचनास आपल्या रजाचीं (आर्तवाचीं) सूर्यपुटें देऊन मग त्या गोरोचनाचा टिळा आपल्या ललाटाच्या ठायीं जी स्त्री लावील, तिला टिळ्यासह पाहताच पति अगदीं वश होईल.

॥ 'अथांजनविधि' . काजळ लावण्याचा विधि ॥

नेत्रांमध्यें अंजन म्हणजे काजळ घालण्याची पद्धत फार पूर्वीपासूनची आहे. अंजनानें डोळे स्वच्छ होतात. नजर चांगली रहाते. कांहीं काहीं अजनें अशीं आहेत कीं, तीं अजनें डोळ्यांमध्यें घातलीं असता दिवसा नक्षत्रें दिसतात, काळोख्या रात्रीं चांगलें स्पष्ट दिसून वाचताहि येतें व भूमिगत असलेले गुप्त धन कोठें आहे तें दिसतें. येथें सांगितलेले अंजनविधि कामीजनामध्यें प्रेम उत्पन्न करणारे, मोहकपणा वाढविणारे व आकर्षक दिसणारे असे आहेत.

॥ प्रयोग १ ॥

**महाष्टमीदिने यत्तु पातितं नरमस्तके ।**
**स्मशाने कज्जलं विश्वं मोहयेन्नयनांजनात् ॥ ९ ॥**

आश्विन शुद्ध अष्टमीस पुरुषांच्या मस्तकाचे अस्थीवर स्मशानामध्यें काजळ पाडून तें काजळ जो मनुष्य आपले डोळ्यात घालील, त्यास काजळासुद्धा पाहून सकल विश्व मोहित होईल, म्हणजे तो सर्वांत प्यार होईल.

॥ प्रयोग २ ॥

**रोचनाकेसरं कन्याशिलैश्चाभिर्विलोचने ।**
**योजयेद् दृष्टिपथगं सर्वमेव विमोहयेत् ॥ १० ॥**

वशलोचन, नागकेशर, कोरफड आणि मनशील ही इतकीं औषधें एकत्र उगाळून याचें अजन आपल्या डोळ्यामध्यें जो मनुष्य घालील, त्या माणसास अजनयुक्त पाहताच सर्व जग वश होईल.

कांहीं कांहीं औषधी अंजनें डोळ्यात घातलीं असता काळोखात स्पष्ट दिसतें. भूमीतील गुप्त धन दिसतें. त्या अंजनानें 'क्ष' किरणासारखें दिव्य तेज डोळ्यांत निर्माण होतें.

॥ प्रयोग ३ ॥

तालीसकुष्ठतगरैर्लिप्त्वा क्षौमीं सुवर्तिमाम् ।
सिद्धार्थतैले निक्षिप्य कज्जलं नरमस्तके ॥ ११ ॥
पातानादंजनात्तस्य सर्वदा भुवनत्रये ।
दृष्टिगोचरमायातः सर्वो भवति दासवत् ॥ १२ ॥

ताडवृक्ष, कोष्ठ तगर यांचा कल्क काढून अथवा याच्या मुळ्या उगाळून त्यानें रेशमाचें वस्त्र भिजवावें. मग त्या वस्त्राची वात करून पाढरे शिरसाचें तेलात ठेवून स्मशानामध्यें मनुष्याचें मस्तक पडलेलें असतें त्याजवर त्याचें काजळ धरून तें काजळ डोळ्यास लावावें. असें जो पुरुष करील त्यास त्रिभुवनात जो कोणी पाहील, तो अंजन केलेल्या पुरुषाचा सर्वदा दास होईल म्हणजे चाकरासारखा विकला जाईल.

॥ प्रयोग ४ ॥

शिलाकिंजल्कफलिनीरोचनानां तथांजनात् ।
पुष्यार्कयोगे विहितं दंपत्योर्मोहनं परम् ॥ १३ ॥

मनशील, नागकेशर, काळा उंबर आणि वशलोचन यांचें अंजन आदित्यवारीं पुष्य नक्षत्र असेल त्या दिवशीं करून ठेवून मग त्यानें डोळे अंजित केले असतां परस्पर वधूवराची पराकाष्ठेची प्रीति वाढेल म्हणजे दपती परस्पर प्रीतियुक्त वागतील.

हरिणाप्रमाणें काळेभोर, वाटोळे व चंचल असणारे डोळे–'हरिणाक्षी', कमळाचा कळा जसा दीर्घ असतो असे दीर्घ डोळे असून दोन्ही कडाना तांबडा रंग असलेले डोळे–'कमलाक्षी'; मत्स्याप्रमाणें वाटोळे असून बारीक डोळे–'मीनाक्षी'; मद्य पिऊन येणाऱ्या धुंदीनें दिसणारे डोळे–'मदिराक्षी'; पिंगट दिसणारे डोळे–'पिंगलाक्षी'; मार्जारीप्रमाणें धुरकट डोळे असणारी–'धूम्राक्षी'; हे डोळे विश्वासघातकी असतात. विरूपाक्षी असे नेत्रशास्त्रसौंदर्याचे अनेक प्रकार आहेत. नेत्रांमध्यें काजळ घातलें असता नेत्राचें चमकदार तेज वृद्धिंगत होऊन मोहक आकर्षकता निर्माण करते. कामी स्त्री-पुरुषांचीं मूकभाषा म्हणजे त्याचे नेत्रच होत. कारण कामी स्त्री-पुरुषाना

एकमेकांचीं मनें नेत्रद्वारा होणाऱ्या मूकभाषेनें जाणतां येतात. स्त्रिया आपल्या नेत्रातील चमकदार व तेजस्वी नयनबाणानें पुरुषांचें प्रथम नेत्रहरण करतात; नतर त्यांची मनें हरण करतात. नंतर त्याच्या हृदयात प्रेमाची जखम करितात. अनेक नटी आपल्या नेत्रामध्यें काजळ घालून नेत्रसौंदर्य विशेष उठावदार, मोहक व आकर्षक करितात. 'सुरम्या'च्या धातूपासून काजळ बनवितात—वरील १२ व्या श्लोकामध्यें मनुष्याच्या (मृत) कवटीवर काजळ धरण्यास सांगितलें आहे. यावरून 'सुरमा' धातु व हाडें याचे गुणधर्म समान असावेत असें दिसतें. कामिनी स्त्रीच्या नेत्रसौंदर्यातील चंचल आणि चमकदार तेजाच्या तडाक्यात कामी पुरुष सांपडला कीं, त्याच्या शरिरावर त्याच्या मनाचा असलेला ताबा तत्काल नाहींसा होतो. असें त्या नेत्रचमकेमध्यें विलक्षण सामर्थ्य असतें. हें सामर्थ्य काजळानें विशेष खुलून दिसतें.

## ॥ वश करणारीं चूर्णें ॥

### ॥ प्रयोग १ ॥

काकजंघासितापक्षौ भ्रामरौ कुष्ठमुत्पलम् ।
मूलं तगरजश्चैषां चूर्णं क्षिप्तं विमोहयेत् ॥ १४ ॥

कांगाचें झाड, श्वेत निशोत्तर, भ्रमराचे पंख, कोष्ठ, कमळ आणि तगरमूळ इतक्यांचें चूर्ण एकत्र करून ज्यावर टाकावें तो मोहित होईल.

### ॥ प्रयोग २ ॥

वात्यांतिकदलं पुंसो मलं माला शवस्य च ।
पक्षावलेरिदं चूर्णं क्षिप्तं शिरसि मोहनम् ॥ १५ ॥

वाताळूचीं पानें, सोमवल्ली, पुरुषाचा मळ आणि प्रेतास वाहिलेली माळ इतक्याचें चूर्ण एकत्र करून ज्याच्या मस्तकावर टाकावें तो मनुष्य मोहित होऊन आपणास खचित वश होईल.

### ॥ प्रयोग ३ ॥

सप्तच्छदं शिवाक्षं च सक्षौणेयं समांशकम् ।
अमीषां शिरसि क्षिप्तं चूर्णं मोहकरं परम् ॥ १६ ॥

सातवीण वृक्षाचीं पानें, रुद्राक्ष आणि सण याचें बीच, इतक्याचें चूर्ण समभाग करून ज्याचे मस्तकावर टाकावें तो वश होईल. हें उत्कृष्ट मोहनकारक चूर्ण आहे.

## ॥ ज्यांच्या भक्षणानें मोहन होतें ते पदार्थ ॥

### ॥ प्रयोग १ ॥

अन्त्रादिसर्वं निष्कास्य खंजरीटोदरं कुजे ।
पूरयित्वा स्ववीर्येण शरावयुगले क्षिपेत् ॥ १७ ॥
मुद्रां कृत्वा तदेकांतसप्ताहं धारयेत्सुधीः ।
पश्चान्निष्कस्य संपिष्य वटीं कृत्वा विशोषयेत् ॥ १८ ॥
समभक्षविधानेन दीयमाना परस्परम् ।
दंपत्योर्मोहजननी कीर्तिता वटिकोत्तमा ॥ १९ ॥

मंगळवारीं चाषपक्ष्याचे पोटांतील आतड्यादिक सगळें मांस काढून मग त्यात आपलें रेत भरून तो रेतभरित पक्षी एका परळात ठेवून वर दुसरा परळ उपडा घालावा, आणि त्या दोन्ही परळास मुद्रा करून एकातीं सात दिवस ठेवून सात दिवसानंतर परळांतून बाहेर काढून तो कुटून त्याचें पीठ करावें, आणि त्याची गोळी बांधून सुकवावी. मग ती गोळी भक्षणाच्या विधी-प्रमाणें पुरुषानें स्त्रीस दिली असता पुरुषास ती स्त्री वश होईल. आणि त्याच विधीनें स्त्रीनें पुरुषास दिली असतां ती पुरुषासही मोहीत करील, अशी ही उत्तम गोळी सांगितली आहे. असें जो करील त्यास प्रत्यय निश्चयेंकरून येईल.

## ॥ 'लेपविधि' · लेपाचा विधि ॥

### ॥ प्रयोग १ ॥

यः स्वरेतः समादाय रतांते सव्यपाणिना ।
वामपादे स्त्रियोर्लिंपेत्सा तस्य वशगा भवेत् ॥ २० ॥

स्त्रीस भोगिल्यानंतर बाहेर आलेलें आपलें रेत आपल्याच उजव्या हातानें घेऊन स्त्रीच्या डाव्या पायास जो पुरुष त्याचा लेप लावील, त्याजवर त्या स्त्रीची प्रीति वाढून ती पतीस अगदीं वश होऊन राहील.

'शिवस्वरोदय' ग्रंथामध्यें भगवान् श्रीशंकर हे देवी पार्वतीला स्त्रीवशीकरणाचा एक अद्भुत प्रयोग पुढीलप्रमाणें सांगतात : संभोगकार्य चालू असतां वीर्यस्खलनाचे वेळी पुरुषानें आपलें मुख स्त्रीच्या मुखाजवळ चुंबन घेण्याचे निमित्तानें न्यावें म्हणजे मुखाजवळ मुख आणि नाकाजवळ नाक येईल. नंतर संभोगामुळें स्त्रीच्या नाकातून जोराजोरानें बाहेर पडणारा श्वास आपल्या नाकानें आंत ओढावा. त्यानंतर, तत्काल आपल्या नाकातून जोरानें बाहेर पडणारा श्वास तसाच स्त्रीच्या नाकात सोडावा;

स्त्रीनेंहि तो श्वास आपल्या नाकानें आत ओढावा. असा हा प्रयोग जो पुरुष संभोगाचे वेळीं नित्य करीत जाईल, त्या पुरुषाच्या ताब्यात ती स्त्री आयुष्यभर मोठ्या सुखासमाधानानें राहील. संकटकालांतहि त्या पुरुषाला ती स्त्री सोडीत नाहीं. वरवधूंनीं हा प्रयोग जरूर करावा.

॥ प्रयोग २ ॥

या भोगशेषे कांतस्य लिंगं वामांघ्रिणा स्पृशेत् ।
यावदायुर्भवेद्दासः स तस्या नात्र संशयः ॥ २१ ॥

जी स्त्री भोगाची समाप्ति झाली नाहीं तोंच पतीच्या लिंगास आपले डावे पायाचा स्पर्श करीत जाईल,तिला तो पुरुष जन्मभर निःसंशय दासाप्रमाणें होईल.

बृहदारण्यकोपनिषदासारख्या तत्त्वज्ञानप्रधान ग्रंथातहि अशा प्रकारचे वशीकरण-प्रयोग सांगितलेले आहेत.

॥ प्रयोग ३ ॥

कपोतविष्ठासिंधूत्थमधुकैः समभागकैः ।
लिप्त्वा लिंगं भजेद्या सा वशगा स्याद्वरांगना ॥ २२ ॥

कपोतपक्ष्याची विष्ठा, सैंधव आणि मोह, हीं समभाग वाटून लिंगास लेप करून मग ज्या स्त्रीस भोगावी ती अतिसुंदर असून अवश असली तरीहि वश होऊन राहील.

॥ प्रयोग ४ ॥

घनसारं सभल्लूकमेंदूं च मधुना सह ।
पिष्ट्वा लिप्तध्वजी यां च भजेत्सा वशगा भवेत् ॥ २३ ॥

कस्तुरी, पित्तटेट्ट आणि डुमा हीं मधात वाटून त्यानें आपलें लिंग लिप्त करून मग ज्या स्त्रीस भोगावी तीही वश होईल.

॥ ज्यामुळें वशीकरण होतें असा धूप ॥

॥ प्रयोग १ ॥

चंदनं कुंकुमं व्याघ्रिकालांग कुसुमं जलम् ।
देवदारुं च संपिष्य मधुना सह मिश्रयेत् ॥ २४ ॥
चिंतामणिरिति ख्यातो धूपः परममोहनः ।
एष प्रयुक्तो विधिना सर्वकार्याणि साधयेत् ॥ २५ ॥

चदन, कुकू, कोष्ठ, कृष्णागरु, सुवासिक पुष्प, श्वेतवाळा आणि देवदार वृक्षाचें काष्ठ, इतकीं हीं औषधें बारीक वाटून मधात मिश्रित करावीं व नतर वाळवावीं. असें सिद्ध झाल्यास त्याचें नांव चिंतामणी धूप असें आहे. हा धूप सर्वोत्कृष्ट मोहक आहे. याचा प्रयोग यथाविधीप्रमाणें केला असता या धूपाच्या सेवनेंकरून आपलीं सर्व कार्यें साध्य होतील, यांत संदेह नाहीं.

॥ प्रयोग २ ॥

पलासर्ज्जरसस्तार्क्ष्यं चंदनं युवती वचा ।
श्रृंगी चैभिः समैर्धूपात्सर्वं विश्वं विमोहयेत् ॥ २६ ॥

वेलचीदाणे, पाढरे खडे असलेला उची सुगधी ऊद (लोबान), गरुडवेल, चदन, जुईचीं फुलें, वेखड आणि मंजिष्ठ हीं औषधें समभाग कुट्टून एकत्र मिळवावीं. या धुपाच्या वासेंकरून सकल विश्व मोहित होईल; म्हणजे आपणास वश होईल.

॥ वश करणारे मत्र ॥

॥ कामेश्वर मंत्र ॥

पाकामेश्वरेत्युक्त्वा प्रणवोदिततोऽमुकीम् ।
आनयाथानयेत्येवं वश्यतां क्लिंतः पदम् ॥ २७ ॥

॥ मंत्र १ ॥

"कामेश्वर अमुकीं आनय आनय वश्यतां क्लीं"

॥ प्रयोग १ ॥

अथं कामेश्वरो मंत्रः कदंबकुसुमैः सह ।
पलाशकुसुमैर्वाथ संजप्तोऽयुतसंख्यकः ॥ २८ ॥
तथा दशांशहोमेन सर्वसिद्धिप्रदः स्मृतः ।
अनेन जप्तं पुष्पादि दत्तं परममोहनम् ॥ २९ ॥

प्रथम प्रणवयुक्त कामेश्वर असा उच्चार करून नतर अमुक मनोवाछित स्त्रीचें नाम घेऊन मग आनय आनय म्हणजे अमुक स्त्री आण, आण, या प्रकारचा उच्चार करून पश्चात् वश्यकारक क्लीं, हें पद लावावें. याप्रकारें मंत्रोच्चार आहे. या मत्राचा जप दहा हजार वेळां करावा आणि होमास फुलें

कळ्‍ह्याचीं अथवा पळसाचीं असावीं, त्या फुलांचा होम जपाच्या दशांश करावा; म्हणजे हा मंत्र सिद्ध होतो. मग या मन्त्रानें फूल अथवा दुसरा कांहीं सुगंधि पदार्थ मंत्रून जिच्या नांवाचा मन्त्रांत उच्चार केला असेल तिला द्यावा; म्हणजे ती स्त्री वश होईल. हें उत्कृष्ट मोहन आहे.

॥ चामुंडेचा मन्त्र ॥

चामुंडे मोहय चाथ वश्यतां नय चामुकीम् ।
स्वाहा पदांत इत्युक्तश्चामुंडामंत्र उत्तमः ॥ ३० ॥

॥ मंत्र २ ॥

"चामुंडे मोहय वश्यतां अमुकीम्"

या मन्त्रास आदि प्रणव पश्चात् अग्निभार्या दैवी लावून मन्त्रोच्चार करावा; हा चामुंडेचा मन्त्र आहे.

॥ प्रयोग २ ॥

पलाशकुसुमैरेतल्लक्षं जप्त्वा दशांशतः ।
होमेन वामविधिना सर्वे सिद्धिं प्रविंदति ॥ ३१ ॥
इति मंत्रेण जप्तानि सप्तधा कुसुमानि च ।
दत्तानि वशगा कुर्युः कामिनी नात्र संशयः ॥ ३२ ॥

वाममार्गविधीनें या मन्त्राचा एक लक्ष जप करावा. नंतर पळसाच्या फुलांनीं जपाच्या दशांश होम, दशांश तर्पण, असें विधियुक्त अनुष्ठान झाल्यास आपलीं इच्छित सर्व कार्यें सिद्धीस जातील. मंत्रदेवता साध्य होईल. मग या मन्त्रात जिचा नामोच्चार केला असेल, तिला तीं फुलें दिलीं असता, निःसंशय ती कामिनी वश होईल. (शाक्त धर्मामध्यें वाममार्गाचे विधि आहेत.)

॥ पद्मिनी स्त्री वश करण्याचा उपाय ॥

॥ प्रयोग १ ॥

कामेश्वरपदं पूर्वमोंकाराद्यथ मोहय ।
स्वाहांतं क्रमतो मंत्रं नागवल्लीदले लिखेत् ॥ ३३ ॥

प्रणवयुक्त कामेश्वर हें पद पूर्वी, नंतर मोहय, शेवटीं दैवी अग्निभार्या, असें क्रमानें लावून मन्त्रोच्चार करावा. मन्त्र जप करून मन्त्रदेवता सिद्ध

झाल्यानतर आदित्यवारीं विड्याच्या पानावर मधानें कामेश्वर हा मत्र लिहून नतर याच मत्रानें तें पान शभर वेळ अभिमत्रून पद्मिनी स्त्रीस भक्षावयास द्यावें. पद्मिनी स्त्रीची परीक्षा करून असें कृत्य जो पुरुष करील, त्याला ती पद्मिनी निःसंशय वश होईल. (स्त्रियाना वश करण्याचे मंत्र प्राचीन काला-पासूनचे आहेत.)

॥ चित्रिणी वश करणारे उपाय ॥

॥ मंत्र ॥

"विहंगम विहंगम कामदेवाय तस्मै च"
कामदेवाय तस्मै च स्वाहेत्यस्त्रं मनोभुवः ॥ ३४ ॥

या मत्रास मदनास्त्र म्हणतात.

॥ प्रयोग १ ॥

पिष्ट्वा जातीफलं रंभामूलतो येन भावयेत् ।
संशोष्य भानुकिरणैर्नागवल्लीदले क्षिपेत् ॥ ३५ ॥
निमंत्र्यानेन मंत्रेण रविवारे प्रदापयेत् ।
एतद्भक्षणमात्रेण चित्रिणी वशगा भवेत् ॥ ३६ ॥

दोन प्रणवासहित विहगम पद, हें दोन वेळ म्हणून पश्चात् कामदेवाय तस्मै, तदनतर देवी अग्निभार्या असें क्रमानें लावून मंत्र जप करावा. मंत्रदेवता सिद्ध झाल्यावर जायफळाचें चूर्ण केळीच्या मुळाच्या रसांत भिजवून आणि उन्हात बारा दिवस वाळवून मग तें चूर्ण विड्याच्या पानांत घालावें आणि मदनास्त्र या मंत्रानें आदित्यवारीं तें मत्रून चित्रिणी स्त्रीस खावयास द्यावें. तें खाताच चित्रिणी स्त्री वश होईल.

॥ शखिनी स्त्री वश करण्याचा उपाय ॥

॥ प्रयोग १ मंत्रप्रयोग २ 'पच पच' ॥

ततश्चौमोमोमिती च स्वाहांतं च पचद्वयम् ।
अयं महासिद्धमंत्रः कीर्तितः पूर्वसूरिभिः ॥ ३७ ॥
मंत्रेणानेन संजप्तं मूलं तगरसंभवम् ।
श्रीफलं चैव संदद्याच्छंखिनीं वशतां नयेत् ॥ ३८ ॥

या मत्रास आदि तीन वेळ प्रणव लावून नंतर मध्यभागीं 'पच पच' या दोन पदांचा उच्चार करून शेवटीं अग्निभार्या देवी म्हणावी; हा मंत्र मोठा सिद्धिदायक आहे, असें पूर्वीच्या मांत्रिक पडितानीं वर्णन केलें आहे. या मत्राचा जप करून मत्रदेवता सिद्ध झाल्यावर तगराचें मूळ आणि नारळ अथवा वेलफळ, हीं अभिमत्रून शखिनी स्त्रीस भक्षावयास द्यावीं. तिनें तीं भक्षिलीं असतां ती निःसंशय वश होईल.

॥ हस्तिनी स्त्री वश करण्याचा उपाय ॥

॥ प्रयोग १ ॥

कारोधिरीयुग्म च कामदेवाय चेत्यथ ।
तस्मै स्वाहेति कथितो मंत्रः श्रेष्ठो मुनीश्वरैः ॥ ३९ ॥

॥ मंत्र ॥

" धिरि धिरि कामदेवाय तस्मै "
कपोतपक्षं संपिष्य मधुनाथ निमंत्रयेत् ।
मंत्रेणानेन तद्दानाद्धस्तिनी वशगा भवेत् ॥ ४० ॥

या मत्रास आदि प्रणवयुक्त धिरि धिरि, मध्यभागीं कामदेवाय तस्मै, अतिमदेवी अग्निभार्या लावून मत्रोच्चार करावा. हा मत्र महाश्रेष्ठ मुनीश्वरांनीं वर्णिला आहे. मत्र जप करून मत्रदेवता सिद्ध झाल्यावर कवड्याचा पख मधांत वाटून गोळी करावी आणि ती गोळी या मत्रानें मंत्रून हस्तिनी स्त्रीस खावयास द्यावी, म्हणजे ती वश होईल, (मत्र जाणणाऱ्या मत्री पुरुषाकडून या मंत्रांची माहिती करून घ्यावी. म्हणजे मत्रदेवतेची सिद्धि मत्रजपानें कशी होते हें समजेल.)

॥ उटयादिक घ्यावयाचे सुगंध ॥

शरिराची कांतिवर्धन करून शरीरसौंदर्य खुलून संभोगकार्याला उत्तेजन देऊन सुशोभित करणारीं सुगंधी उटणीं विलासी स्त्री-पुरुषानीं आपल्या अंगाला लावणें जरूर असतें. मस्तकांतील ब्रह्मरंध्रामध्यें (मेंदूमध्यें) "कामोत्पादक" ज्ञानतंतु असतात. हृदयामध्यें "कामप्रेरक" ज्ञानतंतु असतात; गुह्येंद्रियामध्यें "कामवर्धक" ज्ञानतंतु असतात. कामोत्तेजक सुगंध हा उत्पादक, प्रेरक, वर्धक अशा या तिन्ही ज्ञानतंतूंचें तत्काळ संयुक्तीकरण करून सर्व शरिरांत कामसंचार होतो. या कामसंचारा-

मुळेंच कामवासनेची प्रचड शक्ति शरिरात उत्पन्न होऊन ही प्रचड शक्ति गुह्येंद्रियामध्यें केंद्रिभूत होतें. नंतर पुरुषाचें शिश्न ताठ होतें. इतकें झाल्यावर मग पुरुष स्त्रीची इच्छा करतो आणि स्त्री पुरुषाची इच्छा करते. अशा कामोत्सुक स्त्री–पुरुषानीं एकत्र येऊन सभोगकार्य केलें नाहीं तर पुढें त्याना 'उन्माद' होतो. यास्तव उन्मादाची अवस्था प्राप्त होऊ नये व शरिरात उत्पन्न झालेली कामवासनेची प्रचंड शक्ति संभोगकार्य करून पूर्णपणें ती शक्ति शात करतां यावी, म्हणून सुगधि उटण्यांचें प्रयोग येथें सागितले आहेत.

**संमूर्छितानुरागाणां रत्युत्सवविलासिनाम् ।**
**कामिनां प्रीतिजनकमंगरागादिकं ब्रुवे ॥ ४१ ॥**

ज्या लोकास प्रीति फारच आहे त्यांस, प्रीति उत्पन्न करणारे जे रति-विलासी त्यास, आणि तसेंच कामी जे मनुष्य असतील त्यास प्रीति उत्पन्न करणारे जे अगरागादिक उपाय ते साप्रत काळीं वर्णितों.

॥ प्रयोग १ ॥

**चंदनोशीरपथ्यार्तिलोध्राम्रत्वक्समुद्भवः ।**
**लेपः स्वेदजदौर्गंध्यं हरत्याशु विलासिनाम् ॥ ४२ ॥**

चंदन, वाळा, हर्ड्यांचें पाणी, लोध्र आणि आंब्याची साल हीं औषधें बारीक वाटून यांचा अंगास लेप केला असता विलासी जनाच्या घामाच्या घाणीचें हरण लवकर होऊन शरिरास सुगध येतो. (सभोगाला स्त्री-पुरुष तयार झाले असता, त्याचे अंगाला, काखेला व मुखाला दुर्गंध येत असेल, तर तो संभोग सुखकारक न होता उलट मनाला उदासीनता आणतो.)

॥ अंगाची घाण दवडणारें औषध ॥

आलिंगन, चुंबन व संभोग या क्रीडा करण्याचें वेळीं स्त्री-पुरुषाचीं शरीरें प्रेमानें परस्पराना अगदीं खेटून मिडलीं आतात. त्यावेळीं त्यांच्या शरिराला दुर्गंध येत असला तर त्यांच्या मनाचा एकदम विरस होतो. विरस झालेलें तें मन वरील क्रीडा करण्यामध्यें रमत नाहीं. मग प्रेमोत्पत्ति कसली होते? म्हणून शरिराची दुर्गंधि नाहींसे करणारे उपाय येथें सागत आहे.

॥ प्रयोग १ ॥

**पथ्यानिंबदलं लोध्रं दाडिमीसप्तपत्रयोः ।**
**वल्कलश्च प्रलेपोयमंगदुर्गंधिनाशनः ॥ ४३ ॥**

हर्डा, निंबाचीं पानें, लोध्र आणि डाळिंबीची व सातविणीची साल हीं औषधें एकत्र वाटून इतक्यांचा लेप अंगास लाविला असता अंगाचा दुर्गंध नाहींसा होतो.

॥ कांखेचा दुर्गंध जाण्याविषयीं ॥

॥ प्रयोग १ ॥

चिंचाफलं करंजस्य बीजैरथ हरीतकी ।
विल्वमूलेन कक्षादिदुर्गंधिहरणं द्वयम् ॥ ४४ ॥

चिंचेचें फळ आणि करंजाच्या बिया अथवा हर्डा आणि बेलमूळ या दोहोंतून कोणा एकाचा कांखेस लेप केला असता कांखेस दुर्गंध येणार नाही.

॥ उन्हामुळें आलेला घर्मगंध जाण्याविषयीं ॥

॥ प्रयोग १ ॥

नागपुष्पागरूशीरकोमलमज्जांबुचंदनैः ।
लिप्तांगं विनिहंत्याशु दुर्गंधं घर्मवारिजम् ॥ ४५ ॥

नागकेसर, अगरु, वाळा आणि चदन इतक्याचा लेप बोरीची अतरसाल कुटून आणि त्याचें पाणी काढून त्या जलातून अंगास लेप केला असता उन लागून आलेला जो घाम, त्याच्या घाणीचें लवकर निवारण करतो.

॥ घाम फार न येण्याचीं औषधें ॥

॥ प्रयोग १ ॥

खगं पिलुतरोः पुष्पं तथा जंबुफलं समम् ।
एतद्देहो निदाघे तु लिप्तं घर्मांबुनाशनम् ॥ ४६ ॥

अक्रोड वृक्षाचें अगलित फूल आणि जांभळीचें फळ हीं समभाग वाटून उष्ण काळीं अंगास लावीत गेलें असता घाम फार येणार नाहीं.

॥ प्रयोग २ ॥

पिचुमंददलांभोजलोध्रदाडिमवल्कलैः ।
निदाघकाले लिप्तांगं घर्मवारिचयं जयेत् ॥ ४७ ॥

कडू लिंबाचीं पानें, कमलमूळ, लोध्र आणि डाळिंबाची साल इतक्यांचा शरिरास लेप केला असताही उष्ण काळांत फार घाम येणार नाहीं.

॥ प्रयोग ३ ॥

**शिरीषकेशरोशीरलोध्ररंगविलेपनात् ।**
**तद्भक्षणाच्च घर्मांबु निदाघे नैव विंदति ॥ ४८ ॥**

शिरस वृक्षाचे केसर, वाळा आणि लोध्र हीं औषधें वांटून अगास लावून पोटातही खात गेलें असता घाम येणार नाहीं.

॥ स्नानाचें सुगंधी तेल ॥

**विल्वपत्रं मरुबकमशोककुसुमानि च ।**
**क्रमात्पुष्पाणि केतक्याः क्षिप्त्वा तैले निधापयेत् ॥ ४९ ॥**
**आतपे शुष्कपुष्पाणि ततो निष्कासयेन्नरः ।**
**महापरिमलं तैलं ख्यातं योग्यं विलासिनाम् ॥ ५० ॥**

तिळाच्या तेलामध्यें पहिल्यानें बिल्वपत्रें टाकून तें तेल उन्हात ठेवावें आणि तीं पानें सुकलीं म्हणजे बकुल पुष्पें आणि मरवा टाकावा, तोही अगदीं सुकून गेल्यावर अशोकाचीं फुलें घालावीं, तींही सुकल्यावर केवडे घालावे, तेही केवळ सुकून गेले म्हणजे तें तेल सुगंधि होतें. त्यानतर उन्हातून लवकर काढावें आणि त्यातून सुकलेलीं फुलेही काढून टाकावीं. हें तेल महापरिमल-सुगंधिप्रसिद्ध आणि विलासी जनास फार उत्तम योग्य आहे. (संभोगाचे वेळी संभोगाला उत्तेजन येईल असा कामोत्तेजक सुवास मिळणें अवश्य आहे. त्या योगें स्त्री-पुरुषाचें मन संभोगात रमून प्रसन्न राहातें.)

॥ सुगंधी उटणें ॥

॥ प्रयोग १ ॥

**एलांबुदनखस्वर्णमांसीकर्चूरपत्रकैः ।**
**स्नात्वा सुगंधं परमं मूर्धजानां प्रविंदति ॥ ५१ ॥**

वेलचीदाणे, नागरमोथा, नखला, सोनकेवडा, जटामासी, कचोरा आणि तमालपत्र, हीं एकत्र वाटून याचें उटणें शरिरास लावून स्नान केलें असता केंसांना उत्तम सुगंध येत राहील.

## ॥ पंधरा दिवसपर्यंत वास येणारें उटणें ॥

### ॥ प्रयोग २ ॥

धात्रीस्वर्णाघनोशीरपथ्यामांसीविलेपनैः ।
स्नात्वा मासार्धमाधत्ते केशसौरभ्यमुत्तमम् ॥ ५२ ॥

आंवळकाठी, सोनकेवडा, नागरमोथा, वाळा, बाळहर्डा आणि जटामासी याचे उटण्यानें स्नान केलें असतां पंधरा दिवसपर्यंत केंसांना वास येत असतो.

## ॥ दुसरे सुगंध ॥

### ॥ प्रयोग १ ॥

चंदनैलासटीपत्रशिग्रुपथ्यांबुतोयदैः ।
सामयैर्लेपयुक्तोयं सुगंधः कामिवल्लभः ॥ ५३ ॥

चंदन, वेलचीदाणे, कचोरा, तमालपत्र, शेवग्याच्या बिया, हर्ड्यांचें पाणी, नागरमोथा आणि वाळा, ही समभाग एकत्र वाटावीं, या औषधींचें उटणें फार सुगंधी असतें व कामी लोकांना प्रिय असा हा सुगंध आहे.

### ॥ प्रयोग २ ॥

कर्पूरं कुंकुमं लोध्रं स्थैर्णेयं जलमंबुदः ।
उशीरश्च समैरेभिर्लेपस्यात्सुरभिः परः ॥ ५४ ॥

कापूर, कुंकू (पिंजर), लोध्र, लोहबाण (सुगंधि ऊद, धूप), वाळा, नागरमोथा, या समभागांचें उटणें सर्वोत्कृष्ट सुगंधि आहे.

### ॥ प्रयोग ३ ॥

पत्रांबुचंदनोशीरकृष्णागरुसमुद्भवः ।
लेपः कृतोयमंगेषु सौरभ्य परमं दिशेत् ॥ ५५ ॥

तमालपत्र, वाळा, चंदन, काळा वाळा आणि कृष्णागरु यांचें उटणें अंगास लाविलें असतां सर्वोत्कृष्ट सुगंध येईल.

## ॥ सर्वोत्तम सुगंध ॥

### ॥ प्रयोग १ ॥

कस्तूरीनागकुसुमं शैलेयं चंदनं घनः ।
श्रीवासः कनका चंद्रो जातीस्थौणेयपूतिकम् ॥ ५६ ॥
सुलक्ष्णपिष्टैरेभिस्तु नागवल्लीदलोद्भवैः ।
रसैर्लेपः सुगंधोयमुक्तो योग्यो महीभुजाम् ॥ ५७ ॥

कस्तुरी, नागकेसर, शिलारस, चदन, नागरमोथा विशेषधूप, कणेरी, कापूर, जायफळ आणि लोहबाण या औषधाचें फार बारीक चूर्ण करून विड्याचे पानाच्या रसांत अंगास लेप करावा. हा सुगध राजांना फार उत्तम सागितला आहे. अर्थात् इतर जनासही उत्तम आहेच.

## ॥ राजमान्य सुगंध ॥

### ॥ प्रयोग २ ॥

स्वात्तोह्यस्य भागैकं पथ्याभागचतुष्टयम् ।
व्याधिक्षौणेयचंद्राणां प्रत्येकं भागयुग्मकम् ॥ ५८ ॥
शिलात्मजस्य पंचस्युर्नवभागा नखस्य तु ।
एभिरुक्तः सुगंधोयं कस्तूरीदलसंज्ञकः ॥ ५९ ॥
नखपथ्यामयांमोदमांसीमिसिकरंजकः ।
समाः स्वर्णाभसोरुक्तं प्रत्येकं भागयुग्मकम् ॥ ६० ॥
कर्पूरागरुकस्तूरीजातीक्षौणेयकस्य च ।
भागत्रिकं स्यात्प्रत्येकं सर्वैरेभिरिहोच्यते ॥ ६१ ॥
लेपः सौरभ्यगर्भाख्यः सर्वलोकमनोरमः ।
भूभुजामेव योग्योयमन्येषां दुर्लभः स्मृतः ॥ ६२ ॥

नागरमोथा १ भाग; हर्डी ४ भाग; कोष्ठ, लोहबाण आणि कापूर हीं तिन्ही दोन भाग; शिलारसाचे ५ भाग आणि नखला ९ भाग; अशीं पाच औषधें घेऊन मिश्रित करावीं. या सुगधास कस्तुरीचा तुकडा असें नाव आहे. नखला, हर्डी, वेखड, नागरमोथा, जटमासी, शोपा आणि करजीचें बीं, हीं प्रत्येक एकेक भाग; सोनकेवडा, पाणी याचे दोन दोन भाग; कापूर, आगरु, कस्तुरी, जायफळ आणि लोहबाण इतक्याचे तीन तीन भाग घेऊन मिश्र करावे आणि एकत्र करून वाटावे. या उटण्याचें नाव सुगधगर्भ असें

आहे. हा सुवास सर्वांस मनोरम खरा, परंतु सकळ जनास मिळणें अवघड; यास्तव पृथ्वीपतीलाच हा योग्य आहे.

## ॥ मुखास वास येण्याचे उपाय ॥

### ॥ प्रयोग १ ॥

त्वक्पत्रैलानखस्वर्णाजातिभिः कारयेद्वटीम् ।
तांबुलयुक्ता सा भुक्ता वक्त्रं सुरभितां नयेत् ॥ ६३ ॥

कल्मीदालचिनी, जायपत्री, वेलदोड्याचे दाणे, नखला, सोनकेवडा आणि जायफळ इतकीं औषधें एकत्र कुटून त्या गोळ्या विड्याबरोबर खाव्या म्हणजे तोंडास निरंतर सुवास येत राहील. (काहीं पुरुष व स्त्रिया अशा असतात कीं, त्याच्या मुखाला अत्यत दुर्गंध येतो. संभोगाचे वेळीं किंवा चुबनाचे वेळीं मुखाला असा दुर्गंध आल्यास प्रेम नाहींसें होतें.)

### ॥ प्रयोग २ ॥

केशरं कोलमज्जा च क्षौणेयं जातिसस्यकम् ।
वटिका मधुनैतेषां कृता वक्त्रं सुवासयेत् ॥ ६४ ॥

केशर, कक्कोळगर्भ, लोहबाण (उची ऊद), जायफळ आणि धणे हे वाटून याची गोळी मधांत खडून भक्षण केली असताही पूर्वीप्रमाणेंच मुखास सुवास येईल असें समजावें.

### ॥ प्रयोग ३ ॥

मुराकिंजल्ककुष्ठाणां चूर्ण लीढं हि संध्ययोः ।
कर्पूरगंधिवदनं कुर्यान्मासार्धतो ध्रुवम् ॥ ६५ ॥

एकांगी मुरा, नागकेसर आणि कोष्ठ याचें चूर्ण करून सकाळीं आणि सायकाळीं असें दोन वेळां पोटात घेत जावें, म्हणजे पधरावे दिवशीं मुखाला कापुराप्रमाणें सुवास येऊं लागेल.

### ॥ प्रयोग ४ ॥

कांबोजिबीजकुष्ठोत्थं चूर्णं मधुघृतान्वितम् ।
यो लेढि मासं तद्वक्त्रं केतकीगंधवद्भवेत् ॥ ६६ ॥

तावडी गुंज आणि कोष्ठ याचें चूर्ण मधांत आणि तुपात महिनाभर सकाळीं आणि संध्याकाळीं पोटात घेत गेलें असतां मुखास केतकाप्रमाणें सुगंध येऊ लागेल.

'कोष्ठ' हें सुगंधि असून गुजराती भाषेंत याला उपलेट म्हणतात.

॥ प्रयोग ५ (सर्वोत्तम) ॥

**आम्रपत्ररसे क्षारं मार्गवृक्षभवं क्षिपेत् ।**
**संशोष्य भानुकिरणैर्भक्षेत्तांबूलमध्यगम् ॥ ६७ ॥**
**प्रातः प्रतिदिनं यस्तु सुगंधि स्यात्तदाननम् ।**
**सर्वेषु मुखवासस्य योगोऽयमनुत्तमः ॥ ६८ ॥**

आंब्याच्या पानाच्या रसात अपामार्ग वृक्षाचा किंचित् क्षार टाकून उन्हात बारा दिवस सुकत ठेवावा. सुकून गेल्यानतर विड्यांत खात जावा. हा रसयुक्त विडा प्रत्यहीं सकाळीं जो खात जाईल त्याचे मुखास उत्तम सुवास येईल. सगळ्या मुखवासापेक्षा हा उत्तम प्रयोग तोंडास सुवास देणारा आहे.

आंब्याच्या पानानें दांत घासण्याची पद्धत पूर्वीच्या लोकाची होती. कारण आंब्याचीं पानें मुखदुर्गंध नाहींसा करतात. दात आणि जीभ स्वच्छ होते.

**इति श्रीमल्लाडनवलविनोदाय महाकविकल्याणमल्लविरचिते**
**अनंगरंगवशीकरणादिनिरूपणं नाम सप्तमः स्थलः ॥ ७ ॥**

याप्रकारे राजाधिराज जो लाड राजा त्याच्या विनोदार्थ श्री कविराज कल्याणमल्ल-रचित अनंगरंग ग्रंथातील वशीकरण विषयक वर्णनाचे सातवे स्थल पूर्णतेस पावले.



प्रकरण आठवें

## ॥ वधू कशी असावी याविषयीं ॥

येथपर्यंत कामशास्त्राचें विवेचन करून राजर्षि कल्याणमल्लकवि आता यापुढें धर्ममान्य विवाह प्रकरणास आरंभ करीत आहेत.

॥ वधूचे गुण ॥

विद्याशौर्यविवेकधैर्यमहिते शुद्धस्वधर्मस्थिते ।
विख्याते धनधान्यवैभवयुते जाता समाने कुले ॥
कन्या दोषविवर्जिता गुणवती सभ्रातृका सुंदरी ।
सद्भिः शास्त्रविधानतः स्मरकलायोग्या विवाहात्सदा ॥ १ ॥

ज्या कुलात विद्या चागली, शूरत्व, विचार, धैर्य, शुद्ध आचार, स्वधर्मानें जगामध्यें प्रसिद्ध, धनधान्य आणि थोरपणा यानीं युक्त, अशा समान कुलामध्यें उत्पन्न झालेली, दुर्गुणरहित, सद्गुणयुक्त, बंध्यादिकासहित, स्वरुपानें सुदर, कामशास्त्र जाणणारी, अशी जी कन्या असेल, ती विवाहास योग्य. विचक्षण पुरुषानें शास्त्राप्रमाणें त्या कन्येशीं अवश्य विवाह करावा.

विवाहसस्थेंत नागरिकांना अत्यत आवश्यक असलेली दापत्यव्यवस्था आणि गृहव्यवस्था उत्तम प्रकारची सुव्यवस्थित रहात असल्यामुळें अनुरूप अशा पुरुषाशीं विवाहबद्ध होणें हेंच शुद्ध शील, पवित्र आचरण असलेल्या स्त्रियाना सन्माननीय होय, असें धर्मशास्त्रकाराचें मत मान्य करून राजर्षि कल्याणमल्ल हे विवाहप्रकरणास सुरवात करीत आहेत. स्वरुपानें सुंदर, सद्गुणयुक्त, शुद्ध आचार त्याचप्रमाणें विद्या चागली, शूरत्व, धैर्य, धनधान्यांनीं युक्त हे सर्व गुण विवाहेच्छु तरुणांचीं मनें आकर्षित करतात, म्हणजे अशा ह्या वरील गुणानीं युक्त असलेल्या कन्येशीं आपला विवाह झाला तर आपण खरोखर भाग्यशाली होऊं, अशी स्फूर्ति यांचे अंतःकरणात निर्माण होते. अशा कन्येशीं तरुणानें जरूर विवाह करावा असें कल्याणमल्ल सागतात. उत्सवादि मंगल कार्याच्यासमयीं प्रसंगानुसार शालीनतेला शोभेल असा नीटनेटका–आकर्षक पोषाख आणि केशभूषा करून विवाहेच्छु कन्येनें आपल्या अंगीं असलेल्या या वरील गुणाचें योग्य तऱ्हेनें म्हणजे स्त्रीसुलभ शालीनतेचा भंग होणार नाहीं असें मोठ्या कुशलतेनें प्रदर्शन करावें. यायोगें तरुणांचीं मनें तिच्याकडे आकर्षित होतील.

'कामशास्त्र जाणणारी' कन्या असली म्हणजे आपल्या नवऱ्याच्या संभोगाच्या आवडी-निवडी कशा आहेत, कोणत्या कामशास्त्रीय उपायानें नवऱ्याचें प्रेम आणि चित्त आपल्याच ठायीं पूर्ण रमेल, मदनदेवतेची कोणती उपासना केली असता नवऱ्याचें प्रेम आपण पूर्णपणें जिंकू, या सर्वांचे शास्त्रीय उपाय तिला माहीत असतात. आपला नवरा परस्त्रीकडे नेहमीं निरखून कां पाहातो ? आपल्यावरील प्रेम कमी झालें आहे काय ? या सर्वांचें बारकाईनें निरीक्षण करून त्यांतील खरें कारण नवऱ्याला समजूं न देता मोठ्या युक्तीनें ती शोधून काढते व तें कारण नष्ट करून नवऱ्याचें चित्त आपल्याकडे आकर्षण करून घेऊन संभोगाविषयींच्या आपल्या नवऱ्याच्या अपेक्षा पूर्ण करिते. हीं लक्षणें कामशास्त्र जाणणाऱ्या सुशिक्षित भार्येची असतात. याच्या उलट लक्षणें कामशास्त्र माहीत नसलेल्या अशिक्षित भार्येची असतात. असा हा सुशिक्षित भार्या आणि अशिक्षित भार्या याच्यामधील महत्त्वाचा फरक आहे.

कामशास्त्र जाणणारी कन्या आपल्या नवऱ्याची मर्जी सभाळून त्याचें प्रेम पूर्ण जिंकते व संसाराचा भार वाहून आपला संसार सुखाचा करिते. दंडी कवीनें आपल्या दशकुमार चरित्रातील उत्तरपीठिका षष्ठोच्छ्वास यामध्यें असें एक उदाहरण दाखविलें

आहे कीं, "शक्तिकुमार नांवाच्या एका श्रीमत वैश्यपुत्रावर एका तरुण सौंदर्यवान् व कामकलानिपुण वेश्येनें आपलें मोहजाल पसरलें. त्यायोगें तो वैश्यपुत्र त्या वेश्येच्या नादीं पूर्णपणें लागला. आपला नवरा त्या वेश्येच्या मोहजालांतून सुटणें अशक्य आहे असें शक्तिकुमाराच्या भार्येला हें सर्व समजून आल्यावर ती विचार करूं लागली कीं, या वेळीं मीं योग्य ती सावधगिरी बाळगिली नाहीं, तर सर्व संपत्ति वेश्येच्या घरात जाईल, नवऱ्याची तारांबळ होईल, मला व माझ्या पतीला शेवटीं दारिद्र्यात दिवस काढावे लागतील. तेव्हा त्या वेश्येलाच घरीं आणून सख्ख्या बहिणी-प्रमाणें तिला मानून तिच्यासह गोडीगुलाबीनें राहिलों, तर आपली धनसंपत्ति घराबाहेर जाणार नाहीं, दारिद्र्याचा दुःखदायक प्रसंग येणार नाहीं, नवऱ्याचें प्रिय आणि त्याचें लैंगिक जीवन सुखी केल्यामुळें त्यावर आपलें वजन राहील व तो आपल्या ताब्यांत राहील. अशा रीतीनें त्रिकट प्रसंगींही चतुराईनें नवऱ्याचें प्रेम जिंकून आपला संसार तिनें सुखावह केला." संसाराचा भार वहाणारी अशी ती रतितत्त्वज्ञ भार्या होती.

वरच्या श्लोकात कन्या गुणवती सुंदर असावी असें सांगितलें आहे. आणि सुरेख म्हणजे काय, कसकसे अवयव असले म्हणजे सुरेख म्हणावें तें समजण्याकरितां सुरेखपणाचीं लक्षणें सांगतों.

**नीलांभोरुहपत्रकांतिरथवा स्वर्णप्रभाभासुरा ।**
**भृंगीनीलशिरोरुहा शशिमुखी सारंगशावेक्षणा ॥**
**स्याद्यस्यास्तिलजप्रसूनसदृशी नासा सुदंतावली ।**
**सुश्रोत्री पिकभाषिणी च जलजग्रीवाऽथ बिंबाधरा ॥ २ ॥**
**चक्राद्यंकितशोणपाणिचरणा क्षामोदरी स्वल्पभुग् ।**
**रंभास्तंभमनोरमोरुयुगला श्रोण्या बृहत्यान्विता ॥**
**नाभ्या चैव सुनिम्नया गजगतिः शांताऽल्पनिद्रालसा ।**
**शीलाढ्या सुकुमारिका नरवरैः कन्या विवाहात्सदा ॥ ३ ॥**

ज्या कन्येचे मुख चंद्रासारखें आल्हादकारक, नेत्र हरणाच्या बालकाच्या नेत्राप्रमाणें सुरेख, नाक तिळाचे पुष्पासारखें नाजूक, दात हिऱ्यासारखे तेजस्वी, कान शोभायमान, भाषण कोकिळेसारखें मंजूळ, मान शंखासारखी त्रिवळीयुक्त, अधरोष्ठ पिकलेल्या तोंडल्यासारखा तांबडा, केस भ्रमरासारखे नीलवर्ण, कांति निळे कमळाचे पत्राप्रमाणें श्यामवर्ण अथवा सुवर्णासारखी गोरवर्ण, शरीर तेजस्वी, हात आणि पाय आरक्त असून चक्रादिक चिन्हांनीं युक्त, उदर कृश, जेवण थोडें, मांड्या कर्दलीस्तंभासारख्या मनोहर, कुल्ले मोठे, बेंबी खोल, चालणें गजगतीप्रमाणें मंद असून जलद, वृत्ति शांत, निद्रा

थोडी, आलस्यरहित, स्वभाव चांगला, या लक्षणानीं युक्त जी कन्या ती उत्तम प्रकारची नवरी. तिच्याशीं बुद्धिमान् पुरुषांनीं विवाह निःसंशय करावा.

कुल्ले म्हणजे ढुंगण. हा पार्श्वभाग मोठ्या वाटोळ्या गोलाकार स्तनाप्रमाणें उन्नत असा पाहिजे. त्यायोगें चालतांना त्या स्त्रीचे दोन्ही कुल्ले समुद्राच्या लाटेप्रमाणें खालीं वर आणि एकदां या बाजूला एकदां त्या बाजूला असे हालताना दिसतात. त्यामुळें ती स्त्री शोभायमान दिसते. तिला 'सुश्रोणी' म्हणतात. याला 'Kallipygy' म्हणतात. 'सुश्रोणी' होण्यासाठीं ढुंगणावर ज्या कापडी पट्ट्या बांधतात, त्याना bands for posteriors म्हणतात (used to tie up too fully developed buttocks and raise them and make them more prominent).

### ॥ कन्येची दूषणे ॥

दुर्गुणी कन्या विवाहास अयोग्य, हें कळण्याकरितां दुर्गुणाचे कथन करितों.

क्रूरा पिंगलकेशलोचनवती खर्वाऽतिदीर्घा कृशा ।
लंबोष्ठी पृथुकंधराऽतिबहुभुक् श्यामाधरा दंतुरा ॥
वाचाला विषमस्तनी द्रुतगतिः शूर्पश्रवा कोपिनी ।
रूक्षा पल्लवजिव्हिकाऽतिकठिना सा श्मश्रुला लोमशा ॥ ४ ॥
निद्राशोकवती सदार्थवचने कस्याः प्रकंपोधरे ।
हास्ये चातितरंगितो प्रभवतो गल्लौ भृशं चंचला ॥
अंगुष्ठाद्धिका भवेत्तदुपगा पादे तथानामिका ।
स्त्या नो धरणीं स्पृशेदथ भवेन्मध्या तु हीनाग्रका ॥ ५ ॥
अज्ञाता गिरिपक्षिभूरुहनदीनक्षत्रसंज्ञा च या ।
प्रौढा रोगसमाकुला च सरलभ्रूवल्लरी निस्त्रपा ॥
गंडौ कूपयुगान्वितौ विदधती हीनाऽधिकांगी तथा ।
दुःशीला च विवाहकर्मणि सदा त्याज्याऽबला पंडितैः ॥ ६ ॥

ज्या कन्येचा स्वभाव क्रूर, केस पिंगटवर्ण, नेत्र घारे, शरीरबांधा अत्यंत ठेंगणा अथवा अति उंच, शरीरानें कृश, ओंठ लांब, मान उंच, जेवण पुष्कळ, अधरोष्ठ काळा, दांत लांब व ओंठाबाहेर आलेले, फार बोलणें, एक स्तन मोठा तर एक लहान, अथवा एक वर-एक खालीं, चालणें तुरतुरीत, कान सुपासारखे, स्वभाव कोपिष्ट, सर्वकाळ शरीर रूक्ष, जीभ तोंडाबाहेर लळलळीत, शरीर फार राकट, तोंडावर मिशी-दाढी, सर्वांगावर लोंकर पुष्कळ म्हणजे केंसाळ, सर्वदा निद्राळु, निरंतर कष्टी, बोलताना अधरोष्ठ कांपतो, हासणें

गालाबाहेर खदखदित, स्वभावानें अतिचपळ, पायाचें अंगुष्ठाजवळचें बोट आगळ्यापेक्षा मोठें, शेवटचें आणि मधलें हीं दोन पायाची बोटें चालताना जमिनीस लागत नाहींत, मधली आंगठी अग्ररहित, प्रपचांत समजूत कमी असा अज्ञानपणा; पर्वत, पक्षी, वृक्ष, नदी, नक्षत्रें या नावाची म्हणजे गोवर्धनी, चिमणी, अंबा, तरंगिणी, रेवती या प्रकारची, प्रौढ दशेंत फार आलेली, निरंतर रोगिष्ठ, भिवया सरळ, लज्जारहित, हसताना दोन्ही गालास खाडे, काहीं अवयव कमी, काही अवयव अधिक, स्वभाव दुष्ट, या दुर्लक्षणानीं युक्त जी कन्या असेल ती प्राज्ञ पुरुषानें सर्वथा करू नये; ती विवाहकर्मी अवश्य त्यागावी.

## ॥ सामान्य पुरुषांचीं लक्षणें ॥

**यथा चतुर्भिः कनकं परीक्ष्यते निर्घर्षणच्छेदनतापताडनैः ।**
**तथा चतुर्भिः पुरुषं प्रतीक्षते श्रुतेन शीलेन गुणेन कर्मणा ॥ १ ॥**

प्रथम पुरुषाची परिक्षा करावी. ती कशी? सोनें जसें चार प्रकारानीं पाहतात–पहिल्याने कसोटीला लावतात, नंतर कापतात, तदनंतर तापवतात, त्यानतर हातोड्यानें ताडन करून पाहतात, तशी पुरुषाची चार प्रकारें परीक्षा करावी. प्रथम दुसऱ्यापाशीं त्याचें शिक्षण विचारावें, नतर त्याचा स्वभाव पहावा, त्यानतर गुण पहावा, पश्चात् त्याची कृति (नोकरीधदा) पहावी, अशा चार परीक्षेला उतरेल तो उत्तम.

## ॥ गुणाचें वर्णन ॥

जो पुरुष अल्प कार्य किंवा महत्कार्य करावयाची इच्छा करितो, त्यानें सिंहासारखें शूरत्व धरून तें कार्य करावें. गुण १. काहींएक कार्य करणें असल्यास पूर्वी देशकाल पाहून मग बकपक्षासारखें इंद्रियाचें नियमन करून कार्यारंभ करावा म्हणजे कार्य साधून येतें. गुण २. प्रातःकाळीं आपण लवकर उठून दुसऱ्यास जागें करावें हा एक ३. युद्धप्रसंगीं शूरपणा हा एक ४. कांहीं पदार्थ भक्षण करणें असल्यास पूर्वी बंधवादिकांचा विभाग काढून नतर स्त्रीस देऊन भक्षण करणें हे. ५।६. मैथुन गुप्त हा एक ७. सर्व कार्यांच्या ठायीं धीरपणा हा एक. ८. ज्या ज्या काळीं जी जी वस्तु मिळते तिचा तिचा संग्रह करणें हा एक ९. धनधान्यद्रव्याचें वैभव प्राप्त झालें असतां उन्मत्तता न धरणें १०. अप्राप्य वस्तूंच्या ठायीं विश्वास न धरणें हा एक ११. आहार फार असला तथापि कोणे काळीं अल्प मिळालें तरी संतुष्ट हे १२।१३. निद्रा फार असली तथापि

पाहिजे त्या वेळेस जागृत होणें हे. १४।१५. अन्याचे कामाविषयीं तत्पर हा एक १६. चोरादिक प्रसगीं परावृत न होणें हा एक. १७. आपण श्रमी आहें आणि भारवाह प्रसग पडल्यास थंडी–ऊन न पाहतां भार वहाणें हे. १८।१९. कसाही प्रसग पडो, तथापि निरंतर संतोष असणें हा एक २०. या प्रकारें वीस गुण पुरुषास असल्यास तो पुरुष उत्तम असा जाणावा.

॥ जांवयाचीं लक्षणें ॥

विद्याशौर्यधनाश्रयो गुणनिधिः ख्यातो युवा सुंदरः ।
साचारः सुकुलोद्भवो मधुरवाग्दाता दयासागरः ॥
भोगी भूरिकुटुंबवान् स्थिरमतिः पापार्तिहीनो बली ।
जामाता परिवर्णितः कविवरैरेवंविधिः सोत्तमः ॥ ७ ॥

विद्या फार, कुटुंब मोठें, बुद्धि स्थिर, दयेचा केवळ सागर, शक्त्यनुसार दानधर्म करणारा, भाषण मधुर, स्वधर्माचारसंपन्न, उत्तम कुलामध्यें उत्पन्न झालेला, स्वरूपानें सुदर, वयानें तरुण, जगामध्यें प्रसिद्ध, गुणांची केवळ खाण, कार्याविषयीं शूरपणा, संपत्तिवान्, लक्ष्मीभोक्ता, बलवान्, पाप आणि दारिद्र्य पिढींत ठाऊक नाहीं असा जो पुरुष तो कन्यादानास योग्य; या प्रकारें जावयाचें कविश्रेष्ठांनीं वर्णन केलें आहे.

ज्या तरुणाला आपली कन्या द्यावयाची त्या तरुणाचें कुल, शील, कुटुंब, विद्या, धनसपत्ति, उद्योग-व्यवसाय, या सर्वांची पूर्ण माहिती मिळण्यासाठीं बारकाईनें पूर्ण चौकशी प्रथम करावी. समाधानकारक खात्रीची माहिती मिळाल्यानंतरच कन्या देण्याचें निश्चित करावें. नाहीं तर फसगत होऊन कन्येच्या आयुष्याचा, संसारिक जीवनाचा नाश होईल.

॥ जामाताचीं वाईट लक्षणें ॥

वृद्धो दुर्व्यसनो दयाविरहितो रोगी महापापवान् ।
षंढो दुष्कुलोद्भवश्च पिशुनो द्यूतेऽतिबद्धस्पृहः ॥
दारिद्रः कृपणोऽतिचंचलमतिर्नित्यं प्रवासी ऋणी ।
भिक्षुः स्नेहविवर्जितः सुमतिभिः कार्यो वरो नेदृशः ॥ ८ ॥

जो पुरुष वयातीत म्हणजे म्हातारा, दुर्व्यसनी, दयाविरहित, महारोगानें ग्रस्त, मोठमोठीं पातकें करणारा, नपुसक, दुष्ट कुलांत उत्पन्न झालेला, दुसऱ्याचे सद्गुण टाकून दोष प्रकट करणारा, द्यूत खेळण्यास फार उत्सुक

(जुगारी), दरिद्री, सर्व गोष्टींविषयीं फार कृपण, बुद्धीस शाश्वती नाहीं म्हणजे फार चंचल, नेहमीं प्रवास करणारा, कर्जबाजारी, भिकारी आणि स्नेह सहज तोडून वरचेवर कज्जे करणारा; इतक्या प्रकारचा जो पुरुष असेल, त्याला ज्ञाते पुरुषानीं आपली कन्या देऊं नये

म्हातारा, दुर्व्यसनी, रोगी, नंपुसक, नित्य प्रवासी अशा पुरुषाच्या तरुण बायकांजवळ त्याच्या शेजारचे जवळचेच तरुण पुरुष गुप्तपणें संभोग करतात. जुगार खेळून सर्वस्व गमावलेल्या पुरुषाच्या बायकोजवळ त्याचेच धनिक मित्र संभोग करतात. अत्यंत कर्जबाजारी झालेल्या दरिद्री पुरुषाच्या सुंदर व तरुण बायकोजवळ त्या पुरुषाला वेळोवेळीं कर्ज देणारा संभोग करतो. व्यापारी, धर्मोपदेशक, सैनिक व खलाशी वगैरे लोकाना व्यवसायानिमित्त आपापलीं घरें सोडून दीर्घकाल प्रवास करावा लागतो. हे लोक प्रवासामध्यें जेथें जातील तेथें आपापली कामवासना भाडोत्री बायकांशीं समागम करून पूर्ण करून घेतात, मग साहजिकच घरीं असलेल्या बायकोकडे दुर्लक्ष करितात. अशाना कन्या देऊं नये. अशीं दूषणें ज्याच्या ठायीं दिसत आहेत अशा पुरुषाला कन्या दिली असतां आपल्या कन्येची हौस पुरविण्यास तो पुरुष असमर्थ असतो. त्या कन्येला शेवटीं शीलभ्रष्ट होऊन दारिद्र्यावस्थेंत दुःखाचे दिवस काढावे लागतात.

## ॥ स्त्री-पुरुषांचीं सामुद्रिक लक्षणं ॥

अथातः संप्रवक्ष्यामि सुभगं पुरुषस्त्रियाः ।
सामुद्रिकं त्विदानीं च सलक्षणमनुत्तमम् ॥ १ ॥

यानतर साप्रतकाळीं लक्षणासहवर्तमान उत्तम प्रकारचें श्रेयस्कर स्त्री-पुरुषांचें सामुद्रिक सांगतों.

पूर्वमायुः परीक्षेत पश्चाल्लक्षणमेव च ।
आयुर्हीननरस्त्रीणां लक्षणैः किं प्रयोजनम् ॥ २ ॥

पूर्वीं स्त्री-पुरुषाचें आयुष्य पाहून नतर उभयतांचें लक्षण पहावें. कारण आयुष्यरहित जी स्त्री-पुरुषें त्याचीं उत्तम लक्षणें पाहून काय करावयाचें ? यासाठीं आयुष्यपरीक्षा सांगतात.

## ॥ पुरुषाचें सामुद्रिक ॥

कनिष्ठांगुलिमूले च रेखा गच्छति तर्जनीम् ।
अविच्छिन्नानि वर्षाणि शतायुः स विनिर्दिशेत् ॥ ३ ॥

प्रत्येक हातापायास बोटें पाच. त्याचीं नावें अंगुष्ठ म्हणजे आगठा, तर्जनी म्हणजे आगठ्याजवळचें बोट, मध्यमा म्हणजे मधलें बोट, अनामिका म्हणजे मध्यमेच्या पुढचें बोट आणि कनिष्ठिका म्हणजे शेवटचें बोट, अशीं पाच बोटें; ज्या पुरुषाच्या हातावर कनिष्ठागुलीचे मुळापासून तर्जनी-पर्यंत रेषा असेल त्या पुरुषास अविच्छिन्न शभर वर्षे आयुष्य असतें असें समजावें.

**कनिष्ठांगुलिमूले च रेखा गच्छति मध्यमाम् ।**
**अविच्छिन्नानि वर्षाणि षष्टिमायुर्विनिर्दिशेत् ॥ ४ ॥**

ज्या पुरुषाचे कनिष्ठागुलीचे मुळापासून मध्यमागुलीपर्यंत अकुंठित रेषा आहे, त्या पुरुषास साठ वर्षें आयुष्य असतें.

**रेखाभिर्बहुभिः क्लेशं स्वल्पाभिर्धनहीनता ।**
**रेखाचतुष्टयं सौख्यं बहुरेखा दरिद्रता ॥ ५ ॥**

ज्या पुरुषाच्या हातावर फार रेषा आहेत त्या क्लेशकारक, थोड्या असल्यास धननाश, चार आहेत तर बहुत सुखदायक, चारापेक्षा अधिक असल्यास दरिद्रदशादायक होय.

**अगुष्ठोदरमध्यस्थो यवो यस्य विराजते ।**
**उत्पन्नभक्षी भोगी च स नरः सुखमोदते ॥ ६ ॥**

ज्या पुरुषाच्या हाताच्या आगठ्यावर व हृदयावर यवांकित रेषा उत्तम शोभते, तो पुरुष स्वकष्टार्जित अन्न भक्षण करील आणि आपणच संपादन केलेले भोग भोगून निरतर सुखी राहील.

**न श्रीस्त्यजति रक्ताक्षं तथा कनकपिंगलम् ।**
**दीर्घबाहुं च ऐश्वर्यं न मांसोपचितं सुखम् ॥ ७ ॥**

ज्या पुरुषाचे डोळे आरक्त, देह सोन्यासारखा गोरा, हात लाब जानू-पर्यंत, सर्वांग मासल, त्या मनुष्याजवळ निरंतर लक्ष्मी असून ऐश्वर्य व सुख प्राप्त होईल.

**ऊरूविशाले धनधान्यभोगी शिरो विशालं नृपपुंगवश्च ।**
**कट्यां विशालो बहुपुत्रदारा पादौ विशालौ सततं सुखी स्यात् ॥ ८ ॥**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत

ज्या पुरुषाच्या माड्या लांब त्यास धन आणि धान्यप्राप्ति होते. मस्तक लांब आणि मोठें असल्यास नृपश्रेष्ठ होईल. कमर मोठी आहे तर स्त्रीसुख होऊन पुत्र बहुत होतील. पाय विस्तीर्ण असल्यास निरंतर सुख भोगील.

**अकर्मकठिनौ हस्तौ पादौ चाध्वनि कोमलौ ।**
**यस्य पाणी च पादौ च स नरः सुखमोदते ॥ ९ ॥**

ज्या पुरुषाच्या हातांनीं नित्य सत्कर्मे होतात; म्हणजे सत्कर्मी रत, आणि पाय मार्गाच्या लावण्याविषयीं अति कोमल, खडे अगदीं पायास सोसत नाहींत, तो मनुष्य बहुत सुखभोक्ता होईल.

**दीर्घलिंगेन दारिद्र्यं स्थूललिंगेन दुःखितम् ।**
**कृशलिंगेन सौभाग्यं ह्रस्वलिंगेन भूपतिः ॥ १० ॥**

ज्या पुरुषाचें लिंग फारच लांब त्यास दरिद्रता, ज्याचें लिंग फार मोठें व जाड त्यास अति दुःखप्राप्ति, ज्याचें बारीक लिंग पण टणक तें उत्तम सुखदायक व ज्याचें आखूड तो नर पृथ्वीपति होईल.

॥ स्त्री चें सामुद्रिक ॥

**मातरं पितरं वापि भ्रातरं देवरं तथा ।**
**भर्तुर्विनाश्रया नारी लक्षणै रहिता तथा ॥ ११ ॥**

स्त्रीचा नवरा नसला म्हणजे माता, पिता, भाऊ आणि दीर हे असूनहि सर्व व्यर्थ होऊन जशी ती स्त्री आश्रयरहित होते, तशी ज्या स्त्रीस उत्तम लक्षणें नाहींत ती स्त्री दुर्भगा होय; म्हणून प्रथम लक्षणें पाहून स्त्री करावी.

**चक्रं पद्मध्वजं छत्रं स्वस्तिकं कमलं तथा ।**
**यासां पादेषु दृश्यंते ज्ञेयास्ता राजयोषितः ॥ १२ ॥**

ज्या स्त्रियांचे पायावर म्हणजे पादतळीं चक्र, पद्म, ध्वज, छत्र, स्वस्तिक आणि कमळ म्हणजे चक्रांकितादि रेषा आहेत त्या स्त्रिया राजपत्न्या होतील असें जाणावें. यातून कांहीं कमी चिन्हें असल्यास राजांगनासारखे भोग प्राप्त होतील.

**यस्यास्तु चरणे लेखा तर्जनीं सा प्रयाति चेत् ।**
**भर्तारं लभते शीघ्रं प्रिया भर्तरि योषितः ॥ १३ ॥**

ज्या स्त्रीच्या पायाचे कनिष्ठांगुलीचे मुळापासून तर्जनीपर्यंत रेखा आहे, त्या स्त्रीस नवरा चांगला मिळून ती नवऱ्याच्या ठायीं रत असेल, तेणेंकरून नवऱ्याची प्रीति तीव्र बनून व्यभिचारकर्मी होणार नाहीं.

**यस्या न स्पृशते भूमिमंगुली च कनिष्ठिका ।**
**भर्ता च म्रियते पूर्वं सा जारं प्रतिगच्छति ॥ १४ ॥**

ज्या स्त्रीच्या पायाची कनिष्ठिकांगुली चालतांना भूमीस लागत नाहीं त्या स्त्रीचा पति तिच्यापूर्वी मरेल. तिला वैधव्यप्राप्त झालें असताही ती जारकर्म करील असें जाणावें.

**अंगुलीश्च व्यतिक्रम्य यस्यास्तीतिप्रदेशिनी ।**
**कुमारी रमते जारं यौवने चैव का कथा ॥ १५ ॥**

ज्या स्त्रीची पायाची तर्जनी अंगुली सर्वांगुलीपेक्षा अधिक लांब आहे, ती स्त्री कुमारीदशेंतहि जारिणी होईल. मग तारुण्यात काय सांगावें ! किती पुरुष भोगील याची संख्या सांगता येत नाहीं.

**पीनौ स्तनौ घनौ स्निग्धावुरो रोमविवर्जितम् ।**
**हस्तिनासे च जंघे च यस्याः सा लभते सुखम् ॥ १६ ॥**

ज्या स्त्रीचे कुच मांसल असून घट्ट व रमणीय, ऊर रोमरहित, नाक हस्तिणीचे नाकाप्रमाणें, मांड्या हत्तिणीच्या शुंडादंडासारख्या, ती स्त्री सुख भोगणारी अशी होईल.

**यस्याः पयोधरे वामे असितं तिलकं भवेत् ।**
**कर्णे कंठे सुपुत्रा च सा कन्या सुखदायिनी ॥ १७ ॥**

ज्या कन्येच्या डावे स्तनावर, मानेवर आणि कानावर काळा तीळ असेल, तीस निश्चयेंकरून सुलक्षणी पुत्र होईल आणि सकल कुटुंबास तिच्या योगानें सुख प्राप्त होईल.

**ग्रीवया दीर्घया क्रूरा दरिद्रा ह्रस्वया तथा ।**
**यस्या ग्रीवा सुवृत्ता स्याद्रेखात्रयसमन्विता ॥ १८ ॥**

ज्या कन्येची मान अतिशय लांब तिचा स्वभाव क्रूर, आखूड असल्यास दारिद्र्यप्राप्ति आणि चांगली वाटोळी तीन रेषायुक्त असेल तर तिचा स्वभाव

चागला असून सुखदायक, जन्मभर सौभाग्यवती आणि संपत्ति भोगणारी अशी होईल.

**यस्याः पाणितले रेषा प्राकारं तोरणं तथा ।**
**अपि दासकुले जाता नरेंद्रं लभते पतिम् ॥ १९ ॥**

ज्या कन्येच्या तळहातावर प्राकाररूप तोरणासारखी रेषा आहे, ती जरी सेवकाच्या कुळांत उत्पन्न झाली असली, तरी ती राजस्त्री होईल.

**अंकुशं कुंतलं चक्रं यस्याः पाणितले भवेत् ।**
**पुत्रं प्रसूते सा नारी नरेंद्रं लभते पतिम् ॥ २० ॥**

ज्या कन्येच्या हाताचे तळीं अकुश, कुतल आणि चक्र म्हणजे अंकुशाकितादि रेषा आहेत तीस पति राजश्रेष्ठ मिळून राजसयोगानें सुलक्षणी पुत्र होतील. विशेषेंकरून कन्या होणार नाहीं.

**अदंतां वर्णहीनां च लक्षणैः परिवर्जिताम् ।**
**न तां परिणयेत्साधु सामुद्रिग्वचनं यथा ॥ २१ ॥**
**मातरं पितरं वापि भ्रातरं देवरं पतिम् ।**
**हन्यात्कुलक्षयं तेन नारदेन च भाषितम् ॥ २२ ॥**

ज्या कन्येचे दात चागले नाहींत, वर्ण उत्तम नाहीं आणि जीस सुलक्षणेंही नाहींत, ती चाणाक्ष पुरुषांनें करू नये. सामुद्रिक लक्षणानीं युक्त असेल तिच्याशीं विवाह करावा, असें सामुद्रिक वचन नारदोक्त ग्रथीं आहे. सामुद्रिक लक्षण न पाहून वरिली तर काय होतें तें सांगतों. अशी अवलक्षणीय कन्या जिचें पोटीं उत्पन्न होते, ती आईस पूर्वी मारते व नंतर बाप मेल्यानतर भाऊ मारते, असा पित्याचे कुळीं संहार होतो. अशा स्त्रीस जो बायको करितो तो पुरुष लग्न होताच मरून जातो. पाठीमागें दीर असल्यास तोही मरतो, असा एकेकाचा संहार करीत जाते. तेव्हां अर्थात् उभय कुळाचा क्षय झालाच समजावें. अशी एकादि कन्या उभय कुलक्षयकारिणी उत्पन्न होते, यासाठीं आधीं सामुद्रिक लक्षणें पाहून नतर विवाहास प्रवृत्त व्हावें. (असे अनुभव कधीं कधीं येत असतात.)

ज्या स्त्रीचे ठायीं फक्त "संभोग-सुखाचीच इच्छा" हाच मुख्य हेतु असतो, अशा स्त्रीचे ठायीं तिचें कुल, शील, वय, गोत्र वगैरे पहाण्याची मुळीच गरज नसते.

संभोगसुख तिचेपासून मिळेल की नाहीं, सभोगाला ती योग्य म्हणजे उपदश-परमा वगैरे गुप्तरोग नसलेली अशी सुंदर, तरुण आहे कीं नाही, एवढेंच फक्त पहातात. वेश्या, रखेल्या, नटी, नर्तकी, नवऱ्यानें टाकलेल्या आणि विधवा स्त्रिया, वगैरेंचा यात समावेश होतो. आपला कुलधर्म आणि कुलातील आपले आचार व्यवस्थित पाळण्यासाठीं, आपला वंश शुद्ध ठेवून तो वाढविण्यासाठीं, गृहस्थाश्रम व्यवस्थित चालविण्यासाठीं, सुप्रजोत्पत्तीसाठीं, ससाराचा भार वहाण्यासाठी, वगैरे हेतु साध्य करण्यासाठीं, पुरुष ज्या वेळीं ज्या स्त्रीचा स्वीकार करूं लागतो, त्या वेळीं मात्र त्या स्त्रीचें कुल, शील, गोत्र, वय, रूप, सामुद्रिक लक्षणें वगैरेंचा विचार करणें जरूर असतें. कारण ज्या हेतूंच्या सिद्धीसाठी ज्या स्त्रीची योजना करावयाची, त्याला ती स्त्री योग्य आहे कीं नाहीं व त्या स्त्रीच्या द्वारें ते ते हेतु साध्य होतील कीं नाहीं, हें सर्वांगीण सूक्ष्म पहाणें जरूर असतें.

प्राचीनकालचे ग्रीक वाङ्मयात असेंच दिसून येतें. “We have courtesans for our pleasure, concubines for daily personal service, and married women to bear us children and manage our house faithfully ” कौटिलीय–अर्थशास्त्र, याज्ञवल्क्य स्मृति हे ग्रंथहि असेंच सागतात. “गृहकृत्यें, प्रजोत्पादन (औरस संतति), बालसंगोपन वगैरे संसारांतील नित्य-नैमित्तिक कर्तव्यकर्में अत्यंत विश्वासानें आणि प्रामाणिकपणानें करण्यासाठीं योग्य अशा धर्मपत्नीची योजना करावी; आणि केवळ संभोग सुखासाठीं विलासिनी स्त्रियाची (वेश्याची) उघड अगर गुप्त योजना करावी. कारण, धर्मपत्नीला अनेक गृहकृत्यांची व कर्तव्यपालनाची जबाबदारी पार पाडावयाची असते, त्यांतच सर्व वेळ जात असतो. मग, खास संभोगविलास करण्यास तिला वेळ कोठून मिळणार ? हिंदूंचा विवाहसंस्कार हा गृहस्थाश्रम स्वीकारून औरस पुत्रोत्पादनासाठी असल्याने औरस पुत्रोत्पादनाला आवश्यक एवढीच कामवासना धर्मपत्नीचे ठायीं हक्काने तृप्त करून घ्यावी. औरस पुत्रोत्पादनबाह्य कामवासना धर्मपत्नीचे ठायीं तृप्त करू पहाणें, म्हणजे धर्मपत्नीच्या मूलभूत हक्कावर अतिक्रमणच ठरेल. ‘कामे च नातिचरामि.’ कामाचे बाबतींत धर्मपत्नीच्या हक्कावर अतिक्रमणाचें आचरण मी करणार नाहीं, या शपथेमध्यें वरील ग्रीक तत्त्वच दिसून येतें. याज्ञवल्क्य स्मृतिमध्येंहि ‘भुजिष्या’ शब्दामध्यें हेंच ग्रीक तत्त्व दिसून येते. ‘भुजिष्या’ म्हणजे केवळ सभोगसुखासाठींच ठेवलेली स्त्री. पुत्रोत्पादनबाह्य कामवासनेची तृप्ति या स्त्रीचे ठायीं करून घ्यावी, असे याज्ञवल्क्य स्मृतीचें मत दिसतें.”

### ॥ शयनेषु रंभा ॥

त्याचबरोबर असेंहि एक सुभाषित प्रसिद्ध आहे कीं “कार्येषु मंत्री, करणेषु दासी। भोज्येषु माता, शयनेषु रंभा”. कार्यांमध्यें हुशार मन्त्र्याप्रमाणें योग्य सल्ला

देणारी, दासीप्रमाणें नम्र असलेली, भोजनाचे वेळीं मातेप्रमाणें प्रेमळ असणारी, शयनाचे वेळीं संभोगकलांमध्यें रंभेप्रमाणें कौशल्य दाखविणारी, ही खरी धर्मपत्नी होय. ही धर्मपत्नी आपल्या पतीला वेश्या स्त्रियाकडे जाण्याची गरजच भासूं देत नाहीं. 'रंभा' नांवाची इंद्र दरबारातील एक प्रमुख अप्सरा. ही अप्सरा संभोगाचे वेळीं असें कांहीं कौशल्य दाखवीत असे कीं, "जो पुरुष रंभेशीं सभोग करी त्याला वाटे 'संभोग करावा तर हिच्याशींच !' दुसऱ्या अप्सरेकडे त्याचें मनच जात नसे." रंभा या शब्दानें येथें हा विशिष्ट अर्थ दाखविलेला आहे. धर्मपत्नीला कामशास्त्र ग्रंथ वाचावयास देणें, शयनमंदिरांत तिला संभोग-आसनाचीं चित्रें दाखवून तसें करावयास लागणें, तिला नेहमीं आनंदांत ठेवणें, तिच्या मनाप्रमाणें तिची हौस पुरवणें, हे उपाय केलें कीं, सुभाषितांतील रंभेप्रमाणें सभोगकौशल्य धर्मपत्नी आपल्या पतीला निश्चित दाखवील. धर्मपत्नीचें हें महत्त्व कामशास्त्राच्या प्रयोगात्मक शिक्षणानें वृद्धिंगत होतें. 'रम्यं कुलस्त्रीरतम्'. वारांगनेशीं लुब्ध न होता कुलीन स्त्रीशीं केलेली रतीच सुखकारक होय असें राजा भर्तृहरी शृंगारशतकांत सांगतो.

धर्मपत्नीचें असें हें महत्त्व सर्वत्र दिसून आल्यामुळें उच्चवर्णीय हिंदूलोक 'वधू'चें कुल, गोत्र, शील, तसेंच सामुद्रिक लक्षणें वराला अनुकूल व अनुरूप आहेत कीं नाहींत, हें बारकाईनें पाहिल्याशिवाय विवाहसंबंध करीत नाहींत. कारण ते वर्णाश्रमधर्म व कुलाचारधर्म पाळतात. इजिप्तमध्यें हिंदुलोकाप्रमाणें काहींच मानीत नाहीत. आपल्या कुटुंबात असलेली अलोट धनसंपत्ति परकी कुटुंबात जाऊ नये म्हणून त्याच्यामध्यें अयोग्य विवाहसंबंध होतात. स्पार्टामध्यें विवाहाला योग्य अशा कुमारिका व अविवाहित तरुण असें कुमार या सर्वांना एका मोठ्या अंधेऱ्या खोलींत सबंध रात्रभर कोंडून ठेवावयाचें. सकाळीं प्रत्येक तरुणानें त्याच्या त्यांच्या हातांत त्यांच्या नशिबानें जी जी कुमारी सापडेल ती ती धरून जोडीजोडीनें त्या अंधाऱ्या खोलींतून बाहेर पडावयाचें. ज्या तरुणाच्या हातात जी तरुणी असेल ती त्याची बायको ! दुसरी पद्धत अशी होती कीं, तत्वज्ञान, साहित्यशास्त्र, अलंकारशास्त्र, नाट्यशास्त्र, गायनवादन-नृत्यादिशास्त्र, वैद्यकशास्त्र, कायदेशास्त्र या शास्त्रांचें शिक्षण घेतलेले अनेक विद्वान तरुण भोजनाचे निमित्तानें एकत्र जमावयाचे. भोजन झाल्यावर प्रत्येक तरुण आपण शिक्षण घेतलेल्या शास्त्राची चर्चा कंटाळवाणें वाटणार नाहीं अशी त्रोटक पण मनोरंजक भाषेंत आणि मधुर आवाजात ऐकवितो. ज्या तरुणीला जो विषय आवडेल त्या विषयाचें शिक्षण घेतलेल्या तरुणाशीं तिचें लग्न होत असे. एकात नशीब व दुसऱ्यात प्रौढ शिक्षण व आवड याशिवाय काहींही पहात नसत. येथपर्यंत विवाहाचा विचार झाला.

## ॥ अथ परस्त्रीगमननिषेध ॥

प्राचीनकाळीं विवाहसंस्था अस्तित्वात येण्यापूर्वी, समाजामध्यें परस्त्रीगमन उघड उघड फारच प्रचलित होतें. ज्याप्रमाणें गोड पक्वान्नें खाण्यात सर्वांनाच इष्ट असतात.

त्याचप्रमाणें उपभोग घेण्यास तरुण स्त्रिया सर्वांनाच इष्ट समजत. विवाह संस्था स्थिरावत चालली तसा परस्त्रीगमनाचा निषेध उघड उघड होऊं लागला. तेव्हा परस्त्रीगमन हें गुप्तपणें होऊं लागले. परस्त्रीगमनाचें हें गुप्तस्वरूपहि नष्ट करण्यासाठीं सामाजिक नियम कडक करण्यांत आले. प्राचीन ग्रीकांनीं परस्त्रीगमन करणाऱ्यास ठार मारण्याचा कायदाच अस्तित्वांत आणला. एका ग्रीकानें परस्त्रीगमन केलें असता, "त्यानें आपण चुकलों, क्षमा करा, दंडादाखल मागाल ती रक्कम मी देतों, पण मला ठार मारूं नये" अशी दयेची याचना केली. त्याला पुढील उत्तर मिळालें. We will not kill you but the law of the state will kill you. (Lysias) हिंदु कामशास्त्रकार परस्त्रीगमनानें दुष्परिणाम कसे भोगावे लागून शेवटीं नाश कसा होतो हें येथें दाखवून परस्त्रीगमनाचा निषेध करितात. कोणत्याहि संस्कृत नाटकांत परस्त्री नायिका दाखविलेली नाहीं. परस्त्री ही गुप्त नायिका असते.

परस्त्रीशीं गमन कशासाठीं करू नये त्याचें वर्णन करतों.

आयुः क्षतिं विकलतात्युपहास्यता च ।
निंदाऽर्थहानि लघुता च गतिः परत्र ॥
स्यादेव यद्यपि च रतेन परांगनायाः ।
प्राहुस्तथाप्यनघमित्यपि कारणेन ॥ ९ ॥

१ परस्त्रीस भोगिल्यानें आयुष्याचा क्षय होतो. २ शरीर निःसत्त्व होते. ३ लोकांत उपहास होतो. ४ सर्व लोक निंदा करितात. ५ द्रव्याचा तर फारच क्षय होतो. ६ मोठेपणा जाऊन लघुत्व येतें. ७ आणि इहलोकीं व परलोकीं दुःख फार होतें. ही सात प्रकारची विटंबना आहे. यास्तव परस्त्रीची इच्छा करूं नये हाच निश्चयार्थ. आता हे इतके नाश जरी परस्त्रीसंगानें होतात, तथापि कांहीं कारणास्तव परस्त्रीसंग करावा लागतो, तीं कारणें पुढें लिहिलीं जातील. परस्त्रीच्या अभिलाषेनें मोठमोठे पराक्रमी राजे राज्यासह नाश पावले, ते कोणते ? उदाहरणार्थ लिहितों—

लंकेश्वरो जनकजाहरणेन वाली
तारापहारकतयाऽप्यथ कीचकाख्यः ॥
पांचालिकाग्रहणतो निधनं जगाम
तच्चेतसापि परदाररतिं न कांक्षेत् ॥ १० ॥

पूर्वी जानकीच्या ग्रहणेंकरून रावणाचा कुळक्षय कसा झाला हें सर्व रामायणाचें कथानक होऊन लोकामध्यें प्रसिद्ध झालें. तारेच्या अभिलाषानें

वाली आपल्या जिवास कोणत्या प्रकारें मुकला, हें रामायणामध्यें किष्किंधा कांडीं प्रसिद्ध आहे. आणि द्रौपदीच्या अभिलाषानें कीचक आपले बंधुवर्गासह क्षयास गेला तो भाग भारतीं विराटपर्वी प्रसिद्ध आहे. याप्रकारें आजपर्यंत जे पुरुष परस्त्रीच्या अभिलाषाची इच्छा धरीत गेले ते नाश पावले. यास्तव विशहित अशा परस्त्रीची इच्छा मनानेंही करू नये.

रावण, वाली, कीचक यांच्याप्रमाणें जुन्या ग्रीक वाङ्मयात पुढील उदाहरण आढळतें. In Sparta, Alcibiades had committed adultery with Timaea, the wife of King Agis to political motives चंद्रसेना या असुर स्त्रीशीं भगवान् श्रीरामचंद्राचा सुरतयोग राजकीय कारणास्तव दाखविण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो.

परस्त्रीची इच्छा मनानेंही करूं नये. या वाक्यात 'मना नेंही या शब्दात गूढ अर्थ आहे, परस्त्रीसंभोग शरीरानें होतो तसा 'मनानें' ही होतो. दिवसा एखादी (मनांमध्यें भरलेली) परकी सौंदर्यवान् स्त्री पाहून रात्रीं आपल्या बायकोशीं संभोग करीत असता दिवसा पाहिलेली सौंदर्यवान् स्त्री मनामध्यें कल्पून, जणू काय, दिवसा पाहिलेल्या सौंदर्यवान् स्त्रीशींच आतां आपण संभोग करीत आहोंत, अशी मनोमय व्यभिचारी कल्पना करून घेऊन आपले बायकोशीं संभोग करणें, असेंही मनानें करूं नये असें कल्याणमल्लाचें मत आहे.

॥ कारणप्रसंगीं परस्त्रीसंग करण्याचीं कारणें ॥

**दृष्टिप्रेम पुरा भ्रमोथ मनसि प्रोक्तोथ संकल्पको**
**निद्रोच्छित्तिरतः शरीरतनुता लज्जाविनाशस्ततः**
**वैराग्यं विषयेष्वथो निगदिते उन्मादमूर्छे ततो**
**मृत्युः स्यादिति पंडितैः स्मरदशा उक्ता दशैव क्रमात् ॥ ११ ॥**

कामाचा उद्वेग झाला असता जिवास दहा दशा म्हणजे १० विकार होतात. ते कोणते.—प्रथम स्त्री पहाण्याचा मोह फार उत्पन्न होऊन त्यामुळें दुसरें कांहीं सुचत नाहीं. दशा १. चित्तात निरंतर भ्रम होईल. दशा २. मनीं सर्वदा विचारणा होत असेल. म्हणजे अमुक तऱ्हेनें परस्त्रिया साध्य कराव्या, अमुक तऱ्हेनें त्या भोगाव्या या विवंचनेंत बुडून जाईल. दशा ३. निद्रेचा भग होऊन अलोचन घडेल. दशा ४. शरिरास सूक्ष्मत्व येईल. दशा ५. लज्जेचा नाश होऊन निर्लज्जत्व येईल. दशा ६. वैराग्य येऊन सकल संपत्तीपासून भ्रष्ट होईल. दशा ७. उन्मत्तता प्राप्त होऊन वेड लागेल.

दशा ८. मूर्च्छित होऊन पडेल. दशा ९. शेवटीं मृत्यु प्राप्त होईल. दशा १०. हे दहा विकार अतिकामोद्रेकापासून प्राप्त होतात असें ज्ञात्यानीं वर्णिलें आहे.

॥ या दहा दशा जिवास घातक कशा आहेत? ॥

**ऊर्वशीसुरतचिंतया ययौ संक्षयं किल पुरूरवा नृपः ।**
**रक्षणाय निजजीवितस्य तत्संभजेत्परवधूं न कामतः ॥ १२ ॥**

पूर्वी पुरूरवा या नामेंकरून एक राजा होता. त्यानें तपश्चर्या बहुत केली. त्या वेळेस इद्रास असें संकट प्राप्त झालें कीं, हा राजा इंद्रपदीं येऊन बसतो कीं काय? म्हणून त्याच्या तपाचा विध्वंस करावा या हेतूनें ऊर्वशी नामेंकरून स्वर्गीं उत्कृष्ट अप्सरा होती, ती भूलोकीं त्या राजाजवळ इंद्रानें पाठविली; तेव्हा ध्यानासीं तिचें स्वरूप राजाच्या दृष्टीस पडताच तो तपोभग होऊन भुलून गेला आणि तिशीं अहोरात्र सुरताविषयीं रत झाला. असे उभयताचे बहुत दिवस रतिक्रीडेंत गेले. स्वर्गी काय चमत्कार झाला? इंद्रास त्या अप्सरेची आठवण झाली. तेव्हा आपले दूत जे गधर्व ते मृत्युलोकीं पाठवून दोघाचा वियोग करून तिला स्वर्गात आणली. ती जातांच राजास चिंता फार प्राप्त होऊन तो सकलयोगभ्रष्ट झाला. त्या राजाची दशा ऊर्वशीच्या ध्यासानें कशी होऊन गेली वरें? यास्तव फार कामोद्रेक झाला असतां विचार करावा कीं, या वेळीं अतिप्रसंग केला तर आपल्या जिवास घात होईल, असें वैद्याच्या अथवा वैद्यकशास्त्राच्या विचारानें ठरून आल्यास जिवाच्या संरक्षणासाठीं एकादे वेळ जिच्यावर कोणाचीहि सत्ता नाही अशी परस्त्री भोगावी; परंतु अशी अपवादात्मक कारणें नसता उगीच विलासाकरिता भोगू नये.

॥ परस्त्री भोगण्यास दुसरें एक निमित्त ॥

**नारी प्रोन्नतयौवनाभिलषितं कांतं न चेदाप्नुया-**
**दुन्मादं मरणं च विंदति तदा कंदर्पसंमोहिता ।**
**संचिंत्येति समागतां परवधूं रत्यर्थिनी स्वेच्छया ।**
**गच्छेत्स्वापि न सर्वदा सुमतिमानित्याह वात्स्यायनः ॥ १३ ॥**

स्त्रिया परम उमेदवारींत आल्या असता त्यासही कामोद्रेक फारच होतो. तो असा कीं, या वेळेस अमुकच पुरुष भोगावा. तेव्हां तिनें इच्छिलेला

पुरुष जर त्या वेळेस भोग न देईल, तर पूर्वी सांगितलेल्या उन्माद-मरणान्त १० दशा त्या स्त्रीस प्राप्त होतात. यास्तव एकादी स्त्री कामानें मोहित, होऊन आपणच जर गळीं पडेल, तर त्या वेळेस पुरुषानें असा विचार करावा कीं, या वेळेस मीं हिला भोग दिला नाहीं तर त्या स्त्रीच्या जिवास कांहीं घात होईल. असें विचारातीं दिसून आल्यास जी अशी स्त्री भोग मागेल त्यावेळीं तिजजवळ एकादा वेळ गुप्तपणें निजावें; परंतु सर्वकाळ निजू नये; याप्रमाणें वात्स्यायन ऋषींचें मत आहे. (याला 'वामदेव्य व्रत' म्हणतात. हें वामदेव्यव्रत उपनिषदात सांगितलेलें आहे. 'रतिदान' अग्निपुराणात सांगितलेलें आहे.)

ऐन तारुण्यांत आलेल्या स्त्रियाच्या शरीरांत कामाग्नि प्रज्वलित होतो हा प्रज्वलित कामाग्नि शांत होण्यासाठी त्या पुरुषभोगाची इच्छा करतात. अशा वेळीं त्यांच्या इच्छेनुसार जर त्या स्त्रियाना पुरुषभोग मिळाला नाहीं, तर त्याना 'उन्माद' होतो. कामाग्नीचा अतिरेक ताप, तापाचा अतिरेक संताप व संतापाचा अतिरेक उन्माद होय. हा उन्माद त्या स्त्रियाच्या आयुष्याची भयंकर हानि करतो. संसारसुखाचा लाभ अशा स्त्रियाना मिळत नाहीं. अशा प्रकारें त्याच्या जन्माचें मातेरें होऊं नये, या भावनेनें पुरुषानें जर गुप्तपणें अशा स्त्रियाना भोग दिला, तर परस्त्रीसमागमाचें पातक लागत नाहीं असें काहीं शास्त्रकारांचें मत आहे कन्या उपवर (उपवर म्हणजे वराजवळ जाऊं इच्छिणारी) झाली कीं, तिला नवरा भेटवावा (विवाहविधीनें). म्हणजे उन्मादाचा प्रश्नच उत्पन्न होणार नाहीं. असा धर्मशास्त्रकार उपाय सांगतात. यावरून 'उन्मादावर' पुरुषभोगानें किंवा मायिक शिश्नानें कामवासनेची पूर्ण शांति करणें हा उपाय होय असे दिसतें. वात्स्यायन ऋषीनीं आपल्या 'कामसूत्र' ग्रथांत 'पारदारिकं' नामक परस्त्रीगमनाची चर्चा केलेलें एक अधिकरण लिहिलें आहे. ज्या लोकामध्यें 'घटस्फोट' करण्याची चाल आहे, त्या लोकामध्यें 'परस्त्रीसमागम' फार होतात. घटस्फोटाच्या अनेक कारणांपैकीं 'परस्त्रीसमागम' हेंही एक कारण असतें. परस्त्रीलंपट पुरुष नित्य परस्त्रीगमनांत सुख मानतो. निर्लज्ज व मानपानशून्य पुरुष आपल्या सुंदर व तरुण बायका परस्त्रीगमनात नित्य रत असणाऱ्या परस्त्रीलंपट राजाकडे आपण होऊन पाठवून देतात. 'परस्त्रीसमागमा'चें एक उदाहरण 'दंडी' नामक संस्कृत कवीनें आपल्या 'दशकुमारचरिता'त दाखविलें आहे. "अरेबिअन नाईटस्" या जगप्रसिद्ध ग्रथाचा आरंभ परस्त्रीसमागमनापासूनच आहे. उच्चदर्जाच्या सुशिक्षित नागरिकानीं 'परस्त्रीसमागम' करूं नये असें कल्याणमल्लाचें मत असल्यामुळें त्यानीं येथें वात्स्यायन ऋषींचें मत सांगितलें आहे. वेश्या स्त्रियाशीं होणारा समागम हा परस्त्रीसमागम होत नाहीं. दुसऱ्याच्या विवाहित स्त्रीशीं समागम करणें यालाच 'परस्त्रीसमागम' असें शिष्टजन म्हणतात.

पुत्रोत्पादनार्थ एका पुरुषाशीं धार्मिक विधीनें विवाहबद्ध झालेली स्त्री जर गुप्तपणें दुसऱ्या पुरुषाशीं रत होऊन व्यभिचार कर्म करूं लागली, तर ती स्त्री तिच्याशीं व्यभिचारकर्म करणाऱ्या पुरुषाबद्दल अधिक उत्सुकता दर्शविते, आणि पहिल्या पुरुषाबद्दलचा तिच्या हृदयात असलेला आदर आणि प्रेम ती स्त्री कमी करूं लागते. शेवटीं, तो तिला आवडेनासाही होतो.

॥ अराजक राष्ट्रांतील परस्त्रीगमन ॥

पाखंडी-नास्तिक अगर लोकायतिक लोक हे नेहमीं भौतिक सुखाचा म्हणजे पंचमहाभूतात्मक या जड शरीराच्या सुखाचाच केवळ विचार करतात. त्याचें मत असें आहे कीं,

पुनर्वित्तं पुनर्मित्रं पुनर्भार्या पुनर्मही ।
एतत्सर्वं पुनर्लभ्यं न शरीरं पुनः पुनः ॥

गेलेले धन पुनः मिळेल, मित्र, भार्या, जमीन पुनः पुनः हीं सर्व मिळतील. पण धर्म–अर्थ–काम हे तीन पुरुषार्थ प्राप्त करून देणारें हें शरीर एकदा नष्ट झालें म्हणजे पुनः पुनः मिळणार नाहीं. हें शरीर इहलोकीं उत्पन्न होतें व इहलोकींच पुष्ट होऊन नष्ट होतें, या शरीरानें केलेल्या संभोगाचें फलहि इहलोकींच मिळतें. एकदा नष्ट झालेलें पुष्ट शरीर पुनः पुनः प्राप्त होत नाही. तेव्हां, अशा दुर्मिळ शरीररक्षणासाठीं परस्त्रीगमनास हरकत कसली? इहलोकीं शरीरच नाहीं तर शरीर-सुख कसलें? कारण—

एक धष्टपुष्ट मेंढा दुसऱ्या मेंढीकडे न पाहतां आपल्या स्त्रीच्या ऋतुकालाची वाट पहात असतां, 'मी तिच्याशी अशी रतिक्रीडा करीन, मी असा उडेन, असें संभोग कौशल्य दाखवीन,' वगैरे मनांतले मनात विचार करीत असताच अकस्मात एका लाडग्यानें त्याच्यावर झडप घालून त्याला खाऊन टाकलें, व मनातले विचार त्याच्या मनांतच राहून त्याचें शरीर मात्र नष्ट झालें. शरीरच नष्ट झाल्यावर कसलें शरीरसुख! मानवी जीविताचें मुख्य व अंतिम ध्येय चारी पुरुषार्थांची प्राप्ति! या पुरुषार्थप्राप्तीचें मुख्य साधन 'पुष्ट शरीर' हें आहे; अशा या पुष्ट शरीररक्षणार्थ परस्त्रीसमागम करणें आवश्यक आहे असें जर आढळून येईल, तर परस्त्रीसमागम केल्यास पातक लागणार नाहीं, असें पाखडी–नास्तिक–लोकायतिक लोकांचें मत आहे. राष्ट्रांत अराजक सुरू झालें कीं, तेथें 'मात्स्यन्याय' सुरू होतो! अशा अराजक राष्ट्रांत परस्त्रीसमागम, बलात्कार, विनयभंग, व्यभिचार याचा सुळसुळाट होतो. आज जी एकाची बायको असेल ती उद्यां त्याचीच बायको राहील कीं, दुसऱ्याची होईल याची शाश्वति नसते. अराजक राष्ट्रांतील कित्येक पाखडी लोक असेंहि प्रतिपादन करतात कीं, "व्यभिचार हें महत्पाप आहे" असें सांगणें व्यर्थ आहे. तरुण ऋषिपत्नींशीं व्यभिचार कर्म करणारा

परदारलोलुप इंद्र पहा! इंद्रानें गौतमऋषीची तरुण आणि सौंदर्यवान् पत्नी अहिल्या हिच्याशीं व्यभिचार केला. अहिल्येला शिळा होण्याची शिक्षा झाली, पण इंद्राला काय शिक्षा झाली? त्याच्या देहाला सहस्र क्षतें पडलीं, तरी 'सहस्राक्ष इंद्र' (हजार डोळ्याचा इंद्र) असा त्याचा गौरवच झाला. इंद्रपद नष्ट झालें नाहीं. कित्येक संशोधक सांगतात कीं, गौतमपत्नी अहिल्येशीं इंद्रानें व्यभिचार केल्यामुळें इंद्राचे शरीराला एक हजार क्षतें पडलीं तोच हा उपदंश—गरमी रोग (syphilis) होय. (रसयोग-सागर १९२७ प्रथम भाग.) हें मत मान्य करतां येत नाहीं. उपदंशयुक्त स्त्रीशीं संभोग केला तरच पुरुषाला उपदंशरोग होतो. मग ऋषिपत्नी अहिल्या उपदंशरोग पीडित अशी होती काय? असा प्रश्न पुढें उभा राहातो. नेत्रहीन अंधमनुष्याच्या हातांतील प्रकाशमान् दीप हा त्या नेत्रहीन अंध माणसासाठीं नसून इतरासाठीं असतो. तसेंच ऐश्वर्यहीन, वैभवहीन, सामर्थ्यहीन पुरुषाची तरुण, सौंदर्यवान् बायको ही त्याच्यासाठीं नसून ऐश्वर्यवान्, वैभवशाली, बलशाली पुरुषासाठीं असते. अराजक राष्ट्रांतील बलवान् व जुलमी सत्ताधीश, अधिकारीवर्ग आणि उन्मत्त धनिकवर्ग या पाखंडी मताचा स्वीकार करून दुर्बलाच्या सुंदर स्त्रिया पळवून आणतात व नित्य परस्त्रीसमागम करण्यांतच रत होऊन सर्वस्वी त्यातच सुख व आनंद मानतात. कल्याणमल्लानें 'अनंगरंग' हा ग्रंथ अराजक राष्ट्रांतील पाखंडी लोकांसाठीं लिहिला नसल्यामुळें तो या पाखंडी मताचा स्वीकार करीत नाहीं. तर, उलट निषेध करीत असल्यामुळें 'परस्त्रीसमागमाचा' येथें निषेध केला आहे. कांहीं आचार्यांचें असें मत आहे कीं, धर्माचार्यांनीं परस्त्री-समागमाचा जरी निषेध केला असला, तरी वेश्या स्त्रियाशिवाय इतर अशाहि कांहीं स्त्रिया आहेत कीं, त्यांच्याशीं समागम केल्यानें परस्त्रीसमागमाचा दोष लागत नाहीं.

## ॥ आचार्य गोणिकापुत्राचा परस्त्रीसमागम ॥

परस्त्रीसमागमाची सशास्त्र आणि सर्वांगीण चर्चा असलेलें "पारदारिक" नावाचें कामशास्त्रातील एक अधिकरण दोन हजार वर्षांपूर्वी आचार्य गोणिकापुत्र यांनीं स्वतंत्रपणें लिहिलें आहे. "भार्येची अत्यंत जिवलग सखी ही प्रसंगोपात भार्येप्रमाणेंच असते. हिला वैकल्पिक नायिका म्हणतात. आपल्या नवऱ्याच्या कामवासनेचा त्रास भार्येला गर्भारपण, बाळतपण, आजारीपण वगैरे कारणास्तव असह्य होऊं लागला कीं, ती भार्या आपल्या अत्यंत जिवलग सखीला स्वखुषीनें कांहीं काल आपलें भार्यापद आपल्या नवऱ्याच्या संमतीनें देऊन स्वतः नवऱ्यापासून विश्रांतीसाठीं दूर रहाते. अशा परिस्थितींत त्या सखीजवळ होणारा नवऱ्याचा संभोगव्यवहार परस्त्री-समागमाच्या दोषास पात्र होत नाहीं, असें आचार्य गोणिकापुत्रांचें मत त्यांनीं लिहिलेल्या 'पारदारिक' अधिकरणात आहे.

'पारदारिक' अधिकरणामध्यें परस्त्रीसमागमासंबंधीं पुढीलप्रमाणें विशेष ऊहापोह या आचार्यांनीं केलेला आढळतो. बड्या श्रीमंत सत्ताधीश लोकांना जसे पुरुषमित्र

असतात; तसेंच त्याना अनेक स्त्रीमित्रहि असतात. अशा त्या स्त्रीमित्राच्या मैत्रीचा उत्कर्ष त्याच्याशीं समागम करूनच होत असतो. अशा बड्या लोकांनीं निरनिराळ्या स्त्रियांशीं निरनिराळीं संभोगकर्मे करून नाना प्रकारच्या संभोगवैचित्र्याचें सुख प्राप्त करून घ्यावें अशी इच्छा करणें हा मनुष्यस्वभावच आहे. या इच्छेच्या तृप्तीसाठीं पुरुष गुप्तपणें परस्त्रीशीं समागम करतो. अशा पुरुषाचें असें म्हणणें असतें कीं, स्वयंपाकाची सामुग्री एकाच प्रकारची आणि एकाच दर्जाची असली, तरी प्रत्येक स्त्रीनें केलेल्या स्वयपाकाची गोडी एकाच प्रकारची नसून निरनिराळी गोडी असते असें आढळून येतें. त्याचप्रमाणें, योनीमध्यें शिश्नप्रवेश ही संभोगक्रिया जरी एकाच प्रकारची दिसत असली, तरी निरनिराळ्या स्त्रियांशीं केल्या जाणाऱ्या निरनिराळ्या संभोगकार्यांची गोडी एकाच प्रकारची नसून निरनिराळ्या प्रकारची गोडी असल्याचें आढळून येतें." Man is essentially polygamist असें पाश्चात्य कामशास्त्रकारहि सांगतात. देवाचा राजा इंद्र हासुद्धा अनेक ऋषिपत्नींशीं व्यभिचार करीत असे. ज्याप्रमाणें, एखाद्याची चोहोंकडून आर्थिक उत्पादन शक्ति अफाट वाढलेली असली तर तो आपल्या आर्थिक सुरक्षितेची पूर्ण खात्री करून घेऊन नंतरच आपले आर्थिक संबंध इतराशी जोडतो. तसेंच, ज्याची सुस्थितीमुळें मनमुराद आहार–विहार, सर्वप्रकारचें स्वास्थ्य, चिंतारहित जीवन यायोगें कामोत्पादक शक्ति अफाट निर्माण झालेली आहे; तो प्रथम आपल्या सुरक्षिततेची पूर्ण खात्रीची व्यवस्था करून घेऊन नतरच इतर स्त्रियांशीं आपला कामव्यवहार संबंध जोडतो. इतर स्त्रिया म्हणजे ज्या स्त्रियावर कोणाचीहि कसलीहि सत्ता नसते अगर ज्या स्त्रिया कोणाच्याहि प्रतिबंधांत नसतात, अशा स्त्रियांनीं स्वतः संभोगाची याचना केल्यास त्या वेळीं, अशा स्त्रियाचा अपमान न करितां त्याच्या शरीराचें आणि मनाचें उत्तम प्रकारें रंजन करून संभोगकार्य करावें. तसेंच आर्थिक दृष्ट्या स्वतंत्रपणें राहाणाऱ्या स्त्रीनें आपण होऊन परपुरुषाजवळ संभोगाची याचना केल्यास परस्त्रीसमागमाचें पातक लागत नाहीं. कारण ती परदारा नसते, असें प्राचीन अर्थशास्त्रकारांचेंही मत आहे.

## ॥ परान्नप्रिय, परधनप्रिय, परस्त्रीप्रिय ॥

समाजामध्यें पुरुष परान्नप्रिय असलेले, परधनप्रिय असलेले, आणि परदाराप्रिय असलेले असे तीन प्रकाराच्या मनोवृत्तीचे आढळतात. भोजनप्रिय असलेले भिक्षुक हे परान्नपुष्ट असतात. परान्नसेवनाची कोणतीही संधि प्राप्त झाली असतां ते ती संधि व्यर्थ घालवीत नाहींत. परधनप्रिय असलेले अर्थवादि (बँकर्स, बँका, सावकार वगैरे) हे देवघेवीचे अर्थव्यवहार करण्यासाठीं ठेवीच्या रूपानें परधन प्राप्त करून घेतात. त्या परधनाचा अर्थव्यवहार करून ते आपली आर्थिक उन्नति करून समाजामध्यें सन्मानानें रहातात. त्याचप्रमाणें, विलासी कामीजन हे निरनिराळ्या प्रकारें परस्त्रियांशीं परीचय करून घेण्याची संधि साधून नंतर त्यांच्याशीं गुप्तपणें संभोग

करण्यात रममाण होऊन आपली उत्कट कामवासना तृप्त करून घेतात. त्यासाठीं ते आपल्या धनाचीहि पर्वा करीत नाहींत. येणेंप्रमाणें आचार्य गोणिकापुत्रानें आपल्या पारदारिकम् प्रकरणांत परस्त्रीसमागमाचीं सर्वांगीण चर्चा केली असून हे पारदारिकम् अधिकरण वात्स्यायन कामसूत्रांत पांचवें आहे. तरी पण खालील स्त्रियांशीं कोणत्याहि परिस्थितींत परस्त्रीसमागम करूं नये असा स्पष्ट इषारा येथें कल्याणमल्ल देत आहेत.

॥ कोणत्या स्त्रिया अवश्य वर्ज्य कराव्या ? ॥

**अपि द्विजश्रोत्रियभूपमित्रसंबंधिभार्या यदि याश्च भुक्ताः ।**
**स्युस्ताश्च दोषाय न चेत्प्रगच्छेत्ततः पुमान् कामत एव नैवम् ॥ १४ ॥**

ब्राह्मणाची स्त्री वर्ज्य, त्यात ब्राह्मण असून श्रोत्रिय–अग्निहोत्री–पुराणिकादिक विद्वान् ब्राह्मणाच्या स्त्रियांकडे कामुक दृष्टीनें नुसतें पहाणेंही निंद्य; मग भोगकल्पना झाल्यास दोष किती सांगू ! तसेच क्षत्रिय राजे, मित्र, सखेसोयरे या सर्वांच्या स्त्रियांतून एखादी स्त्री भोगिली तरी नरकसाधन होतें. यास्तव ग्रंथकर्ते, पुरुषास विनती करतात कीं, परस्त्रीशीं गमन कधींही करू नये.

व्यभिचार अगर परस्त्रीगमन दोष नटी, गायिका, नर्तिका, स्वैरिणी, दासी, वगैरे स्त्रियामध्यें धर्मशास्त्रकार मानीत नाहींत असें कौटिलीय अर्थशास्त्र सांगतें.

॥ नियोग आणि व्यभिचार ॥

कामशास्त्रानें परस्त्रीगमन–व्यभिचाराचा निषेध जरी सांगितलेला आहे, तरी अनेक स्त्रियांना व्यभिचारकर्मापासूनहि देवासारखे थोर व पराक्रमी पुरुष झालेले आहेत, असें पाखंडी नास्तिक लोकांचें मत आहे. त्याला शास्त्रज्ञ लोकांचें असें उत्तर आहे कीं, त्या स्त्रियांनी पापवासनेनें अगर कामासक्तीनें व्यभिचार केलेला नसून केवळ श्रेष्ठ वर्णांशीं ऋतुकालींच पुत्रप्राप्तीस्तव आपद्धर्म म्हणून केला. त्याला व्यभिचार अशी संज्ञा नसून ' नियोग ' अशी संज्ञा आहे. कारण पुत्रप्राप्ति झाली कीं, संभोग-व्यवहार बंद होतो. व्यभिचारात तसें कांहींच नसतें. व्यभिचारांत केवळ स्वैर कामासक्ति असते. असा हा सूक्ष्म भेद आहे. (Begetting by proxy The husband transfers his conjugal rights temporarily to one sexually stronger from whom he could expect especially beautiful and vigorous child ) (पाच पांडवाचा जन्म.)

॥ षढत्व दोषाचा परिहार नियोग ॥

उत्पत्तिशास्त्राच्या नियमांमध्यें असा एक अपवाद सांगितलेला आहे कीं, अगदीं नाइलाजास्तव बिकट प्रसंगीं ज्या वेळीं इकडून तिकडून कोठून तरी उत्पत्ति करणें (प्रजोत्पत्ति) हेंच मुख्य कार्य साध्य करावयाचें असतें, त्या वेळीं प्रतिबंधक नियमाचें

पालन करण्याकडे दुर्लक्ष केलें जातें. उत्पत्तीचें मुख्य कार्य साध्य झाल्यावर तें कार्य अनावर होऊन नाशास कारणीभूत होऊं नये, म्हणून प्रतिबंधक नियमाचें पालन पुन्हा अत्यंत कडक आणि सक्तीनें करावें लागतें. व्यवहारकुशल समाजशास्त्रज्ञ मनुष्यानें उत्पत्तिशास्त्राला अनुसरून सांगितलेला हा व्यवहार प्राकृत जनाना समजणारा नसतो. पुत्र व्हावा अशी उत्कठा स्त्रीस लागलेली आहे, पण पुत्रोत्पादनाच्या कार्यांतील अडथळा करणारें पतीचें षंढत्व अगर असमर्थपणा या दोषाच्या परिहारार्थ क्षत्रियाना "नियोग" ही योजना कुलवृद्धीसाठीं समाजशास्त्रकारानीं सांगितलेली आहे. पुत्रफलाच्या प्राप्तीवांचून स्त्रीजीवनाचें साफल्य शिष्टजन मानीत नाहींत. यास्तव, पुत्र व्हावा अशी उत्कठा लागलेल्या स्त्रीचा पति जर पुत्रोत्पादनास असमर्थ असेल, तर उत्कंठित स्त्रीनें पतीची संमति घेऊन पुत्रोत्पादनास समर्थ अशा महातेजस्वी पुरुषास पति मानून त्या पुरुषाचे जवळ उत्कंठित स्त्रीनें पुत्रोत्पादनार्थ जाणें याला नियोग म्हणतात. पुत्राची गरज पूर्ण करणारा तो नियोगपति. याप्रमाणें गरजेच्या प्रसंगानुसार इतरहि पति स्त्रियाना असू शकतात. (१) लग्नाचा पति. (२) नियोगपति. (३) कलापति. स्त्रियाना गायन-वादन-नर्तन-नाट्य वगैरे कला शिकविणारा. या कलाचें शिक्षण घेतांना हस्तस्पर्श-अंगस्पर्श दाट परिचय होत असल्यामुळें त्या कलापतीनें क्रमाक्रमानें केलेल्या चेष्टा सहन करण्याची मनोवृत्ति त्या स्त्रियाची बनते. (४) हौसपति, उत्सवादि मंगलकार्यांच्या सणाच्या दिवसात अलंकारादि भूषणें, ऊंचीऊंची वस्त्रें, स्त्रियाना तो वापरावयास देऊन त्यांची हौस पूर्ण करतो. प्रसगोपात स्त्रियाची द्रव्याचीहि गरज तो पूर्ण करतो. अशा प्रकारची हौस पूर्ण करीत असल्यामुळें त्याचा त्या स्त्रियांशीं वारवार दाट परिचय झाल्यावर त्यानें सभोगाची इच्छा दर्शविताच त्या स्त्रिया त्याच्याशीं गुप्तपणें संभोग करण्यास तयार होतात. (५) सकटमुक्तपति. कोणत्याहि संकटात सापडलेली स्त्रीला मला भोग दे म्हणजे तुला या संकटातून मुक्त करीन असें सागून तिला तो भोगतो. लग्नाचा पति उघड असतो. बाकीचे चार उपपति असून गुप्त असतात. पुत्र झाला कीं नियोगपतीचा सबध रहात नाहीं. पण इतर पतींचा गुप्त सभोगसबंध रहातो.

॥ कसेंही संकट आलें तरी ज्या स्त्रिया सर्वथा भोगूं नयेत ॥

कन्या प्रव्रजिता सती रिपुवधूर्मित्रांगना रोगिणी।  
शिष्या ब्राह्मणवल्लभा च पतितोन्मत्ता च संबंधिनी ॥  
वृद्धाऽचार्यवधूश्च गर्भसहिताऽज्ञाता महापापिणी।  
पिंगा कृष्णतमा सदा बुधजनैस्त्याज्या इमा योषितः ॥ १५ ॥

कन्या १. संन्यस्त व विधवा स्त्री २. पतिव्रता नारी ३. शत्रूची स्त्री ४. मित्राची वायको ५. जीस मोठे रोग असतील ती ६. आपले शिष्याची

७. ब्राह्मणाची स्त्री ८. बाटलेली अगना ९. वेड लागलेली १०. आपले कुळात उत्पन्न झालेली ११ आपल्यापेक्षा जी वृद्ध असेल ती १२. गुरुपत्नी १३. सासू १४. मावशी १५. मामी १६. भगिनी १७. आप्त १८. पितृव्यपत्नी १९. गर्भिणी २० जिची आपणास माहिती नाहीं ती २१. जिनें मोठीं पातकें केलीं असतील ती २२. केवळ पिंगट वर्णाची २३. आणि केवळ अतिशय काळी जी असेल ती. या इतक्या चोवीस प्रकारच्या स्त्रिया आणि याशिवाय संबधी स्त्रिया असतील, त्याही ज्ञात्यानीं सर्वथा ग्राह्य न कराव्या. म्हणजे त्यांच्याशीं केव्हाही संभोग करू नये असे शास्त्रप्रामाण्य आहे.

॥ कुटीण (दूति) कशी असावी? ॥

मालाकारवधूः सखी च विधवा धात्री नटी शिल्पिनी ।
सैरंध्री प्रतिगेहिकाऽथ रजकी दासी च संबंधिनी ॥
बाला प्रव्रजिता च भिक्षुवनिता तक्रस्य विक्रेतृका ।
मान्या कारुवधूर्विदग्धपुरुषैः प्रेष्या इमा दूतिकाः ॥ १६ ॥

माळीण १. आपली सखी २. विधवा ३. दाईपणा करीत असेल ती ४. नृत्य करणारी ५. शिल्पशास्त्र जाणणारी ६. दुसऱ्याचे घरीं राहून आपल्या स्वाधीन राहणारी ७. प्रतिघरास जाऊन गोडगोड बोलणारी ८. परटीण ९. दासी १०. आप्तसंबधीं असेल ती ११. सोळा वर्षांचे अलीकडे वयानें तरुण १२. संतीण १३. भिक्षूची बायको १४. ताक-दूध विकणारी १५. मान्य आजीबाई म्हणण्याजोगी १६. अथवा शिंपीण १७. कोष्टीण १८. इत्यादि स्त्रिया कुंटणगिरीस पाठविल्या असता वकिलात चांगली करतील. यास्तव काममोहित जे असतील त्यानीं या असल्या कुटीण स्त्रिया पाठवाव्या. (संकेत स्थळीं स्त्री-पुरुषाची परस्पर प्रेमाची गुप्त भेट करून देण्यांत या कुटिणी मोठ्या चतुर असतात.)

Match-makers, apportunity makers, go-between and procuress असे चार प्रकार 'कुन्टिर्णी'चे होतात. कन्यामध्यें आकर्षता उत्पन्न करवून त्यांचीं लग्नें जुळविणें, त्या Match-makers होत. नवऱ्याच्या गैरहजेरीमध्यें त्यांच्या स्त्रियांना गुप्तपणें अनीतिमान् करण्याचा प्रसंग घडवून आणतात त्या opportunity-makers होत. दोन शूर वीरांमध्यें स्नेह घडवून आणतात त्या go-between होत. गिऱ्हाईक व वेश्या यांचा संबध घडवून आणतात त्या procuress होत.

॥ लवकर वश होणाऱ्या नायका व त्यांची चर्या ॥

**निर्लज्जा विधवा कलासु कुशला गोष्ठीपरा दुर्भगा ।**
**क्रूरस्थूलकठोरवामनजरद्वैरूप्यभार्यास्तु याः ॥**
**द्वारावस्थितिशीलिताऽतिचपला वंध्या महामानिनी ।**
**प्रत्यग्रा तरुणी महाविरहिणी साध्याः सुखेनांगनाः ॥ १७ ॥**

ज्या स्त्रीस मर्यादा नाहीं ती १. विधवा २. नाचणें, गाणेंबजावणें इत्यादि कलांमध्यें परिपूर्ण असते ती ३. गोष्टीवेल्हाळ बोलणारी ४. दरिद्री ५. नपुसक पुरुषाची स्त्री ६. ज्या पुरुषाचें पोट फार मोठें असेल त्याची ७. कठोर निर्दय पुरुषाची ८. आणि जो पुरुष लहान हिणकस वर असेल त्याची ९. म्हाताऱ्याची १०. फार कुरूप असेल त्याची ११. दारांत उभी राहाण्याची जिची खोड असते ती १२. फार चचल स्वभावाची १३. आणि जीस मुलें नसतील ती १४. बढाईखोर १५. मोठा विरह झाला असेल ती १६. अथवा फार मर्यादा दाखविणारीं १७. कोणीं भोगिलेली १८. आणि अत्यत उमेदींत आलेली १९. या इतक्या प्रकारच्या स्त्रिया वश करण्याला फार कष्ट पडत नाहींत. (कारण ह्या स्त्रिया द्रव्याच्या लोभानें, दागिन्यांच्या अगर सुंदर वस्त्रें, वगैरेच्या लोभानें मोहाला बळी पडून परपुरुषाशीं सभोग करण्यास तयार होतात.)

॥ आपल्यावर प्रसन्न झालेल्या स्त्रियांचीं लक्षणें ॥

**लज्जां न धत्तेऽभिमुखं च पश्येत्पादेन भूमिं विलिखेत्स्थिता च ।**
**व्यनक्तिगात्रं कुरुते च हास्यं दृष्ट्वा कटाक्षं नयने विदध्यात् ॥ १८ ॥**

जी स्त्री पुरुपास पाहून लाज धरीत नाहीं ती १. आपले डोळ्याला डोळा देऊन पाहाणारी २. उभी असतां पायानें उगीच कांहीं रेपा काढिल्यासारखें करते ती ३. आपलें अंग उघडें टाकून जागोजाग खाजवल्यासारखें करणारी ४. तोंडाकडे पाहून हसणारी ५. आणि कटाक्षयुक्त नजरेनें पाहणारी ६. हीं लक्षणें अनुरागिणी स्त्रियाचे ठायीं होतात.

**दृष्ट्वा स्फुटं सस्मितमेव वाक्यं शनैर्व्रजेच्चानुसरेद् व्रजंतम् ।**
**विलोक्य तं व्याजकथाप्रसंगादुच्चैर्वदेत्स्व परिदर्शयंती ॥ १९ ॥**
**तन्मित्रवर्गे प्रणयं विदध्यादित्यादि वार्तामसकृच्च पृच्छेत् ।**
**कति स्त्रियोस्यालयगाः सुरूपाः कस्यामयं प्रेम भृशं विधत्ते ॥ २० ॥**

मृद्नाति दृष्ट्वा स्वकुचं करेण संस्फोटयेदंगुलिकाः सजृंभम् ।
भूषाविहीना न ददाति तस्मै स्वदर्शनं याचितमप्यजस्त्रम् ॥ २१ ॥
पुष्पादिना हंति तथातितारं संकाशयेन्मार्ष्टि भुजं करेण ।
व्याजेन गच्छेत्सदनं करांघ्रिवक्त्रेषु धर्मांबु वहेद्विलोक्य ॥ २२ ॥
इत्यादिचिन्हैरनुरागयुक्तां ज्ञात्वा विदग्धां मृगशावकाक्षीं ।
संप्रेषयेतां प्रति निर्विशंकं दूतीं त्वरा कामकलाप्रवीणः ॥ २३ ॥

ज्या स्त्रीस पुरुषानें कांहीं विचारलें असता त्याशीं स्पष्ट न बोलून विनोदयुक्त हसत हसत बोलेल, आपण जिकडे जावें तिकडे हळूहळू येईल, कांहीं उगीच निमित्त काढून आपले तोंडाकडे पाहून मोठ्यानें संभाषण करील आणि आपल्यापुढें येऊन आपलें अंग दाखवील, आपल्या मित्राशीं आर्जव-युक्त सख्य करील आणि त्या मित्रास असें विचारील कीं, अमक्याच्या घरात बायका किती आहेत आणि त्यात सुरेख किती आहेत व हा पुरुष कोणत्या स्त्रीवर फार प्रीति करितो, ह्या असल्या गोष्टी पुनः पुन्हा विचारील; आपल्या-कडे पाहून मंजुळ गाणें करील, स्तनावर वारवार हात फिरवील, बोटें मोडून जांभयाही देईल, जेव्हा शृंगारलेली नसेल तेव्हां आपल्यासमोर येणार नाहीं. जरी पुढें येण्याचें काम असलें तरी दृष्टीस पडणार नाहीं; वारंवार पुढें बोलाविलें तरी भूषणरहित येणार नाहीं, आपल्या अंगावर कांहीं फुलादिक हळूच टाकील, निर्भीडपणें पाहील आणि कामोद्रेक प्रकट करील, भुजावर हात फिरवील, कांहीं निमित्त काढून पुनः पुनः घरात जाईल, पुनः पुनः बाहेर येईल आणि जेव्हा तो पुरुष तिच्या दृष्टीस पडेल तेव्हां तिचे हातपाय आणि मुख यावर घाम येईल, इत्यादि चिन्हांवरून हीं चिन्हें ज्या स्त्रीच्या ठायीं दृष्टीस पडतील, ती स्त्री आपल्याविषयीं अनुरक्त आणि कामानें संतप्त झाली आहे असें जाणावें. मग कामशास्त्रात निपुण अशा पुरुषानें निःशंक होऊन त्या स्त्रीकडे कुंटीण लवकर पाठवावी.

अशीं लक्षणें जरी दिसून आलीं तरी प्रत्यक्ष पुरुषानें स्वतः प्रयत्न करू नये; कुंटीण ही आपल्या कामात हुषार व वाकबगार असल्यामुळें तिलाच द्रव्य देऊन कामगिरी सांगावी. कुंटिणीचें काम करणाऱ्या स्त्रिया दोन प्रकारच्या असतात; एक उघड उघड काम करणाऱ्या असून त्या अल्प द्रव्यानें कामगिरी करतात व दुसऱ्या वरवर संभावितपणा दाखवून गुप्तपणें काम करतात. या मात्र भरपूर द्रव्य प्रथम हातात पडल्याशिवाय कामगिरी करीत नाहींत.

॥ साध्य करण्यास फार कठीण अशा परस्त्रिया ॥

भर्तृस्नेहवती दृढैकवनिता प्रेम्णा विहीना भृशम् ।
सेर्ष्या भूरिसुता त्रपाभरयुता गुर्वादिभीतिस्थिता ॥
प्रायेणार्थवती तथा परजनालापे विरक्ता सदा ।
निर्लोभा व्यभिचारकर्मणि बुधैर्दुःखेन साध्या स्मृता ॥ २४ ॥

ज्या स्त्रीची प्रीति भ्रताराशीं मोठी दृढ असेल ती १. जीस कामांचें प्रेमच नाहीं ती २. जिला ईर्षा फारच असते ती ३. फार मुलाची आई ४. मोठी मर्यादेची ५. आई, बाप, सासू, सासरे इत्यादिकाचें देखरेखीखालीं असेल ती ६. प्रायः श्रीमत असेल ती ७. परक्याशीं संभाषणाचा सर्वदा जिला कंटाळा असतो ती ८. आणि लोभ न बाळगणारी ९. इतक्या प्रकारच्या स्त्रिया व्यभिचार कर्मासाठीं साध्य करण्यास फार संकट पडतें असें बुद्धिवा-नानीं निश्चित केलें आहे.

॥ कोणकोणत्या जागीं व कोणकोणत्या वेळेस स्त्रीस भोगूं नये ? ॥

वन्हिब्राह्मणपूज्यवर्गनिकटे नद्यां च देवालये ।
दुर्गादौ च चतुष्पथे परगृहेऽरण्ये श्मशाने दिवा ॥

अग्निमुखादिक मत्रानीं सिद्ध केलेला अग्नि १. पवित्र ब्राह्मण २. वडील मनुष्यें ३. पूज्य बाप–गुरू ४. थोराचे समीप ५. नदी ६. पाणवठ्यावर ७. देवाल्यात ८. किल्ला ९. चौकी इत्यादि १०. सरकारी संकटस्थानात ११. रस्त्यावर १२. दुसऱ्याचे घरात १३. रानात १४. उघड्यावर १५. स्मशानांत १६. इत्यादि अयोग्य स्थानीं आणि दिवसा स्त्री भोगूं नये.

यज्ञातील अग्नि हा मत्रानीं सिद्ध केलेला असतो. कृष्णयजुर्वेदामध्यें असाही एक यज्ञ सागितलेला आहे कीं, आपला यजमान नपुसक नाहीं व तो यज्ञ करण्यास योग्य आहे, हें सिद्ध करण्यासाठी यज्ञमंडपामध्यें यजमानानें आपल्या पत्नीशीं पवित्र ब्राह्मण, पुरोहितवर्ग या सर्वांच्या समक्ष सभोगकर्म करावयाचें असतें शाक्तपंथातील वाममार्गीय लोक 'श्री' व गज चक्रात नियुक्त केलेले स्त्रीपुरुष आपापला लहान-मोठा दर्जा आणि आपापलें लहानमोठें वय विसरून परस्पराच्या समक्ष सामुदायिक संभोगकर्म करितात. नदीमध्यें जलक्रीडा करणारे नग्न स्त्रीपुरुष जलातच स्वैर सभोग-कर्म करण्याची सधि साधतात. देवाल्यांत अनेक देवदासी असल्यामुळें सभोगकर्म तेथें सहजच होत असतें. किल्ला, चौकी वगैरे सरकारी सकटस्थानात गुन्हेगार तरुण स्त्रियाना अटकेंत ठेवीत असल्यामुळें तेथील हीन वृत्तीचे अधिकारी त्या गुन्हेगार तरुण

स्त्रियांना 'तुम्हाला गुन्ह्यातून मोकळें करूं' असें सांगून त्या स्त्रियांशीं संभोगकर्म करितात. व्यभिचार कर्म करणारे अघोरी पंथाचे लोक स्मशानातच रात्री संभोगविधि उरकून घेतात. विजयी सैन्यांतील लष्करी लोक विजयोन्मादानें धुंद होऊन शत्रुदेशातील तरुण स्त्रियाना जबरदस्तीनें पकडून आणून प्राणभयानें भ्यालेल्या त्या स्त्रियांशीं रस्त्यावर, चव्हाट्यावर, उघड्यावर पशुप्रमाणें संभोग करून आपली पाशवी कामवृत्ति पूर्ण करून घेतात. श्रीमंत जुलमी लोक जबरदस्तीनें दुसऱ्याच्या घरात शिरून परस्त्रियावर बलात्कार करतात. गुलाम स्त्रिया व गुलाम कन्या यांच्याशीं उद्यानांतील उघड्या जागेवर पशुप्रमाणें संभोग करण्यास कसलीच लज्जा प्राचीन काळीं ग्रीक लोक बाळगीत नसत, असें त्यांच्या प्राचीन वाङ्मयावरून दिसून येते.

### ॥ "विजयी लष्कर आणि शत्रुस्त्रियांची लूट" ॥

अतिप्राचीन काळच्या इतिहासावरून असें आढळून येतें कीं, युद्धामध्यें शत्रूला पूर्ण जिंकून, जिंकलेल्या प्रदेशातील अत्यंत सुंदर व रूपवान तरुण अशा शत्रुस्त्रियांची लूट विजयी लष्करी अधिकारी करतात. 'प्रदुष्यंति कुलस्त्रियः' = युद्धामुळें कुलस्त्रिया भ्रष्ट होतात. (गीता). त्या लुटलेल्या शत्रुस्त्रियांपैकीं नवतरुणी–रूपवान् स्त्रिया 'कामदासी' अगर 'भोगदासी' या नात्यानें कामविव्हल झालेले विजयी लष्करी अधिकारी जवळ बाळगीत. त्याप्रसंगीं लुटलेल्या शत्रुस्त्रिया प्राणभयानें नग्न होत. कामविव्हल झालेले ते विजयी अधिकारी बेहोष होऊन आसुरी लैंगिक इच्छा पूर्ण करण्यासाठीं त्या विवस्त्र शत्रुस्त्रियांचा अनन्वित लैंगिक छळ करता यावा म्हणून या 'कामदासीं'ना अहोरात्र नग्नावस्थेमध्यें ठेवीत असत. (अलेक्झँडर नेहमीं अशी एक सुंदर नग्न दासी जवळ बाळगीत असे). नग्नावस्थेत ठेवलेल्या त्या शत्रुस्त्रियांशीं जबरी संभोग करणें, त्यांच्या गालाचें चुंबन घेतेवेळीं त्यांचे गाल चावणें, दोन्हीं हातानीं त्या शत्रु-स्त्रियांचें स्तन जोरानें आवळून मर्दन करणें, त्यांच्या योनीचें चुंबन घेतेवेळीं त्या योनीचें चावे घेणें, नखाग्रानीं टोचणें, वगैरे आसुरी लैंगिक इच्छा तृप्त करून घेऊन नंतर त्यांतील कांहीं सुंदर असलेल्या शत्रु स्त्रियांचा अनेक दिवस मनसोक्त उपभोग घेतल्यानंतर त्या शत्रु-स्त्रियाना वेश्याभरती म्हणून वेश्यासमूह बाळगणाऱ्याकडे (बन्धकीपोषकः = कुंटणखाना) वेश्याव्यवसायासाठीं पाठवून देत. किंवा, गुलामस्त्रिया म्हणून त्याना गुलामांच्या बाजारामध्यें विक्रीसाठीं पाठवीत.

### ॥ गुलाम स्त्रियांचे बाजार व त्यांची परीक्षा ॥

अशा प्रकारें अतिप्राचीन काळीं बाबिलोन देशात गुलाम स्त्रियांच्या खरेदी-विक्रीचे बाजार भरत असत. गुलाम स्त्रियांचें वय, तारुण्य, सौंदर्य, कौमार्य, पुरुषभुक्त म्हणजे पुरुषानें भोगलेल्या, या सर्वांची नीट काळजीपूर्वक परीक्षा करून खरेदी-विक्रीच्या किंमती ठरवीत असत. गुलाम स्त्रीला कोठें शारीरिक व्यंग आहे कीं काय हें तपासून

पहाण्यासाठीं तिला पूर्ण नग्न करून तिच्या सर्वांगाची तपासणी करीत. तिचे दांत नीट निरखून पाहून तिच्या वयाची, तिचे स्तन हातात धरून आवळून तिच्या तारुण्याची, तिच्या योनींत हाताचीं बोटें घालून अगर कृत्रिम लाकडी शिश्न घालून तिच्या कौमार्याची, तिच्याशीं बाजारांतच एका बाजूला आडोशाच्या जागेत संभोग करून तिला पूर्वी दुसऱ्या पुरुषानें किती भोगिलेली आहे याची, कसून परीक्षा करीत. हें सर्व त्या काळच्या गुलाम-स्त्रियाच्या बाजारव्यवहाराला धरूनच होत असल्यानें या सर्व परीक्षा करण्यामध्यें अव्यवहार्य कांहींच नाही, अशी त्याकाळीं समजूत होती. प्राचीन भारतात राजा हरिश्चंद्राची राणी तारामति हिची विक्री अशा बाजारांतच झाली असें पुराणग्रंथ सांगतात. हें त्याज्य प्रकार उच्च दर्जीय सुधारलेल्या सुशिक्षित नागरिकाना उचित नाहींत, असें शिष्टजनानीं सांगितल्यामुळें, अशा ठिकाणीं स्त्री भोगूं नये असें कल्याणमल्ल सांगतात. सूर्य हा दिवसा आपल्या हजारों तेजस्वी किरणांद्वारें, पृथ्वीवरील जीवनीय रसांचें शोषण अदृश्यपणें करीत असतो. म्हणून कामशास्त्र-कारांचें असें मत आहे कीं, ज्याचे शरीरांत जीवनीय रसांची कमतरता आहे, अशा पुरुषानीं दिवसा संभोग करूं नये. तो संभोग अकालीं मृत्यूला कारणीभूत होतो.

### ॥ मैथुनास वर्ज्य असलेल्या वेळा ॥

**संक्रांतौ शशिसंक्षयेऽथ शरदि ग्रीष्मे ज्वरांतौ व्रते ।**
**संध्यायां च परिश्रमेषु सुरतं कुर्यान्न विद्वान्कचित् ॥ २५ ॥**

सक्रांतिपर्वणींत १. अमावास्येस २. सूर्यचंद्रग्रहणात ३. शरदृतूंत ४. ग्रीष्म ऋतूत ५. जेव्हा ज्वर येत असेल त्या काळीं ६. व्रतामध्यें ७. संध्यासमयीं ८. ज्या वेळीं फार श्रम झाले असतील तेव्हां ९. इत्यादि समयीं शहाण्यांनीं कसेंहि करून स्त्रीसंभोग करूं नये.

केल्यास त्या संभोगापासून सुख मिळत नाहीं. अशा अयोग्यवेळीं, अयोग्यस्थळीं जर स्त्रीसंग केला तर कुलाचा, वंशाचा आणि स्वतःचाहि नाश करणारे रावणादिकासारखे दुष्ट मनोवृत्तीचे पुत्र अशा स्त्रीसंगापासून जन्मतात.

### ॥ स्त्रीसंग करण्यास उत्तम स्थळ ॥

**विस्तीर्णे ललिते सुधाधवलिते चित्रादिनालंकृते ।**
**रम्यप्रोन्नतचत्वरेऽगरुमहाधूपादिपुष्पान्विते ॥**
**संगीतांगविराजिते स्वभवने दीपप्रभाभासुरे ।**
**निःशंकं सुरतं यथाभिलषितं कुर्यात्समं कांतया ॥ २६ ॥**

आपल्या घरात विस्तीर्ण आणि सुंदर दिवाणखाना सफेता पांढरा रंग देऊन सुंदर व मनोहर चित्रादिकांनीं शोभिवंत करून त्यामध्यें फार सुंदर आणि उच्च असा पलंग

मांडून त्यास अगरादि जे महान् धूप, सुवासिक तेलें व अत्तरें यानीं सुवासिक करून त्यावर फुलाची सुंदर व मनोहर शेज करावी; आणि गायनाचीं जीं साहित्यें वीणा, दूध, तांबूल व संगीत शास्त्राचीं पुस्तकें इत्यादींनीं युक्त असून दिव्यांचा चकचकाट असावा आणि इतकें असूनही दोघांच्या मनांत भीड व भीति नसून इतर कांहींएक शंका नसावी म्हणजे स्त्रीनें भिऊं नये. पुरुषाच्याही मनांत कांहीं अदेशा नसावी. अशा ठिकाणीं उभयतांनीं इच्छा झाल्यास विवस्त्र होऊन कांतेशीं यथेच्छ सुखसंभोग करावा आणि त्यावेळीं मनात संभोगाच्या जसजशा कल्पना येत असतील तसतसे आपले मनोरथ पूर्ण करून घ्यावेत.

## ॥ शयनमंदिर–रतिमंदिर आणि चित्रें ॥

'आपल्या घरांत' अर्थात् स्वतःच्या मालकीच्या घरात! मालकीच्या घरामध्यें मनाप्रमाणें सोई करून घेतां येतात. अशा आपल्या मालकीच्या घरामध्यें संभोग-कार्यार्थ जेथें पूर्ण एकांत असेल अशी स्वतंत्र खोली योजावी; तिला 'शयनमंदिर' ऊर्फ रतिमंदिर म्हणतात तें 'शयनमंदिर' कामोत्तेजक अशा सुगंधि धूपानें, अत्तरानें व तेलानें सुगंधित करावें, जेणेंकरून त्या शयनमंदिरांत प्रवेश करिताच वर-वधूच्या मनात संभोगाची इच्छा तत्काळ उत्पन्न होईल. त्या शयनमंदिरांतील भिंतीवर दिसावयास मनोहर अशीं सुंदर चित्रें काढून शयनमंदिराची शोभा वाढवावी. येथें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, शयनमंदिराच्या भिंतीवर कसलीं चित्रें असावींत? न्यायमंदिरात न्यायदेवता व तिचे उपासक जे न्यायप्रवीण—न्यायाधीश व कायदेपंडित यांचीं चित्रें भिंतीवर ठेवतात. नाट्यमंदिरात नाट्यदेवता व तिचे उपासक असे कलावान् नटनटी यांचीं चित्रें भिंतीवर लावतात. नृत्यमंदिरात नृत्यदेवता व तिचे उपासक, नृत्यांगना यांचीं चित्रें ठेवतात. सरस्वतीमंदिरांत सरस्वती देवी व तिचे उपासक वाङ्मयभक्त यांचीं चित्रें ठेवतात. त्याच पद्धतीनें संभोगकार्यार्थ योजिलेल्या शयनमंदिरात 'मदनदेवता', तिचे उपासक आणि ज्या साधनानीं उपासना करावयाचीं तीं साधनें या सर्वांचीं चित्रें शयनमंदिराच्या भिंतीवर ठेवलीं पाहिजेत. आलिंगनें, चुंबनें, संभोगासनांचीं निरनिराळीं आसनें या सर्व साधनद्वारें मदनदेवतेची उपासना करावयाची असते. अर्थात् शयनमंदिराच्या भिंतीवर आलिंगनें, चुंबनें, संभोगासनें यांचींच चित्रें ठेवलीं पाहिजेत व तीं कलायुक्त पाहिजेत, ज्या मंदिराची योजना ज्या विषयासाठीं केलेली असेल, त्या मंदिरात प्रवेश करताच त्या विषया-बद्दलच्या पवित्र भावना प्रवेश करणाऱ्याच्या मनामध्यें उद्भवल्या पाहिजेत, असें त्या मंदिराचें वैशिष्ट्यच असतें. संभोगार्थ शयनमंदिरात प्रवेश करणारे वधू-वर हे कामदेवतेचे उपासक या नात्यानें आपल्या शयनमंदिरांत प्रवेश करितात! तसेंच आलिंगनें, चुंबनें, संभोगासनें या साधनद्वारा कामदेवतेची उपासना करून कामदेवतेला प्रसन्न करून घेतात! अशा परिस्थितींत जें शब्दानें सांगून समजणार नाहीं, तें

चित्रानें समजून देण्याची सुव्यवस्थित पद्धति सर्वत्र अमलात आणतात. त्यायोगें उपासनेचा कार्यभाग तात्काळ साध्य होतो.

बुद्धीनें चलाख व चतुर अशा 'वर-वधूं'ना कामशास्त्रग्रंथ वाचल्यानें त्यातील रहस्य समजेल, पण बुद्धीनें मंद अशा 'वर-वधू'ला तें रहस्य प्रत्यक्ष चित्रद्वाराच समजून दिलें पाहिजे. संभोगासनाच्या कोणत्या चित्रांकडे आपला नवरा विशेष निरखून पुन्हा पुन्हा पहात आहे, कोणत्या संभोगासनांची तो प्रशंसा करीत आहे, या सर्व गोष्टींचें सूक्ष्म निरीक्षण कामशास्त्रज्ञ 'वधू'नें करावें; मग तीं तीं आसनें संभोगकार्याचें वेळीं मनमोकळेपणानें योजावींत, म्हणजे तिच्या नवऱ्याचें मन तिच्या ठायींच रमेल, परस्त्रीकडे त्याचें मन जाणार नाहीं. नवऱ्याचें मन आपल्या स्त्रीच्या ठायींच रमलें म्हणजे या संसारात त्या दांपत्याचीं मनें परस्परानुकूल एक झालीं कीं, त्यांची आत्मिक उन्नति झाली असें हिंदु मानतात. या आत्मिक उन्नतीसाठीं शयनमंदिरांत संभोगासनाचीं चित्रें भिंतीवर ठेवावींत. या गोष्टीला इं. पि. कोडाचीही मान्यता आहे व सर जेम्स स्टीफन्स यांनींही 'डायजेस्ट ऑफ क्रिमिनल लॉ' मध्यें असेंच आपलें अनुकूल मत प्रदर्शित केलेलें आहे; तें मत अजून कोणींही (अर्थात् न्यायाधिशांनीं) साधार खोडून काढलेलें नाहीं. इतकें ते ठाम म्हणजे निश्चित सिद्धांतरूपानें सांगितलेलें आहे. ज्याना मालकीचें घर नाहीं व शोभिवंत शयनमंदिर नाहीं, अशा मध्यम स्थितींत असलेल्या 'वर-वधू'नें काय करावें! त्यानीं देवमंदिरांत देवदर्शनासाठीं जाऊन तेथील भिंतींवर असलेलीं संभोगासनाचीं चित्रें पहावींत. वर-वधू हे कोणकोणत्या संभोगासनाच्या चित्राकडे निरखून पहात आहेत, ते कोणकोणत्या चित्राची प्रशंसा करीत आहेत, हें परस्परांनीं तेथेंच समजून ध्यावें, व त्याप्रमाणें घरीं आल्यावर संभोगासन करावें. देवमंदिरांत सर्व प्रकारचीं शास्त्रें शिकविण्याच्या पाठशाळा पूर्वी होत्या. त्याबरोबर याही शास्त्राचें शिक्षण मिळण्याची सोय देवमंदिरांत या चित्रद्वारें केलेली होती. हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं अशीं संभोगासनाचीं चित्रें देवमंदिराच्या भिंतींवर काढलेलीं पुष्कळच आढळून येतात. संभोगाच्या वेळीं शरीराची विशिष्ट रचना, विशिष्ट हालचाल, शृंगारिक अभिनय, अंगविक्षेप, वगैरे शृंगारिक प्रकार 'वरा'चे मन जिंकण्यासाठीं वधूला करावे लागतात. अशा या चित्रद्वारें जी 'वधू' हे सर्व प्रकार करण्यास समर्थ होते, त्याच वधूला "कामशास्त्रज्ञ वधू" म्हणतात. असा हा या चित्राचा उपयोग आहे. (Sexual education through images)

॥ रतिमंदिरांतील गणिका व चित्रें ॥

'इंपीरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया' by W W Hunter, Director General of Statistics to the Govt of India, या पुस्तकाची सन १८८६ सालची दुसरी आवृत्ति, अकरावा भाग, 'पुरी' टाउन, ३१५, यांत शेवटीं

होतील, अशा वेतावेतानें स्वतः मदनाची उपासना करण्यास सुरवात करावी.' याला Coaxing works of love असें ग्रीक वाङ्मयामध्यें म्हणतात. योनिमर्दनानें योनिकमल विकसित होऊन संभोगक्षम बनतें.

### ॥ शयनमंदिरांतील वधूची नग्नता ॥

'आतां विवस्त्र म्हणजे पूर्ण नग्न हो,' असें वरानें वधूला सांगावें. कुमारी वधूच्या योनीला 'संभोग-चिंतामणि' अशी संज्ञा दिलेली आढळते, ज्याचें दर्शन होताच चिंतन केलेली वस्तु प्राप्त होते त्याला 'चिंतामणि' म्हणतात. येथें चिंतन संभोगाचें आहे. वधू पूर्ण विवस्त्र झाल्यावर तिच्या योनीचें दर्शन वराला होताच वर हा वधूला मिठी मारून संभोगकार्यास आरंभच करितो. यास्तव 'संभोगचिंतामणि' ही संज्ञा यथार्थच आहे. विवस्त्र वधूचे नाजूक पुष्ट अवयवांनीं युक्त असें प्रमाणशीर सुंदर नग्न शरीरसौष्ठव आणि स्तनसौंदर्य पाहून "अशा सुंदर वधूचा अपूर्व लाभ मला झाला आहे. खरोखरच मी भाग्यवान् आहे." असा शुद्ध अभिमान त्याचे अंतःकरणामध्यें उत्पन्न होईल व तो कामातुर होऊन आपल्या वधूचें ठायींच रममाण होईल. प्राचीन काळीं ग्रीक लोक हे 'नग्नते'चें भोक्ते होतें.

### ॥ नग्नतेचीं प्रदर्शनें ॥

'नग्नता' हें एक शारीरिक सौंदर्य व शारीरिक वैभव असून ती एक कला आहे असें ते मानीत. अनेक सौंदर्यवान् नग्न स्त्रियांचीं ते प्रदर्शनें भरवीत. हीं प्रदर्शनें उघडपणें भरविण्याचें बंद झाल्यावर वेश्यामंदिरांत नग्नतेचीं प्रदर्शनें भरूं लागलीं. वेश्यामंदिरांत गिऱ्हाईकापुढें अनेक वेश्यांना संपूर्ण नग्न स्थितींत उभे रहावें लागत असे. आपल्या इच्छेप्रमाणें जी नग्न स्त्री पसंत होईल, ती वेश्यास्त्रियामधून पसंत करून तिला संभोगार्थ गिऱ्हाईक खोलींत घेऊन जाई. वेश्यामंदिरांत नग्नतेचा सुळ-सुळाट झालेला होता. त्या काळीं ग्रीक व रोमन लोकानीं आपापल्या राष्ट्रांत चोहोंकडे वेश्यामंदिरें ऊर्फ सुरत-क्रीडा-मंदिरें उघडलीं. तेथील वेश्याना वेश्याव्यवसायात लागणारें चातुर्य, धूर्तता, मोहक भाषणें, तसेंच विविध संभोगकलांचें शिक्षण देऊन गिऱ्हाईकाच्या निरनिराळ्या संभोगेच्छा कशा पूर्ण कराव्यात, त्यांत त्या वेश्याना तरबेज करण्यांत येत असे.

### ॥ कामभरतीचीं लैंगिक रंग ॥

स्त्रियावर व्यभिचार व कुमारिकांवर बलात्कार करण्याची प्रवृत्ति समाजामध्यें पसरू नये. कारण, समाजातील श्रीमंत पण आपल्या धनाची पर्वा न करणारें कामासक्त नागरिक, सत्ताधीश पण कामलोलुप राजसेवक, अगर लष्करामधील प्राणाची पर्वा न करणारे कामांध सेनाधिकारी किंवा सैनिक, अशा कामवासनेनें मस्त झालेल्या

कामी पुरुषाच्या काममस्तीची लैंगिक रग जिरविण्याचें योग्य स्थान म्हणजे संभोगकलामध्यें तरबेज झालेल्या वेश्यास्त्रिया असलेलीं वेश्यामंदिरेंच होत. अशा पुरुषाची काममस्तीची रग कशी जिरवावी याचें शिक्षण घेतलेल्या त्या वेश्यामंदिरातील वेश्यास्त्रिया मोठ्या कौशल्यानें काममस्तींत आलेल्या पुरुषांची रग जिरवून चागल्या प्रकारें त्या पुरुषाना लोळवीत; म्हणून वेश्यामंदिरें ऊर्फ सुरत-क्रीडामंदिरें आम्हीं स्थापन केलीं असें त्या वेळचें ग्रीक वाङ्मय व आर्यांचें कौटीलीय अर्थशास्त्र सागतें.

## ॥ सुरतक्रीडामंदिराचें मोहक आकर्षण ॥

अशा या वेश्यामंदिरात ऊर्फ सुरतक्रीडामदिरात सासर्गिक लैंगिक रोगाचा बंदोबस्त पूर्णपणें केलेला असे. सुगंधी तेलें–अत्तरें, धूप व सौंदर्यवर्धक वस्तूंचा संग्रहहि तेथें असे. त्याचबरोबर गिऱ्हाईकाना तत्काल उपयोगी पडतील, अशीं कामोत्तेजक औषधें म्हणजे सभोगशक्तीचीं वाजीकरण औषधें, संभोग पुष्कळ वेळ करणारीं वीर्यस्तभक औषधें, तात्काळ शिश्न ताठ करणारीं मलमें, वेश्यास्त्रियांना उपयोगी पडणारी योनिसकोचन, स्तन मोठे व घट्ट करणारीं औषधें, या औषधाचाहि भरपूर सग्रह असे. पण, या सर्वांहूनहि अगदीं निराळें असें आकर्षण म्हणजे 'मैथुनं परमं तत्त्वम्'. मैथुनशास्त्र हें अतिगहन व अतिविशाल असें एक अपूर्व शास्त्र आहे. ज्या शास्त्रापुढें मोठमोठे तपस्वी ऋषि–महर्षि, विद्वान, पंडित, तत्त्ववेत्ते, तत्त्वचिंतक धर्मवेत्ते, अर्थवेत्ते सुद्धा मोह पावून लटपटतात, अशा तत्त्वप्रणालीचा साक्षात् अनुभव देणारे अद्भुत् कामशास्त्रग्रंथ आणि त्यातील विविध चित्रमय सभोगासनें याचा भरपूर चित्रसग्रह सुरतक्रीडामदिरात गिऱ्हाईकाना पहाण्यासाठीं ठेवलेला असे. शिवाय, पुरुषाचें कामजन्य दुःख विविध प्रकारें शमन करण्यात कुशल बनलेल्या कामशास्त्रसंपन्न वेश्यास्त्रिया एकान्तांत आपल्या गिऱ्हाईकापुढें प्रसन्न वदनानें व अतिनम्रपणानें हात जोडून 'मी काय केलें असता आपण तृप्त व्हाल! हा माझा स्त्रीदेह सर्वस्वी तुमचा आहे. संभोगाचे वेळीं आपण मला सागाल तसें वर्तन मी निःशकपणें आनंदानें करीन; आणि आपली इच्छा पूर्ण करीन," असें मधुर व मंजुळ वाणीनें बोलत असत. त्या योगें, अशा सुरतक्रीडामंदिरात जाण्याचें मोठें आकर्षण व न आवरणारा मोह उत्पन्न होत असल्यानें बरोबर भरपूर धन घेऊन सर्व दर्जाचें पुरुष अशा 'सुरतक्रीडामदिरात' निःशंकपणें जात असत; व तेथें अनेक दिवस राहून रोजच्या रोज निरनिराळ्या कामशास्त्रसपन्न वेश्यास्त्रियाचें निरनिराळें संभोगसुख अनुभवीत असत. हल्लीं जशीं हवा खाण्याचीं निरनिराळीं हवेशीर ठिकाणें सर्वत्र प्रसिद्ध आहेत व तेथें मजेनें दिवस घालविण्यासाठी ऐपतवान् पुरुष जातात, तसेंच प्राचीन काळीं ब्रह्मानंदसमान सभोगानंदाचा विशिष्ट अनुभव देणारीं 'सुरतक्रीडामदिरें' असलेली अनेक ठिकाणें प्रसिद्ध होतीं तेथें धनवान् पुरुष जात असत.

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे...

## ॥ गणिकांचे मदनोत्सव ॥

तत्कालीन वेश्यामंदिरांचा सुळसुळाट व मोहकपणा इतका झाला होता कीं, आर्थिक उन्नति व लोकप्रियता भरपूर प्राप्त होते, म्हणून हजारों सौंदर्यवान् तरुण स्त्रिया वेश्यामंदिरांचा आश्रय घेऊन 'क्रीडास्त्रिया' होण्यात भूषण मानू लागल्या. वेश्यामंदिरामार्फत 'Aphrodisia' नांवाचे 'मदनोत्सव' जिकडे तिकडे सुरू झाले. (मदनोत्सवाचा उल्लेख 'मृच्छकटिक' व 'रत्नावली' नाटकात आलेला आहे!) पूर्ण नग्न स्त्री-पुरुषाचा एकत्र मेळावा, त्यांच्या मिरवणुकी, स्त्री-पुरुष हा भेदभाव विसरून एकत्र केलेलीं नग्न मदननृत्यें, आकंठ मद्यपान, वाटेल त्या पुरुषाला वाटेल त्या स्त्रीशीं अमर्यादित संभोग करण्याची पूर्ण मोकळीक, असे हे मदनोत्सवाचे कार्यक्रम मदनदेवतेच्या सन्मानार्थ सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत होत असत. धदेवाईक-वेश्या, धार्मिकवेश्या, देववेश्या, हौशीवेश्या, दुय्यम धंदा करणाऱ्या वेश्या, समाजवेश्या, दरबारीवेश्या, लष्करीवेश्या (या वेश्या केवळ लष्करी उपयोगासाठीच असत), भटक्यावेश्या, ब्रह्मवेश्या, तीर्थगा म्हणजे फक्त तीर्थांच्या ठिकाणच्याच वेश्या, राजवेश्या, नागरवेश्या इतक्या प्रकारच्या वेश्या मदनोत्सवामध्यें पूर्ण नग्न होऊन भाग घेत असत. मदनोत्सवाच्या कार्यक्रमामध्यें भाग घेणाऱ्या या गणिका विद्युल्लतेप्रमाणें चमकत असत. अनेक पुरुषांनीं त्या परिवेष्टित असत. अशा परिवेष्टित अनेक पुरुषांशी त्या हसतात, नाचतात, संभोगक्रीडा करितात, कामुक चेष्टा करितात, कामोत्तेजक गोष्टी व थट्टा, विनोद, खाणें, पिणें, मजा करणें या सर्वांची रेलचेल करितात. त्या गणिका आपल्या गुलाबी गालाच्या व हंसऱ्या चेहऱ्यांच्या ओठातून "Love me always, but not jealous if others also have me" असे शब्द नित्य काढीत असतात. अशा या मदनोत्सवाच्या कार्यक्रमामध्यें या नग्न गणिकाचा संभोगासाठीं संचार यथेच्छ असतो. कोणत्याहि प्रकारचा त्यांना तेथें प्रतिबंध नसतो. मद्यपानाचा अतिरेक ठरलेलाच! वेश्यांचा या मदनोत्सवाच्या कार्यक्रमांत भाग घेणारे पुरुष हे श्रीमंत नागरिक, तसेच राजे लोकही असत. मदनोत्सवाचे जे कार्यक्रम येथें वर्णन केले आहेत, तशा प्रकारची स्थिति 'मद्र' (इराण देशाचा) राजा शल्य याच्या देशात होती, असें महाभारतांतील कर्णपर्वामध्यें भगवान् व्यासांनीं दाखविलेलें आहे.

## ॥ सुरतमहोत्सवांत वधूवरानें कसें वागावें? ॥

या ठिकाणीं 'नग्नता वर-वधूच्या सुरतमहोत्सवाची सिद्धि यशस्वी होण्यासाठीं आहे, म्हणून शयनमंदिरांत वधू विवस्त्र झाल्यानंतर वरानें वधूला संभोगासनाचीं निरनिराळीं चित्रें दाखवून 'तुला कोणतें संभोगासन पसंत आहे' असें विचारावें. वधूला पसंत असलेलें संभोगासन दिव्यशय्येवर करून वरानें संभोग करावा. वर-वधूच्या या प्रथम संभोगाला 'सुरतमहोत्सव' असें म्हणतात. (प्रकरण ६ वें, श्लोक

११ वा पाहा.) या ठिकाणीं 'वरानें' हें लक्षात ठेवावें कीं, यात लिहिलेल्या सर्व गोष्टी एकदम करण्याची घाई करूं नये व 'वधू' च्या मनाविरुद्ध कोणतीही गोष्ट करू नये. जसजशी वधू अधिकाधिक परिचित होत जाईल तसतसे संभोगाचे हे सर्व प्रकार तिला मानवतील 'वधू' नेंही लक्षात ठेवावें कीं, संभोगासाठीं शयन-मदिरात प्रवेश करण्यापूर्वी वधूनें मुखदुर्गंधि नष्ट करण्यासाठीं दांत घासून स्वच्छ करावेत. केसांना सुगधी तेल लावून ते नीटनेटके बांधून चित्ताकर्षक केशभूषा करावी म्हणजे मुखाचें सौंदर्य वाढेल. तोंड, हात-पाय, सर्व नखें, दोन्ही कांखा आणि योनि एकांतामध्यें स्वच्छ धुवून आवडणाऱ्या अत्तरांनीं ते धुतलेले सर्व अवयव सुगंधित करावेत. उंची आणि विरविरीत तलम वस्त्राचा शृंगाराला शोभेल असा पोषाख करावा. सोन्या-मोत्यांच्या अलंकारांनीं शरीर भूषित करावें. अशा प्रकारें कामोत्ते-जनाला योग्य असें नटून-सजून कामशास्त्रनिपुण सुशिक्षित वधूनें सभोगासाठीं शयनमंदिरात प्रवेश करावा. वधूला अशी नटलेली पाहून तिच्या नवऱ्याची नजर तिच्यावरच खिळून राहील, नतर तिचा नवरा तिला मोठ्या प्रेमानें मिठी मारील, गोडगोड मधुर भाषणें करील, मधून मधून चुंबनें घेईल, तिचे दोन्ही स्तन हातांनीं धरून हळूहळू आवळील, तिला आपल्या मांडीवर बसवील, तिच्या योनीला हळूच हातानें स्पर्श करील, नंतर ती योनि सुपीक होण्यासाठीं हातानें हळूहळू चोळील, मर्दन करील, 'मी तुझ्यावर प्रेम करतों, तूं मला आवडतेस, मी तुला आवडतों ना?' असें प्रेमानें गोड शब्दांत म्हणेल; कारण भक्ष्य, भोज्य, भोग्य पदार्थांचें सेवन प्रिय आणि मधुर शब्दोच्चार करून करावें. त्यानें शांति, तुष्टि, पुष्टि प्राप्त होते. त्या वेळीं वधूनेंहि उलट तसेंच करावें. नंतर संभोगाचीं निरनिराळीं आसनाचीं चित्रें पाहून आवडतील तीं तीं संभोगाचीं आसनें करावींत म्हणजे प्रेम वाढेल. अशा या सभोगा-पासून मिळणाऱ्या संभोगसुखाची गोडी संभोगाशिवाय दुसऱ्या कशांतही मिळणार नाहीं, असेंच त्या वेळीं त्या वर-वधूना वाटेल. अशा या संभोगकार्यास 'घरातील शयनमंदिर हेंच गृहस्थाला उत्तम रम्य स्थळ' असें येथें कल्याणमल्ल सागतो.

## ॥ आदरणीय कलावान् गणिका ॥

आर्य हिंदूनीं धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ मानवी आयुष्याचें अंतिम ध्येय मानलेलें आहे. 'काम' पुरुषार्थाचा शास्त्र आणि व्यवहारदृष्ट्या सर्वांगीण सूक्ष्म विचार केल्यास विवाहित स्त्रियाप्रमाणें वेश्यास्त्रियांचाहि विचार करणें जरूर आहे; नाहीं तर शास्त्रविचार सर्वांगीण होण्याऐवजीं एकांगीच होईल. एकागी शास्त्राला 'निर्दोष शास्त्र' असें म्हणतां येणार नाहीं. विवाहित स्त्रियाप्रमाणें वेश्या-स्त्रियांपासूनहि संभोगसुख प्राप्त करून घेता येतें. गायनादि कलेनें श्रेष्ठ पदाला पावलेल्या कलावान् वेश्या आदरणीय, प्रार्थनीय आणि सेवनीय मानतात. उत्सव-प्रसंगीं त्याचा सन्मान करतात. गुणीजन त्यांचें आर्जव करितात. गीतनृत्यादि कलावान्

आणि यौवनाच्या बहरानें कांतिवान् वेश्याशीं संभोगसुखाचा लाभ प्राप्त झाला असतां कल्याणकारक समजून तें भाग्याचें लक्षण मानतात. धर्मशास्त्राच्या दृष्टीनें अपवित्र असलेल्या पदार्थांतून काढलेलें 'सुवर्ण' अर्थशास्त्रकार किंवा सराफ अपवित्र म्हणून टाकून देत नाहींत. त्याचप्रमाणें, वेश्यास्त्रिया धर्मशास्त्राच्या दृष्टीनें जरी अपवित्र असल्या तरी त्या स्त्रियांपासून मिळालेलें अगर मिळणारें 'संभोगसुख' कामचतुर रसिक पुरुष टाकून देत नाहींत. त्यातील दोषाचा परिहार करून त्या संभोगसुखाचा ते उपभोग घेतात. कलावान् वेश्यांशीं बोलण्या-चालण्याचा व भोजनाचा जरी लाभ मिळाला तरी तेंहि भाग्याचें समजतात. अशा भावनेनें वेश्यांकडे पाहणारे अनेक 'शिष्टजन' आढळून येतात. उज्जयिनीसारखीं नगरें कलावान् वेश्यामुळें प्रसिद्ध होतीं. जर्मनीमध्यें छापलेलें 'Der pilger Kamanita' पुस्तकांत उज्जयिनी येथील कलावान् वेश्याची, त्याच्या वैभवाची सुंदर माहिती आहे. तेथील कलावान् वेश्याचा आरोग्ययुक्त टवटवीतपणा, मोहक व पुष्ट शरीरसौष्ठव आणि अवर्णनीय लावण्य या आकर्षक गुणानीं प्रसिद्ध होत्या. त्याच्या 'सुस्वागतम्' दिवाणखान्यांत महान् कवि, उत्तमोत्तम कारागीर, उत्कृष्ट नट, श्रीमंत, राजेलोक, धनाढ्य व्यापारी, हे सर्वजण मोठ्या आदरानें जात येत असत. महाकवि कालिदास हा असाच एका वेश्यागृहीं मरण पावला असें म्हणतात. मृच्छकटिक नाटकातील वसंतसेना ही उज्जयिनीचीच वेश्या होती. (राज्यारोहणप्रसगीं, राजाचा स्नानविधी होत असता, वेश्याच्या दाराजवळची माती राजाचे कमरेला चोळावी. असें अग्निपुराण सांगतें).

गीतनृत्यादि कलाना सर्वस्वीं वाहून घेऊन तारुण्यानें रसरसलेल्या कामकलाविशारद कलावान् गणिकांचें कलात्मक जीवन केवळ एकाच पुरुषाची कामवासना तृप्त करण्यासाठीं नसतें. तपश्चर्यायुक्त ऋषीचें त्यागी जीवन लोककल्याणासाठी असतें. तसेंच कलावान् गणिकाचें कलात्मक लैंगिक जीवन कामी लोकाच्या कल्याणासाठीं असतें. अशा गणिका कामाचारिणी असतात. कला आत्मसात् करून घेण्यासाठीं तन-मन-धनेंकरून गणिका जें आपलें अमोलिक आयुष्य खर्चतात, ती त्यांची कलेसाठीं केलेली उग्र तपश्चर्याच होय. कलेच्या सिद्धीमुळें गणिका सुदर, कांतिवान्, तेजस्वी, चित्ताकर्षक दिसतात; तें त्याच्या तपःश्चर्येचें तेज होय. अशा तेजःपुंज कलावती गणिका आपल्या अमोलिक कौमार्याचा उपभोग लग्न करून एकाच पुरुषाला देण्या-ऐवजीं ईश्वराचा अंश असा राजा अगर राजप्रतिनिधि, ईश्वराचे खास सेवक असे धर्माधिकारी आणि सर्वव्यापी जनता-जनार्दन या सर्वांचे चरणीं व्यापक स्वरूपात आपलें कौमार्य अर्पण करणें म्हणजे कलावान् वेश्यांचा तो एक प्रकारचा 'त्याग'च आहे, असें कलावान् गणिका समजतात. राजकार्यार्थ शूर वीराना आपले प्राण धारातीर्थी अर्पण करण्यास भाग पाडण्यासाठीं कलावान् वेश्याकन्या पवित्र भावनेनें आपल्या कौमार्याचाही बळी देत, हाही भावनेचाच परिणाम आहे. शूर वीर आणि कलावान् वेश्या याचें असें साहचर्य आहे, तें इतकें कीं, रणांगणावर शूर

वीराला मृत्यु आला असता त्यांना स्वर्गलोक प्राप्त होतो. त्या स्वर्गांतहि त्याना अप्सराभोग प्राप्त होतोच. हाहि एक भावनेचाच परिणाम आहे.

## ॥ कामकलानिपुण धर्मपत्नि आणि कामकला-विशारद गणिका यांचे आचार, विचार, संस्कार ॥

राजा बिंबीसारनें शालीवती नामक राजकन्येला मोठा समारंभ करून 'वेश्यापण' दिलें होतें. (म्हणजे सन्मानानें 'गणिका' पदवी अर्पण केलेली होती.) सर्व प्रकारच्या लालित्याचीं महत्त्वाचीं स्थानें वेश्यामंदिरें होतीं. नृत्य, गायन, वादन, हावभाव, चातुर्य, स्नेह, संभोग, वगैरे कामीजनाचे रंजन करणारे सर्व तऱ्हेचें विविध प्रकार तेथें नित्य होत असत. भूमार्ग व जलमार्गानें प्रवास करणारे सर्व प्रकारचे व सर्व दर्जांचे प्रवासी उत्तम प्रकारच्या भोजनाची आणि अत्यंत सुखकारक शयनाची एकत्र व्यवस्था प्रामाणिकपणानें आणि पूर्ण विश्वासानें होत असल्यामुळें वेश्यामदिरात निःशंकपणें उतरत असत. (महानदेचें उदाहरण). मोहक व सुंदर वेषभूषा करून चित्ताकर्षक सौंदर्य, कामोद्दीपन करणारा थट्टाविनोद, हावभाव, नखरे, अंगविक्षेप व प्रेमाचें प्रदर्शन वगैरे उपाय वेश्यामदिरांत प्रवेश करणाऱ्या गिऱ्हाईकाचे मन तेथेंच रमावें म्हणून वेश्यास्त्रिया योजीत असत. आपला नवरा आपल्याच ठायीं सर्वस्वी रममाण व्हावा म्हणून वरील सर्व उपाय धर्मपत्नीलाही आपल्या शयनमंदिरात योजावे लागतात. जर धर्मपत्नी हे उपाय न करील, तर तिचा नवरा वेश्यामदिराचा आश्रय घेईल. दिसण्यामध्यें नटीच्या सौंदर्यालाही पूर्णपणें लाजवील अशी सौंदर्यवान् धर्मपत्नी घरांत असताही तिचा नवरा वेश्यामदिराचा आश्रय का घेतो याचें गूढ अनेकाना उलगडत नसतें. त्यांतील मर्म हें आहे कीं, सभोगसमयीं ज्या वरील 'कामचेष्टा' करावयाच्या असतात त्या 'चेष्टा' ती करीत नाहीं. अगर त्या 'चेष्टा' कशा करावयाच्या, जेणेंकरून तिच्या नवऱ्याचें कामोद्दीपन उत्तम प्रकारचें होईल, याचें तिला ज्ञान नसतें. याच प्रकारच्या पहिल्या श्लोकार्धामध्यें 'कामशास्त्र जाणणारी' असे शब्द आहेत, त्यांतील रहस्य हेंच आहे कीं, आपला नवरा सभोगाला आपल्याच ठायीं प्रवृत्त होईल, अशा प्रकारचे कामुक हावभाव, अभिनय, अंगविक्षेप, नेत्रकटाक्ष, लैंगिक भाषेचे मनमोहक शब्दोच्चार हसतमुखानें कसे करावेत, तसेंच नवरा संभोगाला प्रवृत्त झाल्यावर सभोगातील कौशल्य त्याला दाखवून त्याची कामवासनेची तृप्ति आणि शांति पूर्णपणें कशी करावी, त्याची चंचल चित्तवृत्ति स्थिर करून आपल्याच ठायीं कशी रमवावी, त्या सर्व गोष्टींची सर्वांगीण माहिती वधूला पूर्णपणें अवगत पाहिजे. त्यायोगे नवरा तिच्या ताब्यात राहतो. वधूनें या माहिती-साठीं अनंगरग हा ग्रंथ वाचून आपला नवरा ताब्यात ठेवावा. धर्मपत्नी व वेश्या-स्त्री या दोन्ही स्त्रिया स्त्रीजातीच्या दृष्टीनें जरी एकाच जातीच्या असल्या तरी स्थान, आचार, संस्कार, हे भिन्न भिन्न असल्यामुळें धर्मव्यवहारातील धर्मपत्नीचें महत्त्वाचें

स्थान वेश्यास्त्रीला प्राप्त होत नाहीं. स्थानाचें दृष्टीनें वेश्यामदिरात कोणीही भरपूर द्रव्य असलेला प्रवेश करूं शकतो. धर्मपत्नीच्या शयनमंदिरात प्रवेश करण्याचा हक्क फक्त नवऱ्याचाच आहे. आचाराच्या दृष्टीनें, द्रव्य देणाऱ्या कोणत्याही पुरुषाचें मनोरजन वेश्यास्त्रीला करावें लागतें, पण धर्मपत्नी फक्त आपल्याच पतीचें मनोरजन करील. सस्काराच्या दृष्टीने पुढील 'वचनें' वाचून निरीक्षण केल्यास समजून येईल कीं, धर्मपत्नीचे संस्कार व वेश्यास्त्रीचें संस्कार कसे भिन्न भिन्न आहेत.–'ओव्हीड' (Ovid) नामक ग्रीक ग्रथकार 'Art Amatoria' (Art of love) ग्रंथात वेश्याना उपदेश करितो कीं, The profession of the Hetairia (गणिका-सज्ञक वेश्या) required not only the careful use of cosmetics, but also great cleverness in behaviour, knowledge of male weakness, and no small acuteness in changing these weaknesses into as much as ready money as possible. 'प्रॉपर्टिअस (Porpertius) नावाचा दुसरा एक ग्रंथकार वेश्याकन्यांना व्याख्यान देतो कीं, 'He delivers a regular lecture on the means by which a girl can extort as much money as possible out of her lover Above all, you must know nothing about loyalty You must understand the art of lying and dissimulation, and you must not pay any heed to the laws of modesty, what do you get from a poet who praises you heavens high with his verses, but cannot make you any presents ?'' लुसियन (Lucian) नामक तिसरा ग्रीक ग्रथकार 'डायलॉग्ज् ऑफ कोर्टेझन्स' ग्रंथात वेश्यांना असाच उपदेश करितो, वात्स्यायन महर्षिंही आपल्या सुप्रसिद्ध '**कामसूत्र**' ग्रथात लिहितात कीं, वेश्यास्त्रियाचें उपजीवन राजेलोकां-प्रमाणें सर्वस्वी अर्थावरच अवलंबून असल्यामुळें वेश्यानाहि '**अर्थ**' पुरुषार्थच श्रेष्ठ होय. धनहीन, ऐश्वर्यहीन, अत्यत दरिद्री पुरुषाशीं वेश्यास्त्रिया कधींहि सभोग-संबंध ठेवीत नाहींत. म्हणून श्रीमत नायक कसा गांठावा, त्याला पूर्ण कामातुर गर्दभ बनवून त्याच्याकडून निरनिराळया उपायांनीं निरनिराळीं कारणें सांगून भरपूर द्रव्य व उंची उंची बक्षिसें कशीं उपटावींत, अखेरीस तो पूर्ण निष्काचन–निर्धन झाल्यावर त्याला 'अर्धचंद्र' (गचाडी) कसा द्यावा, याचे उघड म्हणजे बाह्य व गुप्त म्हणजे आन्तर उपाय वात्स्यायनानेंहि 'कामसूत्र' ग्रंथात लिहिले आहेत. '**कथासरित्स-सागर**' मध्यें एक कुंटीण वेश्याकन्येला असा उपदेश करते कीं, "एका गाईचें दूध काढून घेऊन तिची कास (ओटी) रिकामी झाली म्हणजे गवळी त्या गाईचा त्याग करून दुसऱ्या गाईकडे अधिक दूध काढण्यासाठीं जातो. त्याचप्रमाणें वेश्येनें कृत्रिम प्रेम दाखवून धनाढ्य पुरुषाकडून त्याचें धन काढून घेऊन तो धनशून्य झाल्यावर त्याचा त्याग करावा आणि अधिक धनप्राप्ति होण्यासाठीं दुसऱ्या धनाढ्य

पुरुषाचा स्वीकार करावा." असा हा वेश्याधर्म वेश्यास्त्रियांना सांगितलेला आहे. शरीरामध्यें असलेल्या पंचप्राणांना रहाण्यास तें शरीर अयोग्य झालें कीं, ते पंचप्राण त्या अयोग्य शरीराचा त्याग करून योग्य अशा दुसऱ्या शरीराचा आश्रय घेतात असें आत्मविद्येचें तज्ज्ञ जन्म-मरणाचें वर्णन करतांना सांगतात. तसेंच, धनसंपत्तीच्या दृष्टीनें नालायक (धनशून्य) झालेल्या नायकाचा त्याग करून दुसऱ्या लायक नायकाचा आश्रय घेण्यास वेश्यांना सांगणें हें वेश्याधर्माला अनुसरूनच आहे, यांत पाप-पुण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. श्रीमंत नायकाचें धनहरण करण्याचे उघड आणि गुप्त उपाय वेश्यांना सांगणें हें वेश्याधर्माचें व्यावहारिक गूढ रहस्यच आहे. संभोगानंद आणि ब्रह्मानंद समसमान आहेत, म्हणून आत्मविद्या आणि वेश्याविद्या याचें समानत्व येथें आम्ही दाखविलें आहे.

समदृष्टीमुळेंच मुनिजन 'मोक्ष' प्राप्त करून घेतात. त्याचप्रमाणें, तरुण-वृद्ध, सुस्वरूप-कुरूप, याच्या ठिकाणीं समदृष्टि ठेवून म्हणजे, तरुणाशीं तरुणाप्रमाणें कामचेष्टा करून, वृद्धाशीं संभोगाचे वेळीं पोक्तपणा दाखवून, सुस्वरूपाशीं आपलें वरचढ कृत्रिम सौंदर्य खुलवून, कुरूपाशीं कुरूपतेची कृत्रिम स्तुति करून, धूर्ताशीं लाघवी पण चतुराईचें वर्तन करून, भोळ्याशीं कृत्रिम भोळा भाविक स्वभाव दाखवून, श्रीमंताशीं आपलें कृत्रिम वैभव दाखवून, गरिबाशीं आवश्यक तेवढाच संबंध ठेवून, या सर्वांकडून वेश्याजन 'धन' प्राप्त करून घेतात. या सर्व परिस्थितीचें सर्वांगीण सूक्ष्म निरीक्षण करूनच धर्मशास्त्रकारांनीं या वेश्याधर्माचीच उलट प्रतिक्रिया म्हणून विवाहित 'वधू'ला "तूं पतिव्रताधर्माचें पूर्णपणें पालन करून पतिनिष्ठ राहा. पतीशिवाय परपुरुषाची मनानेंही इच्छा करूं नकोस. परक्यांच्या ऐश्वर्याला भुलून आपल्या पवित्र शीलाचा बळी देऊं नकोस. पतीच्या प्राप्त्यनुसार मोठ्या कुशलतेनें आपला संसार सुखावह कर, पतीच्या आज्ञेंत नित्य रहा, आपल्या संसाराची अपत्यवती अशी गृहदेवता बनून उत्तम शिशुसंगोपन कर, आपल्या संसारातील मर्यादेचें अतिक्रमण करूं नकोस," असा धार्मिक उपदेश केलेला आहे. वेश्या-मंदिरात प्रवेश करणाऱ्या कामातुर पुरुषालाच भरपूर द्रव्य खर्चावें लागतें, आणि गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या संसारी पुरुषाला द्रव्य खर्चावें लागत नाहीं असें नाहीं. भरपूर द्रव्यावाचून गृहस्थाश्रमधर्म सुखानें चालविता येणें शक्यच नाहीं. वेश्याधर्म आणि पतिव्रताधर्म यातील उलट-सुलट महत्त्वाचे फरक जिज्ञासूंना आम्ही येथें दाखविले आहेत.

### ॥ वेश्या (दासी) स्त्रिया जंगम मालमत्ता ॥

कित्येक देशात स्त्रिया या जंगम मालमत्ता आहेत असें मानतात. जंगम मालमत्ता विकणें, भाड्यानें देणें, बक्षिस देणें, दान देणें, बापाच्या मृत्यूनंतर त्याच्या पुत्रानें उपभोग घेणें, या सर्व व्यवहाराप्रमाणेंच स्त्रिया विकणें, भाड्यानें देणें, बक्षिस देणें,

दान देणें, बापाच्या मृत्यूनंतर त्यांचा उपभोग वारसपुत्रानें घेणें, वगैरे व्यवहार त्या त्या देशातील चालीनुसार कायदेशीर मानले जात. अशा स्त्रियाना जुगार खेळण्याच्या पणासही लावीत असत. कौरव–पाडवाच्या द्यूतामध्यें द्रौपदीला पणास लाविली होती. त्यात पांडव हरल्यानतर द्रौपदीला भरसभेंत आणून नग्न करण्याची आज्ञा दुर्योधनानें दिली होती. 'मी दासी झालें आहे काय?' असा प्रश्नहि तिनें सभेला विचारला होता. त्या वेळीं कर्णानें 'तूं दासी झाली आहेस' असें सागून 'दासीधर्म' कसा आहे तो पुढीलप्रमाणें सागितला. "दासाची बायको ती दासी, तो दास ज्या स्वामीचा, त्या स्वामीची सत्ता त्या दासावर व त्याच्या बायकोवर पूर्ण असते. पिता, भर्ता व स्वामी जिवंत असेपर्यंत पुत्र, भार्या व दासी यांना स्वातन्त्र्य मुळींच नसते. दासीभावामध्यें असलेल्या स्त्रियानीं आपल्या स्वामीची शुश्रूषा करीत असता स्वामीशीं केलेलें यथेच्छ आचरण व्यभिचाराच्या दोषास पात्र होत नाहीं. स्वामी जशी आज्ञा करील तसें दासीनें वागलेच पाहिजे. तूं आता पांडवपत्नी नसून दुर्योधनाची दासी झाली आहेस. आतां तूं दुर्योधनाची आज्ञा मान! दासीभावांतील स्त्रियांनीं लज्जेचा पूर्णपणें त्याग केला पाहिजे. 'दासीधर्म' हा असा आहे." शत्रूराजाला पूर्ण जिंकून त्याला आपला दास केला म्हणजे त्या राजाच्या सर्व स्त्रिया दासीधर्मानें आपल्या दासी होतात. अशा दासी स्त्रियातील निवडक, सुंदर, तरुण, मोहक दासींना अहोरात्र नग्नावस्थेत ठेवलेल्या 'नग्न दासी' जवळ बाळगणें हा विजिगीषु राजेलोकाचा सन्मान त्या वेळीं समजला जात होता. म्हणून द्रौपदीला भरसभेंत नग्न करण्याची आज्ञा दुर्योधनानें दिली असावी असें दिसतें. अजंठा लेण्यामध्यें दासीस्वरूपातील स्त्रिया 'नग्नच' दाखविल्या आहेत. अलेक्झँडर दि ग्रेट हा अहोरात्र नग्नावस्थेंत राहणारी 'थायस' नावाची अत्यत सुंदर गणिका जवळ ठेवीत असे. तिच्या हातचे मद्य तो पीत असे. स्मृतिकारानीं 'धर्मपत्नी'ला जगम मालमत्तेचें स्वरूप देण्याचें नाकारून धर्मपत्नीला दासीभाव कधींच प्राप्त होत नाहीं असें स्पष्ट मत दिलेलें आहे.

## ॥ शाक्तग्रंथांतील वेश्यांचे महत्त्व ॥

धर्मशास्त्रव्यवहारामध्यें धर्मपत्नीच्या स्थानालाच महत्त्व दिलें असलें, तरी वाममार्गी 'शाक्त' धर्मग्रथात वेश्यास्त्रियांना तीर्थांसमान मानल्या आहेत. तीर्थें जलप्रधान असून प्रत्येक वर्षी जल नवीन येतें व जातें अशी जमालचांची घडामोड नित्य तेथें होत असते. अशीच लोकव्यवहाराची घडामोड वेश्यास्त्रियाच्या ठायीं नित्य होत असते म्हणून त्यांना तीर्थांसमान 'शाक्त धर्म' मानतो. अशा तीर्थांसमान वेश्यास्त्रियाना 'नारीतीर्थें' अशा संज्ञा दिलेल्या आढळतात, 'शाक्तधर्मांतील' देवचक्रामध्यें वेश्यास्त्रिया 'शक्ति' स्वरूप मानतात (Embodiment of the active power of divinity) कित्येक शास्त्रकार असें सागतात कीं, आपली वशबुद्धि,

औरसपुत्रप्राप्ति, गृहस्थाश्रमातील कुलधर्म, कुलाचार यांचें सुव्यवस्थित पालन करण्यासाठीं कुलवान, शीलवान्, आज्ञाधारक, विश्वासु आणि प्रामाणिक अशा स्त्रीशीं विवाहबद्ध व्हावें; तिला 'भार्या' म्हणतात. परतु केवळ कामवासनेचीच शांति आणि तृप्ति व्हावी, तसेंच संभोगसुखामध्यें वैचित्र्याची प्राप्ति होऊन इच्छेनुसार संभोगसुख मिळावें यासाठीं संभोगकुशल वेश्या स्त्रीला ठेवावें. तिला कामदासी म्हणतात. विवाहित स्त्रीसंभोग, परस्त्रीसंभोग, वेश्या स्त्रीसंभोग अशा प्रकारचीं संभोगाविषयीं स्त्रियांसंबंधींचीं नानाविध मतें निरीक्षण करून अखेरीस 'आपले घरांत कांतेशीं यथेच्छ सुखसंभोग करावा' असें आपलें निश्चित मत कल्याणमल्लानें येथें निवेदन केलें आहे.

## ॥ ब्रह्मानंदसमान संभोगसुख ॥

शरीर, मन, बुद्धि, इंद्रियें आणि काल या सर्वांच्या समयोगाला 'यथेच्छ सुखसंभोग' सुख म्हणतात. अशी सुखाची व्याख्या 'महर्षि चरक' आपल्या चरकसहितेंत करतात. संभोगोत्सुक वधूच्या योनीमध्यें शिरण्यासाठीं उतावीळ झालेलें वराचें ताठ शिश्न, आणि तें ताठ शिश्न ग्रहण करण्यासाठी उतावीळ झालेली वधूची योनि, या दोन गुह्येंद्रियामध्यें त्या वेळीं जी कामशक्ति उत्पन्न झालेली असते, त्या शक्तीचें मिलन त्या योनींत तें शिश्न गेल्यानेंच होतें. अशा प्रकारें शिश्न-योनि यांच्या संयोगामुळें होणाऱ्या संभोगकार्यामध्यें शरीर, मन, बुद्धि, इंद्रियें आणि काल या सर्वांचा एकत्र 'समयोग' होतो, तोच मुख्यत्वेंकरून सुखसंभोग होय. हा सुखसंभोग कोणत्याही तऱ्हेच्या भीतिरहित म्हणजे मनामध्यें कोणतीही शंका अगर भीति उत्पन्न न होता होतो. या सुखसंभोगकर्मामध्यें शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध, या सर्वांचा एकसमयावच्छेदेंकरून उपयोग करावयाचा असतो. मधुर व मोहक कामोत्तेजक शब्द, आलिंगन-चुंबन व गुह्येंद्रियांच्या मीलनानें होणारा स्पर्श, कामोत्तेजक वाजीकरण षड्रसयुक्त आहार, आकर्षक रूप, कामोत्तेजक सुगंध, या सर्वांनीं युक्त असलेला संभोग 'सुखसंभोगच' होय. निरोगी व सुंदर शरीर, सुप्रसन्न मन, कौशल्य दाखविणारी बुद्धि, सशक्त व संभोगकार्यक्षम इंद्रियें व अनुकूल काल या सर्वांनीं युक्त असलेला संभोग हा "कामशास्त्रोक्त सुखसंभोग" होय. असे हे सूक्ष्म भेद आहेत. अशा या सुखसंभोगकार्याची सिद्धि यशस्वीपणें साध्य होण्यासाठीं गुह्येंद्रियवाचक कामोत्तेजक असे निरनिराळे शब्द उच्चारणें उचित असतें. युद्धप्रसंगीं रणांगणावर युद्धप्रिय शूर वीरांचे अंगांत वीरश्रीचा संचार होण्यासाठीं 'हाणा, मारा, ठोका, शत्रूला पकडा,' वगैरे शब्दांचा जोरजोरानें उच्चार करतात, याला रणगर्जना म्हणतात. त्याचप्रमाणें, रतियुद्धप्रसंगी म्हणजे नायक नायिका संभोगकार्य करण्यास तयार झाली कीं, नायक-नायिकेच्या अंगात मदनसंचार होण्यासाठीं नायकानें नायिकेच्या गुह्येंद्रियाकडे अंगुलीनिर्देश करून स्त्री गुह्येंद्रियवाचक इतर शब्दांचा उच्चार त्या वेळीं उचित अशा कामुक स्वरात करावा. त्याच वेळीं नायिकेनेंहि तसेंच म्हणजे नायकाचे

गुह्येंद्रियवाचक इतर शब्दाचा उचित अशा कामुक स्वरांत उच्चार करावा; असें परस्परानीं गुह्येंद्रियाचे कामुक स्वरांत शब्दोच्चार केल्यानें परस्पराच्या शरीरांत मदनसंचार होऊन सुखसंभोगकार्याची सिद्धि यशस्वीपणें त्याना साध्य होईल. याला शब्दशक्तीचें सामर्थ्य म्हणतात.

संभोगाचेवेळीं संभोगाला उत्तेजन मिळेल असा तेथें कामोत्तेजक सुगंध असला म्हणजे संभोगकार्य इच्छेप्रमाणें समाधानकारक होतें. आणि वीर्यस्खलन झाल्यावर शरीरातील ज्ञानतंतूला जी क्षीणता येते ती क्षीणताही नष्ट होते. आकर्षक रूप असलें म्हणजे 'मन' तेथेंच रमतें, असे हे सुखसंभोगाचें सूक्ष्म भेद आहेत. ते अनुभवजन्य ज्ञानानें समजतात.

ब्रह्मानंद आणि संभोगानंद हे समसमान आहेत. ब्रह्मानंद योगीजनांना प्राप्त झाला कीं, योगीजन स्वतःला धन्य धन्य समजतात. ब्रह्मानंदसमान् संभोगानंदापासून प्राप्त होणाऱ्या आनंदमय स्थितींत ज्या वधू–वराना तल्लीनता प्राप्त झाली, ते वधू–वर खरोखरच धन्य धन्य होत; त्याच वधू–वराचें या जगांतील जीवन पूर्णपणें सफळ झालें असें इतरेजन म्हणतात. यालाच आदर्श गृहजीवन असें कामशास्त्रकार समजतात. वधू–वरांनीं हें आदर्श गृहजीवन या ग्रंथद्वारें प्राप्त करून घ्यावें. कारण, या आदर्श गृहजीवनांतील खरें रहस्य म्हणजे नाना प्रकारच्या आसनानींयुक्त असा हा "संभोगविधि" शुद्ध, पवित्र, उज्ज्वल असल्याने वधू–वराना उत्साहवर्धक, बलवर्धक, सुखवर्धक आणि आयुष्यवर्धक होतो.

**इति श्रीमल्लाडनवलविनोदाय महाकविकल्याणमल्लविरचिते अनंगरंगे विवाहाद्युद्देशनिरूपणं नामाष्टम स्थलः ॥ ८ ॥**

या प्रकारें करून लाडखान भूपतीचे संतोषार्थ श्रीकल्याणमल्लकवीनें रचित जो अनगरग ग्रथ त्यांतील विवाहादिकांचे वर्णनाचा आठवा स्थल सपूर्ण झाला.

## ॥ विवाहसंस्थापूर्व-संभोगव्यवहार ॥

अतिप्राचीन कालीं विवाहसंस्था अस्तित्वांत येण्यापूर्वी मानवसमाज टोळ्या-टोळ्यानीं राहून त्यांचें जीवन सदैव भटकत्या स्थितींतील होतें. त्या कालीं टोळींतील स्त्री-पुरुषाचें संभोगव्यवहार पशूप्रमाणें स्वैर होत असत. कळपातील फळत असलेली कोणतीहि गाय कळपातील कोणत्याहि बैलास गम्य समजत. तसेंच टोळींतील ऋतुमति झालेली कोणतीहि स्त्री (तिची इच्छा असो वा नसो) त्या टोळींतील कोणताहि पुरुष यांचे संभोगव्यवहार होत असत. पुढें पुढें, टोळींतील बलवान् पुरुष टोळींतीलच दुर्बल पुरुषाना मारून टोळींतील स्त्रियांशीं जबरदस्तीनें संभोगव्यवहार करूं लागले.

त्यामुळें टोळींतीलच स्त्री-पुरुषात तंटेभांडण होऊन त्यांचा नाश होऊं लागला. तेव्हा, एका टोळींतील बलवान् पुरुष दुसऱ्या टोळींतील पुरुषाना मारून त्या दुसऱ्या टोळींतील स्त्रिया आणि संपत्ति जबरदस्तीनें लुटून आणून त्या स्त्रियांशीं संभोग-व्यवहार निर्भयपणें करूं लागले आणि स्वतःच्या टोळींतील तंटेभांडणें नाहींशीं करून होणारा नाश टाळूं लागले. सर्वस्व हरण आणि नाश होण्यापेक्षा स्वखुषीनें धन आणि स्त्रिया दुसऱ्या टोळींतील बलवान् पुरुषांना देणें बरें, अशी सुखावह पद्धत सुरू झाल्यानें टोळ्याटोळ्यांमध्यें ऐक्य आणि स्वास्थ्य लाभू लागलें. विवाह-संस्था अस्तित्वात आल्यावर या सुखावह पद्धतीचें स्वरूप हुंडा आणि कन्यादान यांमध्यें होऊन विवाहसंस्था स्थिर होऊं लागली; आणि टोळ्याचे समाज बनून त्याना स्वास्थ्यहि लाभूं लागलें. ऐक्य, स्वास्थ्य आणि शांति याचा लाभ प्राप्त झालेली स्वतःची टोळी सगोत्र–परकी टोळी परगोत्र–अशा सुधारलेल्या स्वरूपातील विवाह-संस्थेमध्यें कन्येच्या कौमार्यभंगाची कल्पना आणि त्याचें महत्त्व समाजशास्त्रकारांना समजू लागलें. म्हणून त्यांनीं विवाहपूर्व कन्येचा विवाहबाह्य कौमार्यभंग करणें हा गुन्हा समजण्यांत येऊन गुन्हा करणाऱ्याचें शिश्नच कापून टाकण्याची अतिभयकर शिक्षा ठेविली. विवाहित वधूचा कौमार्यभंग नियोजित वरानेंच करावयाचा ! अशी सुव्यस्थित पद्धति रूढ झाल्यानें विवाह म्हणजे कौमार्यभंग करण्याच्या हक्काची अमलबजावणी करण्यासाठीं दिलेला धर्ममान्य परवानाच होय. एखाद्या अविवाहित तरुणानें अविवाहित तरुण कन्येला “मी तुझ्यावर प्रेम करतों, माझ्याशीं विवाह कर.” असें सांगणें याचा अर्थच असा कीं, ‘तुझा कौमार्यभंग मला करू दे; तुझ्या यौवनबहराची मौज लुटू देऊन त्याची गोडीहि मला मनसोक्त चाखूं दे.’ हें सर्व सुखावह करण्यासाठीं कन्या वयांत आलेली असल्यास तिची स्वतःची मान्यता मिळविणें व वयात आलेली नसल्यास तिच्या पालकाची मान्यता मिळविणें विवाह-संस्थेत हें जरूर असतें.

अनगराच्या विवाहित वाचकानीं हें लक्षांत ठेवावें कीं, कामशास्त्राचें शिक्षण घेऊन सुशिक्षित झालेली स्त्री आपल्या पतीची कामवासना पूर्णपणें तृप्त करून पतीचें प्रेम जिंकते व पतीला आपल्या ताब्यात ठेवून त्याला दुसऱ्या स्त्रीजवळ जाण्याची गरज भासूं देत नाहीं. वैद्य लोलिंबराज आपल्या “वैद्यजीवन” पुस्तकात लिहितात कीं, “प्रिये, आज मीं वाजीकरण औषधाचें सेवन केलें असल्यामुळें दहा स्त्रिया भोगण्याचें सामर्थ्य मला प्राप्त झालें आहे, तू तर येथें एकटीच आहेस.” यावर वैद्य लोलिंबराजाची पत्नी उत्तर देते कीं, “प्राणप्रिय पतिराज, आपणच मला कामशास्त्र शिकवून कामक्रीडेच्या कलांमध्यें हुशार केली आहे; आपणाला काम-क्रीडामध्यें मी असें संभोगचातुर्य दाखवीन कीं, आपलें दहा स्त्रिया भोगण्याचें सामर्थ्य मी पूर्णपणें जिरवीन. तुम्हाला दुसऱ्या स्त्रीची गरज भासू देणार नाहीं. पहा तर खरें माझें संभोगचातुर्य आणि कौशल्य !”



प्रकरण नववें

## ॥ बाह्यसंभोगाविषयीं ॥

**मतिमानुपभोगपूर्वकं सुरतं संविदधीत कांतया ।**
**परिरंभणमेव पंडितैः प्रथमं तेषु निगद्यतेऽष्टधा ॥ १ ॥**

बाह्य संभोग म्हणजे चुंबन घेणें, स्तन धरणें, आलिंगन देणें, इत्यादि मैथुनाहून जे दुसरे विलास त्यांना बाह्यसंभोग असें साधारण नांव आहे; तेव्हां मतिमतानीं पहिल्यानें बाह्यसंभोग करून मग मैथुन करावें. ते बाह्यसंभोग बहुत प्रकारचे आहेत. त्यांत रतिसमयीं स्त्रीला प्रथमारंभीं आलिंगन द्यावें असें पंडितानीं सांगितलें आहे. त्या आलिंगनाचें आठ भेद आहेत, त्यांचीं नांवें लिहितों.

शयनमदिरात संभोगाचे पहिल्याच दिवशीं वधू-वर हे परस्पराना अपरिचित असतात. अशा वेळीं वधूच्या इच्छेविरुद्ध सभोग करण्याची घाई वरानें करू नये. कारण, त्यावेळीं वधू ही 'नवोढा' (one who is afraid to meet her lover alone.) आणि 'मुग्धा' (Unexperienced) असते. प्रथम रति-विनोदांनीं तिला रमवावें. हंसवावें. नतर हळुहळु आलिंगनें-चुंबनें करावींत; त्यायोगें ती प्रेमात येते. नंतर सभोगकार्यास आरंभ करावा. याला 'नववधू-संगम' म्हणतात. आलिंगनक्रियेनें कामी स्त्री-पुरुषाचें हृदयमीलन होतें. तुझें माझें हृदय एकच आहे हें दर्शविणारें तें एक सूचक चिन्ह आहे. याला हृदयभेटही म्हणतात. समान दर्जाच्या दोन पुरुषांमध्यें प्रेमाचें चिन्ह म्हणून हृदयभेट-आलिंगन परस्परानीं परस्पराना देण्याचा प्रघात आहे. येथें पति-पत्नी हे समान दर्जाचे आहेत म्हणून 'आलिंगन-विधि' त्यानी प्रथम केला पाहिजे. हें सूचित करण्यासाठीं आलिंगनप्रकरणास आरंभ होत आहे. निरनिराळ्या प्रकारच्या आलिंगन-चुंबनविधीनें सभोगकार्याचा उत्साह उत्पन्न होऊन नाना प्रकारचें बाह्य स्पर्शसुख प्रथम मिळतें व त्या योगानें आनंदाचे रोमाच उभे रहातात. आतरस्पर्शसुख देणाऱ्या साक्षात् सभोगक्रियेस आरंभ करण्या-पूर्वी प्रथम ह्या बाह्य स्पर्शसुखाच्या आनंदाची प्राप्ति होणें जरूर आहे. कारण हा आनदच सभोगक्रियेला चांगल्या प्रकारें मदत करितो. यास्तव कल्याणमल्लानें आलिंगन-चुंबन-प्रकरण सुरत-प्रकरणापूर्वी येथें सांगितलें आहे.

वृक्षाधिरूढं तिलतंडुलाख्यं लालाटिकं जांघनविद्धके च।
ऊरूपगूढाह्वयदुग्धनीरे तत्राष्टमं वल्लरिवेष्टितं च ॥ २ ॥

वृक्षाधिरूढ १, तिलतडुल २, लालाटिक ३, जांघन ४, विद्धक ५, उरूप-गूढ ६, दुग्धनीर ७, वल्लरिवेष्टित ८, पहिलें वृक्षाधिरूढ म्हणजे झाडावर चढल्याप्रमाणें १ दुसरें तिलतडुलाख्य म्हणजे तीळ आणि तादळाच्या मिसळीप्रमाणें २. तिसरें लालाटिक म्हणजे कपाळाशीं कपाळ भिडून होतें तें ३. चवथें जाघन म्हणजे माडीवर बसून झालेलें ४. पांचवें विद्धक म्हणजे छातीस स्तनाच्या बोंड्या बोंचून झालेलें ५. सहावें ऊरूपगूढ म्हणजे माड्यानीं मांड्या वेष्टून झालेलें ६. सातवें दुग्धनीर म्हणजे दूधपाणी यांच्याप्रमाणें मिश्रित ७. आठवें वल्लरिवेष्टित म्हणजे झाडास वेल वेष्टिले त्याप्रमाणें ८.

॥ वृक्षाधिरूढ आलिंगन ॥

चरणकमलमेकेनांघ्रिणाक्रम्य
भर्तुरपरपदसरोजेनाश्रयंती तदूरूम्।

तरुमिव भुजवल्ल्या पीड्य चुंबन्नतांगी
कथितमिह मुनींद्रैरेव वृक्षाधिरूढम् ॥ ३ ॥

नवरा उभा असता त्याच्या पायावर स्त्रीनें एक पाय देऊन दुसरा पाय त्याच्या मांडीवर टेकून त्याच्या मांडीचा आधार घेऊन वेल जशी झाडास धरून वर चढते, त्याप्रमाणें भ्रतारास हातानीं घट्ट आवळावें आणि आपलें अग लववून भ्रताराचें चुंबन घ्यावें. यास वृक्षाधिरूढ आलिंगन असें मुनींनीं नांव ठेवलें आहे.

॥ तिलतंडुल आलिंगन ॥

भुजगुह्यविपर्ययं मिथो घटयेच्चेन्मिथुनं सुनिश्चलम् ।
तिलतंडुलसंज्ञकं तदा परिरंभं कथयंति सूरयः ॥ ४ ॥

दोघा स्त्रीपुरुषांनीं गुह्याशीं गुह्य लावून परस्पराचे भुजावर भुज येतील अशी मिठी मारून निश्चल असावें, यास निर्वेध तिलतडुल आलिंगन असें म्हटलें आहे.

॥ लालाटिक आलिंगन ॥

मिथो ललाटाक्षिकपोलवक्त्रहृद्बाहुवल्लीमिथुनं घटेत ।
रसातिरेकाद्यदि निस्तरंगं लालाटिकं तत्प्रवदंति संतः ॥ ५ ॥

दोघा स्त्रीपुरुषानीं मोठ्या प्रेमानें परस्पराचे कपाळाशीं कपाळ, डोळ्यावर डोळे, गालावर गाल, तोंडाशीं तोंड, उराशीं ऊर आणून भुजांवर भुजा येतील अशा परस्परानीं मिठ्या माराव्या, यात कांहीं अंतर नसावें. या आलिंगनाचें नाव लालाटिक असें पडित बोलतात.

॥ जांघन आलिंगन ॥

जघनपरिसरस्थं श्रोणिदेशं स्वभर्तु-
र्निजभुजलतिकाभ्यां गाढमालिंग्य रागात् ।
लुलितवसनकेशा चुंबनं यत्र कुर्यात्
स्फुटमिह परिरंभं जांघनं तद्वदंति ॥ ६ ॥

भ्रतार उभा अथवा बसला असता त्याच्या जघनावर स्त्रीनें आपले कुल्ले येतील असें बसून मोठ्या प्रीतीनें घट्ट मिठी मारावी आणि लुगडें वर केलेलें

असून केंस अस्ताव्यस्त होत्साती चुंबन घ्यावें, यास जांघन आलिंगन असें नाव प्रसिद्ध आहे.

॥ विद्धक आलिंगन ॥

स्थितं पतिं मीलितनेत्रयुग्मं पश्चात्प्रविध्येद्वनिता कुचाभ्याम् ।
गृह्णात्यसौ तामपि विद्धकार्यमालिंगनं तन्मुनिभिः प्रदिष्टम् ॥ ७ ॥

पति डोळे झाकून स्थिर बसला असता स्त्रीनें त्याच्या हृदयास कठीण अशा स्तनाच्या बोंडींनें टोंचून घट्ट मिठी मारावी. मग त्यानेंही तीस धरावी. यास विद्धक आलिंगन असें मुनींनीं नाव ठेविलें आहे. (ज्या स्त्रीचे स्तन घट्ट कठीण असून उन्नत असतील तिलाच हें आलिंगन करता येईल. आलिंगनानें पुरुषास सुख होतें.)

॥ उरूपगूढ आलिंगन ॥

उद्दामकामोन्मथितांगनाया ऊरूयुगं स्वोरुयुगेन यत्र ।
आपीडयेत्कांत उदीरितं तदूरूपगूढं परिरंभणं च ॥ ८ ॥

फार मोठ्या जबरदस्त कामोद्रेकानें पीडित पुरुषानें आपल्या मांड्यांनीं स्त्रीच्या माड्या फार आवळून जें होतें त्यास उरूपगूढ आलिंगन असें नाव आहे. (चंडवेग स्त्री–पुरुषाना हें साध्य होतें.)

॥ क्षीरनीर आलिंगन ॥

अंकेऽथ तल्पे पतितं सुखस्था कांता समालिंगति यत्र गाढम् ।
मिथःप्रवेशं कुरुते निजांगैः स्यात्क्षीरनीर परिरंभणं हि ॥ ९ ॥

भ्रतार पलगावर कसाही निजलेला असता स्त्रीनें त्याच्या सन्मुख पडून घट्ट आवळावा आणि परस्परांनीं परस्पराच्या कुशींत शिरून एकमेकाचे अवयव एकमेकांत एकमेकानीं गुरफटवून मिठ्या माराव्या. या आलिंगनाचें नाव क्षीरनीर आलिंगन असें आहे. (अति उत्कट प्रेमाचें हें लक्षण आहे.)

॥ वल्लरिवेष्टित आलिंगन ॥

वल्लीव वृक्षं सरलांगयष्टिं पतिं समालिंगति यत्र कांता ।
चुंबेच्च रागात्कृतमंदसीत्का प्रोक्तं बुधैर्वल्लरिवेष्टितं तत् ॥ १० ॥

वृक्षाचे अगास जशी वेल गुंडाळते त्याप्रमाणें भ्रताराच्या अगावर वेंगाटून हळू हळू सीत्कार करीत चुंबन घ्यावें. यास वल्लरिवेष्टित आलिंगन म्हणतात. हें इतकें आलिंगनाविषयीं संक्षेपेंकरून वर्णन झालें.

॥ चुंबन कसकसें करावें? ॥

**अधराक्षिकपोलमस्तकं वदनांतस्तनयुग्मकंधरे ।**
**विहितानि पदानि पंडितैः परिरंभादनु चुंबनस्य हि ॥ ११ ॥**

पुरुषानें स्त्रीस प्रथम आलिंगन देऊन त्यामागून चुबन घ्यावें. चुबनानें प्रेम वाढतें. चुबन करण्याचीं मुख्य स्थानें सात आहेत; त्या त्या ठिकाणचें चुंबन घ्यावें. त्याचीं नांवें—१ अधरोष्ठ, २ डोळे, ३ गाल, ४ मस्तक, ५ मुख, ६ स्तन, ७ मान, असें अनुक्रमानें चुबन घेत जावें.

॥ चुंबनाच्या अप्रशस्त जागा ॥

**कक्षायुगं मन्मथमंदिरं च नाभेश्च मूलं स्मरलोलचित्तः ।**
**चुंबंति लाटा निजदेशसाम्यान्नास्त्यन्यतश्चुंबनरीतिरेषा ॥ १२ ॥**

स्त्रीच्या दोन्ही काखा, बेंबीचें मूळ व स्त्रीचें गुह्याग, या तीन जागेचें चुबन घेण्याची चाल लाट देशात मात्र आहे. तेव्हा आपल्या चालीप्रमाणें लाट देशाचे कामातुर लोक या तीन ठिकाणाचें चुबन फार प्रेमानें घेतात. परतु दुसऱ्या लोकात या तीन जागांचें चुंबन घेण्याची चाल नाहीं. चुबनें दहा प्रकारचीं आहेत. ती नावांसहवर्तमान प्रसिद्ध करितों. काही पुरुषाना योनीचें चुबन घेतल्याशिवाय संभोगाची चेतनाच उत्पन्न होत नाहीं. त्याना योनिचुबनाची संवय झालेली असते.

॥ योनिचुंबनाच्या निरनिराळ्या भावना ॥

योनिपूजक योनीचें मोठ्या आदरानें–सन्मानानें, व पवित्र भावनेनें चुंबन घेतात. Woman never grows old below the girdle असें त्याचें योनि-महात्म असतें. अशा योनिपूजकांना महाभारतामध्यें 'भगदेव' अशी संज्ञा दिलेली आहे. (Whose divinity was vulva) वैद्यकीयदृष्ट्या भगदेव म्हणजे योनिशास्त्राचा खास अभ्यास केलेला (Gynecologist) असेंही म्हणता येईल. कारण त्याचा मुख्य विषयच 'योनि' हा असतो. शाक्तधर्मी लोक शक्तिदेवतेला प्रसन्न करून घेण्यासाठीं व शक्तिदेवतेची मन्त्रसिद्धि व्हावी, म्हणून योनीचें एकसारखें

चुंबन घेत घेत आपले मनामध्यें मंत्राचा जप करितात, असें कुलार्णवासारखे शाक्त-धर्मग्रंथ सांगतात. शूरसेन देशातील व पाटलीपुत्र नगरातील लोक वेश्याजनांशी सहवास ठेवून त्यांच्या योनीचें चुंबन घेणें हें पवित्रच आहे, अशा समजुतीनेंच निशःकपणें योनिचुंबनाचे प्रयोग करितात, असें वात्स्यायन आपल्या कामसूत्रात दाखवितो. श्रीशंकर मदनाला ज्या वेळीं जाळूं लागले, त्या वेळीं मदनाच्या अंगाची लाही होऊं लागली. म्हणून स्त्रियांच्या दोन मांड्यामध्यें प्रेमरस पाझरत असलेल्या योनीला सरोवर समजून त्या योनीच्या खोलीमध्यें मदनानें उडी टाकली, असें अलंकारिक भाषेंत सुभाषितकारानीं वर्णन करून योनीला 'मदनमंदिर' अशी संज्ञा दिली आहे. संभोगसमयीं अशा योनीचें चुंबन घेणें पवित्रच आहे अशी उत्कट मनोभावना लाट देशांत आहे, असें कल्याणमल्लाचें मत आहे. चुंबनाद्वारें मनो-भावना प्रकट होतात. शिष्यानें गुरूच्या पायावर हात ठेवून त्या पायाचें शिष्यानें चुंबन घेणें ही नम्रतेची मनोभावना. राजसेवकानें राजाच्या हाताचें चुंबन घेणें ही राजनिष्ठेची मनोभावना. बालकाच्या गालाचें चुंबन घेणें ही माया-ममता वात्सल्याची मनोभावना. धर्मग्रंथाला स्पर्श करून त्या धर्मग्रंथाचें चुंबन घेणें ही आदर-श्रद्धा याची मनोभावना. संभोगसमयीं पुरुषानें स्त्रीची योनि किंवा स्त्रीनें पुरुषाचें शिश्न याचें चुंबन घेणें ही उत्कट कामवासनेची प्रेमाची मनोभावना होय. जशी भावना तशी कृति करणें हें कर्तव्य निसर्गसिद्धच आहे. त्यांत आश्चर्य असें कांहींच नाहीं. महाभारतात "भगदेव" हा शब्द जसा आढळतो; त्याचप्रमाणें, ऋग्वेदात "शिश्नदेव" हा शब्द आढळतो. योनिपूजकाप्रमाणें ऋग्वेदकालीन शिश्नपूजकहि होते. "शिश्नमहात्म्य" पृष्ठ ५६ पहा.

योनिचुंबनाला पाश्चिमात्य देशामध्यें "French-kiss" म्हणतात. युरोपांतील तरुण स्त्रिया योनीवरील सर्व केंस काढून ऑलिव्ह तेलानें योनीचें मर्दन करून साबूनें स्वच्छ धुऊन टाकतात, नंतर सुगंधी कामोत्तेजक अत्तर योनीला लावतात. योनिलुब्ध कामातुर पुरुष अशा सुगंधित योनीचें चुंबन घेणें, दोन्ही ओठांनीं योनि चोखणें, जिभेनें योनि चाटणें या सर्व क्रिया मोठ्या प्रेमानें करण्यांत आनंद मानतात. कामोत्तेजनाला या सर्व क्रिया आवश्यक आहेत अशी त्याची समजूत असते. कामसूत्रकार महर्षि वात्स्यायन कामसूत्रात सांगतात कीं, ज्याची कामवासना अतिमंद असते, संभोगसमयीं ज्यांचें शिश्न चांगलें ताठ होत नाहीं, असे मंद पुरुष योनि-चुंबनाचें प्रयोग करून आपली कामवासना जागृत करतात. प्राचीन काळीं ग्रीक व रोमन देशातील लष्करी लोकामध्यें योनि-चुंबनाचे प्रयोग फारच प्रिय झालेले होते, असें ग्रीक व रोमन वाङ्मय सांगतें. तामीळ भाषेंतील कामशास्त्रकार योनिचुंबनाचे अनेक प्रयोग सांगतात. जीभेनें योनीचें मर्दन करणे, जीभ योनींत घालून ती जीभ आंत बाहेर करणें. योनींत जीभ घालून भोवरा जसा वाटोळा फिरतो तशी ती जीभ योनींत वाटोळी फिरविणें. तामीळ आंध्र देशातील स्त्रियाना योनिचुंबनाचे प्रयोग

प्रिय असतात. जी स्त्री आपल्या ओठाच्या बाहेर जीभ थोडीशी काढून त्या ओठावर ती जीभ इकडून तिकडे फिरविते त्या स्त्रीला योनिचुंबनांचे प्रयोग निश्चित आवडतात. भावना, समजूत, कर्तव्य याचें हें तादृचर्य होय.

स्त्रीची योनि जरी मूत्रोत्सर्ग करणारी अपवित्र-अशुद्ध असली, तरी साबूनें ती योनि स्वच्छ धुवून पुसून, अत्तरानें सुगंधित करून ती योनि शुद्ध व पवित्र करता येते. योनिलुब्ध पुरुष अशा पवित्र सुगंधित योनीचें ग्रहण शिश्नानें करील म्हणजे संभोग करील, किंवा त्या सुगंधित योनीचें ग्रहण मुखानें करील म्हणजे योनिचुंबनांचे विविध प्रयोग करील, अशा पवित्र व सुगंधित योनीला "स्वर्गीय सुखाचें द्वार" असें कामलोलुप पुरुष समजतात. योनीचे ठायी तारुण्यमदामुळें जो प्रेमरस (कामसलील) उत्पन्न होतो, तो प्रेमरस प्रेमशास्त्रामध्यें कित्येकजण अमृतासमान समजतात. (स्वर्गात अमृत असतें.) या अमृतसमान प्रेमरसाचें पान करण्यासाठी योनि-चुंबनाचे प्रयोग करण्यात योनिलुब्ध पुरुष गुंग होऊन स्वोन्नतीचें कार्य विसरून जातो; योनिलुब्ध होणें हा पुरुषार्थ नव्हे, म्हणून योनिचुंबनाला कल्याणमल्ल येथें अप्रशस्त समजतो.

## ॥ रंभा-शुकसंवाद ॥

पुढील विवेचनावरून असें दिसून येतें कीं, ग्रीक, रोमन, फ्रेंच वाङ्मयाप्रमाणें हिंदूंच्या पुराणग्रंथातही योनिचुंबनाचें एक सुंदर उदाहरण म्हणजे 'रंभाशुकसंवाद'! इंद्रसभेतील एक प्रमुख अप्सरा रंभा महामुनि शुकाला म्हणते 'शुकमुने, उत्तम लक्षणें असलेली मानवती (मानानें रहाणारी), गुणवती (गुणाची भोक्ती), कलावती (गायन नृत्यादि कला तसेंच संभोगकला जाणणारी), कमलमुखी (कमळाप्रमाणें सुंदर मुखाची), मृदुभाषिणी (नित्यमृदु-सौम्य नम्र मधुर भाषण करणारी), स्मित-हासिनी (अंतःकरणामध्यें प्रेम उत्पन्न झाल्यामुळें लज्जायुक्त होऊन गालातल्या गालात हासणारी), अशा सौंदर्यवान् स्त्रीच्या नाभिप्रदेशाचें चुंबन ज्या नरानें घेतलें नाहीं त्या नराचें जीवन व्यर्थच! (स्त्रीचा नाभिप्रदेश हा 'काम' पुरुषार्थाचा भाग आहे. त्यात प्रेमरस पाझरणारी रसरसलेली योनि हें मुख्य पवित्र स्थान आहे), राजा भर्तृहरि शृंगार-शतकात लिहितो :—या जगीं सुज्ञ माणसाला दोनच गति. एक डोंगर प्रदेशातील अरण्यसेवन! आणि दुसरें स्त्रीच्या कटिप्रदेशातील असलेल्या रोमा-वलीचें सेवन! (रोमावली = योनीवर रेशमाप्रमाणें नरम मऊ अशा काळ्या केसाचा प्रथमच उद्भव होणें. हें लक्षण कन्या पूर्णपणें वयात येऊन तिचे देहामध्यें पुरुष भोगण्याची इच्छा उत्पन्न झाल्याचे समजतात. योनीवरील अशा नरम व मऊ काळ्या केसाला 'रोमावली' संज्ञा आहे. रोमावलीसंबंधी सुभाषितकार सांगतात कीं, श्रीशंकरांनीं मदनाला जाळीत असता मदनानें 'अज्ञातयौवना' (who is unconscious of her youth) स्त्रीच्या योनींत उडी मारली. त्यावेळीं मदनज्वाळा

विझून त्या योनीच्या बाहेर जो काळा धूर निघाला त्या काळ्या धुराची ही रोमावली बनली. असे मऊ काळे केस न काढलेली योनी.) येथें सेवन शब्दांत योनीचुंबनाचाहि समावेश होतो. कारण, हा 'काम' व्यवहार आहे. वेश्येचें वय, वर्ण, रूप, कला आणि तिचें ऐश्वर्य योनि आणि स्तन घट्ट अगर सैल यावर अवलंबून असतें. या सर्वांचा विचार करून तिचें 'भोगद्रव्य' निश्चित करावें, असें कौटिलीय अर्थशास्त्र सांगतें. हें 'भोगद्रव्य' फक्त मुखचुंबन आणि संभोग यासाठींच निश्चित केलेलें असल्यामुळें 'स्तनचुंबन' आणि 'योनिचुंबन' या दोन्ही क्रिया करण्याची इच्छा जर तो कामातुर पुरुष दर्शवीत असेल, तर त्यासाठीं भोगद्रव्याशिवाय जास्त निराळ्या द्रव्याची जादा मागणी वेश्येनें करावी असें कामसूत्रकार सांगतात.

## ॥ नायिकेचा देह ॥

'कुट्टिनीमत' ग्रंथात सांगितलें आहे कीं, नायिकेनें आपला देह संभोगकार्यासाठीं एकदा नायकाच्या स्वाधीन केल्यावर त्या देहावर नायकाची सत्ता चालते. तेव्हां त्या नायिकेच्या देहाच्या कटीप्रदेशीं असलेल्या योनीचें चुंबन घेणें न घेणें, व त्यासाठीं जास्त निराळें द्रव्य देणें अगर न देणें हें त्या नायकाच्या इच्छेनुसार अवलंबून असतें. स्त्रीचा देह विष्ठा, मूत्र, शेंबूड, लाळ वगैरे घाणीनें, तसेंच तिच्या कमरेचा खालील भाग द्विधा झालेल्या चामडीचा असून नित्य दुर्गंधीनें व्यापलेला असतो, असें वैराग्यवृत्तीचे लोक सांगतात. पण, कामातुर पुरुषाची उत्कट झालेली कामवासना तृप्त करण्याचा योग्य उपाय स्त्रीदेहाच्या कमरेच्या खालीं द्विधा झालेला चामडीचा भाग हाच नैसर्गिक मानतात. यास्तव स्त्रीचा सबंध देह आणि त्या देहाचे सर्व अवयव पवित्र समजूनच संभोगसमयीं स्त्रीच्या सबंध देहाचा उपयोग नायकानें करावा, असे ग्रंथकार सांगतात.

योनि आणि शिश्न हीं 'काम' पुरुषार्थाच्या प्राप्तीचीं दोन मुख्य साधनें आहेत. शेती सुपीक करण्यासाठीं कुजलेलें शेण, पाला, सोनखत वगैरेंचा उपयोग केला जातो. नापिक शेताचा तो उपायच आहे. कामवासना जागृत झाल्याशिवाय संभोगकर्म घडत नाहीं. कामवासना जागृत होण्यासाठीं शरीर-मन-बुद्धि-इंद्रियें हीं सर्व पुष्ट-सुपीक असलीं पाहिजेत; व तीं सुपीक होण्यासाठीं 'योनिचुंबन' हा एक उपाय आहे. हा उपाय ज्यांना मानवला आहे त्यानीं संभोगसमयीं योनि आणि शिश्न हीं पवित्रच समजलीं पाहिजेत. या दोन मुख्य साधनाच्या सयोगानें मानवी अस्तित्वाची जाणीव त्यांना होते. तेव्हा योनिचुंबनादि प्रयोग पवित्रच समजावेत असें मानसशास्त्राचे आचार्य सांगतात. कित्येक शरीरशास्त्रवेत्ते स्त्रीच्या योनीला 'मायांग' असें संबोधितात. ज्या स्त्रीची योनि जो पुरुष आपल्या मंद स्पर्शानें गोंजारून हळू हळू मर्दन करून कुरवाळतो, तसेंच मुखानें योनिचुंबनाचे प्रयोग तिला मानवतील असें करतो, तो पुरुष त्या स्त्रीचे मनांत भरून तिची माया सर्वस्वी त्या पुरुषावरच बसते म्हणून

योनीला 'मायाग' म्हणतात. पतिनिष्ठ, धार्मिक वृत्तीची शीलवान् स्त्री आपलें 'मायाग' पतीशिवाय परपुरुषाच्या नजरेस पडूं देत नाहीं, मग हस्तस्पर्श अगर मुखस्पर्श किंवा लिंगस्पर्श याची पतीशिवाय गोष्ट दूरच! हें प्रबल मनोविकाराचें मानसशास्त्र असून रहस्यमय आहे. अशा प्रकारचे योनिलुब्ध पुरुष उदार आणि व्यापक मनाचे होऊन शेवटीं शेवटीं पूर्णपणें अध्यात्मवादी-मोक्षवादी बनतात. तरीसुद्धा त्याचें मन योनि कीं मोक्ष यांत हेलकावे खात असतें, पण 'शेवटीं योनीपासूनच मोक्षप्राप्ति!' असा ते सिद्धांतहि प्रस्थापित करतात. विलासी आणि कामशास्त्रविशारद अशा शेंकडों स्त्रिया आपल्या अंतःपुरात बाळगणाऱ्या अमरु राजानें लिहिलेल्या 'अमरुशतक' ग्रंथातील श्लोकाचे अर्थ शृंगार आणि संभोगपर जसे होतात; तसेंच त्याच श्लोकांचे अर्थ अध्यात्मपरहि होतात. अशी द्व्यर्थी शब्दरचना त्या श्लोकाची अमरु राजानें केलेली आहे. कर्नाटक राज्याचा राजा देवराज यानें लिहिलेल्या 'रतिरत्नप्रदीपिका' ग्रंथात पुढील चरण आढळतो.

॥ सहस्रभगसम्बन्धान्मुक्तिरित्यभ्यधान्मुनि. ॥

ह्या चरणाचे दोन अर्थ होतात. (१) हजार योनींशीं संभोगसंबंध झाला कीं मुक्ति मिळते. (मुक्ति म्हणजे मोक्ष) (२) सहस्रभगसंबंध-सहस्राव भगसंबंध म्हणजे संभोगाला आरंभ करून संभोगाच्या समाप्तीच्या वेळीं, पुरुषाचें विर्यस्खलन आणि स्त्रीच्या योनींतील पाझरणाऱ्या प्रेमरसाचें स्खलन या दोन्ही क्रिया एकदम एक कालीं झाल्या (सह-स्राव) कीं, त्यांना मुक्ति मिळते म्हणजेच संभोगासाठीं स्त्रीपुरुषांनीं एकमेकांना मारलेली जी घट्ट मिठी, त्या घट्ट मिठींतून ते स्त्री-पुरुष सह-स्राव होतांच तात्काळ एकमेकांपासून मुक्त होतात. एकमेकांपासून बाजूला होऊन मोकळे होतात हा भावार्थ! येथें मुक्ति याचा खरा अर्थ हा आहे.

पहिला अर्थ 'शाक्तमता'चा आहे. 'हजार योनींशीं संभोग-संबंध' याचा भावार्थ विविध मैथुनाचा अतिरेक करून (या अतिरेकामध्यें हजार योनींच्या योनि-चुंबनाच्या अतिरेकाचाहि समावेश होतो) अशा अतिरेकी मैथुनाचा पूर्ण वीट आला कीं, मनुष्याला मोक्ष प्राप्त होतो असें शाक्तांचें मत आहे. शाक्तांचे आचार्य असें प्रतिपादन करतात कीं, निरनिराळ्या सौंदर्यवान् स्त्रियांचे निरनिराळे नटलेले चेहरे पाहून नेत्र तृप्त होतात. निरनिराळ्या स्त्रियांचे निरनिराळे मधुर-मंजुळ आवाज ऐकून कान तृप्त होतात. स्त्रियांनीं केलेल्या निरनिराळ्या पक्वान्नाची रुची चाखून जीव्हा तृप्त होते. तसेंच, निरनिराळ्या स्त्रियांच्या निरनिराळ्या योनींशी संभोग केला कीं, त्या त्या निरनिराळ्या योनींच्या आंतील भागाचं निरनिराळें स्पर्शसुख जननेंद्रि-याला मिळून शिश्न तृप्त होतें. तृप्तीनंतर मुक्ति-मोक्ष! पण शाक्तांचें हें तत्वज्ञान व्यवहारांत जमत नाहीं. कारण 'पुरूरवा' राजानें बोकडाप्रमाणें अखंड संभोगकार्य विविध तऱ्हेनें केलें. तो म्हणतो, 'संभोगाचा अतिरेक करूनहि वीट येण्याऐवजीं,

अग्नींत जों जों तूप ओतावें तों तों अग्नि विझण्याच्या ऐवजीं जास्त भडकत जातो, त्याप्रमाणें माझी कामवासना अखंड संभोगानें तृप्त होण्याऐवजीं जास्त वाढतच गेली. मोक्ष मिळविण्याऐवजीं मीच कामवासनेला बळी पडलों.' दुसरा अर्थ कामव्यवहाराला धरून असून अनुभवहि तसाच येतो.

असें हें सविस्तर निरनिराळें साधक-बाधक विवेचन करण्याचें कारण हेंच कीं, कामशास्त्रकार कामव्यवहारांमध्यें योनि पवित्रच समजतात तेव्हा योनिचुंबनाची क्रिया अपवित्र असून त्याज्यच आहे असेंच केवळ म्हणता येत नाहीं हें अभ्यासकांना समजावें.

॥ मीलित चुंबन ॥

**नारीमुखांते वदनं स्वकीयं समानयेद्यत्र बलेन कांतः ।**
**सा नैव चुंबेदतिकोपयुक्ता स्याच्चुंबनं तन्मीलिताभिधानम् ॥ १३ ॥**

रागें भरली असता स्त्री भ्रताराचे मुखाचें चुंबन अगदींहि घेत नाहीं; तेव्हा भ्रतारानें आपलें मुख तिच्या मुखात बळेंच घालावें. अशीं उभयताची मुखें एकत्र झालीं असता या चुंबनाचें नाव मीलित चुबन असें आहे. (चुबन प्रेमकलहाचें वेळींच होईल.)

॥ स्फुरित चुंबन ॥

**दयितस्य निवेश्य वक्त्रके निजवक्त्रं परिचुंबिताधरम् ।**
**न पिबेदबला तदाननं स्फुरिताख्यं किलं चुंबनं तदा ॥ १४ ॥**

स्त्रीनें आपलें मुख भ्रताराच्या मुखात घालावें आणि पतीनें तिच्या अधरोष्ठाचें चुंबन घ्यावें. परंतु स्त्रीनें पतीच्या मुखाचें चुबन घेऊं नये. तेव्हा त्यास स्फुरित चुंबन असें नांव आहे.

॥ घाटिक चुंबन ॥

**करेण कांतस्य निमील्य नेत्रे जिव्हां मुखांतर्विनिधाय वक्त्रम् ।**
**चुंबेद्विलोलापरिमीलिताक्षि तद्घाटिकाख्यं कवयो वदंति ॥ १५ ॥**

भ्रताराच्या डोळ्यावर आपले हात ठेवून डोळे मिटवून आपली जीभ भ्रताराच्या तोंडांत घालून आपले डोळे मिटून कामचचल होत जाणाऱ्या स्त्रीनें पतीचें मुख चुबावें. त्यास कविजन घाटिक चुंबन म्हणतात.

## ॥ तिर्यक् चुंबन ॥

**करेण कांता चुबुकं गृहीत्वा दशोत्पतिं पश्चिमभागवर्ती ।**
**प्रियाधरं यत्र तु तिर्यगाख्यं प्रोक्तं कवींद्रैः खलु चुंबनं तत् ॥ १६ ॥**

भ्रतारानें स्त्रीच्या पाठीमागें उभा अथवा ओणवा किंवा कसाही राहून स्त्रीच्या हनुवटीखालीं हात घालून तिची हनुवटी धरावी आणि हनुवटी वर उचलून स्त्रीचें मुख वर आकाशाकडे करून तिचा अधरोष्ठ आपले मुखात धरून चुंबून हळू हळू चावावा. आपलाही अधरोष्ठ प्रियेचें मुखात असू द्यावा. यास कवीश्वर तिर्यक् चुंबन म्हणतात.

या चुंबनांत विशेष असें कीं परस्परांचें अधरोष्ठ परस्परांचें मुखांत सापडतात.

## ॥ उत्तरोष्ठ चुंबन ॥

**दंतैर्गृहीत्वा मदनार्ति लोलाऽधरं विचुंब्याशु दशेत्स्वभर्तुः ।**
**कांतस्तदीयं कथितं मुनींद्रैरित्युत्तरौष्ठं परिचुंबनं हि ॥ १७ ॥**

मदनाचे पीडेनें चचळ झालेली स्त्री जेव्हा आपले भ्रताराचे ओठ मुखांत पहिल्यानें धरून चुंबून दातानीं हळू हळू चावेल, तेव्हा भ्रतारानेंही तिचा वरचा ओठ मुखांत धरून चुंबून हळू चावावा. यास मुनींद्र उत्तरौष्ठ चुंबन म्हणतात.

## ॥ पीडित चुंबन ॥

**आदाय दंतच्छदमाशु पत्युः करांगुलीसंपुटकेन नारी ।**
**जिव्हाग्रदेशेन घटेद्दशेच्च तच्चुंबनं पीडितसंज्ञकं स्यात् ॥ १८ ॥**

नारीनें आपल्या बोटानीं भ्रताराचे ओठ धरून त्यावर आपली जीभ फिरवावी आणि हळू हळू चावावे, यास 'पीडित चुंबन' अशी संज्ञा आहे.

## ॥ संपुट चुंबन ॥

**प्रियामुखं स्वाधरसंपुटेन पिबेत्पतिः सापि तथैव भर्तुः ।**

प्रियेचें मुख भ्रतारानें आपल्या ओष्ठांनीं चुंबावें व स्त्रीनेंही तसेंच भ्रताराचें चुंबावें. यास संपुट चुंबन असें नाव आहे.

## ॥ हनुवक्त्र चुंबन ॥

**तत्संपुटास्यं हनुवक्त्रसंज्ञं स्यात्केलिजिव्हाननयत्तदेवम् ॥ १९ ॥**

वरील चुंबनाप्रमाणें करूं लागावें आणि तें करूं लागतांना विलासाच्या छंदेकरून तोंड चाळवावें. पहिल्यानेंच तोंडात तोंड देऊ नये. अमळ तोंडाची इकडे तिकडे चाळवाचाळव करून मग वर सांगितलेल्या चुंबनाप्रमाणेंच करावें. म्हणजे त्यास हनुवक्त्र चुंबन अशी संज्ञा आहे.

## ॥ प्रतिबोध चुंबन ॥

**संप्राप्तनिद्रां रहसि स्वकांतां चिरागतश्चुंबति यत्र भर्ता।**
**प्रोक्तं कवींद्रैः प्रतिवोधसंज्ञं तच्चुंबनं सर्वरसातिरेकम् ॥ २० ॥**

आपली स्त्री एकांत स्थळीं निद्रित झाली असता फार वेळ बाहेर गेलेला भ्रतार घरीं येऊन जेव्हा तिचें चुंबन घेतो, त्या वेळच्या चुंबनास प्रतिबोध चुंबन म्हणजे जागें करणारें चुंबन म्हणतात. आणि सर्वांपेक्षा याच्याठायीं रस विशेष आहे, 'रस' म्हणजे आनंद।

मध गोड असतो. मधापेक्षा अमृत गोड. अमृतापेक्षा ज्या स्त्रीवर आपलें मन बसलें आहे अशा सुंदर स्त्रीचें चुंबन गोड. मन बसलेली किंवा मनात भरलेली सुंदर स्त्री झोपली असतां जर तिचें चुंबन घेण्याची संधि मिळून चुंबन घेतलें तर त्यांत विशेष गोडी असते. अशा या प्रतिबोध चुंबनाला चोरून घेतलेलें चुंबन असेंहि म्हणतात.

## ॥ समौष्ठ चुंबन ॥

**अधरोष्ठयुगेन कामिनी पतिवक्त्रौष्ठयुगं स्वजिव्हया ।**
**परिपीड्य विचुंब्य नृत्यति कथितं तद्धि समौष्ठसंज्ञकम् ॥ २१ ॥**

भ्रताराचे दोन्ही ओठ आणि मुख स्त्रीनें आपल्या ओठांत घेऊन आपल्या जिभेनें चेपून चुंबन करीत जी नृत्य करते. त्याचें नाव समौष्ठ चुंबन असें जाणावें. हें चुंबनाचें वर्णन संपूर्ण झालें.

## ॥ नखें लावण्याचे प्रकार ॥

नखें कोठें व केव्हां लावावीं हें सांगितल्याशिवाय समजणार नाहीं. यास्तव हा विषय वर्णितों. त्यांत पहिल्यानें नखें कोठें लावावीं तीं स्थानें सांगतों.

**ग्रीवाकरोरुजघनस्तनपृष्ठिकक्षाहृत्पार्श्वगंडविषये नखराः खराः स्युः ।**

१ मान, २ हात, ३ मांड्या, ४ स्तन, ५ पाठ, ६ कांखा, ७ हृदय, ८ कुशी, ९ योनीचे आसपासची जागा, १० गाल, हे नखें लावण्यास योग्य अवयव. या इतक्या स्थानीं नखें अंमळ तीक्ष्ण लावावीं.

॥ नखरे करण्याचे समय ॥

**माने नवीनसुरते विरहे प्रवासे द्रव्यक्षयेऽथ विरतौ च मदे प्रयोज्याः ॥ २२ ॥**

विशेष मानाच्या समयीं १, नवा भोग करतांना २, विरह झाला असता ३, प्रवासास जातेसमयीं ४, द्रव्यक्षयाच्या वेळीं ५, मदाच्या समयीं ६, आणि विरतीच्या वेळेस ७, या इतक्या वेळीं वर सांगितलेल्या ठिकाणीं नखरे करावें. (नखरे म्हणजे नखानें टोंचणें.)

॥ नखें कशीं असावीं ? ॥

**निरेखता निर्मलतोज्ज्वलत्वं वर्धिष्णुताप्यस्फुटितत्वमेव ।**
**अमार्दवं चेति गुणा नखानां बुधैः प्रयुक्ताः किल कामशास्त्रे ॥ २३ ॥**

नखांवर रेघा नसाव्यात, निर्मळ असावीं, आणि तेजस्वी असून मध्यें वाढतीं असावीं, फुटीर नसून कठीण असावीं; असे हे नखाचे सहा गुण ज्ञात्यानीं कामशास्त्रांत सांगितले आहेत.

हें नखदान सात प्रकारचें आहे त्याचीं नावें लिहितों.

छुरित १. अर्धचंद्र २. मंडलक ३. तरुणभाव अथवा रेखा ४. मयूरपाद ५. शशप्लुत ६. अन्वर्थ ७.

॥ छुरित नखदान ॥

**अव्यक्तरेखं कृतरोमहर्षं समर्पितं गंडकुचाधरेषु ।**
**यत्कर्म संपूर्णनखप्रभूतं विज्ञास्तदेवच्छुरितं वदंति ॥ २४ ॥**

ज्या नखदानेकरून अवयवावर ओरखडा तर उमटत नाहीं, परंतु खीस रोमाच उठत. तोंपर्यंत गाल, कुच आणि अधोरोष्ठ या स्थानीं जीं नखें लावावीं त्यास छुरित नखदान म्हणतात.

॥ अर्धचंद्र नखदान ॥

**ग्रीवाकुचे वक्रनखप्रहारो दत्तोऽर्धचंद्राख्य उदीरितोऽसा ।**

अनुक्रम


मान आणि कुच याच्याठायीं नखें लावून ज्या वाकड्या रेषा उमटतात त्यास अर्धचंद्र असें नाव आहे.

॥ मंडलक ॥

**इत्येव चेदाशु मुखे प्रयुंज्या त्तदा बुधा मंडलकं वदंति ॥ २५ ॥**

पूर्वी सांगितल्याप्रमाणेंच स्त्रीच्या मुखावर जीं नखें उमटतात त्यास ज्ञाते मंडलक म्हणतात

॥ तरुणभाव नखदान ॥

**द्वित्र्यंगुलादधिक एव नखप्रहारो**
**मूर्धोरुगुह्यकुचदेशसमर्पितो यः ।**
**रेखाव्हयं मदनकेलिकलाविधिज्ञाः**
**प्राहुस्तमेव तरुणस्य हि तत्र भावः ॥ २६ ॥**

स्त्रीच्या मस्तक, मांड्या, गुह्य आणि कुच इतक्या अवयवावर जो ओरखडा दोन तीन बोटापेक्षां लांब करतात, त्यास रेखा अथवा तरुणभाव असें काम-शास्त्र जाणणारे म्हणतात.

॥ मयूरपाद ॥

**रेखा कृता सर्वनखैरधस्तादंगुष्ठमाधाय तु चूचुके या ।**
**मयूरपादं कितवं वदंति—।**

स्तनाच्या बुडाशी चारही बोटें व बोंडीवर अंगुष्ठ ठेवून जेव्हा स्तन धरावे, तेव्हा जी नखें उमटतात, तीं जसा मोराचा पाय चिखलावर उमटतो त्याप्रमाणें दिसतात. त्यास मयूरपाद असें म्हणतात. (ज्या स्त्रीचे स्तन लहान आकाराचे असताल त्याचे ठिकाणीं हें होईल.)

॥ शशप्लुत ॥

**शशप्लुतं सर्वनखैः कुचाग्रे ॥ २७ ॥**

कुचाच्या ज्या काळसांवळ्या बोंड्या असतात, त्या तेवढ्या काळसांवळ्या भागावरच पांच बोटें ठेवून जेव्हां तितकाच स्तन धरावा, तेव्हा जीं नखें उमटेतात, त्यास शशप्लुत म्हणतात.

॥ अन्वर्थसंज्ञक नखदान ॥

**रेखात्रयं पृष्ठकुचेऽथ गुह्ये कृतं भवेदुत्पलपत्रवद्यत् ।**
**अन्वर्थसंज्ञं प्रवदंति तद्धि स्मर्तुं प्रवासावसरे दिशंति ॥ २८ ॥**

तीन बोटाच्या नखांनीं तीन ओरखडे पाठ, स्तन व गुह्य या स्थानीं करावें. ते कमळाच्या पाकळीप्रमाणें दिसतात त्यास अन्वर्थ म्हणतात. हें नखदान प्रवासास जातेसमयीं स्मरण होण्यासाठीं करितात आणि वास्तव हें नाव योग्य आहे.

एका राजानें शिकारीच्या प्रवासाठ निघण्यापूर्वी आपल्या राणीच्या स्तनावर व योनीवर संभोगसमयीं आपल्या नखानीं टोंचून खुणा करून ठेवल्या होत्या. पुढें तो राजा शिकारीला निघून गेला. कांहीं दिवसांनीं त्या राणीनें खिडकींतून खालीं रस्त्यावर जात असलेला एक सुंदर तरुण पाहिला व मोहित होऊन आपल्या दासीकडून त्या सुंदर तरुणाला बोलावून आणलें. तो येताच त्या राणीला राजानें आपल्या नखानीं टोंचलेल्या खुणाचें स्मरण झालें व मनात म्हणू लागली कीं, ‘ मी राणी ! राजा किती रसिक व विलासी ! नानाप्रकारचे भोग मला त्याचेपासून प्राप्त होतात. असें असता या सुंदर पण अरसिक गांवढळ तरुणावर मोहित होऊन मी त्याच्याशीं व्यभिचार करण्यात उद्युक्त झालें हें ठीक नाहीं !’ ती उद्विग्न झाली. तिच्या चर्येवरील हा गूढ भाव तिच्या धूर्त व चतुर दासीनें ओळखला व म्हणाली, ‘ राजा येण्याची आता वेळ झाली आहे, या खेडवळ तरुणाला त्वरत बाहेर जाऊ दे !’ त्या वेळीं राणीनें त्या तरुणास बाहेर जाण्यास सांगितलें व दासीस म्हणाली, ‘ शाबास. तू माझा गूढ अभिप्राय अचूक ओळखलास !’ ही कथा क्षेमेंद्राच्या ‘ बृहत्कथा ’ मध्यें आहे. विद्यासंपादन, कलासंपादन, अगर कोणत्याही कारणास्तव परदेशात जाणारे तरुण पुरुष जर विवाहित असतील, तर त्यानीं प्रवासास निघण्यापूर्वी आपल्या तरुण पत्नीचे स्तनावर, योनीवर नखानीं अगर दांतांनीं कांहीं ओरखडे काढावेत. म्हणजे तिला आपल्या पतीचें स्मरण नित्य होऊन प्रेम कायम राहील. कमी होणार नाहीं.

॥ सुशिक्षित नागरिक आणि अशिक्षित खेडवळ ॥

शहरातील सुशिक्षित कामशास्त्रज्ञ रतितन्त्रज्ञ रसिक असतात. खेड्यातील तरुण कामशास्त्रांत अनभिज्ञ आणि अरसिक असे असतात, याचे एक कौतुक सुभाषितकार पुढीलप्रमाणें सांगतात. कांहीं विशेष प्रसंगानें शहरातील एका कामशास्त्रनिपुण स्त्रीचा एका खेडवळ, अरसिक पण शरीरानें मजबूत, दिसण्यात सुंदर अशा तरुणाशीं संभोगसंबंध घडला त्याच्या त्या दणकट संभोगानें ती स्त्री बेहोष होऊन आनंदांत निमग्न झाली. त्या योगें तिचे डोळे हळूहळू मिटूं लागले. तिचा देह आनंदानें थरारू

लागला. हीं सर्व आनंदाचीं लक्षणें आहेत, हें त्या खेडवळ तरुणाला कामशास्त्र माहीत नसल्यानें समजलीं नाहींत. त्याला वाटलें, माझा हा दणकट संभोग या नाजुक स्त्रीला सहन झाला नाहीं; आता ही मरणार, आपण संकटात सांपडूं या भीतीनें तो खेडवळ तें संभोगकार्य अर्धवट टाकून तिच्या जवळून निघून गेला. अशा प्रकारें, आनंद प्राप्तीच्या ऐन प्रसंगीं त्या स्त्रीचा पूर्ण विरस त्यानें केला. कारण, कामशास्त्र त्याला माहीत नव्हतें.

**'नखं प्रयुक्तं प्रणवाद्रसंस्थैर्यदेतदेवास्ति मनोभवस्य ।**
**सर्वस्वमत्यंतसुखैकहेतुर्नातोस्ति किंचिद्वरकामिनीनाम् ॥ २९ ॥**

रसिक पुरुषांनीं संभोगसमयीं वर सांगितल्याप्रमाणें प्रेमानें नखदान केलें असता कामिनी स्त्रियाच्या संभोगकार्यास तें सर्वस्वी अत्यंत सुखकारक होतें आणि यापेक्षा दुसरें कांहीं श्रेष्ठ त्यांना वाटत नाहीं. (त्याचा विरस होत नाहीं.)

॥ पहिल्यानें कोठें चावावें ? ॥

**नखप्रदेशेषु दंताः प्रयोज्या ओष्ठाननांतर्नयनानि हित्वा ।**
**हुंकारसीत्कारविशेष उक्तो दंतार्पणे कामकलाविदग्ध्यः ॥ ३० ॥**

पूर्वीं ज्या ठिकाणीं नखें लावावीं म्हणून सांगितलीं आहेत, त्याच ठिकाणीं दातही लावावे. परंतु डोळे, वरचा ओठ आणि जीभ वर्ज करून इतर ठिकाणीं हळू दंश करावा. हें दशन (चावणें) जें करणें तें, स्त्री मुखानें हू हू असा सीत्कार करीपर्यंत करावें, असें कामकलानिमग्न पुरुषांनीं सांगितलें आहे असें समजावें.

योनीचे ठिकाणींही नखाप्रमाणें दात लावावे प्रेम वाढतें.

॥ दांत कसे असावे व कसे नसावे ? ॥

**रागस्पृशः स्निग्धतराः समाना घनाश्च सूक्ष्माः सशिखं सभासम् ।**
**दंताः प्रशस्ता अथ खर्वरूक्षा करालबाह्या मलिनाश्च निंद्याः ॥ ३१ ॥**

दात कांहीं थोडे गुलाबी रंगासारखे दिसावे, केवळ पांढरे दिसू नयेत. फार स्निग्ध, ओळींनीं एकसारखे आणि घन व बारीक असून पुढें अण्या असाव्या आणि तेजस्वी असावे. या लक्षणानीं युक्त जे दांत ते प्रशस्त होत.

आखूड, रूक्ष, अक्राळविक्राळ, ओठाबाहेर येणारे आणि मलीन या प्रकारचे दात निंद्य आहेत.

दशन सात प्रकारचें आहे, त्याचीं नांवें सांगतों : गूढक १, उच्छूनक २, प्रवालमणि ३, बिंदु ४, बिंदुमाला ५, खडाभ्रक ६, कोलचर्चा ७.

॥ गूढक दशन ॥

**अधरस्थितरागमात्रगं रदलेख्यं किल गूढकं विदुः ।**

स्त्रीचा अधरोष्ठ जेवढा तांबडा असतो तेवढ्याच जाग्यावर दात लागून ज्या खुणा होतात (म्हणजे लोकांस दिसण्याजोग्या बाहेरच्या बाजूवर असल्यास त्या नव्हेत) त्या खुणास गूढक म्हणतात.

॥ उच्छूनक ॥

**दशनच्छदगंडपीडनात्समुच्छूनकमुच्यते बुधैः ॥ ३२ ॥**

स्त्रीच्या ओंठावर पाहिजे त्या ठिकाणीं अथवा गालावर ज्या दात लागून खुणा होतात त्यांस ज्ञाते उच्छूनक म्हणतात.

॥ प्रवालमणि ॥

**दंतोष्ठयोर्योगविशेषसाध्यः प्रवालपूर्णो मणिरेव उक्तः ।**
**अभ्यासयोगेन स दंपतीभ्यां संसाध्यते नान्यविनोदतस्तु ॥ ३३ ॥**

पुरुषाचे दांत आणि स्त्रीचे ओठ याच्या चमत्कारिक योगानें विलास होतो आणि हा स्त्रीपुरुषांस बहुत दिवसाच्या अभ्यासानें साध्य होतो, थोडक्या दिवसांनीं साध्य होत नाहीं. म्हणून यास प्रवालमणि दशन म्हणतात.

॥ बिंदु व बिंदुमाला ॥

**अधरे तिलके च कामिनो रदयुग्मेन विखंडने कृते ।**
**इति बिंदुरुदीरितोऽखिलैर्दशनैः स्यात्किल बिंदुमालकः ॥ ३४ ॥**

स्त्रीचा अधरोष्ठ आणि कपाळावरील टिळ्याची जागा या ठिकाणीं कामी पुरुषाचे दोनच दात लागून जी खूण होते तिला बिंदु दशन म्हणतात.

याच्या पूर्वीच्या जागांवर पुष्कळ दांत लागून जी खुणाची ओळ उठते तीस बिंदुमाला दशन म्हणतात.

॥ खंडाभ्रक ॥

**कपोलवक्षोगलभालदेशे खंडाभ्रकं स्याद्दशनाग्रलेख्यम् ।**
**तन्मंडलाकारकमंगनानामंगेषु शोभां लभते नितान्तम् ॥ ३५ ॥**

स्त्रीचा गाल, ऊर, मान आणि कपाळ इतक्या ठिकाणीं दांताच्या अण्या लागून ज्या खुणा होतात, त्या समुदायास खंडाभ्रक असें नाम आहे. हें पूर्वीं लिहिलेलें जें मंडलक त्याप्रमाणें स्त्रीचें अंगावर झालें असता दशनाग्रमंडलासह स्त्रीचें अंग फार शोभा पावतें.

॥ कोलचर्चा ॥

**अखर्वसांद्रा दशनावली या कांताशरीरे क्रियते स्वभर्त्रा ।**
**प्रस्थानकाले स्मृतिहेतुभूता तां कोलचर्चां प्रवदंति विज्ञाः ॥ ३६ ॥**

नवऱ्यानें स्त्रीच्या शरीरावर स्नेहयुक्त लांब दाताची पंक्ति उठेल इतकें प्रवासास जातेसमयीं दशन केलें असता नवरा प्रवासास गेल्यावर स्त्रीस वारंवार नवऱ्याची आठवण होते; त्या दशनास कोलचर्चा असें प्राज्ञजन म्हणतात.

॥ केशग्रहण विचार ॥

**स्निग्धा घनाः कुंचितनीलवर्णाः केशा प्रशस्तास्तरुणीजनानाम् ।**
**प्रेमप्रवृद्ध्यै विधिनैव मंदं ग्राह्या नरैश्चुंबनदानकाले ॥ ३७ ॥**

स्त्रियांचे केस स्निग्ध, तेजस्वी, घनदाट, कुरळे आणि काळ्या रंगाचे असे जे असतील ते उत्तम मानिले आहेत. या कामशास्त्रात केस धरण्याचा जो विधि सांगितला आहे, त्याप्रमाणें प्रेम अधिक वाढण्यासाठीं चुंबन घेताना स्त्रीचे ते केस हळूच धरावे.

केशग्रहण चार प्रकारचें आहे, त्याचीं नावें समहस्तक १, तरंगरंगक २, भुजगवल्लक ३, कामावतस ४.

॥ समहस्तक ॥

**चिकुरान्परिगृह्य चुंबति करयुग्मेन पतिः प्रियां यदि ।**
**समहस्तकमित्यथैकतो यदि हस्तेन तरंगरंगकम् ॥ ३८ ॥**

स्त्रीच्या मस्तकाचे मागच्या बाजूचे केस भ्रतारानें आपल्या दोन्ही हातांनीं धरून जर स्त्रीच्या अधरोष्ठाचें चुंबन केलें, तर त्या चुंबनास समहस्तक चुंबन असें म्हणताल.

॥ तरंगरंगक ॥

जेव्हां मस्तकाच्या मार्गें केसाच्या ठायीं एकच हात देऊन स्त्रीचें मस्तक पुढें करून तिचें चुंबन घेतो, तेव्हां त्या केशग्रहणास तरंगरंगक म्हणावें.

॥ भुजंगवल्लका ॥

**परिवेष्ट्य करेण कुंतलान्मदनार्तो यदि धारयेत्प्रियाम् ।**
**रतिकेलिकलापकोविदाः कथयंतीति भुजंगवल्लकम् ॥ ३९ ॥**

पुरुषानें क्रीडासमयीं अगांत मदनाचा संचार झाला म्हणजे स्त्रीच्या वेणीचे केस हातानें धरून स्त्रीस आलिंगन द्यावें. असें केलें असता त्या केशग्रहणास कामविलासपरिपूर्ण ज्ञाते पुरुष भुजगवल्लक म्हणतात.

आता कामावतस म्हणजे कामाचा मुकुटमणी असें केशग्रहण कोणत्या प्रकारचें तें प्रसिद्ध करतों.

**कर्णप्रदेशस्थकचान्विगृह्य परस्परं चुंबति यत्र नारी ।**
**पतिश्च रागात्सुरतावतारे कामावतंसः स कचग्रहं स्यात् ॥ ४० ॥**

पुरुषानें संभोगसमयीं स्त्रीच्या कानाजवळ जे केंस असतात ते धरून व स्त्रीनें पुरुषाचे कान धरून उभयतानी परम प्रेमानें परस्पर मुखांचें चुंबन घ्यावें. असें झालें असता त्या केशग्रहणास कामावतस असें नांव आहे.

प्राचीन काळच्या ग्रीक वाङ्मयातही कामावतंस केशग्रहणास 'Handle Kiss' असें म्हटलेलें आहे. त्या काळीं ग्रीक लोकामध्यें हें अत्यंत लोकप्रिय झालेलें होतें. "Take me by the ears and give me a Handle Kiss" असें ग्रीक व रोमन लोक स्त्रियांना म्हणत असत. चुंबनासबधीं 'भर्तृहरि' आपल्या शृंगार-शतकात लिहितो कीं, "स्त्रीचे अधरस्थानीं म्हणजे ओठामध्यें अमृत असतें म्हणून पुरुष त्या ओठांचें चुंबन घेतो, याला 'अधरपान' म्हणतात. आणि स्त्रीचे हृदयस्थानीं विष असतें म्हणून विषकुंभ म्हणजे वाटोळ्या कठीण दोन स्तनांचे जोराने आंवळून खूप मर्दन करितो." याला अलंकारिक भाषा म्हणतात. स्तन–चुंबनाचें रहस्यहि अतिशय गूढ असतें. लहान बालकानें स्तनपान केले असता ज्याप्रमाणें स्त्रीचे हृदया-मध्यें पुत्रप्रेमाचा पान्हा उत्पन्न होतो, त्याप्रमाणें मूल न झालेल्या स्त्रीच्या भ्रतारानें विविध स्तनचुंबनाचे प्रयोग स्त्रीचे ठायीं केल्यास त्या स्त्रीच्या हृदयामध्यें 'पतिप्रेमाचा पान्हा' उत्पन्न होतो. स्तनाचें चुंबन घेणें, स्तन हातांत धरून तोंडानें ते स्तन चोखणें, स्तनाच्या अग्रभागांवर जीभ फिरविणें, हे स्तन–चुंबनाचे विविध प्रकार होत.

**इति प्रदिष्टाः कतिचित्प्रसिद्धाः क्रमान्मया बाह्यरतप्रकाराः ।**
**प्रसिद्धभावाद् बहुशोः परत्र न दर्शिता विस्तरशंकया च ॥ ४१ ॥**

हे बाह्य संभोग ज्या ज्या कर्मेंकरून करण्यास योग्य त्याच कर्मेंकरून येथें वर्णिले आहेत. परंतु जे बहुत प्रसिद्ध होते तेच वर्णिले आहेत; आणि दुसरे बाह्य संभोग बहुत आहेत व ते फार प्रसिद्ध नाहींत. ग्रंथ फार वाढेल या भयास्तव सांगितले नाहींत.

केस, नेत्र, गाल, ओठ, स्तन, हात, कमर, कुशी, बेंबी, माड्या, कुल्ले व योनि हे स्त्रियांच्या शरीराचे भाग स्फुरण पावू लागले म्हणजे त्या स्त्रीला कामवासना उत्पन्न होऊन संभोगाविषयींच्या गोष्टी तिला प्रिय वाटतात. पुरुषसमागमाची ती इच्छा करिते व संभोगाबद्दल उत्सुकता दाखविते. अशा उत्सुक स्त्रीजवळच संभोग करावा, असें 'सुश्रुता' चें मत कल्याणमल्लानें मान्य करून हें नववें प्रकरण स्फुरण करणाऱ्या कामोत्तेजक क्रिया कशा कराव्यात यासाठीं लिहिलें आहे, या क्रिया मदनाची उपासना करणाऱ्या आहेत. त्यायोगें 'मदनदेव' प्रसन्न होऊन मदनक्रीडा चांगल्या प्रकारें दांपत्यांना करिता येते. स्त्री रजस्वला झाली म्हणजे तिच्या शरीराच्या वरील सर्व ठिकाणीं आतून संभोगाला उत्तेजक असें स्फुरण उत्पन्न होत असतें. तें स्फुरण ज्या ज्या क्रिया नवऱ्यानें केल्या असता शांत होऊन स्त्रीला समाधान वाटतें, त्या त्या क्रिया संभोगकार्याला आरंभ करण्यापूर्वी केल्या असता संभोगकार्य सुलभ होऊन सुखावह होतें, हा भावार्थ! ऋतुस्नात भार्येशीं संभोग जर पतीनें केला नाहीं, तर धर्माचें उल्लंघन होतें असें जें धर्मशास्त्रकारांचें मत आहे, त्यांतील रहस्य आतां सहजच समजून येईल. याच्याही पुढें अर्थशास्त्रकार जाऊन म्हणतात, "ऋतुकालीं पतीनें भार्येशीं समागम जर केला नाहीं तर त्याला दंडाची शिक्षा आहे" असें कौटिलीय अर्थशास्त्रांत सांगितलें आहे. येथें धर्माचें उल्लंघन म्हणजे ऋतुस्नात भार्येची जी योनि उत्तेजित झालेली असते, त्या उत्तेजित योनीचा धर्म पतीचें ताठ झालेलें शिश्न ग्रहण करणें. पतीनें संभोगच केला नाहीं; तर त्याचें शिश्नग्रहण योनीला करता येणार नाहीं. धर्माचें उल्लंघन म्हणजे उत्तेजित झालेल्या योनिधर्माचें उल्लंघन.

**इति श्रीमल्लाडनवलविनोदाय महाकविकल्याणमल्लविरचिते**
**अनंगरंगे बाह्यसंभोगनिरूपणं नाम नवमः स्थलः ॥ ९ ॥**

या प्रकारें लाडखान भूपतीच्या संतोषार्थ श्रीकल्याणमल्ल कवीनें रचित जो अनगरंग त्यांतील बाहेरच्या संभोगाच्या वर्णनाचें नववें स्थल संपूर्ण झाले.



प्रकरण दहावें

## ॥ संभोगासनांचें संशोधन ॥

आमचे सशोधनात असें आढळून आलें कीं, कामशास्त्रातील संभोगासनाच्या चित्राचें कुतुहल प्रत्येक तरुणांच्या मनात निर्माण होत असतें. जर्मन–इटालीयन सिने-तंत्रज्ञानीं भारतात येऊन 'वात्स्यायन-कामसूत्रां'ची संपूर्ण सिने–फिल्म तयार केली. अर्थात् कामसूत्रांतील विविध सभोगासनाचे अनेक प्रकार चित्रित केलेच ! बाजीराव पेशवे हे मस्तानीशीं कसकसे संभोगाचे विलास करीत होते याचीं चित्रें पेशवेकालीन चित्रकारांनीं तयार केलेलीं आमचे पहाण्यात आलेलीं आहेत. अनंगरंगची चिनी भाषेंत चीनमध्यें छापलेली एक जुनी प्रत आमचे पहाण्यात आली. त्यात चिनी चित्रकारांनीं चित्रित केलेली सभोगासनांचीं चित्रेंही आमचे पहाण्यात आलीं. इग्लड, फ्रान्स, जर्मनी, इटाली, इजित, अमेरिकासारख्या पाश्चात्य राष्ट्रात सभोगाच्या

निरनिराळ्या दृश्यांची चित्रें, आणि सिने–फिल्म्स पहाण्यात मिळतात. भारतातहि हें सर्व पहाण्यास गुप्तपणें मिळते. मानवांचें कल्याण या विशिष्ट हेतूनें प्रेरित होऊन या सभोगासनाचे संशोधनांत जें आम्हाला आढळून आलें तेंच येथें देत आहे. या संशोधनातील कांहीं भाग विवाहासबधीचें आठवें प्रकरण यांत त्यातील प्रसंगानुसार दिलेला आहे. तो तेथेंच वाचावा

या १० व्या प्रकरणांत सभोगाच्या आसनाचीं विविध वर्णनें केलीं आहेत. सुरू केलेलें एखादें महत्त्वाचें कार्य कंटाळवाणें होऊं लागलें म्हणजे त्या महत्कार्यातील प्रेमच नष्ट होऊन तें महत्कार्यच सोडून द्यावें असें वाटूं लागतें. मग कार्यघात ठरलेलाच ! मानवी जीवनात–संभोगकार्य हें एक महत्कार्य आहे. या सभोगकार्याला एकदा सुरुवात झाली कीं, हे संभोगकार्य निरस व कंटाळवाणें होऊं नये, या सभोगकार्यातील प्रेम नष्ट होऊ नये, व हें संभोगकार्यच सोडून द्यावें असें वाटूं नये, तर उलट सभोगकार्यात उत्साह वाढून सभोगकार्याची पूर्ण सिद्धि प्राप्त व्हावी, म्हणून संभोगाचे निरनिराळे प्रकार मनुष्य नित्य शोधीत असतो. यासाठींच विविध संभोगासनांची योजना केलेली आहे, ती या प्रकरणात लक्षपूर्वक वाचावी. संभोगासनांतील वैचित्र्य आणि विविधता प्राप्त झाल्यानें दांपत्याच्या मनाला, बुद्धीला व्यापकपणा–विशालपणा प्राप्त होऊन त्यांची महत्त्वाकांक्षा, त्याचा उत्साह वाढतो. तूं व मी एकच आहोंत याची जाणीव त्यांना होते.

पुरुषाचे शरीरांत कामाग्नि भडकून एकदा कामवासनेचा संचार झाला कीं, त्याचें पुरुषत्वाचें चिन्ह जें शिश्न तें शिश्न क्षुब्ध होऊन एकदम ताठ होतें, मग संभोग केल्याशिवाय क्षुब्ध व ताठ झालेलें तें शिश्न शात होत नाहीं. अशा कामविव्हल झालेल्या एखाद्या पुरुषानें दुसऱ्या विवाहित स्त्रीशीं सभोगकर्म केलें, तर त्या संभोगकर्माला ‘व्यभिचार’ अशी संज्ञा आहे. अल्पवयी मुलीशीं संभोगकर्म केलें तर त्यास ‘बलात्कार’ अशी सज्ञा आहे. वयात आलेल्या अविवाहित कुमारिकेशीं तिच्या मर्जीविरूद्ध संभोग करण्याचा प्रयत्न झाला तर ‘बळजवरी विनयभंग’ अशी संज्ञा आहे. या सर्व प्रकारांना फौजदारी कायद्यात भयंकर गुन्हा समजून जबरदस्त शिक्षा सांगितल्या आहेत. हे गुन्हे करणाऱ्यांचें क्षुब्ध झालेलें ताठ शिश्न कापून टाकण्याची शिक्षा प्राचीन काळीं देत असत.

हिंदूच्या गर्भाधानसस्काराचे वेळीं उत्तम प्रकारचें कामोद्दीपन होईल अशा प्रकारें शृंगारलेल्या दिव्य शय्येवर प्रजोत्पादनार्थ व सुखार्थ दांपत्यांचा जो प्रथमच सभोग होतो, त्याला ‘सुरत’ अशी संज्ञा आहे. हें सुरतकर्म ज्या दिव्य शय्येवर केलें जातें, या दिव्य शय्येला इंग्रजीमध्यें Celestial Bed असें म्हणतात. या शय्येवर होणारें सुरतकर्म सुदर पुत्रफल देणारें असतें असें मानतात. अशा या सुरतकर्माला कोणत्याही देशांतील फौजदारी कायदा प्रतिबंध करूं शकत नाहीं, अगर हें सुरतकर्म ‘अश्लील’ आहे असें समजत नाहीं; उलट संरक्षण देतो. अशा या राजकायदामान्य

सुरतकर्मांचें प्रकार कल्याणमल्ल येथें सांगत आहेत. दिव्य शय्या सुगंधी कामोत्तेजक फुलांनीं व संभोगासनांच्या नानाविध चित्रांनीं, तसेंच आपण करीत असलेले संभोगासन आपणाला चांगलें दिसावें म्हणून दिव्य शय्येवर मागें-पुढें, डावे, उजवे बाजूला मोठे आरसे ठेवून सुशोभित केलेली असल्यामुळें कामोद्दीपन होऊन दांपत्याच्या मनाचें समाधान निःसंशय होतें.

## ॥ संभोगासनें आणि इंपीरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया ॥

राजकायदामान्य सुरतकर्मांचीं नानाविध चित्रें (संभोगासनें) हिंदुस्थानांतील कित्येक देवळांच्या भिंतींवर काढलेलीं आहेत. यांपैकीं कित्येक चित्राचे कोरलेले दगड 'ब्रिटिश म्युझियम' व 'बर्लिन ॲंटिक्वेरिअन्' यामध्यें जपून ठेवलेले आहेत. कित्येकाना हीं संभोगासनांचीं चित्रें पापमय अश्लील दिसत असलीं, तरी प्राचीन काळच्या जुन्या समजुतींची आठवण करून देणाऱ्या पुराणवस्तु म्हणून सरकारी आर्चिआलॉजिकल खात्यानें नीट संरक्षण करून ठेविलीं आहेत. इतकेंच नव्हे, तर त्यांची नासधूस करणाऱ्यास शिक्षा करण्यांत येईल असा दंडकही करून ठेविलेला आहे. हंटर यांचे इंपीरिअल-गॅझेटिअर ऑफ इंडिया, अकरावा भाग, सन १८८६ सालची दुसरी आवृत्ति, पान ३१५ वर लिहिलें आहे कीं, (या संभोगासनांच्या चित्राबद्दल) 'In a religion of this sort great abuses are inevitable.. it is very difficult for a person, not a Hindu, to pronounce upon the real extent of this evil None but a Hindu priest really knows the truth about their inner mysteries ' सुरतकर्मांच्या आसनातील गूढ रहस्यें शोधून काढण्यास हेंच वचन मला कारणीभूत झालें. हीं संभोगासनांचीं चित्रें म्हणजे वरानें वधूचें प्रेम संपादन करण्यासाठीं दिव्य शय्येवरील रति-मदनाच्या उपासनेचे विविध प्रकार आहेत. या उपासनेचें आठ प्रकारचें रहस्य आमचे संशोधनांत जसें आढळलें तसेंच येथें देत आहे.

## ॥ संभोगासनांतील आठ रहस्यें ॥

(१) शिश्न व योनि यांचा संभोग नीट-सुव्यवस्थित होऊन संभोगातील जास्तींत जास्त आनंद प्राप्त होण्याच्या कार्यात कसल्याहि प्रकारची शारीरिक बाह्य अगर आन्तर अडचण उत्पन्न होत असेल, तर ती अडचण या आसनानीं नाहींशी करिता यावी; म्हणून संभोगासनाचीं चित्रे पाहून त्या त्या संभोगासनाची पूर्ण माहिती चित्रद्वारें वधू-वरानीं प्राप्त करून घ्यावी. कारण, अशा संभोगासनात वधू-वराची पांच ज्ञानेंद्रियें म्हणजे कान, त्वचा, नेत्र, जिव्हा, नाक आणि हात-पाय वगैरे पांच कर्मेंद्रियें अकरावें मन या सर्वांचा परस्परानुकूल त्यांचा एकत्र सहकार होऊन संभोगाचे वेळीं तीं सर्व एकदमच गतिमान् होतात. त्यावेळीं वधू-वराच्या गुह्येंद्रियांचा

संयोग होऊन त्यातून गुह्येंद्रियाचें जें सतत घर्षण होत असतें, त्या घर्षणामुळें त्याचे अन्तःकरणांत 'ममत्व' म्हणजे हा माझा पति आहे, ही माझी पत्नि आहे अशी अभिमानासह प्रबळ मनोभावना निर्माण होते. त्याचें जीवन सुखी होतें.

## ॥ गृहकृत्यें आणि संभोगासनें ॥

(२) देशादेशातील आचार, विचार, प्रामाणिक समजुती, भावना, स्त्री-पुरुषाच्या गुह्येंद्रियाची रचना, प्रमाण, सामर्थ्य व वेग, शारीरिक अडचणी वगैरे गोष्टींचा विचार या आसनांमध्यें केलेला आहे. उताणें निजून, बसून, ओणव्यानें, उभ्यानें, कुशीला निजून, चतुष्पाद प्राण्याप्रमाणें होऊन, पुरुषायित, इतक्या प्रकारांचीं आसनें आहेत. कित्येकांना असेंही वाटण्याचा संभव आहे कीं, अशा या आसनांनीं पुरुषाना जरी संभोग वैचित्र्याचा अनुभव प्राप्त होत असला, तरी स्त्रियाना तीं कष्टप्रद व दुःखदायक होत असतात. त्याचें हें वाटणें एकांगी असतें. कन्यावस्थेत फुगड्या, झिम्मा, पिंगा, कोंबडा—वगैरे शारीरिक चपळतेचे खेळ मुली खेळतात; तसेंच थोडेंसें ओणवें होऊन काढणें-सडणें, थोडें जास्त ओणवें होऊन खरकट्याला शेण लावणें, बसून धान्य जात्यावर दळणें, वगैरे शारीरिक हालचालींचीं व कष्टाचीं जीं गृहकृत्यें स्त्रिया करतात; तसेंच उखळ-मुसळ, पाटा-वरवंटा, जातें-खुंटा, पोळपाट-लाटणें, ताक करण्याची बरणी, राजण अगर डेरा-ताक घुसळण्याची रवि, खल-बत्ता वगैरे संसारोपयोगी वस्तूंची रचनाच योनि आणि शिश्न यांच्याशीं साम्य दाखविणारी आहेत. तसेंच, त्यांचीं कार्येंहि संभोगकार्याशीं साम्यता दाखविणारीं आहेत. या सर्व वस्तूंची कार्यें आणि वरील गृहकृत्यें करताना स्त्रियांना आपल्या शरीराच्या ज्या हालचाली कराव्या लागतात, त्या सर्वांचें जर सूक्ष्म निरीक्षण केलें तर असे आढळून येईल कीं, या सर्व खेळामध्यें व त्या गृहकृत्यामध्यें निरनिराळ्या संभोगासनांच्या क्रियेचें नकळतच घरगुती शिक्षण तेव्हांपासूनच त्याना मिळतें. त्यामुळें स्त्रियाना तीं तीं आसनें दुःखदायक होण्याऐवजीं प्रेमदायक व सुखावहच होतात. याचसाठीं ते खेळ व तीं गृहकृत्यें स्त्रियानीं केलीं पाहिजेत.

## ॥ रतितंत्रज्ञ दुर्मिळ स्त्रीरत्न ॥

आपल्या पतीचे मनांत ज्या ज्या संभोगासनाची इच्छा उद्भवली असेल, तें तें आसन पत्नीनें करून आपल्या पतीला भोग दिल्यास ती आपल्या पतीची आवडती होऊन पतीचें प्रेम जिंकते. एकसारखें तेंच तेच संभोगासन नित्य केल्याने संभोगातील प्रेम नाहींसें होऊन एक प्रकारें कंटाळवाणें वाटत असतें. हें कंटाळवाणें वाटणे नष्ट होऊन प्रेम वृद्धिंगत करून तें प्रेम जिंकणें पत्नीचें धार्मिक कर्तव्य आहे. हें कर्तव्य पार पाडण्यासाठीं संभोगासनाची नानाविध माहिती व त्यांचे शिक्षण स्त्रियाना जरूर पाहिजे. भोजनामध्यें निरनिराळी रुचि उत्पन्न करणारीं, आपणाला आवडत

असलेलीं अशीं नाना प्रकारचीं पक्वानें नित्य मिळालीं कीं, त्या भोजनाचा कधींहि कंटाळा येत नाहीं. असें भोजन नित्य तयार करून देणारी निष्णात स्त्री आपल्या नवऱ्याची अत्यंत आवडती होते, त्याप्रमाणें संभोगकर्मामध्यें निरनिराळीं गोडी उत्पन्न करणारीं अशीं नाना प्रकारचीं संभोगासनें नित्य करून जी निष्णात स्त्री आपल्या पतीला इष्ट असा उत्तम प्रकारचा संभोग नित्य करू देते, ती स्त्री आपल्या पतीची अत्यंत आवडती होते. निरनिराळ्या संभोगासनाचें शिक्षण घेतलेल्या भार्येशीं केला जाणारा संभोग किती 'रसिक' होतो याचा खास अनुभव तिच्या पतीलाच त्या वेळीं मिळतो. अशी रसिक व सुशिक्षित भार्या नशिबानेंच प्राप्त होते. संभोगासनाचें शिक्षण घेतलेली निष्णात स्त्री संभोगकार्यातील सौंदर्य, प्रेम आणि आनंद या तिन्ही कलाचा योग्य वेळीं उपयोग करून आपल्या पतीच्या लैंगिक सुखाच्या अपेक्षा पूर्ण करते आणि आपल्या पतीला आपल्याच ठायीं रममाण करते. वाक्चातुर्य अगर गोष्टीचातुर्य दाखविल्यानें श्रोत्याना चकित करतां येतें. तसेंच संभोगचातुर्य दाखविल्यानें पतीला चकित करता येतें, असे संभोगचातुर्य दाखविणाऱ्या संभोग-कलाविशारद रतितंत्रज्ञ स्त्रीला "स्त्रीरत्न" म्हणतात. असें हंसऱ्या आणि नित्य प्रसन्न चेहऱ्याचें मधुरभाषिणी स्त्रीरत्न दुर्मिळ असतें.

## ॥ योगविद्या आणि संभोगविद्या ॥

(२) काहीं 'आसनें' अशीं आहेत कीं, तें संभोगासन करून संभोग केला असतां स्त्रियाचें 'गर्भकमल' प्रफुल्लित होऊन विकास पावतें; व संभोगकालीं पतीच्या वीर्यस्खलनातील जोमदार वीर्यजंतु ग्रहण करण्यास तें गर्भकमल समर्थ होतें. (गर्भधारणा होते.) कांहीं आसनें संततिनियमन करणारीं आहेत. अशा प्रकारें नानाविध संभोगासनाच्या क्रिया केल्यानें शिश्नाचें योनीमध्यें जें ग्रहण केलें जातें, त्यायोगें योनींतील अपत्यमार्ग बाळंतपणास सुलभ होण्यासारखा होतो. त्या अपत्यमार्गानें जन्मणारें बालक सुखरूपपणें बाहेर येते; प्रसूत होतांना त्रास होत नाहीं. हा मोठा फायदा स्त्रियांना प्राप्त होतो. बाळंतपण म्हणजे स्त्रियांचा पुनर्जन्म ! पण, शौचविधीसाठीं ज्याप्रमाणें विशिष्ट आसन करून बसलें असतां थोडेसें कुंथल्याबरोबर गुदद्वारें मल तत्काळ बाहेर पडतो, किंवा जोरानें शिंकलें असता नाकातील घाण बाहेर येते, त्याप्रमाणेंच नानाविध संभोगासनांच्या सवयी झाल्याने अपत्यमार्ग थोडासा जोर करतांच प्रसववायु जन्मणाऱ्या बालकाला त्या अपत्यमार्गानें पुढें ढकलतो व प्रसुतीला त्रास होत नाहीं. 'प्रसववेदना' सहन करण्याचें सामर्थ्य प्राप्त होत असतें.

## ॥ इच्छित संतति देणारी संभोगासन विद्या ॥

योगविद्येच्या अभ्यासानें इच्छामरणी होता येतें; संभोगविद्येच्या अभ्यासानें संततिनियमन किंवा इच्छित संतति स्त्रीला इच्छेनुसार करून घेतां येते. संभोगसमयीं

पुरुषाचें वीर्यस्खलन होत असतांना स्खलन झालेलें ते पुरुषवीर्य स्त्रीनें आपल्या योनींतील नाडीवर इच्छेप्रमाणें ग्रहण म्हणजेच शोषण करावयाचें. संततिनियमन करण्याची इच्छा झाल्यास स्खलन झालेलें पुरुषाचे वीर्य योनींतील 'समीरणा' नाडीवर ग्रहण करणें म्हणजे तें वीर्य निष्फल होईल. 'कन्या' पाहिजे असल्यास 'चाद्रमसी' नाडीवर वीर्य ग्रहण करावें. 'पुत्र' पाहिजे असल्यास 'गौरी' नाडीवर वीर्य ग्रहण करावें, असें इच्छेप्रमाणें फल मिळतें. संभोगासनाच्या निरनिराळ्या प्रयोगामध्यें ज्या कांहीं शारीरिक विशिष्ट हालचाली होतात, त्या हालचालींच्या नित्य अनुभवानें वरीलप्रमाणें इच्छा सफल करून घेता येतात. स्त्रीच्या अधोभागाच्या या उपासनेचें फल आणि महत्त्व असें आहे. योगविद्या आणि संभोगविद्या.

## ॥ योनींतील सूक्ष्म नाड्या ॥

तंत्रग्रंथातील नाडीज्ञानाचें सूक्ष्म संशोधन करीत असतां या संभोगासनाचें खरें महत्त्व समजून आलें तें असें "स्त्रीच्या योनीच्या अंतर्भागामध्यें समीरणा, चाद्रमसी आणि गौरी अशा तीन सूक्ष्म नाड्या आहेत. संभोगसमयीं पुरुषाचें वीर्य समीरणा नाडीवर पडलें तर निष्फल, चाद्रमसी नाडीवर वीर्य पडलें तर कन्या, गौरी नाडीवर वीर्य पडले तर पुत्र, असें फल मिळतें. असें भावप्रकाश ग्रंथ सांगतो. नानाविध संभोग–आसनाचे हे प्रयोग अभ्यास आणि त्याचें ज्ञान म्हणजे स्त्री-पुरुषाच्या अधोभागाची (कमरेच्या खालील भागांची) ज्ञानयुक्त उपासना आहे. ज्या फलाच्या प्राप्तीसाठीं उपासना करावयाची, तें फल उपासना यशस्वी झाली म्हणजे मिळतें.

## ॥ शास्त्र आणि कला ॥

(४) संभोगकार्यप्रसंगीं विशेष कौशल्य दाखवून संभोगकार्याची शोभा वाढविणाऱ्या या सुंदर 'कला' आहेत. अर्थात् परस्पराचीं मनें परस्परांना रमविणाऱ्या या 'संभोग–कला' आहेत. संभोगशास्त्र आणि संभोगकला यामध्यें सूक्ष्म फरक आहे. शास्त्र हें ज्ञानयुक्त प्रेम निर्माण करतें. पण कला निर्माण केलेल्या त्या प्रेमाला घट्ट–दृढ करून दीर्घकाल स्थिर करते.

## ॥ संभोगानंद आणि प्रजोत्पादन ॥

(५) संभोगप्रसंगीं पति-पत्नी या उभयतानीं परस्परांना आनंद प्राप्त करून दिला पाहिजे. आनद हा मनाचा एक धर्म आहे, असें पतंजलिमहर्षि योगसूत्रात लिहितात. सर्वांचीं मनें एकसारखीं नसतात. ज्या आसनांत उभयताचीं मनें एकाग्र होऊन उत्तम प्रकारें रममाण होतील तेच आसन योजावें. 'मनुस्मृतींत' लिहिलें आहे कीं, "पत्नी असंतुष्ट असेल तर ती पतीला आनद देऊ शकणार नाहीं व आनंदरहित पति प्रजोत्पादनास समर्थ होणार नाहीं." (अ. ३ रा श्लोक ६१). पितृऋणांतून मुक्त

होण्यासाठीं प्रजोत्पादन केलेंच पाहिजे. संभोगकार्याशिवाय प्रजोत्पादन होणार नाहीं. म्हणून जेणेंकरून उभयताना आनंद प्राप्त होईल आणि पितृऋणातून मुक्तता होईल असें संभोगासन स्त्रीनें योजावें. आनंद आणि प्रजोत्पादन हेच मुख्य उद्देश या संभोगासनाचे आहेत.

॥ शिश्नाची दोहनक्रिया ॥

(६) कित्येक वेळां असे विचित्र प्रसंग अनपेक्षितपणें उत्पन्न होतात कीं, पत्नी-जवळ पति जातांच संभोगकार्याला आरंभ करण्यापूर्वीच पतीचें ताठ झालेलें लिंग एकाएकीं थंड होऊन पुढें संभोगकार्यच होत नाहीं. अशा प्रसंगीं पत्नीची वृद्धिंगत झालेली कामवासना पतीनें जर तृप्त केली नाहीं, तर ती स्त्री आपल्या नवऱ्यावर मनामध्यें असंतुष्ट राहून त्याचा द्वेष करील व परपुरुष पाहील. तेव्हां थंड झालेलें लिंग पुन्हा ताठ होऊन संभोगकार्याची पूर्ण सिद्धि होण्यासाठीं तात्कालिक उपाययोजना म्हणून संभोगासनाचीं चित्रें पहावींत म्हणजे सर्व कांहीं मनाप्रमाणें होईल. तसेंच वधूला गाई-म्हशीचें दूध काढतां येत असेल, तर दूध काढते वेळीं गाई-म्हशीचे सड हाताचे मुठींत धरून ते सड हालवून हालवून—चोळून चोळून दुध काढण्यासाठीं ताठर करतात. या क्रियेला दोहन म्हणतात. ही दोहनक्रिया माहीत असलेल्या वधूला 'दुहिता' म्हणतात. अशी ही दोहनक्रिया वधूने वराचे शिश्नाचे ठायीं करावी. म्हणजे संभोगकार्यासाठीं वराचें शिश्न ताठ होईल. ही दोहनक्रिया म्हणजे रतिवर्धन करण्यासाठीं शिश्न ताठ करण्याचें कामशास्त्राचें घरगुती शिक्षणच होय.

(७) *संभोगेन एकत्वं :* संभोगानें एकत्व प्राप्त होतें. मानवी जीवनामध्यें स्त्री हें अर्धे अंग आणि पुरुष हें अर्धे अंग. उभयताच्या संभोगानें 'एकत्व' प्राप्त होऊन त्याचें पूर्ण अंग तयार होतें. परस्पराना परस्पराविषयीचें प्रेम संभोगानेंच उत्पन्न होऊन तें प्रेमच परस्परांच्या शारीरिक-मानसिक-बौद्धिक आणि आत्मिक 'एकत्वा'ला कारणीभूत होत असतें. अशीं 'एकत्व' प्राप्त करून देणारी संभोगासनें उपयोगांत आणावींत, म्हणजे प्रेम आणि आनंद याचा अनुभव दीर्घ काल मिळून मानवी जीवन सुखाचें होईल.

(८) *कामशास्त्र आणि यौगिक मानसशास्त्र :* चित्त हें चंचल असतें. योगीजन निरनिराळीं योगासनें करून चित्ताची चंचलता नाहींशी करतात; आणि तें चित्त आत्म्याचें ठायीं स्थिर करतात. त्याचप्रमाणें, स्त्री-पुरुषाची चंचल असलेली चित्तवृत्ति निरनिराळीं संभोगासनें करून चित्ताची चंचलता त्यांना नष्ट करतां येते. चित्ताची चंचलता नष्ट झाली म्हणजे पति-पत्नी या नात्यानें तें चित्त परस्पराचे ठायीं स्थिर करतां येतें. स्थिर झालेल्या चित्तवृत्तीमध्यें प्रसन्नता असते. स्थिर आणि

प्रसन्न चित्तामध्यें घटस्फोटाचा अगर परपुरुषाशीं व्यभिचाराचा विचारच उत्पन्न होत नाहीं. मग, घटस्फोटाचा अगर व्यभिचाराचा संभव तरी कसा होईल? कारण, चित्ताला चंचलता प्राप्त झाली तरच घटस्फोटाकडे अगर व्यभिचाराकडे मनाची प्रवृत्ति होते. चंचल चित्ताला स्थिर करणारीं योगासनाप्रमाणें संभोगासनें आहेत. योगासनें आणि संभोगासनें हीं निरनिराळीं! पण, त्याचें कार्य एकच! चित्ताची चंचलता नष्ट करणें. म्हणजेच मन स्थिर आणि एकाग्र करणें.

या आसनासंबंधीं कोर्टांत चर्चा चालू असतां हिंदूंच्या 'गर्भाधान' संस्काराची चर्चा झाली. त्या वेळीं 'ओरिएंटल ट्रान्सलेटर टु दि गव्हर्नमेंट ऑफ बॉंबे' याचेतर्फे आलेले साक्षीदार मि. एन्. व्ही. आपटे, बी. ए. यांनीं ता. १-९-३१ रोजींच्या आपल्या उलट तपासणीमध्यें पुढीलप्रमाणें स्पष्ट सांगितलें:—'The devout one is required to study the Kamashastra of some authority for the various positions of sexual intercourse '

या आसनांसंबंधीं ओ. ट्रा. मि. आपटे यांनीं जें वर सांगितलें तें 'गर्भाधान' संस्कारातील "वर-वधूनीं कामशास्त्र ग्रंथांतील नानाविध सुरत प्रकार पहावेत असा" मजकूर वाचून त्या आधारें इंग्रजी भाषेंत कोर्टाला सांगितलें. कोर्टानें तें नमूद करून ठेवलें आहे.

## ॥ संभोगासनें, पुराणग्रंथ, देवळें, आणि लेणीं व उपनिषद्ग्रंथ ॥

या आसनांसंबधीं स्कंदपुराण, अग्निपुराण, आदिपुराण, या पुराणग्रंथांतहीं अशींच वर्णनें आहेत. त्यांत देशादेशातील संभोगांचे आचारहि सांगितले आहेत. बाल्हिक देशांत उष्ट्रासन म्हणजे उंटाप्रमाणें संभोग करतात. आंध्र-तामीळ देशांत पुरुषायित आसन प्रिय आहेत. बिहार-ओरिसा-आसाम-बंगाल देशांत धेनुकासन, गजासन, मुखमैथुन स्वैरपणें उपयोगांत आणतात. अशा प्रकारचीं संभोगासनें जगन्नाथपुरी येथील देवळांवर कोरलेलीं जशीं आढळतात; तशींच संभोगासनें पवित्र क्षेत्र बनारस-काशी येथील नेपाल महाराजांचा शिवमंदिर या देवळाच्या लाकडी तावावरहि आढळतात असें 'इंपेरिअल-गॅझेटिअर ऑफ इंडिया', सातवा भाग, १९०८ ची नवी आवृत्ति, यांत लिहिलेलें आहे. Buddhisum in Northen India या ग्रंथात हॅरुका आणि शक्ति यांची प्रतिमा उभ्यानें संभोग करीत असलेली दाखविली आहे. "रूपम्" या नावाचें एक त्रैमासिक इंग्रजी भाषेंत कलकत्ता येथें पूर्वी प्रसिद्ध होत होतें. त्यांत "मैथुन इन् इंडियन आर्ट" या लेखांत देवळांवरील दगडावर कोरलेल्या मैथुनाचीं चित्रें छापलीं होतीं.

येणेंप्रमाणे, संभोगासनें कामशास्त्रग्रंथ, पुराणग्रंथ, देवळें, लेणीं, रघुवंशादि काव्यग्रंथ यांत आहेतच, पण, तत्त्वज्ञानपर ग्रंथ 'बृहदारण्यक उपनिषद' हा हीं

संभोगासनें म्हणजे स्त्रीच्या अधोभागाची, कमरेच्या खाली असलेल्या योनीची उपासना असें समजतो.

हा ग्रंथ तत्त्वज्ञानपर भाषेंत ६।४।२ यात असें सांगतो कीं, ज्ञानयुक्त स्त्रीच्या अधोभागाची केलेली उपासना फलदायी होऊन तो पुरुष त्या स्त्रीचें पुण्य खेंचून घेतो. (त्या स्त्रीला आपले आधीन करून घेतो.) अज्ञानपणानें (संभोगासनाची माहिती नसता) स्त्रीच्या अधोभागाची केलेली उपासना निष्फल होऊन तो पुरुष स्वतःचें पुण्य त्या स्त्रीला अर्पण करतो. (तिच्या आधीन राहून परतंत्र होतो.) संभोगासनाचा समावेश पौराणिक भाषेंत पुराणग्रंथांत, शास्त्रीय भाषेंत शास्त्रग्रंथात, तत्त्वज्ञानाच्या भाषेंत तत्त्वज्ञानग्रंथांत, काव्यमय आणि अलंकारिक भाषेंत काव्य आणि अलंकार-ग्रंथांत, होऊन त्या त्या ग्रंथात सन्मानपूर्वक वर्णनेंहि केलेलीं आढळतात. इतकेंच काय पण, चित्रमय भाषेंत पवित्र मंदिरावर आणि लेण्यामध्यें त्या त्या संभोगासनाचीं चित्रें काढून चित्रकारांनीं आदरहि दर्शविला आहे. पेशवेकालीनच्या चित्रकारानीहि बाजीराव पेशवा मस्तानीशीं संभोग क्रीडा कशी करीत होता याचा चित्रसंग्रह तयार केलेला आम्ही पाहिला आहे. अशा या आदरणीय, सन्माननीय संभोगासनांना कामशास्त्रकार 'कलात्मक सुरतभेद' अशी संज्ञा देतात. मानवाच्या आयुष्याचा विचार, आणि ज्याच्यामुळें मानवी जीवनाला श्रेष्ठत्व, महत्त्व, अंतिम उच्च ध्येयाची यशस्वी सफलता या सर्वांच्या प्राप्तीसाठीं हें आठ प्रकारचें रहस्यमय संशोधन येथें उघड केलें आहे. कामसूत्रकार कामसूत्रात या संभोगासनाला चतुःषष्ठी अशी संज्ञा देऊन पुढें लिहिताता कीं, इतर शास्त्राचें ज्ञान आहे पण या चतुःषष्ठी-संभोग-विद्येचें ज्ञान नाही तो कधींहि प्रिय होत नाही. इतर शास्त्रांचें ज्ञान नाही पण या चतुःषष्ठी-संभोगविद्येचें ज्ञान आहे तो स्त्री-पुरुषाचें चित्ताचें आकर्षण आणि रंजन करून त्याच्या आदरास पात्र होतो. त्याचा सन्मान करतात. असें म्हटलेलें आहें कीं, वनस्पति गुणधर्माचें ज्ञान नसलेल्या वैद्याचें जीवन निष्फल होतें. गणिताचें—जमाखर्चाचें ज्ञान नसलेल्या हिशेबतपासनिसाचें जीवन निष्फल होतें. त्याचप्रमाणें कामशास्त्राचें ज्ञान नसलेल्या दांपत्याचें जीवन निष्फल होतें. असें होऊ नये म्हणून यापुढें अशा प्रकारचे कलात्मक 'सुरतभेद' कल्याणमल्ल येथें सांगत आहेत.

### ॥ सुरतभेद ॥

**साम्यानुरूपान्प्रविधाय पूर्वं विज्ञः पुमान् बाह्यरतोपचारान्।**
**विधिश्लथीभूतपरांगदेशां भजेत कांतां स्मरकेलिरंगे ॥ १ ॥**

विशेष जाणत्या पुरुषानें प्रथम आपल्या आवडीप्रमाणें व मोठ्या प्रेमानें बाह्य क्रीडोपचार करून नंतर रतीस प्रवृत्त व्हावें. बाह्य उपचार अगोदर करावयाचें कारण असें कीं, शास्त्रयुक्त बाहेरचे उपचार झाले असता स्त्री

मदनानें अत्यंत व्याकुळ होत्साती क्रीडेच्या रंगात निमग्न होते आणि तिचें वरांग सैल होतें. अशी स्त्री स्वाधीन झाली म्हणजे सुरत करावें. अशा तऱ्हेनें केलेल्या मैथुनानें स्त्रिया खूष होतात, त्याचा विचार उत्तर श्लोकीं लिहितात.

'वरांग सैल होतें' म्हणजे 'योनि' आंतल्या बाजूनें ओलसर झाली म्हणजे ती योनि संभोगाला योग्य होते. अन्नसेवनासाठीं मुखामध्यें ओलसर लाळ असली पाहिजे. लाळ नसेल तर पोटांत भूक असूनहि अन्नसेवन होत नाहीं. त्याचप्रमाणें प्रकरण ९ मधील बाह्य संभोगविधीनें स्त्रीची योनि आतल्या बाजूनें ओलसर झाली म्हणजे संभोगकार्य सुखावह होतें. जर ओलसर झाली नाहीं, तर स्त्रीच्या अंतःकरणात संभोगाची इच्छा असूनहि तो संभोग दुःखकारक असा त्या स्त्रीला होतो. म्हणून संभोगापूर्वी बाह्य संभोगविधीनें संभोगाला योग्य अशी ओलसर योनि झाली म्हणजे पुरुषानें सुरत करावें. अशा सुरतक्रीडेंत स्त्री रंगांत येऊन निमग्न होते.

**दृढापि नारी श्लथतामुपैति प्रसारणादूरुयुगस्य सद्यः ।**
**अपि श्लथा संयमितोरुयुग्मं गच्छेद् दृढत्वं सुरतप्रयोगे ॥ २ ॥**

पुरुषाचा दम थोडा आणि स्त्रीचा अधिक आहे, तर त्यास काय उपाय? मोठ्या दमाची स्त्री असली तरी तिच्या मांड्या पसरून ताणल्या असता तिचा दम कांहीं हलका होऊन ती तत्काल तृप्त होईल; आणि हलक्या दमाची स्त्री असून पुरुषाचा दम विशेष जोराचा असला तर पुरुषानें स्त्रीच्या दोन्ही मांड्या आवळाव्या म्हणजे योनि घट्ट होऊन सुरतक्रीडेंत पुरुषाबरोबर दम धरणारी होईल. बरें, स्त्री केवळ चौदा पधरा वर्षांची सुमारें ल्हान आणि पुरुष प्रौढ असला तर कसें? असें असल्यास स्त्रीच्या दोन्हींहि मांड्या समप्रमाणात प्रसृत कराव्या म्हणजे उभयताची समानता होईल.

## ॥ संभोगाचे प्रकार ॥

**उत्तानकं तिर्यगथोत्थिताख्यं स्थितं तथैवानतकं रतिज्ञैः ।**
**पंचप्रकारं सुरतं प्रदिष्टं तस्य प्रभेदान् क्रमतो ब्रवीमि ॥ ३ ॥**

सुरत किती प्रकारचें? पांच प्रकारचें–१ पहिलें उत्तानकसुरत, २ तिर्यक्सुरत, ३ उत्थितसुरत, ४ स्थितसुरत आणि ५ आनतकसुरत. बरें, हीं पाच सुरतें खरीं; परंतु याचे भेद कसे समजावे? ठीक याचे भेद मी क्रमेंकरून सागतों.

## ॥ हस्तमैथुनाचा विनोद ॥

हस्तमैथुन—मुष्टिमैथुन, गुदामैथुन ( सुंदर अशा लहान लहान मुलाच्या गुदस्थानीं केलें जाणारें मैथुन. मुखमैथुन म्हणजे स्त्रीनें आपले मुखात पुरुषलिंग घेऊन भगकार्य करणें. या क्रियेला औपरिष्टक म्हणतात. अशा क्रियाना 'मुखचपला' अशी संज्ञा आहे. यौवनावस्थेला प्रारंभ होताच हस्तमैथुनाची–मुष्टिमैथुनाची सवय वाईट लोकांचे संगतीनें जडते. एकान्तामध्यें, ज्या वेळीं तरुण मुष्टिमैथुन करण्याचे तयारींत असतो, त्या वेळीं त्याला प्रिय असलेली, त्याच्या मनात भरलेली, अशी एखादी सुंदर तरुणी तो आपल्या मनामध्यें कल्पनेनें आठवून 'जणूं काय आता तिचेंच आपण चुंबन घेत आहों, आता तिच्याशींच आपण संभोग करीत आहों,' अशी मनोमय कल्पना करीत करीत तो आपलें ताठ झालेले शिश्न मुठींत धरून मागेंपुढें हालवून हस्तमैथुन करीत असतो. याला हस्तदंडी असेंहि म्हणतात. हस्तमैथुनाची एक विनोदी कथा प्रसिद्ध आहे. लष्करी सैनिकांत स्त्रियांचा अभाव असल्यानें त्यांच्यात हस्तमैथुन फार होत असतें. लष्करातील एक सैनिक हस्तमैथुन करीत असता दुसऱ्या एका लष्करी सैनिकानें त्याला पाहिलें. आणि हळूच विचारलें, मित्रा तू हें काय करतो आहेस ? पहिला सैनिक म्हणाला, मी जेव्हां घरीं होतों तेव्हा माझी बायको, माझा उजवा हात होती पण, येथें माझा उजवा हात, माझी बायको झाली आहे. बायकोजवळ करणारें संभोगकर्म येथें माझी बायको झालेल्या या माझ्या उजव्या हाताजवळ ते संभोगकर्म करीत आहे. जेथें जेथें सक्तीचें दीर्घकाल ब्रह्मचर्य लादलें जातें तेथें तेथें हस्तमैथुन होत असतें. असें हस्तमैथुन सतत केल्यानें त्याचा दुष्परिणाम म्हणजे स्त्रीशीं संभोग करण्याचे वेळीं लिंग ताठ आणि टणक होण्याची जी शक्ति, ती शक्ति भर तारुण्यातच नष्ट होऊन नपुंसकता प्राप्त होते. अशा नपुंसक पुरुषावर स्त्री कधींहि प्रेम करीत नाहीं, उलट तिरस्कारच करिते.

## ॥ गुदामैथुन (अघोरत) ॥

'गुदामैथुन' हें धर्मशास्त्रानें निषिद्ध मानलें असून इ. पि. कोड शिक्षा देतो. कांहीं देश असे आहेत कीं, गुदामैथुनाचें खास शिक्षण देऊन त्यात तरबेज झालेले अनेक सुंदर सुंदर छोकरे (ज्याना मिशी फुटलेली नाहीं असे) गुदामैथुनासाठीं सांभाळून ठेवीत व पाहुण्यांचा सन्मान करितांना त्या सुंदर सुंदर छोकऱ्याना उंची पोषाख घालून गुदामैथुनासाठी पाहुण्याकडे पाठवून देत. गुदामैथुन करणारे नपुसक असतातच असें नसून त्याचें लिंग ताठ व टणक होत असतेच. पण त्यांना योनि-द्वाराची आवड नसून गुदद्वाराची गोडी लागलेली असते. त्यांतच उत्तेजकपणा त्याना मिळतो. त्याची विचारसरणी अशी असते कीं, "योनिद्वार सैल, ढिलें, पोकळ आणि मोठें होत असतें, त्यात गोडी कसली ! गुदद्वार हें नेहमींच तंग, आवळ आणि घट्टच असतें; कधींही सैल होत नाहीं. गुदद्वाराशीं थोडें लोणी लावून

गुदामैथुन केलें म्हणजे स्पर्शसुख चागलें मिळतें." गुदामैथुनाची एकदा सवय जडली म्हणजे तो पुरुष योनिद्वाराची इच्छाच कधीं धरीत नाहीं. योनिद्वाराची त्याला गरजच नसल्यामुळें तो पुरुष स्त्रीजातीचा नित्य द्वेष करीत असतो. समाज दृढ आणि स्थिर होण्यास स्त्रीजातीची अत्यंत आवश्यकता असून धर्मानुसार समाजाची अत्यंत महत्त्वाची कामगिरी स्त्रिया बजावितात. म्हणून समाजाच्या कल्याणासाठीं स्त्रीजातीचा द्वेष करणाऱ्या या गुदामैथुनी लोकाचा निषेध धर्मशास्त्रानें केलेला आहे. तसेंच जगामध्यें संभोगक्रियेला 'योनिद्वार' हेंच नैसर्गिक मानून 'गुदद्वार' हें अनैसर्गिक मानतात. म्हणून राजकायदा म्हणजे इं पि. कोड शिक्षा देतो. असें जरी असलें तरी पुण्यकर्म करणाऱ्यांना स्वर्गांत अप्सरांचें सुख प्राप्त होतें असें हिंदूंचें धर्मग्रंथ–पुराणग्रथ जसें सांगतात, तसेंच काहीं काहीं जमातींचें धर्मग्रंथ असेंहि सागतात कीं, स्वर्गांत सुदर सुंदर छोकरे गुदामैथुनासाठीं मिळतात. येथें मात्र राजकायदा लुळा पडतो. कारण त्या जमातींत गुदामैथुनाचा निषेध सागितलेला नसतो.

वात्स्यायन–कामसूत्रात गुदामैथुनाचें फक्त एकच सूत्र असून गुदामैथुनाला 'अधोरत' अशी सज्ञा दिलेली आहे. स्त्री-पुरुष भेदानें म्हणजे सुंदर सुंदर छोकऱ्या-प्रमाणे स्त्रीशीहि गुदद्वारानें सभोग करण्याचा प्रघात दाक्षिणात्यजनामध्यें आहे. या अधोरताची गणना चित्ररतामध्यें केलेली आहे. स्त्री अस्पर्श–विटाळशी झाली असता संभोगास अधीर झालेला तिचा पति तिच्याशीं अपानद्वारानें अधोरत करण्याचा संभव उद्भवतो.

## ॥ मुखमैथुन ॥

'मुखमैथुन क्रियेमध्यें लिंग ताठ झाले म्हणजे तें लिंग योनिद्वारामध्यें घालण्या-ऐवजीं स्त्रीच्या मुखद्वारामध्यें म्हणजे तोंडामध्यें घालून आपण ज्याप्रमाणें आंबा चोखतों, त्याप्रमाणें ताठ झालेलें तें लिंग त्या स्त्रीला चोखावयास लावतात. एखादा प्रतिभासंपन्न कवि आपल्या प्रेयसीकडून ही मुखमैथुन क्रिया करवून घेतो. त्यानें तिच्या मुखाचा असा उपयोग केला असल्यामुळें तो कवि तिच्या मुखाला शशीमुखी–चद्रमुखी असें सबोधून तिचा गौरव करतो. ओरिसामधील भुवनेश्वर मंदिराच्या भींतीवरील दगडांत या मुखमैथुनाची चित्रें कोरली आहेत. या मुखमैथुनाचा प्रयोग "प्रजोत्पादनार्थ विवाह संस्कारानें नियुक्त केलेल्या स्त्रियांकडून करवू नये" असें धर्मशास्त्रकार सागतात. राजकायदा इं. पि. कोड कांहींच सांगत नाहीं. वेश्या स्त्रियां-कडून या मुखमैथुन क्रियेचा प्रयोग कोणीं केल्यास धर्मशास्त्रकार हरकत घेत नाहींत. अशा या वरील तिन्ही प्रकारच्या अनैसर्गिक मैथुनक्रियामध्यें जरी शुक्रविसर्जनाचा आनंद पुरुषाला प्राप्त होत असला, तरी तो आनद प्रजोत्पादनाला निष्फळ ठरत असल्यामुळें 'पितृऋण' फिटलें जात नाहीं. यास्तव शिष्टजनांनीं गृहस्थाश्रमात हस्त-मैथुन, गुदामैथुन, मुखमैथुन या सर्वांचा निषेध केलेला असून सुशिक्षित नागरिकजनांनीं

हे प्रकार कधींही करूं नयेत, असें कल्याणमल्लांचें मत असल्यामुळें त्याची वर्णनें येथें केलेलीं नाहींत.

*'स्तनमैथुन'* नामक आणखी एक मैथुनप्रकार आमचे आढळण्यात आला तो असा :—ज्या स्त्रीचे स्तन उत्तम प्रकारें घट्ट, पुष्ट, मोठे आणि गोलाकार आहेत, दोन्ही स्तनांमधील अंतर अगदीं थोडें आहे म्हणजे जवळ जवळ दोन्ही स्तन एक-मेकाना जणूं काय स्पर्शच करीत आहेत, अशा स्त्रीला उताणें निजवून तिच्या दोन्ही स्तनाच्या अतरामध्यें आपलें ताठ झालेलें शिश्न ठेवणें, नंतर ते दोन्ही स्तन आपले हातानें आवळून धरून त्या स्तनानींच आपले शिश्न शुक्रविसर्जन होईपर्यंत मर्दन करणें. या स्तनमैथुनांत केवळ दोन्ही स्तनाचा आनंददायक मर्दनस्पर्श शिश्नाला होत असतो हेंच सुख! ज्याचें शिश्न लांब व मोठें आहे. त्यालाच हा मैथुन प्रकार साधेल.

*कृत्रिम-मैथुन* ज्याप्रमाणें, स्त्रियांसाठीं कृत्रिम रबरी शिश्न असतें; त्याप्रमाणें पुरुषांसाठीं कृत्रिम रबरी बाहुली पांच फूट उंचीची असते; जणूं काय खरी स्त्रीच आहे. अशी ती बाहुली दिसते. हिला 'सुखासन' म्हणतात. या रबरी बाहुलीशी होणाऱ्या संभोगाला कृत्रिम मैथुन म्हणतात.

## ॥ सामुदायिक मैथुनक्रीडा ॥

धार्मिक उत्सवामध्यें ऐक्यभावानें प्रेरित असे समान दर्जाचे स्त्री-पुरुष एकत्र येऊन धार्मिक प्रार्थना, पूजा, खेळ, क्रीडा, नृत्य वगैरे करमणुकीचे मनोरजक कार्यक्रम सामुदायिकरीत्या करून शेवटीं सामुदायिक भोजनविधीचा कार्यक्रमहि उरकण्यात येतो. त्याचप्रमाणें, कामोत्सवामध्यें ऐक्यभावाने प्रेरित होऊन कामी स्त्री-पुरुष एकत्र झाल्यावर कामोत्सवाला उचित असे कामुक खेळ, क्रीडा, नृत्यें वगैरे कार्यक्रम करतात. शेवटीं सामुदायिक मैथुन-क्रीडा विधीचा कार्यक्रम त्या एकत्र झालेल्या कामी स्त्री-पुरुषांमध्यें करण्यांत येतो. या वेळीं, त्या सामुदायिक मैथुन क्रीडेमध्यें मद्यपानानंतर स्तनचुंबन, स्तनमर्दन, योनिमर्दन, योनिचुंबन, मुखमैथुन तसेंच अनेक आसनानी युक्त म्हणजे धेनुकासन, पुरुषायित वगैरे संभोगाचे निरनिराळे प्रकार परस्पराना एकदमच उघडपणें तेथें पहावयास मिळतात. घटकंचुकी आणि शाक्ताचे श्री व भैरवी चक्र (गजचक्र) हे असेच विधि आहेत. घटकचुकी म्हणजे शाक्तपंथी स्त्री-पुरुष मत्स्याहार, मांसाहार, मद्यपान यथेच्छ झाल्यावर तेथील स्त्रियाच्या कचुकी म्हणजे चोळ्या एकत्र गोळा करून एका घटात घालतात. नतर एकेक शाक्तानें त्या घटात हात घालून एकेक चोळी हातांत घेऊन बाहेर काढणें. ज्याचे हातांत जिची चोळी येईल तिच्याजवळ तो संभोग करतो.

*यूथरति*— हरिणें, गाई, हत्ती वगैरे पशूंचें कळप असतात. अशा कळपामध्यें तारुण्यानें मुसमुसलेला, बलशाली, पराक्रमी असा एक नर असतो. त्याला यूथपति

म्हणतात. हा यूथपति आपले कळपातील कोणत्याही हरिणीशीं, गाईशीं, हत्तिणीशी इतराच्या देखत रतिक्रीडा करतो. त्याला यूथरति म्हणतात. राजेलोकहि आपल्या अंत:पुरातील स्त्रियाशी अशीच यूथरति आपल्या इतर स्त्रियाच्या देखत अखंड करतात.

*स्वप्नरति*— तरुणाना, स्वप्नात आपण सुंदर स्त्रीशीं रतिक्रीडा करून आपले वीर्यस्खलन झाल्याचें आढळून येतें. असें वीर्यस्खलन होताच तो तरुण तात्काळ जागा होतो. जागा झाल्यावर स्वप्नात ज्या स्त्रीशीं आपण रतिक्रीडा केली ती स्त्री कोठेंच त्याला दिसत नाहीं. पण वीर्यस्खलन झाल्याचें मात्र प्रत्यक्ष दिसून येते. याला स्वप्नरति (Erotic dream) असें म्हणतात. स्वप्नावस्था असेंहि म्हणतात. या स्वप्नरतीचा एक विनोद प्रसिद्ध आहे. एक तरुण एका तरुण कलावान वेश्येवर मोहित झाला. त्या वेश्येचें भोगद्रव्य एका रात्रीचें पांचशें मोहरा होतें. तो तरूण श्रीमंत होता पण कवडीचुंबक होता. ती कलावान् वेश्या भोगद्रव्य मिळाल्याशिवाय त्या तरुणाशीं संभोग करण्यास कबूल होईना. ती कलावान् वेश्या त्या तरुणाला म्हणाली, आम्हां वेश्याचे जीवन सर्वस्वी अर्थप्राप्तीवरच अवलंबून असते. तूं माझ्यावर मोहित होऊन माझ्यावर प्रेम करीत असशील तर माझें भोगद्रव्य सुवर्णाच्या पाचशें मोहरा दे. आणि तूं जर माझ्यावरील प्रेमापेक्षां तुझ्या सुवर्ण मोहरावर अधिक प्रेम करत असशील तर मला सोडून दे; माझ्या नादीं लागूं नकोस. तेव्हां तो तरुण त्या वेश्येला म्हणाला, हें पहा, कालच रात्रीं स्वप्नांत मी तुझ्याशीं मनसोक्त रतिक्रीडा करून तुझें संभोगसुख मी यथेच्छ भोगलें आहे. तेव्हां ती कलावान् वेश्या, माझें भोगद्रव्य पांचशें सुवर्ण मोहरा मला दें; म्हणून त्याच्याजवळ भांडूं लागली. तेव्हा त्या धूर्त–कवडी-चुम्बक तरुणानें एक युक्ती योजिली. एक मोठ्या आरशात स्पष्ट प्रतिबिंब दिसेल असे पांचशें सुवर्ण मोहराचें प्रतिबिंब त्या आरशातील त्या वेश्येला दाखविलें आणि तिला सांगितलें कीं, या आरशांत दिसणाऱ्या प्रतिबिंबातून तुझें भोगद्रव्य घेऊन जा. स्वप्नातील रति म्हणजे मनात प्रतिबिंब स्वरूपात असते. प्रतिबिंब स्वरूपांतील रतीचें भोगद्रव्य प्रतिबिंबातील मोहराच्या स्वरूपातच मिळतें.

## ॥ योगेश्वर कृष्ण कल्ट ॥

योगविद्या, संभोगविद्या, ब्रह्मविद्या, या त्रयींचा संगम म्हणजेच कृष्णकल्ट. या त्रयींमधील विचार, उच्चार, आचार यांत चातुर्य दाखविणाऱ्यास सर्वत्र यश देणारी 'सर्वार्थसिद्धि' प्राप्त होते. हजारों स्त्रियांशीं आलिंगनें-चुंबनें मैथुनक्रीडा करूनहि शेवटीं ब्रह्मचारी ! अशा प्रकारची महान् विभूति योगेश्वर भगवान् श्रीकृष्ण एकच आढळते. स्त्री ही स्फूर्तीची अद्‌भुत आणि गूढ चैतन्य-शक्ति देवता आहे. विशिष्ट गुणधर्मांच्या वनस्पतींमधील गुणधर्म रोगपरिहारार्थ आपण जसे सेवन करतो, तसेंच स्फूर्ति शक्ति देवता असलेल्या स्त्रीच्या योनींतील पाझरत असलेल्या

प्रेमरसामर्थ्ये योगी मैथुनक्रीडा करून वीर्योत्सर्ग करतो. त्यायोगें प्रेमरस आणि वीर्योत्सर्ग यांचें जें एक रासायनिक मिश्रण त्या योनीमध्यें तयार होतें, तें रासायनिक मिश्रण, पिचकारीनें जसें पाणी आत खेचतात तसें शिश्नानें शरीरात परत ओढून मस्तकांतील ब्रह्मरंध्रात तें मिश्रण नेतात. यायोगें विश्वांतील अनेक गूढें उकलण्याचें अद्भुत दिव्य सामर्थ्य त्या योग्याला प्राप्त होतें. स्त्री-पुरुषाचा देह रासायनिक पदार्थांचा Chemical–Substance बनलेला असतो. योनींतील प्रेमरस आणि पुरुषाचें वीर्य हीं दोन्हीं रसायनेंच आहेत. रसायनात अद्भुत-गूढ असें दिव्य सामर्थ्य असतें. मद्य हेंहि रसायनच आहे. ज्या मद्यावर विशिष्ट रासायनिक क्रिया पूर्ण घडते, त्या मद्यातहि अद्भुत-गूढ असें दिव्य सामर्थ्य असतें. स्त्री पुरुषाचा संभोग ही सुद्धां एक रासायनिक मिश्रणाची क्रियाच आहे. या संभोग-रसायनानें पुरुषाला ताब्यांत ठेवण्याचें सामर्थ्य स्त्रीजवळ असते. 'शिवसंहिता' सारख्या तन्त्रग्रंथातील विवेचनावरून आमचे संशोधनांत असें आढळलें कीं, स्त्रीच्या योनीमध्यें 'पूर्णचंद्रा' संज्ञक एक नाडी असते. त्या नाडीतून प्रेमरस (कामसलिल) पाझरतो. योनींतील पूर्णचंद्राच्या नाडींतून पाझरलेला हा प्रेमरस आणि वीर्य यांच्या संयोगाच्या रासायनिक मिश्रणाचा स्पर्श योगीजनांच्या ब्रह्मरंध्राला म्हणजे बुद्धिकमल अगर ज्ञानकमल याला होतांच ज्ञानकमल प्रफुल्लित होऊन विकास पावतें. त्यामुळें त्या योगीपुरुषाला अद्भुत गूढ ज्ञानसामर्थ्य म्हणजेच दिव्य ज्ञानप्राप्ति होते. अशा या दिव्य ज्ञानाचें स्थान बुद्धि, बुद्धीचें स्थान मस्तकातील मेंदु. तेथेंच ब्रह्मरंध्र असतें. हृदयातील कामवासनेची प्रेरणा बुद्धीकडून मनाला होते. मनाकडून प्रेरणा शिश्नाला होतें. तेव्हां, शिश्न जागृत होतें. शिश्न जागृत झाल्यावर शरीरातील रक्ताचा प्रवाह शिश्नाकडे जाऊन शिश्नातील सर्व शिरा रक्तानें भरतात. तेव्हा शिश्न ताठ होतें. शिश्न ताठ झाल्यावरच संभोगकार्य होतें. यास्तव, संभोगाचे वेळीं मनाच्या विरुद्ध कांहीं झाल्यास मन उदास होतें, मग शिश्नाकडे गेलेलें रक्त परत फिरतें, आणि ताठ झालेलें शिश्न थंड होऊन लहान व मिसमिसीत होतें, मग, इच्छा असूनहि संभोगकार्य होत नाहीं. स्त्रियांच्या चंद्रदर्शनाचा म्हणजेच रजोदर्शनाचा परिणाम मेंदूवर होतो. शरीरातील अशा प्रकारें ज्या योग्याला रासायनिक क्रियांचें हें दिव्य ज्ञान साध्य होतें, त्याला 'योगेश्वर' असें योगीजन म्हणतात. योगिजनांचा हा विषय आहे. इतरेजनांचा हा विषय नव्हे. यांतील रहस्य इतरेजनांना समजणारहि नाहीं. योगशास्त्रातील याच प्रयोगानुसार स्त्रियानांहि संभोगकर्म करूनसुद्धा "सदाकन्या" म्हणजे ब्रह्मचारिणी होतां येतें.

॥ योगविद्या – ब्रह्मविद्या – कामविद्या आणि पुरुषोत्तमयोग ॥

पांची पांडवांशी द्रौपदीचा विवाह एकदम झालेला नसून प्रत्येक पांडवाशीं द्रौपदीचा विवाह निरनिराळा झालेला आहे. प्रत्येक विवाहाचे वेळीं द्रौपदी 'कन्या' होत असे.

पाची विवाहांचे वेळीं पाची वेळां द्रौपदी 'कन्या' झाल्याचें भगवान् व्यासानीं महाभारतात दाखविलें आहे. अर्थात् हें योगशास्त्र आहे व तें सत्य आहे. कामशास्त्र आणि योगशास्त्र ! गूढ भाषेमध्यें लिहिलेल्या तन्त्रग्रंथांच्या संशोधनामध्यें आम्हाला असें आढळून आलें कीं, फक्त पुरुषाच्या शरीरामध्यें सर्व शरीरावर सत्ता गाजविणारी एक मोठी नाडी आहे तिला ब्रह्मनाडी अशी संज्ञा आहे. मस्तकामध्यें एक रंध्र आहे त्याला ब्रह्मरंध्र अशी संज्ञा आहे. त्या ब्रह्मनाडीच्या मुखाचा ब्रह्मरंध्राशी जो संयोग करतात, त्याला ब्रह्मरति अगर आत्मरति अशी संज्ञा आहे. या ब्रह्मरतीपासून जी एका आनंदाची प्रचीति मिळते त्याला 'ब्रह्मानंद' असें म्हणतात. या सर्वांच्या ज्ञानाला 'ब्रह्मज्ञान' म्हणतात. हें ब्रह्मज्ञान ज्या विद्येमुळें प्राप्त होतें त्या विद्येला ब्रह्मविद्या म्हणतात. ही ब्रह्मविद्या ज्याला पूर्णांगानें साध्य झालेली असून त्या विद्येप्रमाणें जो आपले व्यवहार आणि आचरण ठेवतो—ब्रह्मचर्यव्रत स्वीकारतो—त्याला ब्रह्मचारी असें म्हणतात. शरीरशास्त्रकार सांगतात कीं, स्त्रीच्या गर्भाशयात गर्भ निर्माण करण्याची शक्ति पुरुषाचे वीर्यातच असते. गर्भाशयात गर्भाची स्थापना झाल्यावर त्या गर्भाचें पालन-पोषण करणें, तो गर्भ वाढविणें, शेवटीं त्या गर्भाला मुक्त करणें–जन्म देणें हीं सर्व कामगिरी स्त्रियानांच करावी लागते. गर्भाशयामुळें गर्भचर्या फक्त स्त्रियानाच सांगितलेली आहे. गर्भाशयाची रचना जशी स्त्रीशरीरामध्यें आढळून येते, तशी गर्भाशयाची रचना पुरुषशरीरामध्यें आढळून येत नाहीं; यास्तव 'गर्भचर्या' पुरुषाना नाहीं. त्याचप्रमाणें तन्त्रशास्त्रकार सांगतात कीं, पुरुषशरीरामध्यें आढळून येत असलेली 'ब्रह्मनाडी' स्त्री–शरीरामध्यें आढळत नाहीं; यास्तव 'स्त्री' जातीला 'ब्रह्मचर्य' नाहीं. तन्त्रशास्त्र-विशारद महर्षींच्या या वचनाची कित्येक जण थट्टा करतात; कारण त्याना तंत्रशास्त्र माहीत नसतें. तनु=शरीर. 'तनू'चें शास्त्र तें तन्त्रशास्त्र. "ब्रह्मनाडी"=मानवसृष्टि उत्पन्न करणारी नाडी. वीर्यामध्यें मानवसृष्टि उत्पन्न करण्याचें बीज असतें. प्राचीन कालीं ऋषींच्या विश्वविद्यालयामध्यें गुह्यातील गुह्य अशा 'ब्रह्मविद्ये'चें शिक्षण हें अगदीं शेवटचें उच्च शिक्षण समजत असत. कामविद्येचा संबंध ब्रह्मविद्येशीं येत असल्यानें कमळ जसें पाण्यांत नित्य राहूनहि पाण्यापासून अलिप्त राहू शकतें; तसेंच सर्व प्रकारचे कामोपभोग भोगूनहि ब्रह्मविद्येच्या सामर्थ्यावर त्या भोगलेल्या कामोपभोगापासूनहि चतुर पुरुष अलिप्त राहू शकतो, अशा पुरुषाला 'पुरुषोत्तम' म्हणतात. भगवान् योगेश्वर श्रीकृष्ण पुरुषोत्तमयोगाची ही गुह्य ब्रह्मविद्या जाणत होते. श्रीकृष्णाला 'मदनमोहन' म्हणतात. भगवान् श्रीकृष्ण गीतेतच सांगतात :—

॥ धर्माऽविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥ गीता ७, ११.

अर्जुना, सर्व प्राणिमात्राचे ठायीं असलेला, धर्माच्या विरुद्ध नसलेला जो 'काम' तो मी आहे.

I am Kama, says the Divine Lord, without detriment to Dharma in all beings, Oh, best of the Bharatas (addressed to Arjun,) sex is Divine.

॥ मैथुनांत ब्रह्मज्ञानप्राप्ति ॥

कामविद्या, योगविद्या आणि ब्रह्मविद्या यांचा हा गूढ रहस्यमय संबंध गुरुमुखी ज्ञानाच्या अभ्यासाशिवाय वाचकाना समजणार नाहीं. आम्हीं फक्त 'कृष्ण-कल्ट' या नात्यानें त्रोटक विवेचन येथें केलें आहे. महाभारतामध्यें "कूटश्लोक" व्यासांनीं घातलेले आहेत. कूटश्लोकामध्यें गूढ अर्थ असतो. योगेश्वर श्रीकृष्ण हा ब्रह्मचारी- हें न उकलणारें गूढ–हें गूढ भाषेंत लिहिलेल्या तन्त्रग्रंथांच्या अभ्यासानेंच समजेल. संभोगानंदाचा अनुभव मिळाला म्हणजे गूढ असलेल्या ब्रह्मानंदाची सहज कल्पना करतां येतें. कैलास तन्त्रात श्रीशंकर पार्वतीला सांगतात :—

मैथुनं परमं तत्त्वं सृष्टिस्थित्यन्तकारणम् ।
मैथुनाज्जायते सिद्धिः ब्रह्मज्ञानं सुदुर्लभम् ॥

The science of sexology is a great divine science, it is the cause of creation (उत्पत्ति), preservation (स्थिति), and destruction (लय). Success attends the act of coitus and offers knowledge of Brahma, which is hard to attain

॥ संभोगसुखांतील प्रेम ॥

स्त्रियाशीं संभोग केल्यानें पुरुषाना जसें सुख मिळतें तसेंच पुरुषांशीं संभोग केल्यानें स्त्रियानाहि सुख मिळतें. या उभय सुखानें त्याच्यात प्रेम निर्माण होते याबाबत अत्यंत सूक्ष्म विचार करतांना, साहित्यशास्त्रकार एक पुरुष एक स्त्रीप्रेम, वेश्या स्त्रियाचे प्रेम, एक पुरुष अनेक स्त्रिया असे प्रेम, एक स्त्री अनेक पुरुष असे प्रेम, हीन स्त्री उच्च पुरुष आणि हीन पुरुष उच्च स्त्री असे प्रेम असें प्रेमाचें वर्गीकरण करतात. याला "शृंगार रसाभास" अशी संज्ञा आहे. आता संभोगासनास प्रारंभ करतो.

॥ उत्तानबंधाचें स्पष्टीकरण ॥

निधाय पादौ रमणांसयोश्चेदुत्तानसुप्ता रमते पुरंध्री ।
प्रतिप्रबंधं समपादसंज्ञं प्रोचुस्तदा भोगविलासदक्षाः ॥ ४ ॥

स्त्रीनें उताणें निजून आपले दोन्ही पाय भ्रताराच्या दोन्ही खांद्यावर ठेवून पुरुषानें विलास करावा. असा विलास झाला असता यास कामविलासी प्रवीण पुरुषांनी समपाद उत्तानबंध असें नाव ठेविलें आहे. आसनास बंध आणि

आसन असें म्हणतात. बरें, हा बध एकच किंवा आणखी याचे भेद आहेत ? नाहीं, याचे आणखी भेद आहेत.

पहिला तर उत्तानपादसमबध सांगितला. दुसरा नागर, तिसरा त्रैविभ्रम, चवथा व्योमपद, पाचवा स्मरचक्र, सहावा अविदारित, सातवा सौम्य, आठवा जृंभित, नववा वेष्टित बध, दहावा वेणुविदारित, अकरावा स्फुटमन्. असे उत्तानक सुरताचे ११ बन्ध आहेत.

॥ नागरबंध ॥

**उत्तानकायाः स्मरमंदिरे यः स्थितस्तदुरूद्वयमूद्गृहीत्वा ।**
**संस्थाप्य बाह्यं कटितो रमेत कांतस्तदा स्यात्किल नागराख्यः ॥ ५ ॥**

नवऱ्यानें स्त्री उताणी निजवून आणि तिच्या योनीजवळ आपण बसून मग तिच्या दोन्ही मांड्या वर करून त्या आपल्या कमरेजवळ बाहेरच्या दोन बाजूस दोन घेऊन तिच्या मस्तकास घट्ट मिठी मारून मग भोगावी यास नागरउत्तान म्हणतात.

॥ त्रैविभ्रम ॥

**स्त्रियोंघ्रिमेकं विनिधाय भूमावन्यं स्वभालौ निजपाणियुग्मम् ।**
**पृथ्व्यां समाधाय रमेत भर्ता त्रैविभ्रमाख्यं करणं तदा स्यात् ॥ ६ ॥**

पुरुषानें स्त्रीचा एक पाय भूमीवर ठेवून दुसरा पाय आपल्या मस्तकावर घेऊन नतर आपले दोन्ही हात जमिनीवर ठेवून स्त्री भोगावी. यास त्रैविभ्रम उत्तानबध म्हणतात. हा बंध चमत्कारिक आहे.

॥ व्योमपद्बंध ॥

**तल्पप्रसुप्ता निजपादयुग्मं ऊर्ध्वं विधत्ते रमणी कराभ्याम् ।**
**स्तनौ गृहीत्वाऽथ भजेत कांतो बंधस्तदा व्योमपदाख्य उक्तः ॥ ७ ॥**

स्त्रीनें पलगावर उताणी निजून मग आपले दोन पाय आपल्या दोन हातानीं मस्तकापर्यंत उचलून धरून नंतर पतीनें तिचे सुदर स्तन आपल्या हातानीं घट्ट धरून स्त्रीच्या दोन पायामध्यें बसून भोगावी, यास व्योमपद उत्तानबध म्हणतात.

॥ स्मरचक्र ॥

**कांतोरुयुग्मांतरगः स्वहस्तौ निधाय भूमौ रमते पतिश्चेत् ।**
**बंधस्तदोक्तः स्मरचक्रनामा प्रेष्ठः सदा कामिजनस्य लोके ॥ ८ ॥**

भ्रतारानें स्त्रीच्या दोन्ही माड्यांमध्यें राहून आपले दोन हात भूमीवर टेकून स्त्री भोगावी. अशा आसनास स्मरचक्र असें नाव आहे. हें आसन लोकामध्यें कामीजनास सर्वदा फार आवडतें.

॥ अविदारितं ॥

**नारी स्वपादौ दयितस्य वक्षः स्थितौ समालिंग्य करद्वयेन ।**
**किंचित्तदूरू रमते तदासौ प्रोक्तो मुनींद्रैरविदारिताख्या ॥ ९ ॥**

स्त्रीनें आपल्या हातानीं आपले पाय नवऱ्याच्या छातीस लागतील इतके उचलून तशाच माड्या किंचित् वर कराव्या; असें स्त्रीनें केल्यावर मग पतीनें स्त्रीस आलिंगन देऊन भोगावी; या आसनास विचारवत पुरुषानीं अविदारित नाम ठेविलें आहे.

॥ सौम्यबंध ॥

**उत्तानितोरूद्वयमध्यगामी गाढं समालिंग्य भजेत यत्र ।**
**कांतो विलासिप्रिय एष बंधः सौम्याख्य उक्तः कविभिः पुराणैः ॥ १० ॥**

भ्रतारानें स्त्री उताणी निजवून आपण तिच्या माड्यामध्यें होऊन आपले दोन हात तिच्या पाठीखालीं घालून तीस घट्ट आलिंगन द्यावें. स्त्रीनेंही नवऱ्याचे गळ्यास मिठी मारावी. इतकें कृत्य झाल्यावर मग संभोग करावा. याचें नाव प्राचीन कवींनीं सौम्य उत्तानबंध ठेविलें आहे. हें आसन विलासी जनास बहुत प्रतिकारक आहे.

॥ जृंभित उत्तानबंध ॥

**ऊरुयुगं वक्त्रमुदंचितं च कृत्वांबुजाक्षी भजते पतिं चेत् ।**
**आनंदकर्ता तरुणीजनानां बंधोयमुक्तः खलु जृंभिताख्यः ॥ ११ ॥**

भ्रतारानें स्त्रीच्या कुल्याखालीं आणि मस्तकाखालीं गिरद्या ठेवून योनि व मस्तक हीं दोन अंगें वर उचलून स्त्रीस धनुष्याकार करून मग आपल्या गुडघ्याखालीं गिरद्या घेऊन अशा चमत्कारानें स्त्री भोगावी. या आसनाचें

नांव जृंभित आसन आहे. हें तरुण विलासी स्त्रियास फार फार आवडतें हा निश्चय होय. (हें आसन नाजूक अशा श्रीमंत स्त्री–पुरुषासाठीं आहे.)

॥ वेष्टित ॥

**कांतोरुयुग्मं परिवर्तितं वै निपीड्य कामाकुलचित्तवृत्तिः ।**
**रमेत भर्ता यदि वेष्टिताख्यं तदेव बंधं मुनयो वदंति ॥ १२ ॥**

स्त्रीनें आपल्या पायास मांड्यापर्यंत विळखा घालून किंचित वर उचलावें. मग भ्रतारानें त्यामध्यें होऊन रमावें. ज्या पुरुषास विशेष काम असतो त्यानें असें आसन करावें. या आसनाचें नाव वेष्टित असें ऋषींनीं ठेवलें आहे.

हस्तिनी जातीची स्त्री, जिची योनि विस्तृत व मोठी असून सैल झालेली व पुरुष वृष जातीचा म्हणजे आखूड व बारीक लिंगाचा, अशा स्त्री–पुरुषाच्या संभोगासाठीं हें आसन आहे. मांड्यांना विळखा दिल्यानें योनीला संकोचपणा येतो, त्यामुळें संभोगसुख प्राप्त होतें.

॥ वेणुविदारित ॥

**स्कंधप्रदेशे विनिधाय जंघामेकां स्त्रियोन्यामथ संविदार्य ।**
**अधोपिनीयं प्रबलं रमेत भर्ता यदा वेणुविदारितं तत् ॥ १३ ॥**

पुरुषानें स्त्रीस उताणी निजवून तिचा एक पाय आपल्या खांद्यावर घेऊन दुसरा खालीं बिछान्यावर करून त्यामध्यें आपण होऊन स्वेच्छ रमावें. असें केलें असतां या आसनास वेणुविदारित म्हणतात.

॥ स्फुटमन् ॥

**विलासिनीं संहतमूरुयुग्मां कृत्वोर्ध्वमालिंग्य भजेत भर्ता ।**
**उद्विग्नकः स्यात्प्रमदांघ्रियुग्मे कांतोरसिस्थे स्फुटमा प्रदिष्टः ॥ १४ ॥**

पुरुषानें विलासी स्त्रीचे पाय एकाशीं एक जुळवून ते दोन्ही पाय वर करवून मग तीस गाढ आलिंगन देऊन भोगावी. यास स्फुटमन् उत्तानबंध म्हणतात.

॥ तिर्यक्सुरत ॥

या सुरताचे भेद तीन आहेत. त्यांचीं नांवें क्रमानें, पहिला वीणक तिर्यक्बंध, दुसरा संपुट तिर्यक्बंध आणि तिसरा कर्कट तिर्यक्बंध.

॥ वीणक तिर्यक्‌बंध ॥

**कांतांघ्रिमेकं हृदये स्वकीये निधाय भर्ता शयने द्वितीयम्।**
**कुर्याद्रतिं चेद्दिति वीणकाख्यः प्रौढांगनायां परिकल्पनीयः ॥ १५ ॥**

पुरुषानें स्त्रीस कुशीस निजवून आपणही तिच्यापुढें कुशीस निजून तिचा एक पाय आपल्या उरावर घेऊन दुसरा बिछान्यावर खालीं करवून मग रति करावी. यास वीणक तिर्यक्‌बंध म्हणतात. परंतु हें आसन प्रौढ स्त्री असेल तर योजावें. नवीन स्त्रीशीं योजिल्यास विपरीत परिणाम होईल.

॥ संपुट तिर्यक्‌बंध ॥

**पार्श्वप्रसुप्तः प्रमदोपरिस्थः कांतां समालिंग्य रतिं करोति।**
**यत्र प्रदिष्टो मुनिभिः पुराणैर्बंधस्तदा संपुटनामधेयः ॥ १६ ॥**

पुरुषानें स्त्रीच्या पार्श्वभागीं वर निजून आणि दृढ आलिंगन देऊन रति करावी. यास प्राचीन मुनींनीं संपुटबंध असें नाव ठेविलें आहे.

॥ कर्कट तिर्यक्‌बंध ॥

**यत्रांगनाकुंचितपादयुग्मं स्वनाभिदेशे परिकल्प्य भर्ता।**
**रतिं प्रकुर्यादिति कर्कटाख्यं तदा कवींद्रैः करणं प्रदिष्टम् ॥ १७ ॥**

पुरुषानें आपण कुशीस निजून नायकोसही कुशीस निजवून तिचे दोन पाय आखूड करवून आपल्या नाभिप्रदेशीं तीस घेऊन मग रति करावी. असें झाल्यास, यास कवि श्रेष्ठ कर्कट आसन म्हणतात. (या तिर्यक् सुरताचा असाही एक उद्देश आहे कीं, गर्भवती स्त्रीला त्रास न होता संभोगक्रिया करावी.)

उपविष्ट बंध दहा प्रकारचे आहेत, त्याचीं नावें :—१ पद्मासन, २ उत्पद, ३ वैधुरित, ४ फणिपाश, ५ संयमन, ६ कौर्मक, ७ परिवर्तित, ८ युग्मपद, ९ विमर्दित, १० मर्कट.

॥ पद्मासन ॥

**प्रेमं विलासं प्रसभं विहृत्य विपर्ययाज्जंघयुगस्य नार्याः।**
**पद्मासनं स्यादथ चैकजंघविपर्ययात्तूत्पपदं प्रदिष्टम् ॥ १८ ॥**

स्त्रीपुरुषांनीं पलंगावरचे आलिंगन-चुंबनादि बाह्य विलास करून नंतर स्त्रीनें आपले हात आपल्या गुडघ्याखालून घेऊन आपल्या खांद्यावर ठेवावे. मग भ्रतारानें आसन घालून स्त्रीस मांड्यावर घेऊन, सर्व विधि कर्तव्य असेल त्याप्रमाणें करावा म्हणजे संभोग करावा. यास पद्म आसन म्हणतात.

॥ उपपद आसन ॥

स्त्रीनें पलंगावर निजून एक मांडी वर करून दुसरी पलंगावर ठेवून नवऱ्यानें मध्यें बसून संभोगविलास करावा. यास उपपद आसन म्हणतात.

॥ वैधुरित आसन ॥

**स्वजानुयुग्मांतरनिर्गतौ भुजौ भर्तुश्च कंठे विनयेन्मृगाक्षी ।**
**कांतोपि कृत्वेति विधिं प्रगच्छेत्तदा बुधैर्वैधुरिताख्यमुक्तम् ॥ १९ ॥**

स्त्रीनें बसून मग आपल्या गुडघ्याखालून हात घेऊन नवरा बसला असता त्याचे मानेपर्यंत नेऊन कंठास घट्ट मिठी मारावी. नवऱ्यानेंही तसेंच करावे. असें उभयताचे वर गुडघे होऊन एक मिठी झाल्यावर मग रति करावी, यास पंडित वैधुरित आसन असें म्हणतात.

॥ फणिपाश आसन ॥

**उक्तप्रकारैर्यदि दंपती स्वभुजौ तु कृत्वा मणिकूर्परस्थौ ।**
**स्वैरं रमेते करणं प्रदिष्टं तदा कवीन्द्रैः फणिपाशसंज्ञम् ॥ २० ॥**

स्त्रीपुरुषानीं पहिल्या आसनासारखे प्रकार करावे. यांत विशेष इतकेंच कीं, स्त्रीनें नवऱ्याचे पाय आपल्या बाहूंवर घ्यावे. पुरुषानें स्त्रीचे पाय आपल्या भुजावर घ्यावे, असें करून परस्परानीं स्वैर रमावें. या आसनास कविश्रेष्ठ फणिपाश आसन म्हणतात. (हीं आसनें सशक्त व चंडवेगी स्त्री-पुरुषांसाठीं आहेत.)

॥ संयमन आसन ॥

**निधाय जंघायुगलं युवत्याः स्वकीययोः कूर्परयोरथास्याः ।**
**कंठे स्वबाहू परिणीय गच्छेत्पतिस्तदा संयमनाख्यमेतत् ॥ २१ ॥**

उभयतां स्त्रीपुरुषाच्या रतिसमयीं पतीनें स्वकीय तरुणी स्त्रीला बसवून आपणही तिच्या समोर बसून मग पतीनें स्त्रीच्या दोन्ही मांड्या आपल्या हातांच्या कोपरावर घेऊन ते तसेंच हात स्त्रीच्या मानेंत घालून वर मांड्या

उचलाव्या. पुरुषाचे पलगावर खालीं पाय असून भोगावी. कवि अशा आसनाचें नाव सयमन असें म्हणतात.

॥ कौर्मक आसन ॥

मुखे मुखं वाहुयुगे स्ववाहू जंघाद्वयं जंघयुगे निवेश्य ।
गच्छेत्पतिश्चेदिति कौर्मकं तदूर्ध्वोरुयुग्मा परिवर्तिताख्यम् ॥ २२ ॥

उभयता स्त्रीपुरुषानीं बसून मग पतीनें स्त्रीच्या मुखास मुख लावून, भुजास भुज, मांड्यास माड्या मिळवून अशी रति करावी. याचे नाव कौर्मक असें म्हणतात.

॥ परिवर्तित आसन ॥

वरील हीं सर्व कृत्यें करून आणि स्त्रीच्या माड्या वर करून विलास करावा. याचें नाव परिवर्तित आसन.

॥ युग्मपद आसन ॥

स्थितां स्त्रियं कुंचितपादयुग्मां तथैव भर्ता कृततिर्यगंगः ।
भजेत चेत्कामकलाविवृद्धो बंध तदा युग्मपदं वदंति ॥ २३ ॥

विलाससमर्थी पतीनें स्त्रीस बसवून आणि तिचे पाय आखूड करवून मग आपलें अग वाकडें तिकडें करून कामकला वृद्धिंगत करणाऱ्या पुरुषानें विलास करावा. यास युग्मपदबध असें नाव कविश्रेष्ठानीं ठेविलें आहे.

॥ विनर्दित आसन ॥

विलासिनीं कूर्परमध्यवर्तीं कटिं स्वकीयां भ्रमयन्मुहुश्चेत् ।
भजेत भर्तेति विनर्दितं च स्यान्मार्कटं सन्मुखसंगमेन ॥ २४ ॥

नवऱ्यानें स्त्रीस आपल्या हातांच्या कोपरांवर घेऊन जशी झेलतात, तशी आपल्या कमरेच्या सुमारें वर उचलून वारंवार इकडे तिकडे फिरवून संभोगविलास करावा, याचें नाव विनर्दित.

॥ मार्कट आसन ॥

आणि सन्मुख संगमाचें नाव मार्कट असें आहे. असे हे १० उपविष्टबध सांगितले.

॥ उत्थितबंध म्हणजे काय ? ॥

उत्थितबंध म्हणजे उभ्यानीं आसनें. ते उत्थितबंध तीन प्रकारचे आहेत. त्याचीं नावें :—एक जानुकूर्परउत्थितबंध; दुसरा हरिविक्रम उत्थितबंध, तिसरा कीर्तिउत्थितबंध.

॥ जानुकूर्परउत्थितबंध ॥

**संवेष्टयित्वा निजकूर्परेण जान्वंगनाया अवलम्ब्य कंठम् ।**
**रतिं प्रकुर्यादिति कूर्पराख्यो बंधः प्रदिष्टः स च जानुपूर्वः ॥ २५ ॥**

पुरुषानें उभें असून स्त्रीस आपल्यासमोर उभी करून मग पुरुषानें आपले दोन्हीं हात स्त्रीच्या दोन्हीं गुडघ्याखालून घेऊन कोपर गुडघ्याखालीं येईल असें करून, ते तसेंच हातावर नेऊन आपल्या मानेस घट्ट मिठी मारून तशीच स्त्रीस कमरेच्या सुमारें वर उचलून मागे पुढें हालवून इकडे तिकडे वळवून रति करावी. अशा आसनास जानुकूर्परबंध असें म्हणतात.

॥ हरिविक्रमउत्थितबंध ॥

**उक्तप्रकारैः करणे यदैकः पादो भवेदूर्ध्वगतोऽगनायाः ।**
**तदा प्रदिष्टो हरिविक्रमाख्यो बंधः प्रियोयं तरुणीजनानाम् ॥ २६ ॥**

स्त्रीपुरुषें उभीं असता पुरुषानें पूर्वी सांगितल्याप्रमाणें स्त्रीच्या एका पाया-खालीं आपला एक हात घालून तिचा तो पाय वर करून व एक खालींच करून उभ्यानें भोगावी. हें आसन तरुण स्त्रियास फार आवडतें. याचें नाव हरिविक्रमउत्थितबंध असें आहे.

॥ कीर्तिउत्थितबंध ॥

**कंठं भुजाभ्यामवलम्ब्य भर्तुः श्रोणीं निजोरूयुगलेन गाढम् ।**
**संवेष्ट्य कुर्याद्रतिमंगना चेदुक्तः कवीन्द्रैरिति कीर्तिबंधः ॥ २७ ॥**

नवरा उभा असता स्त्रीनें आपल्या हातांचीं बोटें एकांत एक अडकवून ते तसले हात भ्रताराच्या मानेवर ठेवून आधार करावा आणि आपल्या मांड्याचा विळखा भ्रताराच्या कमरेस घालून भोगास प्रवृत्त व्हावें. मग भ्रतारानेंही आपल्या हाताचीं बोटें तशींच शिरकावून तिच्या कुल्याखालीं आधार देऊन रति करावी. या आसनास कीर्तिउत्थितबंध असें कवि म्हणतात. ही तीन उत्थित म्हणजे उभें राहून संभोग करण्याचीं आसनें आहेत.

## ॥ नृत्य संभोग ॥

मद्रदेशांतील स्त्रिया उभ्यानींच मैथुन करीतात; असें कर्णपर्वात कर्ण शल्याला सागतो. नृत्यकलानिपुण स्त्री-पुरुष नृत्य करतांकरताच उभ्यानींच सभोग करण्यात आनंद मानतात. कारण, नृत्य हें उभें राहूनच करावयाचें असतें. कांहीं कांहीं नृत्यात शरीराच्या ज्या हालचाली होतात त्या संभोगाचे वेळीं होणाऱ्या शरीराच्या हालचालीप्रमाणेंच दिसतात. यास्तव नृत्य पहाणाऱ्याना ते नृत्य करणारे स्त्री-पुरुष नृत्य करतात कीं उभ्यानें गुप्त सभोग करतात हें त्यावेळीं समजत नाहीं.

## ॥ मैथुनाचा पांचवा प्रकार ॥

या प्रकारात व्यानतबंध सागितले आहेत. व्यानतबंध म्हणजे स्त्री उपडी निजली असतां रति करणें तें व्यानतबंध होय. हे बंध दोन प्रकारचे आहेत. त्याची नावें पहिला धेनुक, दुसरा ऐभिव्यानतबंध.

## ॥ धेनुक ॥

**विन्यस्य पाण्यंघ्रियुगं धरिण्यामधोमुखी धेनुवदग्रसंस्था ।**
**स्त्री स्यादथास्याः कटिदेशवर्ती भर्ता भजेद्धेनुकमेतदुक्तम् ॥ २८ ॥**

पुरुषानें स्त्री अधोमुख करवून तिचे हातपाय जमिनीवर टेकून म्हणजे गाईप्रमाणें स्त्रीला करून मग आपण तिच्या कमरेवर पडून बैलाप्रमाणें रति करावी. या आसनास धेनुक म्हणतात.

मानव समाजात कुत्रा, माजर, बकरा, मेंढा, घोडा, गाय, बैल, कोंबडा वगैरे प्राण्यांस 'उपयुक्त पाळीव प्राणी' (Domestic Animals) असें समजतात. त्यांचे चित्रविचित्र संभोग स्त्री-पुरुषाचे नजरेस नेहमींच पडतात. सभोगाचे वेळीं त्या प्राण्याच्या होणाऱ्या शारीरिक हालचाली आणि त्याच्या मुखांतून त्या वेळीं निघणारे कामुक शब्दोच्चार या सर्वांचें नीट निरीक्षण उभयतानीं करावें. मग सभोगाचे वेळीं आपणहि तसेंच करावें. म्हणजे सभोग वैचित्र्याचा लाभ होईल. कंटाळवाणें होत असलेलें लैंगिक जीवन आनदमय होईल. ज्याचें शिश्न आखूड आहे त्याला धेनुकासनाचा प्रयोग चागला साधणार नाहीं. ज्याचें लाब शिश्न आहे त्यालाच हें आसन करता येईल. धेनुकासनानें स्त्रीची योनि ढिली, सैल पोकळ झालेली असेल तर ती योनि घट्ट आंवळ होते.

## ॥ ऐभिव्यानत बंध ॥

**अधोमुखी मस्तकदोःकुचास्यैर्भुवं गतां क्रामति यत्र नारीम् ।**
**करीव भर्ता रतिलोलचित्तस्तदेभसंज्ञं करणं प्रदिष्टम् ॥ २९ ॥**

स्त्रीनें आपले पाय आखडून जमिनीवर उपडी पडून खालीं तोंड करून डोकें, भुज, स्तन, तोंड आणि पाय इतकीं जमिनीस लागत कुल्ले पाठीमागून वर करून अशी निजली असता रतीविषयीं चंचलचित्त अशा पुरुषानें तरुण हत्तीप्रमाणें वरून भोगावी. या आसनास ऐभिव्यानत बंध म्हणजे गजासन म्हणतात.

## ॥ संभोग ऐश्वर्य ॥

वैभवसंपन्न श्रीमंत लोक आपलें ऐश्वर्य दिसण्यासाठीं दाराशीं हत्ती-घोडें बाळगतात. बागेमध्यें हरणें आणि बागेंतील जलाशयामध्यें हंस पक्षांचीं जोडपीं ठेवतात. हे सर्व प्राणी आपापल्या मादींशीं संभोगक्रीडा कसकशा करतात हें सर्व उभयतानीं नीट लक्षपूर्वक पहावें. त्याप्रमाणें, पुरुषानें आपल्या स्त्रीशीं तशा प्रकारची संभोगक्रीडा करावी. अशी संभोगक्रीडा केल्यानें इतर ऐश्वर्याप्रमाणें संभोग–ऐश्वर्यहि आपणांजवळ फार मोठें आहे असें त्या दांपत्यास वाटेल. शिकारीला जाताना राजेलोक आपल्या राणीला बरोबर घेतात. यदा कदाचित् सिंह–सिंहिणीशीं संभोगक्रीडा करीत असल्याचा दुर्मिळ योग पहाण्यास मिळाला, तर राणीला सिंहाची ती रतिक्रीडा दाखवून त्याच स्थळीं राजानें राणीशीं सिंह–सिंहिणीच्या रतिक्रीडे-प्रमाणें जर रतिक्रीडा केली, तर ती राणी सिंहाप्रमाणें शूर राजपुत्रांना प्रसवते असें ‘अग्निपुराण’ सांगतें. स्त्रीचें ऐश्वर्य तिच्या योनीमध्यें जशी रतिक्रीडा करावी तसें असतें. ज्या स्थानांवर हरीणें स्वच्छेनें, निर्भयतेनें फिरत फिरत, स्वैर क्रीडा करीत करीत, उड्या मारीत मारीत चरतात तें स्थान ऋषि आश्रम, तपाचरण, धर्मशिक्षण यांना श्रेष्ठ समजतात. तसेंच ज्या स्थानीं स्त्री स्वैर हिंडणें, फिरणें, चालणें, बोलणें, विनोदपर मनोरंजक गप्पा-गोष्टी हासत हासत करणे, होय नाहीं म्हणत म्हणत आलिंगन-चुंबनादि क्रीया सहज पण झटकन केल्या असता सहन करते; तें स्थान संभोगाला श्रेष्ठ मानतात. अशी स्थानें म्हणजे वनें-उपवनें, (बागा-उद्यानें) जलाशयाजवळील रमणीय जलस्थानें, हवेशीर पर्वतशिखरें, वगैरे होत. अशा स्थानीं केलेल्या संभोगाच्या विविध क्रीडाद्वारें दिसून येणारें संभोगऐश्वर्य स्त्री-पुरुषाच्या मनांमध्यें “अभिमानिक सुख” उत्पन्न करतें. ‘ही माझी रतिक्रीडा-कुशल प्रिया, हा माझा रतिशास्त्रसंपन्न प्राणनाथ,’ असा जो अभिमान वाटतो त्याला “अभिमानिक सुख” म्हणतात. ज्या गृहस्थाश्रमात हें अभिमानिक सुख निर्माण होत असतें त्यालाच “आदर्श गृहस्थाश्रम” म्हणतात.

ऐणसौकरगार्दभादिकान्यप्रयोजकतरत्र भूरिशः ।
अप्रसिद्धकरणानि नो मया दर्शितान्यतिनिंदितानि च ॥ ३० ॥

कल्याणमल्लकवि म्हणतात, राजा आणखी अशीं आसनें हरिणासन, सूकरासन, गर्दभासन, अश्वासन इत्यादि बहुत आहेत परंतु तीं लोकामध्यें अप्रसिद्ध आणि अप्रयोजक, तशींच करण्यासहि बहुत क्लेशकारक असून अतिनिंद्य आहेत, यासाठीं तुम्हास सांगितलीं नाहींत. संभोगाच्या अशा चमत्कारिक आसनांनीं केवळ पुरुषाना संभोगसुखाचें वैचित्र्य लाभतें; पण स्त्रियाना मात्र फारच कष्ट त्या वेळीं होतात. तरी पण, पुष्कळ द्रव्य मिळेल या आशेनें, अवघड असें आपलें इच्छित कार्य साध्य होत आहे या उद्देशानें, सापडलेल्या कठीण संकटांतून मुक्त होण्याच्या आशेनें, सुखलालसा वगैरे अनेक कारणांनीं, कांहीं धूर्त स्त्रिया अशीं त्रास होणारीं विचित्र आसनें करूनहि पुरुषाला खूष करून आपल्या आधीन करून घेतात व नंतर आपला कार्यभाग साधतात.

॥ लंकाधिपति रावणाचे अन्तःपुरांतील स्त्रियांचा कामविलास ॥

वरील श्लोकाच्या अर्थामध्यें गर्दभासन, अश्वासन म्हणजे गाढवाप्रमाणें, घोड्याप्रमाणें, कुत्र्याप्रमाणें, मांजराप्रमाणें, बोकड-मेंढा-हरीण, कोंबडा या या प्राण्याप्रमाणें स्त्रीनें होऊन मग पुरुषानें संभोग करणें अशा प्रकारचीं हीं आसनें आलीं आहेत, व या श्लोकाच्या पुढील श्लोकांत विपरीत आसनें सांगितलीं आहेत. हीं आसनें म्हणजे 'तामस काम' होय. सीताशोधार्थ श्रीरामसेवक हनुमंत लंकेमध्यें गेला, तेव्हां लंकेतील राक्षसलोकांचे आणि रावणाचे अन्तःपुरांतील संभोगप्रकार ब्रह्मचारी श्रीहनुमंताचे दृष्टीस पडले. त्याचें वर्णन साधुवर्य श्रीएकनाथमहाराजांनीं भावार्थ रामायणामध्यें पुढीलप्रमाणें केलें आहे :—

'स्त्री-पुरुष एकांतस्थानीं। उन्मादमदें मद्यपानीं। नागवीं नाचतीं पैं दोन्ही। निजमैथुनीं रममाणें ॥ ३१ ॥ स्त्री-पुरुषाचें आलिंगन। परस्परें मुखचुंबन। स्त्रियांचें करितां कुचमर्दन। देखे आपण हनुमंत ॥ ३२ ॥ स्त्री-पुरुष एकांत गती। विपरीत करिती रतीची प्रीति। नाना यातीची मैथुन स्थिती। स्वयें मारुती देखत ॥ ३३ ॥ पुरुष होय स्त्रियेची नारी। स्त्रियेसी पुरुष भ्रतार करी। तीस बैसवोनी कामाचारी। विपरीत परी संभोगी ॥ ३४ ॥ येक स्त्रियेसी करी अश्विनी। आपण घोडा होय हों हों करूनी। तिची स्वयं योनि हुंगोनि। अश्व मैथुनीं रमतसे ॥ ३५ ॥ येक स्त्रियेतें करीत खरी। भुंकत धांवे–खराचे परी। पदतळें हाणी उरावरी। खरा संस्कारी विचरत ॥ ३६ ॥ येक राक्षस अति मूढ। स्त्रियेचीं स्तनें चोखी दृढ। तुझें दुग्ध मज लागे गोड। पुरे कोड तेणें माझें ॥ ३७ ॥ येक तो अतिशयें कुश्चितु। स्त्रियेचें योनीस दात देतु। केश रिघती मुखा आंतू। मग कोपतु स्त्रियेसी ॥ ३८ ॥ केश वाढविले योनीवरी।... .

संभोगसमयीं मद्यपान करणें, स्त्री-पुरुषांनीं नग्न होऊन संभोग करणें, स्तनमर्दन, स्तनचुंबन, योनिचुंबन, वगैरेंच्या वर्णनावरून साधुवर्य एकनाथमहाराजांना हें कामशास्त्र पूर्णपणें अवगत होतें असें दिसतें.

## ॥ पशुसंभोग ॥

मुंबई येथील 'प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम' मध्यें गर्दभासन–ऐभिन्यानत आसनाचे कोरलेले दोन दगड 'पुराणवस्तु संशोधन' विभागांत ठेवलेले आहेत. पुणें येथील 'भारत इतिहास संशोधन मंडळा'च्या कचेरींमध्येंही असेच दगड ठेवलेले आहेत. दगडावर कोरलेलें गर्दभासन म्हणजे मानव स्त्री आणि गाढव पशु, ऐभिन्यानत आसन म्हणजे मानव स्त्री आणि हत्ती पशु, असा संभोग दाखविला आहे. कित्येकांना हीं चित्रें अशक्य कोटींतील आहेत असेंही वाटण्याचा संभव आहे. ज्याप्रमाणें मानवपुरुषांनीं पशुजातींतील मादीशीं संभोग केलेले व त्यांना कोर्टांत शिक्षा झालेले आपणाला आढळून येतात, त्याचप्रमाणें मानव-स्त्री पशुजातींतील नराशीं संभोग केलेली त्या दगडी चित्रांत दाखविलेली आहेत. ग्रीक पुराणग्रंथांत पशूंनीं केलेल्या प्रणयचेष्टांची उदाहरणें दाखविलेली आहेत (Love scenes with an animal). त्यापैकीं एक जगप्रसिद्ध असलेलें उदाहरण 'ओव्हिड' (Ovid) या ग्रीक ग्रंथकारानें दाखवलेलें आहे तें असें. मिनॉस (King of Crete) राजाची बायको एका सुंदर पोळ बैलाला पाहून कामासक्त झाली. तेव्हां तिनें एका उत्तम कारागिराकडून लाकडाची पोकळ गाय तयार करून घेतली. त्या लाकडी गाईला गाईच्याच कातड्यानें मढविली होती; जणू काय ती खरोखरीचीच गाय आहे असें वाटावें. त्या लाकडी गाईच्या पोकळ जागेंत मिनॉस राजाची बायको गुप्तपणें निजत असे. त्या पोळ बैलाला ती लाकडी गाय खरी गाय आहे असें वाटत असल्यामुळें तिच्यावर तो उडत असे. अशा रीतीनें त्या पोळ बैलापासून ती राजस्त्री संभोग प्राप्त करून घेत असे. त्यामुळें तिला अर्धें अंग पुरुषाचें व अर्धें अंग बैलाचें असा राक्षसी पुत्र झाला त्याला (Minotaur) म्हणतात. पशुसंभोगानें असे विपरीत राक्षसीपुत्र जन्मतात व राजकायदा शिक्षा देतो; तेव्हां या दोषांतून मोठ्या युक्तीनें सुटण्यासाठीं स्त्री-पुरुषांनींच स्वतः पशूंप्रमाणें होऊन आपापलीं तामसी कामवासना भागवून घ्यावी, म्हणून कामशास्त्रकारांनीं हीं आसनें त्या त्या स्त्रीपुरुषांची तामसी प्रवृत्ति लक्षांत घेऊन निवेदन केलीं आहेत. ग्रीक पुराणग्रंथांत जसें मिनॉस राजाच्या बायकोचें उदाहरण आहे, तशाच प्रकारचीं उदाहरणें हिंदु पुराणग्रंथांतही आढळतात.

## ॥ घोडनवरी ॥

'पुत्रकामेष्टि' यज्ञामध्यें निपुत्रिक राजाच्या राणीनें अश्वमेध यज्ञांतील घोड्याचें शिश्न आपल्या योनींत ग्रहण करण्याचा एक धार्मिक विधि सांगितलेला आहेच.

आफ्रिकेमध्येंहि तरुण स्त्रियांना घोड्याजवळ निजण्याचा एक धार्मिक विधि आढळून येतो. या विधीमुळेंच 'घोडनवरी' या शब्दाचें विशेषण विवाह न झालेल्या तरुणीला लावतात. 'महायोनि' असलेल्या स्त्रिया ज्याना इंग्रजीमध्यें Elytrophyma Vaginal Elephantiasis असें म्हणतात, त्याचा अपत्य-मार्ग (Vagina) फारच विस्तृत व मोठा असल्यामुळें त्या स्त्रिया घोड्याचें शिश्न आपल्या योनींत ग्रहण करू शकतील. इतर सर्वसाधारण स्त्रियांना शक्य नाहीं. हें योनिशास्त्र आहे. योनिशास्त्रज्ञानाच यातील रहस्य माहीत असणार! इतर जनाना हे प्रकार विपरीत दिसणार! हा दोष 'पुत्रकामेष्टि' यज्ञ सागणाऱ्या ऋषींचा नसून त्यातील शास्त्ररहस्य माहीत नसणाऱ्या अज्ञ जनाचा आहे. धार्मिक भावनेच्या दृष्टीने पाहिलें असतां गाईला पूज्य मानणारे गाईबद्दल आदर दर्शविण्यासाठीं धेनुकासनाचा प्रयोग पवित्र धार्मिक भावनेनें करितात. तसेंच इतर पशूंच्या आसनासबंधीं समजावें.

## ॥ पुरुषायित बंध ॥

पुरुषायित म्हणजे पुरुषानें खालीं उताणें निजून आपल्यावर स्त्री उपडी निजवून भोगावी. याचें नांव पुरुषायित बंध असें आहे.

**जातश्रमं वीक्ष्य पतिं पुरंध्री स्वेच्छात एवाथ रतेष्वतृप्ता ।**
**कंदर्पवेगाकलिता नतांगी कुर्याद्रतिं तत्पुरुषायितं सा ॥ २१ ॥**

भोगसमयीं पतीस श्रम झाला असतां पुढें भोग होत नाहीं आणि स्त्रीस तर भोगाची इच्छा आहे. तेव्हां स्त्रीनें पतीस पलंगावर खालीं निजवून आपण त्याचेवर उपडी पडून अगांत मदनाचा संचार फारच झाल्यास पतीला भोगावा. असें स्त्रीनें केल्यास तिची इच्छा तृप्त होईल. या आसनास पुरुषायित म्हणतात. या पुरुषायित आसनाचें उत्तम वर्णन 'नैषध' काव्यामध्यें केलेलें आहे. तसेंच पडित जयदेवानेंहि 'गीत—गोविंद' काव्यामध्यें केलेलें आहे. भर्तृहरि राजानें आपल्या शृंगारशतकांत असें लिहिलें आहे कीं, "वनक्रीडेच्या वेळीं पुरुषायित आसन करून जी स्त्री पुरुषाचे वक्षस्थलावर सदैव पडलेली असते, तोच पुरुष भाग्यशाली होय."

निसर्गाचा असा एक नियम आहे कीं, वेल (लता) वृक्षावर चढते. वेलीवर वृक्ष कधींहि चढत नाहीं. या नियमाला अनुसरून स्त्रीरुपी वेलीवर (लतेवर) पुरुषरुपी वृक्षानें चढून केलेला संभोग नैसर्गिक न मानता पुरुषरूपी वृक्षावर स्त्रीरुपी वेलीनें (लतेनें) चढून केलेला संभोग नैसर्गिक समजून कित्येक कामोत्सुक स्त्री पुरुष "पुरुषायित" आसनाचा सन्मान करितात. बागेंतील लतामंडपांत संभोगोत्सुक स्त्री-पुरुषानीं केलेलीं 'पुरुषायित आसनें' अत्यत सुखावह होतात असें ते समजतात.

कित्येक असेंहि सांगतात कीं, स्त्री पुरुषाचा संभोग हें रतियुद्ध आहे. या रतियुद्धामध्यें, संभोगोत्सुक स्त्रीची योनि हा कामोत्सुक झालेल्या कामवीर पुरुषानें जिंकावयाचा बालेकिल्ला होय. कामशूर पुरुष आपल्या ताठ झालेल्या लिंगाचा चौफेर हल्ला त्या योनीवर चढवून तो बालेकिल्ला (योनि) जिंकतो अर्थातच चढाईखोर पुरुषलिंग केव्हांहि योनीच्या वरतींच असणार. तेव्हा योनीवर हल्ला करणारें चढाईखोर पुरुषलिंग वर आणि पुरुषलिंगाचा हल्ला आपल्याअंगावर घेणारी योनि खालीं अशा अवस्थेंत होणारा संभोग हाच नैसर्गिक होय. कामविषयांतील विशिष्ट भाषातज्ज्ञ सांगतात कीं, स्त्रीची योनि हें साक्षात् मदनाचें सिंहासनच होय. पुरुषाच्या ताठ शिश्नात साक्षात् मदनाचा संचार असतो. ताठ शिश्नाच्या स्वरूपांतील मदन हा योनिरूपी आपल्या सिंहासनावर विराजमान होऊन सुशोभित असें जें संभोगकार्य त्या वेळीं करतो, तेंच संभोगकार्य नैसर्गिक म्हणण्यास कसलीच हरकत नाहीं. आरबी कामशास्त्र सांगतें कीं, स्वार जसा घोड्यावर उडी मारून बसतो त्याप्रमाणें उताणा निजलेल्या पुरुषावर स्त्रीनें स्वाराप्रमाणें उडी मारून पुरुष भोगावा. पुरुषायित बंधासंबंधीं अशी हीं निरनिराळीं तज्ज्ञाचीं मतें वाचकांपुढें ठेविलीं आहेत.

## ॥ पुरुषायिताचे तीन भेद ॥

१ विपरीत बंध, २ भ्रामर बंध, व ३ उत्कलित बंध असे हे तीन भेद आहेत.

## ॥ विपरीत बंध ॥

**उत्तानसुप्तं दयितं भुजाभ्यामालिंग्य लिंगं विनिवेश्य योनौ ॥**
**भजेन्नितंबं परिचालयंती नारी तदा स्याद्विपरीतबंधः ॥ ३२ ॥**

पुरुष उताणा निजला असताना स्त्रीनें त्यावर उपडी निजून नवऱ्यास आपल्या हातानीं घट्ट वेंगाटून आपली कमर हालवून भोगकृत्य करावें. यास विपरीत बंध म्हणतात.

## ॥ पुरुषायित भ्रामरबंध ॥

**सुप्तस्य पुंसो जघने परिस्थिता संभ्रामयत्यंघ्रियुगं विकुंचितम् ।**
**चक्राकृतिस्त्री नरवद्विचेष्टते तद्भ्रामराख्यं करणं समीरितम् ॥ ३३ ॥**

स्त्रीनें पतीस उताणें निजवून मग आपल्या मांड्या आंखूड करून नवऱ्याच्या मांड्यावर बसून चक्राकार देह करून उपभोग घ्यावा; जसा भोंवरा फिरतो तशी आपली कमर फिरवून पुरुषापासून उपभोग संपादावा, यास भ्रामर बंध म्हणतात.

॥ उत्कलित बंध ॥

**प्रेमनिर्भरवती स्मरालये भर्तृलिंगमुपधाय पुरंध्री ।**
**भ्रामयेत्कटिमनंगविलोला स्यात्तदाकरणमुत्कलिताख्यम् ॥ ३४ ॥**

भोगसमयीं स्त्री मदनानें पीडित आहे तर तिनें पतीला उताणा निजवून आपण त्याच्यासमोर बसून अथवा वर निजून भर्त्याचें लिंग आपले योनींत धरून कमर फिरवीत फिरवीत भोग सपादून घ्यावा. यास उत्कलित बंध म्हणतात. या आसनात सुख विशेष आहे. आता विपरीत रतींत स्त्रीनें कसें बोलावें व कसें वर्तावें आणि पुरुषानें कसे चमत्कार करावे हें सर्व समजण्याकरिता स्पष्ट सागतों.

वीणा, सतार, वाजाची पेटी वगैरे मधुर आवाज देणाऱ्या वाद्यावर बोटांची हालचाल कुशलतेनें जशी करावी तसें तें वाद्य मधुर अगर कर्कश आवाज काढील. त्याचप्रमाणें संभोगकार्य करीत असता नायिकेच्ये योनींत नायक आपल्या शिश्नाची हालचाल नायिकेला अनुकूल होईल अशी कुशलतेनें करील; तर ती नायिका प्रेमाचे मधुर आवाज काढील. जर संभोगामध्यें दुःख-त्रास होईल अशी शिश्नाची हालचाल नायक करील, तर ती नायिका तिरस्काराचे कर्कश आवाज काढील. संभोगाचें हें गुप्त रहस्य आहे.

**विपरीतरते ससीत्कृताऽदरयाह्लासमनोरमाऽनना ।**
**कितवाद्य वशंगतोसि मे स्मरयुद्धे विजितोसि चाप्यहम् ॥ ३५ ॥**
**इति मंजुरटत्यथाकुला सकचाकर्षणचुंबिताधरा ।**
**श्रममीलितचारुलोचना द्रवतां याति तदा विलासिनी ॥ ३६ ॥**

अशा या सांगितलेल्या विपरीत रतींत स्त्री निमग्न होऊन मोठ्या प्रेमात आली असता काय विनोद करील ! तोंडाने सीत्कार करून थोडथोडी हसेल, त्या वेळेस तिचें मुख कसें सुंदर शोभेल तें वर्णन करता येत नाहीं, आणि काय चमत्कार करील ? नवऱ्यास म्हणेल, 'हे माझ्या प्राणवल्लभा, सख्या, आज तू माझ्या पूर्ण कबज्यात सापडलास, मला वश झालास. भोगप्रकरणीं रतियुद्धांत तुला मीं आज अगदीं जिंकिला.' अशीं नाना प्रकारचीं मंजुळ भाषणें जेव्हा करील तेव्हा पुरुषानें तिचे केस धरून अधरोष्ठाचें आणि दोन्ही स्तनांचें चुंबन इच्छा तृप्त होईपर्यंत घ्यावें. इतकेंच कृत्य झालें असता तिची इच्छा तृप्त होऊन ती श्रमी होईल. मग डोळे मिटील. असे विलास ज्या स्त्रीस पाहिजे असतील, तिला इतकें झालें असता ती द्रव पावेल, म्हणजे त्या स्त्रीची संभोगेच्छा पूर्ण होईल.

### ॥ स्त्रीचें रेत गळलें हें कसें समजावें? ॥

**श्लथदेहलतां विमूर्च्छितां दरसंमीलितलोचनोत्पलाम् ।**
**समवेक्ष्य नितांतनिःसहामपगच्छेद्बलां द्रुमामिति ॥ ३७ ॥**

स्त्रीचें रेत पडूं लागलें म्हणजे थोडेथोडे डोळे मिटील, अंग केवळ सैल पडेल, मूर्च्छा येईल, मग चुंबनादिक विलास आवडणार नाहींत. अशीं हीं स्त्रीचीं लक्षणें दृष्टीस पडलीं असता पुरुषानें समजावें कीं, तिचा रेतस्राव झाला. मग भोग त्यागावा.

### ॥ विपरीत रतीस कोणत्या स्त्रिया वर्ज्य? ॥

**करिणीं हरिणीं च गर्भिणीं नवसूतामृतुयोगिनीं कृशाम् ।**
**ज्वरितां च कुमारिकां रते विपरीते परिवर्जयेत्सुधीः ॥ ३८ ॥**

पूर्वी सांगितलेल्या स्त्रियांच्या तीन जाती त्यांतून वर्ज्य करावयाच्या त्या —१ करिणी स्त्री, २ हरिणी स्त्री, ३ गर्भिणी, ४ नुकतीच बाळंत झालेली, ५ ऋतुप्राप्त असेल ती, ६ अत्यंत कृशांगी, ७ ज्वर येत असेल ती, ८ ऋतु प्राप्त नसेल ती म्हणजे कुमारी. अशा या आठ प्रकारच्या स्त्रिया बुद्धिमान् पुरुषानें विपरीत रतीमध्यें अवश्य वर्ज्य कराव्या. याप्रमाणें भेदासुद्धां मैथुन सांगितलें.

पुरुषायित आसनापासून स्पर्शसुखाची जी एक विशिष्ट गोडी अनुभवण्यास मिळते, त्या गोडीचा आनंद कांहीं निराळाच असतो. या आसनांत स्त्रियांना आपल्या कमरेची हालचाल तीन प्रकारें करावी लागते. ( १ ) पाळणा जसा मागें–पुढें हालतो तशी, ( २ ) ढुंगण–कुल्ले–वर–खालीं हालविणें, ( ३ ) भोंवऱ्याप्रमाणें चक्राकार वाटोळी कमर फिरविणें. वरील आठ स्त्रिया आपल्या कमरेच्या अशा हालचाली करण्यास असमर्थ असतात, म्हणून वर्ज्य आहेत. विपरीत रतींत पुरुषावर स्त्री चढून ती मैथुन करते. तसेंच स्त्रीवर स्त्री चढून योनीवर–योनी घासून स्त्री–स्त्री मैथुन करतात तेंहि विपरीतच होय. याला Tribadism म्हणतात. तुरुंगातील स्त्रीकैदी विभागांत हा प्रकार होत असतो.

### ॥ करताडन व सीत्कृतोदेश ॥

**कामयुद्धंगयुग्मं स्यात्करताडनसीत्कृते**
**तत्ताडनं चतुर्धोक्तं सीत्कृतं पंचधा स्मृतम् ॥ ३९ ॥**

कामविलास हेंच एक युद्ध म्हणजे रतियुद्ध समजतात. याच्या अंगभूत दुसरीं दोन कृत्यें आहेत, त्याचीं नावें :—करताडन आणि सीत्कृत. त्यात करताडन चार प्रकारचें आणि सीत्कृत पाच प्रकारचें आहे.

॥ करताडनचे चार प्रकार ॥

**प्रसृतेनापहस्तेन मुष्टिना सहपाणिना ।**
**ताडनं स्याच्चतुर्धैवं तस्य स्थानानि संब्रुवे ॥ ४० ॥**

१ प्रसृत हातानें मारणें, २ उताण्या हातानें हळू हळू ठोकणें, ३ मुठीनें हळू हळू मुटके मारणें, ४ सपाट हातानें हळू हळू चापटी मारणें; असें हें चार प्रकारचें करताडन होय.

॥ कोणत्या अवयवावर कोणतें व कसें ताडन करावें ? ॥

**पार्श्वे गुह्ये समतलं मुष्टिं पृष्ठेऽथ मूर्धनि ।**
**फणाकारं प्रसृतिकं युंज्याद्वंध्यापहस्तकम् ॥ ४१ ॥**

कुशीवर सपाट हातानें चापटी मारावी १. गुह्यावर तशाच हातानें वरचेवर चापटी मारावी २. पाठीवर हळू हळू मुष्टी मारावी ३. उरावर उलट्या हातानें मारावें ४. मस्तकादिकावर नागाच्या फणासारख्या पोकळ हातानें हळू हळू थोपटावें. (हें पुरुषानें स्त्रीस करताडन करणें.)

आता स्त्रीनें पतीस करताडन करण्याचे चार भेद आहेत. त्याचीं नावें — १ संतानिक. २ पताका. ३ बिंदुमाल. ४ कुंडल.

॥ संतानिक ॥

**विपरीतरते यदांगना हृदि मुष्ट्या परिताडयेत्पतिम् ।**
**करघातनकं तदा बुधैरिति संतानिकसंज्ञमुच्यते ॥ ४२ ॥**

जेव्हा स्त्रीपुरुषाचें विपरीत मैथुन होतें, त्या वेळेस स्त्री पतीच्या उरावर मुष्टियुक्त करघात हळू हळू मौजेनें करिते. त्या करघातास पंडित संतानिक म्हणतात.

॥ पताका ॥

**विस्तीर्णहस्तेन रतौ यदा स्त्री हन्यात्पतिं स्यात्सपताकसंज्ञ ॥**

रतिसमयीं स्त्री विस्तीर्ण हात करून जेव्हां पतीस हळू हळू कराघात करिते त्या ताडनास पताका म्हणतात.

॥ बिंदुमाला ॥

अंगुष्ठकेनैव कृतप्रहारो विज्ञैः स उक्तः खलु बिंदुमालः ॥ ४३ ॥

रतिसमयीं एकट्याच अंगुष्ठानें स्त्री नखन्यास चमत्कारिक विलासयुक्त टोंचते, त्यास झाले पुरुष बिंदुमाल ताडन निश्चयेंकरून म्हणतात.

॥ कुंडला ॥

सांगुष्ठमध्यांगुलिकाप्रहारं शनैः पुरंध्री कुरुतेऽतिरागात् ।
यद्येष उक्तः कविभिः पुराणैरानंदकृत्कुंडलनामधेयः ॥ ४४ ॥

रतिसमयीं स्त्रीनें फार प्रेमानें पतीस हळू हळू अंगुष्ठासहवर्तमान मध्यमांगुलीनें आनदयुक्त प्रहार केला असतां त्यांस पूर्वींचे कवि कुंडलप्रहार म्हणत आले. असें हें चार प्रकारचें ताडन सांगितलें. हें करताडन पुरुषानें स्त्रीस किंवा स्त्रीनें पुरुषाला संभोगाचे वेळीं सुख व्हावें म्हणून, तसेंच प्रेम वृद्धिंगत व्हावें म्हणून, प्रेमळपणानें हलक्या हातानें करावयाचें असतें. हें करताडन करताना क्लेश होणार नाहींत अशी सावधगिरी बाळगावी.

॥ सीत्कृताचे पांच प्रकार ॥

अथ सीत्कृतभेदांश्च पंचैव क्रमतो ब्रुवे ।
हिंकृतिस्तनितं सीत्कृदुत्कृतं तद्भवाकृति ॥ ४५ ॥

आतां सीत्कृताचे पाच भेद क्रमानें सागतों. १ हिंकृति, २ स्तनित, ३ सीत्कृत, ४ उत्कृत, ५ भवाकृति, अशीं हीं पाच सीत्कृतें आहेत.

॥ हिंकृतादि सीत्कृतांचीं लक्षणें ॥

उच्चारो मुखनासाभ्यां हिंकृतीमभिजायते ।
स्तनितं मेघगंभीरघोषवत्तदिदं स्मृतम् ॥ ४६ ॥
सीत्कृतं भुजगोच्छ्वासवत्तत्स्यादथोत्कृतम् ।
मेघबिंदुर्यथा तोये निपते तद्भवाकृति ॥ ४७ ॥

मुख आणि नासिकेच्या प्रयत्नानें जो नाकामध्यें उच्चार "हु" अथवा "हीं" असा गभीर आवाज होतो त्यास हिंकृति असें नाव आहे १ आणि नाकाच्या प्रयत्नावांचून नुसत्या कंठाच्या प्रयत्नानें जो उच्चार मेघगर्जने-सारखा खोल हा अथवा (ह) (ह) असा होतो त्यास स्तनित म्हणतात. २. सापाच्या उच्छ्वासासारखा जो तोंडामध्यें (शँ) (षँ) असा आवाज होतो त्यास सीत्कृत म्हणतात ३. आणि बाबू फोडतांना जो (थद्) (थद्) असा शब्द होतो, त्याप्रमाणें मुखात शब्द झाल्यास त्यास उत्कृत म्हणतात. हा शब्द जिभेचें अग्र टाळ्याला लावून प्रयत्न केला असता होतो ४. आता पाचवें भवाकृति कसें? जसा पावसाचा बिंदु उदकावर पडून (थप्) (थप्) असा शब्द होतो, त्याप्रमाणें नुसत्या दोन्ही ओठांनीं रतिसमयीं जो उच्चार केला जातो त्यास 'भवाकृति' असें नांव आहे.

संभोग करताना पुरुष स्त्रीचे स्तन अतिशय जोरानें आंवळून आपली कमर जोरजोरानें हालवू लागला म्हणजे त्याचे मुखांतून असे शब्दोच्चार निघतात. याला रतिशर्कांची मस्ती असेंहि म्हणतात.

॥ पाच प्रकारच्या सीत्कृतांचें शब्द ॥

**लावकोकिलकपोतहंसिकानीलकंठरुतसंनिभान् क्रमात् ।**
**संदधाति किल हिंत्कृतादिकांश्चित्रभोगसमये विलासिनी ॥ ४८ ॥**

विलासी स्त्रीनें भोगसमयीं या पांच सीत्कृताचे शब्द कसे करावे, तर सीत्कृताचा शब्द—१ लाव पक्ष्याच्या शब्दासारखा, २ कोकिळेच्या शब्दासारखा, ३ कपोत पक्ष्याप्रमाणें, ४ हंसी पक्षिणीच्या शब्दासारखा, ५ मोराच्या शब्दासारखा, असे चित्रविचित्र शब्द रतिसमयीं विलासी स्त्रीनें करावेत. हे सर्व पक्षी संभो-गाचे वेळीं आपआपले कामुक शब्द जसे उच्चारितात तसे स्त्रीनें उच्चारावेत.

॥ सीत्कृतें स्त्रीनें केव्हां करावीं ? ॥

**सुरते दशनच्छदा यदा प्रमदायाः परिखंड्यते भृशम् ।**
**दयिते न तदातिरागकृत् क्रियते सीत्कृतमंजसा तया ॥ ४९ ॥**

सुरताच्या वेळेस जेव्हां भ्रतार स्त्रीच्या अधरोष्ठाचें चुंबन अतिप्रीतीनें घेतो, त्या वेळेस विलासप्रीतिकारक आणि प्रेमवृद्धिदायक अशीं सीत्कृतें गोड गोड शब्दयुक्त स्त्रीनें करावीं.

॥ अष्ट महानायिका ॥

॥ खंडित नायिका ॥

निखिलसुरतचिन्हैरंगितांगैः सपत्न्या
अरुणकलुषनेत्रोऽनिद्रया जीवितेशः ।
समयमधुरवाक्यं प्रातरभ्येति यस्याः
कथयति भरतस्तां खंडिताख्यां पुरंध्रीम् ॥ ५० ॥

